मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ नागपूर

सर्व सभासदांसाठी निवडणूकविषयक अधिसूचना

(घटना कलम १२ (अं) नुसार)

विदर्भ साहित्य संघाच्या सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक १-४-१९८६ ते ३१-३-१९८९ ह्या तीन वर्षाकरिता विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळाचे १९ सभासद यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील:—

१. वरील पदांकरिता पाठवावयाच्या नामनिर्देशनपत्रिका निर्वाचनाधिकाऱ्यांच्या नावे केंद्रीय कार्यालयात शुक्रवार दिनांक १७-१-१९८६ सायंकाळी ८ वाजेपर्यंत पोचावयास हव्या. मतदारांच्या सूचीतील कोणत्याही व्यक्तीस सभासदाच्या सूचीमधील (दुरुस्त्यांसहित) कोणत्याही व्यक्तीचे नाव तिच्या लेखी अनुमतीसह सुचविता येईल. नामनिर्देशनपत्र जर पोष्टाने पोचते करणे असेल तर ते 'रजि. पोस्ट ॲकनॉलेजमेंट ड्यू' पद्धतीने पोचते केले पाहिजे. अशा तऱ्हेने पोचते झालेले नामनिर्देशनपत्र जर नेमलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत निर्वाचनाधिकाऱ्यास मिळाले असेल तरच ते छाननीत घेतले जाईल.

२. शनिवार दिनांक १८-१-१९८६ सायंकाळी ७ वाजता पासून केंद्रीय कार्यालयात उमेदवारांच्या नामनिर्देशन-पत्रिकांची छाननी करण्यात येईल. ह्यावेळी उमेदवारांना स्वत: किंवा त्यांनी लेखी नेमलेल्या प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल.

३. छाननीअंती स्वीकृत झालेल्या उमेदवारांची यादी केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर शनिवार दि. १८-१-१९८६ ला रात्री ९ वाजताचे सुमारास लावण्यात येईल.

४. नामनिर्देशन-पत्रिकांच्या स्वीकृती किंवा अस्वीकृतीबाबत लवादाकडे तक्रार-अर्ज करण्याची अंतिम तारीख गुरुवार दिनांक २३-१-१९८६ सायं. ७ वाजेपर्यंत ही राहील.

५. लवादासमोरील पहिल्या सुनावणीकरिता मंगळवार दिनांक २८-१-१९८६ सायं. ७ वाजता ही तारीख व वेळ निश्चित करण्यात आली आहे.

६. तक्रारीच्या अंतिम निकालाची तारीख बुधवार दिनांक ५-२-१९८६ सायंकाळी ७ वाजता राहील.

७. नामनिर्देशन-पत्रिका परत घेण्याची अंतिम तारीख रविवार दिनांक ९-२-१९८६, सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील.

८. उमेदवारी परत घेतल्या न गेलेल्या व ज्यांची उमेदवारी वैध आहे अशा उमेदवारांची यादी रविवार दिनांक ९-२-१९८६ ला रात्री ९ वाजताचे सुमारास सूचना-फलकावर लावण्यात येईल.

(मलपृष्ठ ३ वर)

युगवाणी

वर्ष एकेचाळीसावे अंक ११/१२ नोव्हें./डिसें. '८९

स्वगत....

युगवाणीचा हा अंक प्रकाशित होण्यास विलंब झाला आहे. "काही अपरिहार्य तांत्रिक कारणांमुळे हा विलंब आहे," असे मोघम सांगून जबाबदारी झटकणे शक्य आहे. पण तसे आम्ही म्हणणार नाही. अंकाच्या निर्मितीमध्ये संपादकासोबतच मुद्रक आणि चित्रकाराचाही बराच मोठा सहभाग असतो. या साऱ्याच बाबी वेळेवर जुळून आल्या नाहीत, तर विलंब अपरिहार्य होऊन जातो. या अंकाच्या बाबतीतही असाच प्रकार झाला आहे. वाचक, लेखकांनी उदार मनाने आम्हाला क्षमा करावी.

या निमित्ताने चाकरमाने आणि स्वयंस्फूर्त कार्यकर्ते यातील मूलभूत भेद ध्यानात घ्यावा. विदर्भ साहित्य संघासारख्या अनेकविध स्तरावर कार्यरत असलेल्या संस्थेला विविध अडीअडचणीतून पुढे जावे लागते. श्रम आणि वेळ खर्च करूनही कार्यकर्त्यांच्या वाट्याला दूषणे यायची ती येतातच. चाकरमान्यांना देण्यात येणारी दूषणे आणि कार्यकर्त्यांच्या बाबतीत होणारी टीका या दोन्ही बाबी फार वेगवेगळ्या आहेत. पण अनेकदा टीकाकार हा भेद साफ विसरून जातात, असो.

या अंकात स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट कथा आणि एकांकिकांचा समावेश आहे. वेगळा आशय आणि अभिव्यक्तीच्या कथा / एकांकिकांचा शोध घ्यावा, अशी भूमिका या स्पर्धेमागे होती. या भूमिकेला पूर्णतः अनुरूप अशा साहित्यकृती स्पर्धेतून सापडल्या नाहीत. तरी त्यातल्या त्यात काहीशा वेगळ्या कथा / एकांकिकांची निवड आम्ही केली आहे. वाचकांनी या निवडीबद्दलचा आपला अभिप्राय अवश्य कळवावा. युगवाणी हे नव्याजुन्या लेखकांचे वाङ्मयीन व्यासपीठ व्हावे, असा आमचा गेल्या तीन वर्षापासून सातत्याने प्रयत्न राहिला, तो कितपत यशस्वी झाला, हे वाचक / लेखकांनी ठरवावे. दोष आणि अपूर्णतेची जबाबदारी अर्थातच आमची आणि जी काही थोडीफार सफलता असेल, त्याचे मानकरी आपण वाचक, लेखक आहात, ही आमची भूमिका कायम आहे.


—प्रकाश देशपांडे
संपादक 'युगवाणी'

• विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या युगवाणीस महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त झाले आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२

अनुक्रमणिका

अनुक्रम



कथास्पर्धेतील निवड

वारसा

रमेश दा. गाडे

१

पात्रगत चंद्रबिंबाचा दृष्टांत आपल्या स्वतःला कितीही आवडला असला तरी तत्त्वज्ञानासारखा विषय एवढ्या एका दृष्टांताने आपल्या शिष्यांना कळलेला नाही हे आचार्यांना त्यांच्या चर्येवरून जाणवले. एवढा गहन विषय केवळ दृष्टांताच्या योगाने समजाविता येऊ शकेल की काय याबद्दलही

अनुक्रमणिका

त्यांना शंका होतीच. परंतु केवळ स्वानुभवातूनच प्रस्फुटित होणारे व्यक्तिगत सत्य समजावून सांगावयाचे तर दुसऱ्या कशाचाही उपयोग होणे अशक्य आहे हेही त्यांना ठाऊक होते. म्हणून आचार्यांनी आपल्या उत्सुक पण अबोध शिष्यांच्या सोयीसाठी दुसरा एक दृष्टांत देण्याचे ठरविले.

सकाळची वेळ होती. निबीड अरण्यातल्या आपल्या मठीसमोर आचार्य आपल्या निवडक शिष्यांसमवेत बसले होते. अद्वैतवाद हे त्यांचे प्राणप्रिय तत्त्व होते व त्याचा उमज आपल्या शिष्यांना पडावा अशी त्यांची तीव्र इच्छा होती. शिष्यांनाही तत्त्वज्ञानाच्या गहन अरण्यात शिरून वेदांताचे केवळ सारभूत तत्त्व समजावून घेण्याची ईर्ष्या होती.

शिष्यांच्या चेहऱ्यावरची निर्बोध छटा निरखीत आचार्य थोडा वेळ थांबले व मग पुढे म्हणाले–

"आता असे बघा. समजा, इथे एक दोरी पडली आहे. दोरी हे झाले सत्य. ती आपल्याला दोरीसारखीच दिसणार; कारण ती दोरी आहेच. पण अनेकदा आपल्याला, अपुऱ्या प्रकाशामुळे म्हणा किंवा आपल्या स्वतःच्या अज्ञानामुळे म्हणा, दोरीकडे पाहून सापाचा आभास होतो की नाही ?"

यावर साऱ्या शिष्यांनी संमतीदर्शक माना डोलावल्या.

"मग मला सांगा, तो आभास खरा असेल का ? त्या विशिष्ट वेळी कितीही प्रकर्षाने तसे वाटून गेले तरी त्या दोरीचा साप होतो का ? की ती दोरी, दोरीच राहते ?"

"आचार्य, दोरी शेवटी दोरीच राहणार !" एक शिष्य म्हणाला.

"ठीक. पण मला असे सांगा की तो आभास तरी खोटा होता का ? दोरी शेवटी दोरीच राहणार हे जरी खरे असले तरी तुम्हाला त्या ठिकाणी साप दिसला हेही खरेच आहे की नाही ?"

"होय." साऱ्या शिष्यांनी एकमुखाने प्रत्युत्तर दिले.

"मग आपण खरे काय समजायचे ? दोरी म्हणजे दोरी आहे हे, की दोरी म्हणजे साप आहे हे ?"

यावर कुणीच काही बोलले नाही.

मग आचार्यांनी सावकाश सुरुवात केली, "दोरी म्हणजे दोरीच असते. रज्जू आणि तिचे रज्जूत्व हे अविभाज्य आहे. आपल्याला सापाचा भास होतो, पण त्यामुळे ते रज्जुत्व नाश पावत नाही. कारण त्या भासालाही प्रमाणभूत शेवटी ते रज्जूत्वच आहे. दोरीच नसती तर तो सापाचा भास तरी कोठून होता ? रज्जू खरी आहे, आणि रज्जूत्व आणि सर्पत्व ह्या दोन्ही नृतानृतांना तिचाच आधार आहे. तसेच, हा मिथ्या संसारही त्या सत्यस्वरूप ब्रह्माच्याच जिवावर आहे. ह्याच्या तळाशी ब्रह्माचे अंग म्हणूनच याला प्रातिभासिक सत्यत्व तरी आले आहे. अन्यथा येते कोठून ? हे एकदा माहीत झाल्यावर आपल्याला करायचे ते एवढेच असते की सर्परूप म्हणजे, शेवटी भासच आहे हे जाणून दोरीकडे दोरी म्हणून पाहणे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, मायारूप आणि मिथ्या संसार हा शेवटी आभास आहे हे पक्के ओळखून त्या सत्यस्वरूप ब्रह्माचेच केवळ चिंतन करणे."

हा दृष्टांत मात्र शिष्यांना समजल्याचे आचार्यांनी त्यांच्या सहास्य मुद्रांवरून ताडले व मग त्यांनी एक श्लोक म्हणावयास प्रारंभ केला–

"श्लोकार्धेन प्रवक्ष्यामी यदुक्तं ग्रंथ कोटीःभी
ब्रह्मसत्य जगन्मिथ्या, जिवो ब्रह्मैव नापरः"

"कोटीशः ग्रंथांत सांगितलेले सत्य मी केवळ अर्ध्या श्लोकांत तुम्हास सांगतो. नीट ऐका. हा संसार मिथ्या आहे. केवळ ब्रह्म तेवढे सत्य आहे आणि जीव आणि ब्रह्म हे एकच. वेगवेगळे नाहीतच."

एवढ्यात मागे बसलेला एक शिष्य एकदम उठून उभा राहिला. त्याची चर्या भयभीत झाली होती आणि त्याला धड बोलणेही सुचत नव्हते.

"काय रे, काय झाले ?" आचार्यांनी विचारले.

"आचार्य...आचार्य, तो पहा...तो पहा एक हत्ती आपल्या आश्रमावरचं धावून येतोय्. पिसाळलेला असावा बहुतेक !" शिष्याने धापा टाकत उत्तर दिले.

पिसाळलेला हत्ती आश्रमावर धावून येत असल्याची वार्ता साऱ्यांनाच अप्रत्याशित होती

आणि ती ऐकून सारे उभे राहून हत्ती जिकडून येत होता तिकडे पाहू लागले. त्यांच्यात घबराट उडाली आणि प्रत्येक जण जिवाच्या भीतीने पळत सुटला. वार्ता सांगणारा शिष्य मात्र मूढासारखा तिथेच उभा होता. क्षणार्धात सारा आश्रम केवळ तो शिष्य नि स्वत: आचार्य वगळता निर्जन झाला.

त्या दरम्यान तो हत्ती आश्रमाच्या अगदी जवळ येऊन ठेपला होता. हे पाहून आचार्यही पळू लागले.

आचार्य पळताहेत हे पाहून त्या शिष्याला अत्यंत आश्चर्य वाटले. त्याला आचार्यांबद्दल फार आदर होता व त्या भावनेस साजेशा नम्र स्वरात आपल्या आश्चर्यास वाट करून देत तो म्हणाला, "आचार्य, जीव आणि ब्रह्म जर एकच आहेत तर आपण जिवाच्या भीतीने पळता का? हा संसार जर मिथ्या आहे तर सदेह ह्या संसारातच राहण्याची ही धडपड तरी का? हत्तीचा जीव अन् तुमचा जीव हे दोन्ही जर ब्रह्मरूपच आहेत तर कुणीही कुणाचा जीव घेतला तरी तो ब्रह्मातच विलीन होणार. बाकी सारा तर केवळ आभासच आहे. असे असता स्वतःचा जीव वाचविण्याची ही खरी-खुरी त्वरा तरी कां करता?"

यावर आचार्यांनी अत्यंत क्रोधाने त्याच्याकडे पाहिले. पण क्षणार्धात त्यांनी संयमित स्वरात त्या शिष्यास बजाविले, "मूर्खा, जगन्मिथ्या तथा पलायनपि मिथ्या!"

हे उत्तर ऐकताच त्या शिष्याचे आश्चर्य शत-गुणित झाले. आचार्यांकडून अशा उत्तराची त्याने अजिबात अपेक्षा केली नव्हती. आश्चर्याबरोबरच विषाद, भय आणि निराशा ह्या छटाही त्याच्या मुद्रेवरून सरकत गेल्या. एका बोटावरची थुंकी दुसऱ्या बोटावर उडविल्यासारखे हे उत्तर बनावट आहे, आचार्यांनाही ते सर्वार्थाने अभिप्रेत नसावे आणि केवळ तत्काल सोयीचे म्हणूनच त्यांनी ते दिले असावे असे त्याला वाटून गेले. पण हे सोयीचे उत्तर जर एखाद्या व्यक्तीने, समाजाने किंवा राष्ट्राने प्रत्येक निर्णायक अथवा दैनंदीन प्रसंगात वापरायचेच ठरविले तर तत्त्वनिष्ठा म्हणून काही राहणारच नाही व अशा उत्तराच्या अत्याधिक वापराने स्वार्थी व संधिसाधू लोकांच्या हाताव कोलीत दिल्यासारखे होईल हे त्याला जाणवून गेले.

पण आता तो मत्त कुंजर केवळ दहा पावलांवरच येऊन ठेपला होता आणि आचार्यांच्या तशा उत्तरामुळे व्यक्ती किंवा राष्ट्र यांचेवर येऊ घातलेल्या संभाव्य संकटपरंपरेची संपूर्ण आणि सखोल कल्पना येण्यापूर्वीच–जिवाच्या भीतीने त्या शिष्याने, आपल्या गुरुप्रमाणेच पलायन केले होते.

२

"माझ्या अथेन्सवासी मित्रांनो, तुम्ही ॲनिटसचे ऐका वा ऐकू नका, तुम्ही मला फासावर चढवा किंवा जीवदान द्या–तुम्ही काहीही केलेत तरी मी माझा उपक्रम सोडणार नाही. मग त्यासाठी तुम्ही मला हजारदा सुळी दिलेत तरी बेहेत्तर!"

सर्वसामान्य गुन्हेगारांसाठी असलेल्या ट्रिब्यूनल-पुढे सॉक्रेटीस आपला बचाव देत होता.

ज्या क्षणी त्याने ठामपणे हे शब्द उच्चारले–त्याच क्षणी त्याला मृत्यूदंड होणार हे जवळपास निश्चित झाले. तापलेल्या सांडसाचा चटका बसावा तसे क्रिटोला ते जाणवले आणि त्याच्या जिवाची तगमग वाढली. आपला एक प्रामाणिक आणि निर्भय मित्र हकनाक बळी जाणार आणि हे आता अटळ आहे, आपण ते शांतपणे स्वीकारलेच पाहिजे हे त्याला लख्ख जाणवले. सॉक्रेटीस बोलतच होता–

"माझ्यावर कोणते आरोप तुम्ही ठेवले आहेत? मी देव मानीत नाही आणि शहरातल्या तरुण मुलांना बिघडवितो हेच ना? डेल्फीच्या पुजारिणीनेच स्वत: मला सर्वात प्रगल्भ माणूस म्हणून घोषित केले नाही काय? आणि सत्य काय असत्य काय, नीती काय, अनीती काय, पाप कोणते आणि पुण्य कसे असते हे जर मी प्रामाणिकपणे ज्ञानवर्धनासाठी विचारले असेल तर त्याचा अर्थ मी अथेन्सवासियांना बिघडवितो असा होतो काय? मित्रांनो, मला तुम्ही सारे आदरणीय आहात, पण तुमच्या इच्छेपेक्षा ईश्वरी इच्छा मला जास्त प्यारी आहे आणि मी शेवटच्या श्वासापर्यंत सत्य काय आहे हेच तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न

अनुक्रमणिका

करणार. मी माझ्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष केले, पत्नी आणि तीन बछडी यांना वाऱ्यावर सोडले ते कुणाला भिऊन सत्याचा मार्ग सोडण्यासाठी नव्हे. मला माझा कोणताही बचाव द्यायचा नाहीय्. अथेन्सच्या कायद्याप्रमाणे जो निवाडा होईल तो मला शिरोधार्य आहे."

त्यानंतर झालेल्या मतदानात दोनशे एक्यांशी विरुद्ध दोनशे वीस अशा मतांनी त्यास मृत्युदंड फर्मविण्यात आला. ह्या शिक्षेवर "उःशाप" म्हणून त्याला फक्त दोनच मार्ग उपलब्ध होते. एकतर दंड भरून आपली सुटका करून घेणे किंवा विजनवास पत्करणे. कायद्याने त्याला तेवढी मुभा दिली होती. दंड भरणे त्याला शक्य नव्हते आणि विजनवास पसंत नव्हता.

"मित्रहो, मी इथे जन्मलो, इथेच वाढलो, तुमच्यातच वावरलो, आता मी ह्या मृत्यूला भिऊन दुसरीकडे कुठे जाऊ? आणि दुसरीकडे कुठेही माझा आत्मसन्मान कायम राहील काय ? शिवाय, जिथे कुठे मी जाईन, तिथले लोक माझी काय कदर करतील ? त्यापेक्षा, ज्या मातीत वाढलो त्या मातीतच माझी हाडे पडणे मला जास्त श्रेयस्कर आहे."

यावर लवादाचे सारे प्रतिनिधी उठले आणि– न्यायसभा बरखास्त झाली. सॉक्रेटीस पहारेकऱ्यां-बरोबर तुरुंगाकडे निघाला.

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटेच क्रिटो त्यास भेटावयास आला तेव्हा सॉक्रेटिसाने त्यास विचारले,–"अरे क्रिटो. तुला पहारेकऱ्यांनी एवढ्या लवकर सोडले तरी कसे ?"

"त्याची तुम्ही काळजी करू नका. ते सारे माझ्या ओळखीचे आहेत." क्रिटोने उत्तर दिले. त्यांच्या स्वरात प्रौढीची किंचित झाक होती. साक्रेटीस अंतर्यामी थोडा कष्टी झाला. तरीही त्याने हंसत क्रिटोस म्हटले, "बरे, अजून काय म्हणतोस ?"

"हे बघा, वेळ फार थोडा आहे. तुम्ही हा मृत्यू शांतपणे का स्वीकारता ? इथले सारे अधिकारी माझ्या ओळखीचे आहेत. अन् चार चव्वल फेकले की कुणालाही विकत घेता येतं. माझी सारी संपत्ती तुमच्या सारख्या–सज्जनाच्या मदतीला येऊ शकली नाही तर तिचा उपयोग तरी काय ? तुमची सुटका म्हणजे माझ्या हातचा मळ आहे. मी तुमच्यासाठी काहीच केले नाही तर ते मला डाचत राहील. लोक बोलतील. बरे, तुम्हाला ते नको असेल तर तुमच्यासाठी जीव टाकणारे हजार लोक आहेत. थेब्सच्या सिमियाने याच कामासाठी भरपूर पैसा आणलाय. तुम्ही आग्रह धरू नका. ज्यावेळी अथेन्सला तुमची सर्वात जास्त गरज आहे अगदी त्याचवेळी जीविताचा त्याग केल्याने तुम्ही अथेन्सशी प्रतारणा तर करालच, शिवाय एका दृष्टीने तुमच्या शत्रूंचेच हित कराल. हाच तर त्यांचा डाव आहे. महाराज मी पदर पसरतो. आपण विलंब करू नका. आज रात्रीच मी तुम्हाला मुक्त करतो, तुम्ही फक्त 'हो' म्हणा !"

क्रिटोच्या त्या लंब्याचवढ्या भाषणाचे सॉक्रे-टिसास हसू आले. हर्षामर्षाच्या पार गेलेल्या त्या महामानवास ही सारी विधाने परिचित होतीच ! क्रिटोचे आपल्यावरील प्रेमही त्याला ठाऊक होते. त्याच्या ह्या असल्या तर्कदुष्ट प्रस्तावामागे केवळ माया आहे हे तो ओळखून होता. पण अशी मतलबी माया आपण आरंभापासूनच ठोकरत आलो, हे दीर्घकाल आपल्या सहवासात राहिलेल्या क्रिटोला उमजू नये ह्याचा त्याला विषाद वाटला. शेवटच्या परिक्षेतही आपला प्रियतम शिष्य नापास झाल्याचे पाहणे त्याच्या कपाळी आले होते ! पण मनक्षोभ आवरून त्याने अगदी संथ सुरात बोलायला सुरू-वात केली–

"हे बघ क्रिटो, तुला लोक काय म्हणतील किंवा माझ्या मरणाने कुणाचा फायदा होईल ह्याचेशी मला काय करायचे आहे ? माझ्या अंतरात्म्याचेच मी आजवर ऐकत आलो आणि तर्काला न पटणारी गोष्ट मी आजवर कधी केली नाही. आताही तसे न करण्याचे मला काही कारण दिसत नाही. केवळ मृत्यूच्या भीतीने मी आजवर जपलेली मूल्ये नाका-रावीत हे तुला आवडेल काय ?"

"नाही."

"हे बघ एखादे कृत्य करताना ते योग्य आहे वा अयोग्य ह्याचाच विचार होणे अवश्य आहे."

"आपण योग्य तेच बोललात."

"मग मला सांग की माझी सुटका अवैध मार्गाने करून घेण्यास अथेन्सच्या कायद्यांची संमती आहे काय ?"

"अर्थात, नाही."

"मग, मी जन्माला आल्याबरोबर–अन् मी औरस प्रजा आहे–माझा अथेन्स नगरातील कायद्यांबरोबर जो करार झाला आहे तो मला एकतर्फी कसा मोडता येईल ? तसे केले तर ते कायदे मला म्हणतील, 'सॉक्रेटीस तू असे करू शकत नाहीस. या नगरातले कायदे अन्यायकारक आहेत असे तुला वाटते काय ? नाही ना ? मग तू नियमभंग का करतोस ? हां, तुला शिक्षा करणारी माणसे उलटचा काळजाची असतील पण तरीही त्यांनी कायद्याप्रमाणे दिलेली शिक्षा भोगणे तुला क्रमप्राप्त नाही काय ?' यावर तुझे काय उत्तर आहे क्रिटो ?"

क्रिटो यावर स्तब्धच बसला. सॉक्रेटिसाच्या विधानातील तर्कशुद्धता अगदी बावनकशी होती. कायदापालनाचे एकदा स्वीकारलेले व्रत त्याला प्राणप्रिय वाटत होते व त्यापुढे त्याला कायदा अगदी बेकायदेशीरपणे वाकविणाऱ्या अन्यायी माणसांची क्षिती नव्हती. तो अगदी हळू आवाजात म्हणाला, 'येऊ मी आता ?'

सॉक्रेटीस मोकळा हंसला नि त्याच्या मानेवरील केस ओढीत म्हणाला, "बरे ये."

* * *

आज त्याच्या आयुष्यातला शेवटचा दिवस होता.

सॉक्रेटीस आपल्या मित्रांच्या गराड्यात बसला होता. त्यांत फिडो होता, क्रिटो होता, अपोलोडोरस होता. थेब्सहून आलेले सिमिया अन् सिबे सुद्धा होते. प्लेटो मात्र नव्हता. त्या साऱ्यांचे चेहरे काळवंडले होते. सॉक्रेटीस मात्र शांत होता. कुणीच बोलत नाही असे पाहून त्यानेच स्वतः सिमियाशी बातचित सुरू केली.

अन् बघता बघता चर्चा रंगत गेली.

"तुम्ही हे नीट लक्षात ठेवा की, माणसांच्या मृत्युबरोबर त्याच्या सर्वस्वाचा नाश होतो असे नव्हे. आपण आत्ताच पाहिल्याप्रमाणे, माणसाचा देहपात झाला तरी त्याचा आत्मा अमर असतो." असे म्हणून सॉक्रेटिसाने चर्चेचा समारोप केला.

यावर बराच वेळ सारे स्तब्धच होते.

थोड्या वेळाने सॉक्रेटीस निरोपाच्या सुरात म्हणाला, "मित्र हो, आता उठू या. पण मी सांगितलेले सारे नीट ध्यानात ठेवा सत्याकडे जाण्याचा एकच मार्ग आहे अन् तो म्हणजे तर्कशक्ती. तर्कशक्तीचा दुस्वास करण्याइतके अधम कर्म दुसरे कोणते असूच शकत नाही. असो. आता मी स्नान करणार. म्हणजे मग मागाहून स्नान घालण्याची कटकट नको !"

एवढ्यांत त्याची पत्नी आपल्या तिन्ही मुलांना घेऊन आली. त्यांच्यासोबत तो थोडावेळ बोलला. अन् स्नानगृहात निघून गेला. झांटीपी मोठ्याने आक्रोशत तुरुंगाबाहेर पडली.


तो स्नान करून आला तो वर तुरुंगाधिकाऱ्यांनी विषाचा पेला तयार ठेवलाच होता.

सॉक्रेटिसाने एकवार आपल्या साऱ्या मित्रांकडे शेवटचे पाहून घेतले. मग तो क्रिटोकडे वळून म्हणाला, "क्रिटो, ॲस्लेपियसला मी एक कोंबडे कबूल केले होते, तू ते द्यायला विसरू नकोस." यावर क्रिटोने नुसती मान हलविली अन् त्याबरोबर त्याच्या डोळ्यातले दोन थेंब गालावर सरकले.

"बरंय येतो," एवढेच म्हणून मग सॉक्रेटिसाने युरोपच्या संजीवनाचा तो पेला आपल्या ओठांना लावला.

रमेश दा. गाडे
१०४, 'प्राची'
रिझर्व्ह बँक कॉलनी,
खामला, नागपूर.

△ △ △



कथास्पर्धेतील निवड

इट हॅपन्स

प्रवीण वर्दापूरकर

रावसाहेब गवले

'आजचा समाचार नाही आला?' अदबीनं उभ्या असलेल्या पी. ए. ला चहाचा कप खाली ठेवत रावसाहेबांनी तिसऱ्यांदा विचारलं.

'आलाय सर...पण...' पी. ए.

'पण काय?' रावसाहेबांनी विचारलं.

'नाही सर...आणतो...सर...पण आपला मूड

अनुक्रमणिका

खराब होईल म्हणून मुद्दामच ठेवला नाही' पी. ए. नं सांगितलं.

'आमच्याविरुद्ध बातमी आहे का समाचार-मध्ये ? कोणतं प्रकरण मिळालं आमचं समाचारला बातमीसाठी ?' रावसाहेबांनी चहाचा दुसरा कप भरत विचारलं.

'सर...परवाच्या रेडची...' पी. ए.

'रेडची ?' चमकून रावसाहेबांनी विचारलं. आणा...बघू तर द्या आम्हाला.'

पी. ए. बेडरुमबाहेर गेला.

रावसाहेबांच्या कपाळावर आठयांचं जाळं पसरलं.

'समाचार' हे राज्यातलं एक प्रमुख वृत्तपत्र. नागपूरहून प्रसिद्ध होणार.

रावसाहेब गवले यांच्या विभागातलं सर्वाधिक खपाचं. खराखुरा गृहित धरला तरी खप साठ-पासष्ट हजार.

पी. ए. नं समाचार आणला. पहिल्या पानावर, अगदी वरच्या बाजूस एक सिंगल कॉलम बातमी होती—

मंत्र्याच्या घरावर आयकर खात्याची धाड

अमरावती ता. ५ : राज्याच्या मंत्रि-मंडळातील एका ज्येष्ठ कॅबिनेट मंत्र्याच्या येथील निवासस्थानी आयकर खात्यातर्फे दोन दिवसापूर्वी धाड घालण्यात आल्याचे विश्वसनीयरीत्या समजते. धाडीत सतरा लाख, अठ्ठावन्न हजार रुपये रोख, लाखो रुपयांचे बेहिशेबी दागिने आणि संशयास्पद व्यवहाराचा सकृतदर्शनी सबळ पुरावा अस-णारी अनेक कागदपत्र सापडली. धाड आणि कागदपत्रे तपासणीचे काम जवळजवळ चौदा तास चालू होते. धाडीचे वृत्त समजताच सदर मंत्री तातडीने आपल्या गावी आले आणि त्यांनी अधिकाऱ्यांना त्याबद्दल पृच्छा केली. परंतु, वारंट दाखवून काहीही सांग-ण्यास अधिकाऱ्यांनी नकार दिला असे समजते.

या प्रकरणी आयकर खात्याच्या संबंधित अधिकऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी अधिकृतपणे काहीही सांगण्यास नकार दिला. परंतु धाड घातल्याच्या वृत्ताचा इन्कारही केला नाही.

ठळक टाईपातली ही बातमी वाचल्यावर राव-साहेबांचा चेहरा गंभीर झाला. पेपर खाली ठेवत त्यांनी पी. ए. ला विचारलं, 'बाहेर कोण कोण आलंय ?'

'बरीच मंडळी आली आहेत. वेंकटेशरावसुद्धा आहेत. बोलावू ?' पी. ए.

'वेंकटेशला बोलवा आणि इतर मंडळींना सांगा मी झोपलोय दहा वाजेपर्यंत भेटणार नाही. फोनही आणा आत येताना.' रावसाहेबांनी सांगितलं.

डनहिल पेटवून रावसाहेबांनी येरझारा सुरू केल्या.

रावसाहेब गवले. राज्याच्या मंत्रिमंडळातील एक ज्येष्ठ आणि मुरब्बी मंत्री. मूळचे अमरावतीचे. पंधरा वर्षापूर्वी बऱ्यापैकी चालणाऱ्या वकिलीला रामराम ठोकून रावसाहेब राजकारणात उतरले आणि मग त्यांना मागे वळून पाहण्याची सुद्धा उसंत मिळाली नाही. राजकारणात आमदार, उप-मंत्री, राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्रिपदापर्यंत मजल मारतानाच शेती, उद्योग, शिक्षण संस्था याचा पसारा वाढू लागला. गव्हाळ वर्ण, शिडशिडीत बांधा, धारदार नाक, त्याला शोभेसा रेखीव चेहरा, सर्वप्रकारच्या श्रोत्यांना जागेवर खिळवून ठेवील असे वक्तृत्व. त्यासाठी आवश्यक असणारा अभ्यास करण्याची सदैव तयारी. आणि महत्त्वाचे म्हणजे मितभाषी स्वभाव. त्याच्या जोडीला डोकं शांत ठेवण्याची जन्मजात सवय. याच्या जोरावर राव-साहेब राज्याच्या राजकारणात इतके स्थिरावले की आठ महिन्यापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर संभाव्य मुख्यमंत्री म्हणून त्यांचंही नाव शर्यतीत होतं. उघडपणे शर्यतीत सामील न होता वृत्तपत्रांच्या माध्यमातून आपलं नाव अतिशय चतुराईने रावसाहेबांनी स्वतःच मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत घुसवलं आहे; हे त्यांच्या पत्नीलाही ठाऊक नव्हतं !

वेंकटेशराव आत आले. त्यांच्याही हातात समाचारचा अंक होता.

वेंकटेशराव जाधव हे रावसाहेब गवले यांचा उजवा हात. उग्र चेहरा, ताशीव काळी शरीरयष्टी,

मनगटात कमावलेली ताकद, डोकं पैलवानकीला शोभेलसं भडक, फक्त रावसाहेबांसमोर झुकणारं. वीस–बावीस वर्षापूर्वी म्हणजे रावसाहेबांनी वकिली सुरू करण्याआधी वेंकटेशराव वस्तीचे दादा होते. रावसाहेबांनी त्यांना स्वत:कडे ठेवून घेतलं. चालू असलेल्या कोर्टकेसेसमधून सोडवलं. पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून सायकली भाड्याने देणाऱ्या वेंकटेशचीही रावसाहेबांच्याबरोबर भरभराट सुरू झाली. वेंकटेशदादाचा वेंकटेशराव झाला. रावसाहेबांच्या शिक्षणसंस्था, रावसाहेबांच्या पत्नी आणि मुलांच्या नावे असलेल्या अनेक एजन्सीज, तीन हॉटेल्स, आणि एका मद्य प्रक्रिया कारखान्याचे वेंकटेशराव भागीदार झाले.

'साहेब करू का पार त्या समाचारच्या पोट्ट्याला ? का समाचारवर मोर्चा नेऊन राडा करून येऊ ?' आत येताच वेंकटेशरावने अशा आवाजात विचारलं की त्यासाठी हवी असणारी संपूर्ण तयारी करूनच ते आले आहेत.

'घे, चहा घे...' म्हणत रावसाहेबांनी चहाचा कप त्याच्या हाती दिला. स्वत:साठीही तिसरा कप भरून घेतला. एक घोट पिऊन धीम्या आवाजात रावसाहेब म्हणाले, 'असं करून नाही जमणार. दुसराच मार्ग शोधावा लागेल.'

'साहेब, अशी मुंडी पिरगाळतो त्याची की कुणालाच पत्ता लागणार नाही. आपली इज्जत पार डाऊन झाली आहे या न्यूजने.' वेंकटेशराव संतापून म्हणाले.

जरबेच्या आवाजात रावसाहेबांनी वेंकटेशरावला बजावले...'हे बघा, आम्ही म्हणू तोपर्यंत या प्रकरणात तुम्ही लक्ष घालू नका...कळलं ?'

वेंकटेशरावने मान हलवली.

'समाचारच्या शंतनू कात्रेंना फोन लावा' असं पी. ए. ला सांगून रावसाहेब वेंकटेशरावला म्हणाले, 'वेंकट, बातमीत नाव नसलं तरी सारं काही स्पष्ट आहे. सतरा लाख अठ्ठावन्न हजार रुपये रोख, चौदा तास, इनकमटॅक्सवाल्यांनी इन्कार न करणे...या गोष्टी खऱ्याच आहेत. अजित कानविंदे आणि असिस्टंट इन्कमटॅक्स कमिशनर केसरी साहेब यांची दोस्ती आम्हाला ठाऊक आहे...' रावसाहेबांचे बोलणे अर्धवटच राहिले. पी. ए. ने कात्रेंना फोन लावून रिसिव्हर हातात दिला–

रावसाहेबांनी बोलणे सुरू केले, 'काय म्हणतात समाचारचे मॅनेजिंग डायरेक्टर ?'

* * *

अजित कानविंदे

फोनची बेल वाजत होती.

हात लांब करून अजितनी रिसिव्हर उचलला.

'हॅलो, अजित बोलतोय.'

'मी, केसरी,' पलिकडून आवाज आला.

'गुडमॉर्निंग सर, एवढ्या सकाळी अस्मादिकांची आठवण म्हणजे समाचारमधली बातमी वाचलेली दिसते.' असं म्हणत अजितनी बेडच्या दुसऱ्या टोकाला जात समाचारचा अंक उचलला.

'अजित, मी आधीही तुला सांगितलं आहे. आता परत सांगतो, तू ही बातमी छापायला नको होतीस. आता छापलीच आहे तर निर्माण होणाऱ्या भानगडी तुला एकट्यालाच निस्तराव्या लागतील,' केसरींनी आठवण करून दिली.

'ओ. के. नो प्रॉब्लेम.' अजित फिस्कारला.

'आणि आता किमान मला पंधरा दिवस भेटू नकोस. कळलं ना ?' एवढं बजावून केसरींनी फोन बंद केला.

अजित कानविंदे.

समाचार ह्या दैनिकाचा अमरावतीचा जिल्हा प्रतिनिधी. वय वर्षे तीस. शिक्षण एम्. कॉम. प्राध्यापकी सोडून वृत्तपत्राच्या धबडग्यात शिरला तो दहा वर्षापूर्वी. त्यावेळी रावसाहेब गवाले राज्याच्या मंत्रिमंडळात उपमंत्री होते. दहा वर्षात अजित राज्यातल्या प्रमुख दहा वार्ताहरात गणला जाऊ लागला. जबरदस्त आकलनशक्ती, समोरच्या माणसाला सहज गुंडाळू शकेल अशी गोड भाषा आणि रिपोर्टिंग करताना एकही अक्षर लिहून न घेणे ही त्याची खासीयत.

समाचारचे जवळजवळ सोळा हजार म्हणजे, शहर आवृत्ती इतके अंक अमरावतीत विकले जातात. महिन्याला गेला बाजार २०–२५ नी मागणी वाढतेच आहे. हे अजितचं एकट्याचं कर्तृत्व. शिवाय वर्षाला सात–साडेसात लाखाचा धंदा जाहिरातीच्या स्वरुपात समाचारला सहज

मिळतोय. हेही अजितचं एकटयाचं कर्तृत्व. एक दोनदा समाचारच्या जाहिरात विभागानी अमरावतीतून परस्पर जाहिराती मिळवायचा प्रयत्न केला. पण तो फसला साफ. अजितची वसुलीही काटेकोर. बातम्या, जाहिराती, वितरण, वसुली ही सर्व कामं अजित एकटा मॅनेज करतो. अजितच्या कामाची वाखाणणी खुद्द मॅनेजिंग डायरेक्टर करतात.

समाचार आणि इतर दैनिकांचे अंक चाळून झाल्यावर अजित पुन्हा आडवा झाला. धाडीच्या बातमीनी धम्माल उडणार होती. पुढील घडामोडी कशा आकार घेतील याचा विचार करता करता त्याला आठवलं. दोन दिवसांपूर्वी ही बातमी देऊ नकोस असं वारंवार सांगताना केसरी म्हणाले होते, 'लक्षात घे, तुमच्या पेपरनी सत्ताधाऱ्यांना कधीच दुखावलेलं नाहीये आतापर्यंत. त्याही पेक्षा महत्त्वाचं म्हणजे तुझा एम्. डी. कात्रे आणि रावसाहेब कॉलेज जीवनापासून दोस्त आहेत.' केसरींचं ते वाक्य आठवताच आपणच हे सारं एम्. डी.च्या कानावर घालावं म्हणून अजितनी कात्रे साहेबांच्या घरचा फोन फिरवायला सुरुवात केली.

एक–दोन...तीनदा फोन सतत एंगेज लागत होता.

*   *   *

शंतनु कात्रे

शंतनु कात्रे. वय ४३ वर्षे. एक्झिक्युटिव्हला शोभणारा टिपिकल तरतरीत चेहरा. सोनेरी फ्रेमच्या चष्म्यानी अधिकच खुलणारा. 'मी रिझल्ट ओरिएन्टेड आहे' असं सांगणारे कात्रे वागतातही तसेच. माणूस अतिशय टापटिपीचा आणि वक्तशीर. समाचारमध्ये येण्याआधी कात्रे एका बडया उद्योगसमुहात पर्सोनेल मॅनेजर होते. त्यांचा तेथला कामाचा वकूब एवढा दांडगा होता की त्या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर पाराशर 'माझ्या नंतरचा मॅनेजिंग डायरेक्टर' असा कात्रेंचा उल्लेख उघडपणे करीत. चार्टर्ड अकाऊंटंटची पदवी संपादन केल्यावर व्यवस्थापनाचा उच्च अभ्यासक्रम कात्रे यांनी अमेरिकेत पूर्ण केला. तिकडेच तीन–चार वर्षे उमेदवारी केल्यावर ते भारतात आले.

समाचारच्या चेअरमननी मॅनेजिंग डायरेक्टर या पदाची ऑफर दिली तेव्हा वृत्तपत्रीय क्षेत्राबद्दल कात्रे अनभिज्ञ होते. पण चाळीसाव्या वर्षी मॅनेजिंग डायरेक्टरची पोस्ट. अत्यंत आकर्षक पगार आणि वृत्तपत्रासारखे स्वतःची स्वतंत्र अशी इमेज तयार करणारे माध्यम हातातून सोडण्याइतका मूर्खपणा कात्रेंसारखा दूरदर्शी एक्झिक्युटिव्ह करणे शक्यच नव्हते.

आणि तीन वर्षात समाचारनी अक्षरशः कात टाकली. सर्वांचा विरोध पत्करून कात्रेंनी आणलेले अद्यावत् तंत्रज्ञान आणि शिस्त यामुळे समाचारचा खप पंचवीस हजारांनी वाढला.

कात्रेंची तीन वर्षं ही जिद्द आणि अफाट मेहनत यातून यश कसं पदरात पडतं याचं सुरेख उदाहरण, समाचारचं बदललेलं स्वरूप आणि वाढलेली आर्थिक उलाढाल हे होतं. पंचेचाळीस वर्षांची परंपरा असलेल्या समाचारची वार्षिक उलाढाल कात्रे येण्याआधी ४५ लाखही नव्हती. तीन वर्षात कात्रेंनी त्यात दीडपट वाढ केली. ह्यासाठी रावसाहेब गवळे या वर्गमित्राचा कात्रेंना चांगलाच उपयोग झाला. समाचारसारखं वृत्तपत्र हाताशी असणं केव्हाही चांगलं या भूमिकेतून गवळे कात्रेंना मदत करत होते तर, समाचारच्या भरवशावर गवळेंना आपण केव्हाही त्यांची जागा दाखवू शकतो या भूमिकेतून कात्रे त्यांची मदत घेत होते.

नवीन तंत्रज्ञान आणण्यापूर्वी त्याबद्दलची स्वतःची भूमिका मांडताना संपादकीय विभागाच्या एका बैठकीत कात्रे म्हणाले, 'संपादकाच्या नावाने वृत्तपत्र बाजारात खपण्याचे दिवस आता संपत आले आहेत. केवळ उत्कृष्ट बातम्या किंवा अग्रलेख लिहून वृत्तपत्र विकले जाणार नाही तर त्याचे प्रेझेंटेशनही सुंदर हवे. त्यासाठी छपाईचे अद्यावत तंत्रज्ञान अतिशय आवश्यक आहे. वर्तमानपत्राचं दिसणं एखाद्या सुंदर नटीसारखं असलं पाहिजे; तरच ते कुणी हातात घेईल. वृत्तपत्राला सुंदर करण्यासाठीचा खर्च जाहिरातीतूनच मिळू शकतो. वृत्तपत्र बातम्यांइतकंच; अधिक स्पष्ट बोलतो माफ करा, बातम्यांपेक्षा थोडसं जास्तच जाहिरातींवर जगत असतं. वृत्तपत्रांसाठी जाहिराती ऑक्सिजन आहेत. समाचारचं स्वरूप बदलण्यासाठी तुमचं सहकार्य मला हवं आहे.' बैठकीत कुणीच काही

बोललं नाही. कात्रे पुढे म्हणाले, 'रिपोर्टर्सना मला एक विशेष विनंती करायची आहे. रिपोर्टर्स आर द फेस ऑफ समचार. सो दे शूड हॅव अ ब्युटिफुल अॅन्ड इंप्रेसिव्ह अॅपिअरन्स. या महिन्यापासून रिपोर्टर्ससाठी मी दरमहा १०० रुपये अलाऊन्स मंजूर करीत आहे.'

कात्रेंच्या म्हणण्याला विरोध करण्यात अर्थच नाही हे संपादकीय विभागातील सर्वजण ओळखून होते. कारण आतापर्यंत झालेला विरोध कात्रेंनी खंबीरपणे मोडून काढला होता.

चहानंतर बैठक संपवताना कात्रे म्हणाले, 'मला तुमचं सहकार्य हवं आहे, विरोध नको. मला विरोध आवडत नाही.'

* * *

सकाळी समाचारचा अंक हातात घेतल्याबरोबर 'मंत्र्याच्या घरावर आयकर खात्याची धाड' या बातमीने कात्रेसाहेबांचे लक्ष वेधले. बातमी वाचल्यावर पाईप पेटवून ते रिलॅक्स झाले. रावसाहेब गवळे नागपुरातच आहेत हे त्यांना माहित होतं. त्यांचा फोन येणार हे त्यांनी गृहित धरलं. कात्रेंच्या डोक्यातला कॉम्प्युटर सुरू झाला.

तीन चार मिनिटातच फोनची वेल वाजली. कात्रेंनी हात लांब करून फोनची ट्रॉली जवळ ओढली. रिसिव्हर उचलला—

'एस. कात्रे स्पिकिंग'

... ...

'कोण रावसाहेब? द्या ना'

... ...

'काय रे, रावसाहेब. कधी आलास नागपूरला. आणि इतक्या सकाळी आम्हा गरिबाची आठवण कशी झाली तुला?' कात्रेंनी सहज स्वरात विचारलं.

* * *

रावसाहेब गवळे

मंगळवारी रात्री मुंबईहून येणारं विमान नागपूरला पोहोचलं तेव्हा पाऊस धुवांधार कोसळत होता.

विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना आणि उद्या एक लक्षवेधी सूचना असताना रावसाहेबांनी मुंबई सोडणे योग्य नव्हते. पण आज त्यांच्या खात्याच्या प्रश्नोत्तराचा दिवस होता. विदर्भातल्या एका विरोधी आमदाराने समाचारच्या शनिवारच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या आधारे उपप्रश्न विचारला.

अध्यक्षांनी गैरलागू म्हणून प्रश्न फेटाळला तर खरा, पण स्वतंत्र चर्चा उपस्थित केली तर विचार करण्याचे आश्वासन दिले आणि त्याचक्षणी रावसाहेबांनी जातीने हे प्रकरण निकालात काढण्याचा निर्णय घेतला. त्या बातमीचा खुलासा न करता आला तर त्याचा फायदा पक्षातले विरोधक निश्चितच उचलणार हे रावसाहेबांनी ओळखलं. त्या निमित्ताने घोंगावणाऱ्या वादळाला तोंड देण्याची ताकद रावसाहेबात होती. त्यामुळे त्यांची प्रतिमा अधिक उजळ बनलीही असती. पण पत्नीच्या नावाने एका जपानी उद्योगाबरोबर चाललेली कोलॅबरेशनची बोलणी पूर्ण झाली होती. मोपेडसचा तो कारखाना सहा आठ महिन्यात सुरू करायचा म्हणजे सोवळं राहून जमणार नव्हतं. आज रात्री शंतनु कात्रेंकडे जेवायला गेल्यावर या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागायलाच हवा होता. कोणत्याही किंमतीवर.

वेंकटेशराव गाडीचा दरवाजा उघडून उभे होते. काहीही न बोलता रावसाहेब गाडीत बसले. डनहिल पेटवून विमानात मिळालेल्या तासाभराच्या निवांत वेळात सापडलेल्या तोडग्याची उजळणी त्यांनी सुरू केली. लाल दिवा लावलेली गाडी सुसाट वेगानी रविभवनाकडे धावू लागली.

रविभवनला पोहोचल्यावर फ्रेश होऊन वेंकटेशरावांनी आणलेली फाईल चाळण्यात रावसाहेब गढून गेले. अधुनमधून ते नोटसही घेत होते.

* * *

कात्रेंकडे पोहोचले तेव्हा रावसाहेबांची सौदा करण्यासाठीची तयारी पूर्ण झालेली होती.

सौभाग्यवती आणि चिरंजीव कात्रेंची चौकशी झाली.

कात्रे आणि रावसाहेब स्टडीत शिरले.

सारा सरंजाम सिद्ध होता.

पेग भरून एक सिप घेतल्यावर रावसाहेबांनी सरळ मुद्याला हात घातला; 'काय करायचं ठरवलं आहे त्या बातमीबद्दल?'

'काय करायचं ?' कात्रेंनी सावधपणे विचारलं.

'हे बघ शंतनू, ती बातमी स्पष्टच आहे. तो मंत्री मीच हे कुणीही शेंबडं पोर सांगेल. महत्त्वाचं म्हणजे हाऊसमध्ये आज त्या बातमीचा ओझरता उल्लेख झाला. उद्या कदाचित गोंधळ माजेल त्यावर. मला संपवण्याचा काही प्लॅन आहे का तुझ्या डोक्यात ?' रावसाहेबांनी विचारलं.

'आज हाऊसमध्ये त्या बातमीचा ओझरता उल्लेख झाला, या रावसाहेबांनी केलेल्या उल्लेखानी कात्रेंच्या डोक्यातला कॉम्प्युटर सुरू झाला. रावसाहेब संपायला तर नको आहे एवढ्यात पण त्याला आपल्या ताकदीची जाणीव झाली आहे. आणि सौदा करताना आपल्या पदरात जास्तीत जास्त पाडून घ्यायची हीच वेळ आहे हे ओळखून कात्रे गप्प राहिले. मुंबईच्या प्रतिनिधीने ही बातमी आधीच आपल्याला न कळवल्याबद्दल त्याला उद्या झापायचंही कात्रेंनी ठरवून टाकलं.

कात्रेंचं मौन पुरेसं बोलकं आहे हे रावसाहेब जाणून होते. खिशातून कागदाचं एक चिठोरं काढून रावसाहेब बोलू लागले, 'तुझ्या समाचारच्या जवळजवळ साडेतीन हजार कॉपीज आम्ही घेतो, आमच्या उद्योगांमार्फत वर्षाला जाहिरातींचा दीड लाखाचा बिझिनेस देतो, समाचारचा सरकारी जाहिरातीचा दर मीच १५ रुपयांवरून ३५ रुपयांवर नेला आहे. तुला काय हवंय आणखी ?'

'तू काय देऊ शकतोस ?' कात्रेंनी विचारलं.

'जपानच्या एका कंपनीबरोबर कोलॅबरेशनमध्ये मोपेडस्‌चा कारखाना काढतोय. सहा आठ महिन्यात उत्पादन सुरू होईल. समाचारला अडीच तीन लाखाचा बिझिनेस देतो, अगदी कमिटेड. जाहिरातीचा दर पाच रुपयांनी वाढवून देतो.' रावसाहेबांनी पहिला पत्ता फेकला.

'बस ?'—कात्रे.

'आणखी काय हवंय तुला ? नवीन कारखान्यात भागीदारी ?'

कात्रे चटकन्‌ रिॲक्ट झाले, 'मुळीच नको ! ती मिळवायचीच झाली तर मी बातमीचा आधार मुळीच घेणार नाही हे तू लक्षात ठेव.'

'मग ?' सौदा कोणत्या दिशेला जातोय हे न कळून रावसाहेबांनी विचारलं.

स्वत:चा दुसरा पेग भरून घेतल्यावर उजव्या हाताचा अंगठा, तर्जनी आणि मधल्या बोटानी नाकावर घसरलेला चष्मा वर ढकलत कात्रे म्हणाले, 'हे बघ, मला तुझ्याकडून जाहिरातीचा एकूण बिझिनेस वर्षाला पाच लाखांचा हवा. तुझ्याच शब्दात बोलायचं झालं तर अगदी कमिटेड. दुसरं म्हणजे सरकारी जाहिरातीचा दर ३५ वरून ५५ रुपयांवर आणि तुझ्याकडून किमान वर्षासाठी समाचारचे पाच हजार अंक विकत घेण्याची हमी हवी.'

चित्र स्पष्ट झालं. हुकुमाचे पत्ते रावसाहेबांकडे भिरकवून कात्रे इझी चेअरमध्ये रिलॅक्स झाले.

पेग हातात घेऊन रावसाहेबांनी डोळे मिटले. 'सौदा वरवर पाहता महाग वाटत असला तरी खिशातून फक्त पाच हजार अंकांचे पैसे जाणार. कंपनी स्थिर होईपर्यंत जाहिरातीचा ७५ टक्के खर्च जपानी कंपनीच देणार आहे; जाहिरातीचा दर वाढवून देणंही फारसं अवघड नाहीच. पण पदरात काय पडणार ?' रावसाहेब भविष्याचा वेध घेऊ लागले—'आपण आज राज्यात नंबर दोन आहोत. दोन वर्षात कदाचित नंबर एक असू. मैदान साफ व्हायसाठी एवढी किंमत मोजायला काहीच हरकत नाही.' हात पुढे करत रावसाहेबांनी होकार दिला, 'डन ! पण...'

'पण काय ?' कात्रेंच्या चेहऱ्यावर सावधपणा अतिशय स्पष्ट पसरला.

'असा सावध होऊ नकोस उगाचच !' कात्रेंचा हात दाबत रावसाहेब म्हणाले, 'खुलासा त्या अजितकडूनच लिहून घे.'

हसत हसत कात्रे म्हणाले, 'तू राजकारणात गेलास पण बुद्धीबळ विसरलास रे बाबा. राजाला वाचवायसाठी प्याद्यांचा बळी पडतच असतो हे माहित नाही का तुला ?'

'तसं नाही मॅनेजिंग डायरेक्टर साहेब' रावसाहेबांनी आवाज राजकारणी संथ केला. 'राजकारणाच्या खेळात उंटाची तिरकी चाल रोखायची असते नेहमी. याला अधिकचे उणे करणे म्हणतात आमच्या भाषेत. पत्रकार म्हणजे उंट. त्यांची तिरकी चाल सदैव जेरबंद केली गेली पाहिजे.

प्रसन्न हसत कात्रेंनी रावसाहेबांना दाद दिली. पण वचन दिले नाही.

दोघं डायनिंग टेबलावर आले तेव्हा घडयाळाचा काटा साडेबाराकडे सरकला होता.

*   *   *

अजित कार्नविदे

गुरुवार, १० जुलैच्या सकाळी सात वाजता अजित कार्नविदे नागपूरला जायला निघाला तेव्हा चक्रावलेला होता. काल त्याला समाचारच्या टेलिफोन ऑपरेटरचा फोन आला की एम्. डीं. नी उद्या साडेबारा वाजता भेटायला बोलावलं आहे. धाडीची ती बातमी प्रसिद्ध झाल्यावर अजितनी एम. डीं. शी फोनवर संपर्क साधायचे केलेले प्रयत्न निष्फळ ठरले. दोन वेळा ऑफिसमध्ये फोन लागला पण 'साहेब मिटिंगमध्ये बिझी आहेत' असं सांगण्यात आलं. एकदा सकाळी घरी फोन केला तर 'साहेब बाहेर गेलेत' असं सांगून सौ. कात्रेंनी फोन चटकन् बंद केला.

त्यातच आजच्या समाचारच्या अंकात पहिल्या पानावर, ज्या जागी बातमी प्रसिद्ध झाली त्याच जागी एक खुलासा होता,...

खुलासा

'समाचार'च्या ता. ५ जुलैच्या अंकात मंत्र्याच्या घरावर आयकर खात्याची धाड या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेली बातमी चुकीच्या माहितीवर आधारलेली असल्याचे आम्हाला आढळून आले आहे. अशा प्रकारची धाड टाकल्याचे आयकर खात्यातर्फे अधिकृतरीत्या नाकारण्यात आले. या बातमीमुळे संबंधितांना भोगाव्या लागलेल्या मनःस्तापाबद्दल आम्ही दिलगीर आहोत.
–संपादक.

खुलासा वाचल्यावर अजित जाम भडकला. लगेच संपादकांना फोन लावला तर ते म्हणाले, 'याबद्दल तुम्ही एम. डीं. शी बोलणे योग्य ठरेल.'

'पण खुलासा तुमच्या नावे आहे. किमान मला कल्पना द्यायची आधी.'

'बिटविन यू अँन्ड मी ओन्ली, कार्नविदे, संपादक संथ स्वरात पुढे म्हणाले, 'खुलासा माझ्या नावे असला तरी तो प्रसिद्ध झाल्यावरचं पाहिलं मिळालाय मला. एनीवे, इटस् अ न्यू ट्रेन्ड इन जर्नालिझम्'

*   *   *

नंतर केसरींचा फोन आला 'अजित हाऊ आर यू ?'

'काय साहेब इतक्या सकाळीं आठवण आमची ?'

'अजित मी तुला म्हटलं होतं, तू या भानगडीत पडू नकोस. माघारच घ्यावी लागणार तुला हे उघड होतं.'

अजितनी उत्तर दिलं, 'हे सारं मला अंधारात ठेवून करण्यात आलंय आणि असं का घडलं हे मी एम. डीं. ना विचारणार आहे.'

'अजित, धीस वॉज व्हेरी मच एक्स्पेक्टेड. आता नोकरी टिकवायची असेल तर किमान जाब विचारण्याचा मूर्खपणा करू नकोस. परिणाम वाईट होतील.'

'व्हेरी काईंड ऑफ यू मिस्टर केसरी. सी यू अगेन' म्हणून अजितनी फोन बंद केला.

*   *   *

कात्रेंच्या केबिनमध्ये अजित शिरला आणि नेहमीप्रमाणे एअरकंडिशनरचा तो मंद वास त्याच्या सर्वांगात भिनला.

कात्रेसाहेबांची कॅलक्यूलेटरवर आकडेमोड चालू होती. समोर संपादक बसलेले.

'गुडमॉर्निंग सर,' अजित म्हणाला. कात्रेंनी वर पाहिलं, आणि म्हटलं, 'मॉर्निंग यंग मॅन. हाऊ आर यू ? केव्हा आलास ?"

'थँक्यू फाईन सर. आत्ताच येतोय.' औपचारिकता पूर्ण करता करता अजितनी नोंद केली, एम. डी. आज आपल्याशी खूपच फॉर्मल वागताहेत.

खुर्चीवर बसत अजितनी विचारलं. 'सर मला इतक्या तातडीने बोलावलंत ?'

रिवॉल्विंग चेअरवर मागे झुकत, उजव्या हाताचा अंगठा, तर्जनी आणि मधल्या बोटानी चष्मा वर सरकवत एम. डी. बोलू लागले, 'अजित तुझ्यासारख्या बुद्धिमान माणसाची इथे गरज आहे या निष्कर्षाला आम्ही आलो आहोत. आपले वृत्तसंपादक पुढच्या महिन्यात निवृत्त होता.

हेत. तू इथं यावंस त्यांच्या जागी अशी इच्छा आहे आमची. बाय द वे, तुझ्या पगारात घसघशीत वाढ होईलच.' संपादकांकडे बघत कात्रे म्हणाले, 'संपादकांनीच हा बदल सुचविला आहे.'

संपादकानी मान डोलावली.

धोक्याची घंटा डोक्यात घणाणू लागली. अजितला संताप काबूत ठेवणं कठीणच गेलं. थरथरत्या शांत आवाजात त्यानी एम. डीं. ना विचारलं, 'ही शिक्षा समजायची काय ?'

'कशाची बुवा ?' एम. डीं. नी वुरखा पांघरला.

'त्या बातमीची ?' अजित.

'कोणत्या ?' एम. डीं. नी उत्सुकता दाखवत विचारलं.

ते आपणहून विषयाला हात घालणार नाहीत हे ओळखून अजितनी विचारले, 'रावसाहेब गवळेंच्या घरावर पडलेल्या धाडीची ?'

'ते मंत्री म्हणजे रावसाहेब होते का ? मला नव्हतं माहित बुवा !' एम. डीं. नी अजितला खिजवलं.

'सर, टूवी व्हेरी फ्रँक, तुम्हाला सगळं माहित आहे. पण तुम्ही वेड पांघरून पेडगावला जात आहात. काही कॉम्प्रोमाईज झाला का त्यांच्याशी ?' अजितनी थेट वार केला.

अनपेक्षित आणि वर्मावर झालेल्या घावानी कात्रे चमकले. खुर्चीवर रेलून झुकलेल्या अवस्थेतून टेबलवर येईपर्यंत लागलेल्या वेळात त्यांनी स्वतःला सावरले. एक पोझ घेऊन ते रिअॅक्ट झाले, 'अजित, तू एम. डीं. शी बोलतोय हे विसरू नकोस.'

'सॉरी सर, माझा दुखावण्याचा हेतू नव्हता,' अजित खाली मान घालून म्हणाला.

दोन्ही हातांची बोटं एकमेकात गुंतवत मंद हसत कात्रे म्हणाले, 'तुला म्हणून सांगतो, वर्षभर दररोज पाच हजाराचा सेल, जाहिरातीचा सरकारी दर ३५ वरून ५५ रुपये आणि गवळेंच्याकडून वर्षाला ५ लाखाच्या जाहिराती या अटींवर कॉम्प्रोमाईज झालाय. तुझ्या अॅन्टिसिपेशनला मी मन:पूर्वक दाद देतो.'

'पण सर, हा खुलासा छापताना मला विश्वासात घ्यायला हवं होतं. त्यांच्या घरावर खरंच धाड पडली आहे,' अजितनी त्याची खंत व्यक्त केली.

'अजित यू डोंट फरगेट वन थिंग, या सर्व व्यवस्थेत तू खूपच लहान मासा आहेस. वृत्तसंपादकाची जागा देऊन मी तुला मोठा मासा बनण्याची ऑफर देतोय. आणि खुलाशाची बात म्हणशील तर ते संपादकांना विचार. खुलासा प्रसिद्ध झाल्यावरच मला पाहायला मिळालाय ...' संपादकाकडे हात वळवत कात्रे म्हणाले.

अजितनी संपादकांकडे पाहिलं. त्यांनी नजरेला नजर द्यायचं टाळलं.

'ही ऑफर मी पनिशमेंट समजू का ?' अजितनी विचारलं.

'तू त्याकडे प्रमोशन म्हणून का पाहात नाहीस ?' कात्रेंनी प्रतिप्रश्न केला.

'मी कळवतो सर नंतर, विचार करून.' दुखऱ्या स्वरात अजित म्हणाला आणि केबिनबाहेर पडला.

संपादकीय विभागात तो सहकाऱ्यांशी बऱ्याच वेळ गप्पा मारत बसला. त्याच्या प्रमोशनची चाहूल एव्हाना सर्वांना लागलेली.

चपराश्याने टेलिप्रिन्टरच्या कॉप्या फाडून आणल्या.

मावळत्या वृत्तसंपादकांनी त्या चाळल्या आणि ओरडून अजितला सांगितलं, 'अरे तुझ्या मित्राची बदली झाली रे बाबा.'

'कोण ?'

'आयकरवाले केसरी,' त्यांनी सांगितलं.

डोक्यात स्फोट झाल्यासारखा अजित सुन्न झाला.

या लढाईत कोण जिंकलं नेमकं हेच त्याला कळेनासं झालं खूप वेळ. बराच वेळ निस्तब्ध राहिल्यावर त्याच्या लक्षात आलं, रावसाहेब, मॅनेजिंग डायरेक्टर किंवा समाचार या हॅपनिंगमध्ये फायद्यातच आहेत. पराभव आपलाच झालाय.

त्यानी समोरचा कागद ओढला. अतिशय शांतपणे राजीनामा लिहिला.

स्वतः मॅनेजिंग डायरेक्टरच्या हातात दिला. संपादक तिथेच होते.

तो वाचल्यावर कात्रे म्हणाले, 'आर यू सिरियस ?'

'फ्रॉम द बॉटम ऑफ द हार्ट' मोकळं हसत अजितनी उत्तर दिलं.

'तू फारच इमोशनल होतोयेस. इट हॅपन्स...' कात्रे कोरड्या आवाजात म्हणाले.

'माझा निर्णय पक्का आहे' असं म्हणत अजित उठला.


'एक्स्पेक्टेड रिॲक्शन' असं पुटपुटत कात्रेंनी राजीनामा पत्रावर 'सॅन्क्शनड् वुईट इमिजिएट इफेक्ट' असा शेरा मारून तो संपादकाकडे सरकावला. न वाचता संपादकांनी त्यावर सही केली.

अतिशय खुषीत शीळ वाजवत अजित समाचार कार्यालयाच्या बाहेर पडला.

* * *

△ △

प्रवीण बर्दापूरकर
१३९, छत्रपती नगर,
वर्धा रोड, नागपूर



कथास्पर्धेतील निवड

‘ तथास्तु ’

हरिहर आठलेकर

तो एक देह–सापळा, सांगाडा, पिंजरा काय हवं ते म्हणावं–तिथं पडला आहे. त्याच्या एवढीच जुनी असलेली ती बला तिच्यावर !

रक्त आटत चाललंय, मांस आकसतंय आणि स्नायू हळू हळू सैल पडत चाललेत. उघडी नजर दूर कुठंतरी लागलेली आहे. इच्छा असो नसो. आता त्याला जायलाच हवं आहे. अज्ञानातून

जाणाऱ्या त्याच्या त्या अदृश्य वाटेचीच कदाचित ती नजर वेध घेत असावी.

मधून मधून त्याचे ओठ हलल्यासारखे वाटतायत. काहीतरी बोलत असावा. काय ते कळण्यासारखं नाही आहे. श्वासाचा मंद आवाज होतोय आणि खपाटी गेलेलं पोट थोडंसं वरखाली झाल्याचा भास होतोय. म्हणूनच पहाणाऱ्याला त्या देहात थोडीशी धुगधुगी असल्याची जाणीव होतेय. कोणीतरी अशातच त्याला पहायला येतोय. लांब चेहरा करून टक लावून त्याच्याकडे पहात राहातोय. मग कसनुसं होत त्याला विचारतोय,

"आत्मारामा वळखलस ?"

एखाद वेळच ती निस्तेज नजर तिकडे वळतेय. टकाटक पहातेय. फार झालं तर मिनतवारीनं त्या हलत्या ओठांतून क्षीण आवाज फुटतोय,

"चलतहंय, बाबा चलतहंय ! पन वाट काय सरना नाय." बस्स एवढंच ! म्हटलं तर जाणीवविरहीत ते शब्द आणि ती नजर. पहाणाऱ्याला मात्र कासावीस व्हायला होतंय. बराच वेळ ती नजर तशीच स्थिर रहातेय आणि एकाएकी कोणतं अज्ञात बळ त्या शरीराला येतंय न कळे. लागोपाठ अनेक उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडतायत. क्षणभर अनामिक उत्साह चेहऱ्यावर झाकोळतोय,

"तो बघ, तो बघ केदी इसवण ! घर घर लेका-!" पुन्हा चार दोन क्षणांचा अवसर घेत सौम्य हसू फुटून ओठ अलग होतायत,

"नया घर बांधलंहंय. आज पूजा आसा. येया हां-"

"मागारणीक झील जालो माज्या-" पुन्हा क्षणानं एक अस्पष्ट गाढ चिंतेची छाया त्या चेहेऱ्यावर पसरतेय आणि-

"पडलो, पडलो ! होतो तोय पडलो रे ऽ आता कसां रे जातला ? झिला ऽ थोरल्या रे ऽ ! माजो-माजो संवसार-"

या उद्गारांबरोबरच त्या शरीराची बरीच हालचाल होतेय आणि दुःखार्त क्षीण स्वराबरोबर ते शरीर पुन्हा निपचित पडतंय. पुन्हा सुस्त तसंच संथ पहाणारा खिन्न चेहऱ्यानं मागं फिरतोय आणि निघून जातोय. एखाद्याच्या डोळ्यात दोन आसू डोकावतायत. असं किती दिवस चाललं होतं.

'माझा माझा संसार-' असं त्याचं होतं तरी काय ? घर ? होय. त्याच्या बापजाद्यांना शक्य झालं नाही असं एक घर त्यानं बांधलं होतं. त्याच जागी. बापजाद्यांनी राखलेल्या कुडाच्या भिंती त्यानं मातीनं उभारल्या होत्या. केमळं काढून कौलं घातली होती. त्या भिंती बिन गिलाव्याच्या, भेगा उसवलेल्या कशाही असल्या तरी मधल्या एका खणाला आणि आतल्या होवरीला पुरेसा आडोसा करायला त्या समर्थ होत्या. वास्तुशांतीच्या वेळी हौसेनं आणलेली सत्यनारायणाच्या चित्राची तसबीर अद्याप भिंतीला लटकत होती. आता फक्त ती तिरपी झाली होती. सत्यनारायणाचा त्रिकोण आणि भटजीचं डोकं तेवढं वाळवीनं खाल्लं होतं. बाकी शाबूत होतं.

घराच्या वरच्या अंगाला माथ्यापर्यंत चढत गेलेली टेकडी आता त्याची झाली होती. तिच्यावरची आंबा-काजूची झाडं त्याच्या हातची होती. घराच्या खालच्या अंगाला त्यानं माडींची बाग उभारली होती. ती त्याचीच होती. पुढं पसरलेला अथांग समुद्र तो आपलाच मानीत होता. त्याचा तो कोणी एक पोशिंदा परमेश्वरच होता. या भूमीतील स्थावराच्या उभारणीसाठी त्यानं त्या दर्याच्या उंचउंच लाटांवरून रात्री रात्री त्याच्या सान्निध्यात घालविल्या होत्या. त्या रात्रींच्या विविध पराक्रमांच्या अदृश्य स्मृती त्याच्याच होत्या. आणखीही बऱ्याच स्मृती त्याच्या होत्या. काही शहारे आणणाऱ्या तर काही गुदगुल्या करणाऱ्या. आता त्या सगळ्याच त्याला सुखावीत होत्या खऱ्या, पण-?

ऐन उमेदीत आपली छोटी होडी घेऊन तो वावळ टाकायला दर्यात जायचा. जुवाबेटांच्याही पलीकडे. जिथून जमिनीची एक रेषामात्र दिसावी इतकं दूर. घरवाली घरात एकटी लकालका जीव कंठाशी आणून त्याची वाट पहात राहायची. दर्याशी खेळताना लाटांच्या तांडवात तिची अनेक मोहक चित्रं त्याच्या डोळ्यांसमोर तरळायची आणि त्याला स्फुरण चढायचं. मग एका सकाळीच तो सूर्याबरोबर पुळणवटीत उगवायचा. सरंगे-मोरीसारखे जाडे मासे त्याच्या खांद्यावर असायचे.

घिमी पावलं टाकीत मस्त धुंदीत पुळणीतून घरी येताना तो दिसला की ती हरसून जायची. आपल्या दादल्याचं रसरसतं तारुण्य आणि सूर्यासारखं मस्तीतलं रूप न्याहाळीत ती लगवगीनं पुढं व्हायची. हिरव्या लुगड्यानं आणि हिरव्या चुड्यानं नटलेलं तिचं रूप पाहून तोही हरखून जायचा. हळूच गालांवर टिचक्या मारून तिथंच तिला लाजवायचा.

"शीः बाये काय–!" कुंदीच्या वेणीसारखं हसू तिच्या चेहऱ्यावर खुललं की तो तृप्त व्हायचा. तेव्हाच वरच्या पांदीत साठीला पोचलेला दादू शिगवण मिस्किलपणानं खाकरायचा आणि तोही लाजायचा. मग हळूच कोणतातरी तराणा गुणगुणत तिथून निसटायचा. जणू आपण त्या गावचाच नाही.

एक दिवस रापणीत एक 'गादा रेडा' अडकला होता. त्याच्याशी टक्कर देऊन अनेकांचे प्राण वाचवता वाचवता त्याच्याच जिवावर बेतलं होतं. शिताफीनं आणि मोठ्या मिनतवारीनं तो बचावला होता. साऱ्या रापणकारांनी हैदोसहुल्ला करीतच रात्री त्याला गौरवानं खांद्यावरून घरी आणलं होतं. घरवाली तर डोळ्यात प्राण घेऊन उभी होती. त्याच्या सर्वस्वाला आसुसलेली ती आपलं सर्वस्व अर्पून त्याला बिलगली होती. ऊबदार समर्पणाची ती स्मृती केवळ त्याचीच होती. तेव्हाच थोरल्याचा जन्म झाला होता.

असाच केव्हातरी तो रापणीवरून घरी यायचा. अंगणात मांडवाखाली ते छोटं आईच्या पदराखाली तन्मयतेनं चुरूचुरू दूध चोखीत असायचं. त्यानं त्याच्यासाठी आणलेला मकमकीत लालपिवळा बोंडू दाखवायचा आणि त्याला उठवायचं. ते धाकटं त्या काजूच्या फळाकडे झुकलं की त्यानं आयशीची कळ काढायची,

"हे बोंडू कितके ग्वाड लागतत बगूया तरी!"

"शाः, इलाज नाय तुमच्याफुडे! मानसां फिरतत भंवतिल्यान दिसतत?" ती वरकरणी डाफरायची पण आतल्या झाकल्या लाजल्या इशाऱ्यानं तो मोहरून जायचा. मग त्या मांडीवरच्या धाकट्याला उचलून झेलवीत–खेळवीत अंगणभर नाचायचा. लाडिकपणानं हे कौतुक डोळ्यात साठविणाऱ्या गालांची जाता जाता पुन्हा कळ काढायचाच.

"आता सांगतंय तुमकां–!" असं म्हणत तिनं केलेल्या गोड लाडिक चाळ्याचीही आठवण. अशा कितीक आणखी! कोवळ्या आणि रणरणत्या उन्हासारख्या, मुसळधार आणि इंद्रधनुषी झिमझिम पावसासारख्या आणि मुरमुरल्या थंडीतल्या गोधडीतील उबेसारख्याही. धाकट्याच्या जन्मानंतर एकाएकी तिनं सोबत सोडली तेव्हाची वणव्यासारखी काळीज करपवून टाकणारी एक आठवण. साऱ्या त्याच्याच होत्या. मग धाकट्याचीच नव्हे तर साऱ्या स्थावराची तो आई बनून राहिला होता. त्या भूमीतल्या वाढत्या जीवांभोवती गुंफलेले मनोरम मनसुबे त्याचे होते. परंतु–?

ती एक रात्र त्याच्या जाणिवेतली शेवटची ठरली होती. त्या दिवशी दिवस धारेला गेला आणि नित्याप्रमाणे तो उठला. आकाश निरभ्र होतं. निसर्ग प्रसन्न होता. समुद्र शांत होता. त्यानं मुलांना जेऊ घातलं. उरलेलं आपण जेवला. त्यानं होडी बाहेर काढली. थोरल्याच्या मदतीनं वावळ होडीत मांडली. दोघांनी होडी लोटली. गड्याला कुकारा दिला आणि थोरल्याला म्हणाला,

"मी जावन येतंय. तांदूळ दवर नि वाळण लाय. सुंद्र्याच्या आवशीकडसून निस्त्याकाक घेया. तुमी जेवन घेया मी येतंय तवसर–"

"बाबा दोंपारा वेगिनं येशी मा?" थोरल्यानं सहज विचारलं.

"झिला तू ल्हान न्हय आता! सतरायां लागलां तुका. दर्याक गेल्याचो येळ सांगाक येता?" त्या कातर वेळेला नेमका कुठंतरी पिंगळ्यानं शब्द केला पण त्याला कसलीच क्षिती नव्हती. आजवर त्यानं मनमानं राज्य दर्यावर केलं होतं. मी मी म्हणणाऱ्यांना होत नव्हतं असं धाडस त्यानं केलं होतं. तेवढ्यात गडी आला आणि त्यानं वल्हं सावरीत त्या निर्जीव होडीवरून हलका हात फिरवीत म्हटलं,

"चल बाये." होडी लाटांवरून हिंदकळत डौलात निघाली. पौर्णिमेच्या गरगरीत चंद्र डोंगराआडून कासराभर वर चढलेला दिसला आणि तिथंच अंधुक प्रकाशात टेकडीवरच्या लाल

दिव्याकडे त्याचं लक्ष गेलं. तिकडे पहात त्यानं हटकलं,

"शिवरामा, काय रे ?"

"बावटो लागलो सो दिसता–"

"हुं: असे कितके जवळी बगले ! चल." म्हणत त्यानं शीड सोडलं आणि सुकाण धरून तराणा ललकारत लाटांवर झुलणाऱ्या होडीत उभा राहून तोही झुलू लागला. लाटा ओलांडून होडी लयीत आली तसा आरामात बसला. मार्गशीर्षातलं टिपूर चांदणं लाटांशी खेळू लागलं. त्यांच्या तोंडातून उमटलेले तराण्याचे उच्च सूर त्यात मिसळून अथांग दर्यावर पसरत गेले. होडी बरीच दूर गेली. किनाऱ्याचे दिवे अगदीच टिमटिमू लागले आणि एक विचित्र झुळूक त्याला जाणवली. तिच्याबरोबर आलेल्या विलक्षण वासानं तो शहरला आणि तेवढ्यातच उसळलेल्या एका लाटेमुळं त्याचं काळीजही चरकलं. त्यानं दमन सोडलं आणि ओरडला,

"शिवरामा ऊठ बेगिन ! शीड गुटाळ. घाय कर. ह्यां काय बऱ्याचां चिन्ह दिसणाहा नाय."

"काय करतस ? पाटी जावयां ?"

"तर ! तडे बग. दक्षणच्या धारेक. केदी रे हेलमी येताहा ! बावटों नीटसो बगलंय नाय. शा: काय शानपन चलांचां नाय. चल व्हले मार." त्यानं सुकाण वदललं आणि मुकाटघानी मागं फिरला. दर्यावर आजच तो पहिल्यांदा असा चरकला होता. काहीही तक्रार न करता निसर्गापुढं आज त्यानं शरणागती पत्करली. हा हा म्हणता उलट सुलट वाऱ्याचा जोर वाढू लागला. हळू हळू ढगांची दाटी माथ्याकडे सरकू लागली. मोठ्या कष्टानं लाटांशी झुंजत तो उजाडता उजाडता किनाऱ्याला पोचला. आज सूर्य जणू उगवायचाच नव्हता. आभाळानं छत्र धरलं होतं.

"हेलमी खंय जाता नि काय करता कोन जाना !" असं पुटपुटत तो उतरला. त्या दोघांनी होडी आवरली आणि गड्याला निरोप देऊन वावळ खांद्यावर टाकून तो घरी पोचला. खांद्यावरचं ओझं खळ्यात फेकून त्यानं चिलीम पेटवली. मग दर्याकडे पहात खांबाला टेकून ओटीवर बसला. हळू हळू वाऱ्याचा जोर वाढू लागला. डाव्या बाजूच्या खडकाळीत समुद्राचं पाणी फसाळताना आणि 'सुईं ऽऽ' करून फेसाचा विरव टाकताना चांगलंच जाणवू लागलं. वाऱ्याचा जोर आणखी वाढला. माडांतून पलीकडे दर्यात लाटांचं रुद्र तांडव सुरू झालं होतं. माडा–झाडांचे शेंडे पिळवटून एकमेकांना टकरा देऊ लागले. भराभर अडसरं तुटून पडू लागली. दूर एक करपट घोंघावली. प्रचंड लाटेनं खडकाळीला टक्कर दिली. कानांचे दडे बसले आणि त्याच्या हातातली चिलीम तशीच घुमत राहिली. तो फक्त एकटक नजरेनं पाहात राहिला, त्याच्या समोर त्याच्याच हातच्या एका माडानं करपटीसरशी काडकन लोळण घेतली होती.

"मांडलाहा तरी काय ह्या वाऱ्यानं ?" म्हणत भराभर चिलमींचे फुफकारे सोडीत हताशपणे खाली पहात राहिला. लागोपाठ करवटीवर करपट घोंघावू लागली. पर्वतप्राय लाटा उसळत गेल्या. कान गप्प करीत खडकांना टकरावू लागल्या. फुटू लागल्या. पिंजून पिंजून भुगा होत आसमानभर विरत गेल्या. इच्छा आकांक्षांचा चुरा कोसळावा तसा तो भुगा संथपणानं पुन्हा खाली येत वाऱ्याच्या झोताबरोबर दूर कुठंतरी जाऊ लागला.

"बाबा काय रे जाताहा ?" त्याचा एकेक जण उठून विस्फारल्या डोळ्यांनी पहात त्याला बिलगू लागला.

"मोट्टी जवळी जाल्या दर्यात."

"आता काय जातलां ?"

"सत्यानास !" शून्यात पहात तो म्हणाला.

"आता–?"

"तो बघ, तो बघ! तुज्या आवशीत लायललो माड कोसाळलो." थैमान चालूच राहिलं. विस्फारित नजरेनं फक्त ते पहात होते. एकेका करपटीबरोबर एकेक माड एकेका स्मृतीला जागवीत कोसळत होता. त्यांनी दोघांनी कावडींनी पाणी शिपून त्या माडांना वर आणलं होतं. बांगड्या पेडव्यांची कुटी देऊन त्यांना बळावलेलं होतं.

"आता घा उरले, सात–पाच..." करता करता बराच वेळ वाऱ्याशी टक्कर देत न्हाणीचा

अनुक्रमणिका

माड चिवटपणानं उरला होता. समोर सगळं उघडं भणभणीतं झालं होतं. फेसाळणारा आणि तांडव करणारा अख्खा दर्या नजरेत येत होता. दूरवर नजर ठरेना एवढा खळगा समुद्रात तयार झाला. किनाऱ्याच्या बाजूनं पाण्यानं अस्मानापर्यंत उसळ घेतली. ती पर्वतप्राय लाट खडकाशी टकारली. 'घुम्मऽऽ' आवाजासरशी तुषारांचा डोंब उसळला. आकाशाचा वेध घेत त्याच्या बाजूनंच झेपावला आणि मागोमाग घोंगावत येणाऱ्या झोतानं माडाला कवटाळलं. माडानं शिकस्त केली. झापं सळसळली. दोन गिरक्या घेतल्या आणि त्यानं सपशेल घालून घेतलं. 'घुप्प' आवाज वाऱ्याच्या झोतात विरून गेला.

"झिला ऽ, बावा रे ! आता कसां रे जातलां ?" एवढा एकच उद्‌गार त्याच्या तोंडून निघाला. बस्स तेवढाच ! मग त्याची नजर पुरती पुरती शून्यात पोचली. बराच वेळ भक्कम प्रहरानं वारा दमला. स्वार्थी हपापी माणसांची धावाधाव सुरू झाली. सावध दु:खी माणसांनी मोजदाद सुरू केली. आत्माराम तसाच बसला होता. ते भकास भणभणीत शून्य पहात.

"बावा, ऊठ मारे ! वारो थांबलो न्हय ?" थोरल्यानं हटकलं.

"आं ऽ" भानावर आला तो तेवढाच. उठू लागला तोच खाली कोसळला. त्याचे पाय जमिनीला लागतनासे झाले. कसंबसं त्याला तिघांनी धरलं आणि आतल्या खणात नेलं तर तो पुन्हा त्या जुनाट बाजेवर कोसळलाच. तेव्हापासून हे असंच चाललंय. एकेका दिवसानं एकेक अवयव कमी होऊ लागलाय.. पोरांनी आता कोणाकडे पहायचं ? त्यांच्याकडे पहायला सवड तरी कोणाला होती. कमी अधिक प्रमाणात साऱ्यांची गत तिथं तशीच होती तर !

त्या रात्री त्या खणात त्याच्यासह चौघेही झोपले होते. त्याचं विव्हळणं बरंचसं क्षीण झालं होतं. दिशा फटफटली आणि वाऱ्याची एक मंद झुळूक कुठूनशी आत घुसली, थोरल्याला जाग आली. कृष्ण एकादशीचा चंद्र बराच वर आला होता. दरवाजाच्या किलकिल्या फटीतून धूसर प्रकाश आत घुसत होता. थोरल्याला त्या फटीतून कोणीतरी आत आल्याचा भास झाला. तो पटकन उठला. सताड डोळे उघडून त्यानं पाहिलं कोणीही दिसलं नाही. त्या धूसर अंधारात बाजेवरचा मंद होत जाणार श्वास तेवढा घुमत होता. थोरला उठला आणि दार उघडून खाली झरीवर गेला. तोंड धुतलं. सकीर चांगला कासराभर वर आला होता. दिशा चांगली फटफटली होती. तांबडं उधळीत अरूण येत होता. तो लगोलग वर आला. दारातून धुसर प्रकाश थेट बाजेपर्यंत पोचत होता. क्षणभर थोरला दारातच थबकला. कोणी एक म्हातारा त्या बाजेच्या कोपवर बसल्याचा त्याला भास झाला. एक विलक्षण म्हातारा. म्हटला तर गंभीर नाहीतर त्याचा चेहरा हसरा. असावा असंच त्याला भासलं. थोरला पुढं सरकला आणि बाजेजवळ जाऊन त्यानं हाक मारली,

"बाबा ऽ" आता तो सापळा निस्पंद होता. क्षीण श्वास तेवढा सुरू असावा. बाकी सारं शांत आणि थंड होतं थोरल्याच्या जागीनं मज्येला आणि धाकल्याही उठले. फटफटल्याचं जाणवून ते तडक झरीवर गेले. थोरला त्या निस्पंद सापळ्याकडे पाहत स्तब्ध उभा राहिला. काही क्षणच. त्या विलक्षण म्हाताऱ्याचा एक हात सापळ्याच्या छातीवर फिरत असावा असं त्याला जाणवलं आणि तो भानावर आला.

"बावा, बावा, बोल मारे !" थोरल्यानं पुन्हा हाक मारली. क्षीण श्वास जाग देत होता तेही आता जाणवेनासं झालं होतं. त्याच्या मनात विचित्र शंका डोकावली. पुन्हा काही क्षण तोही निस्पंद उभा राहिला आणि आवेगानं पुढं सरकला.

"बावा रे ऽ" म्हणत थोरल्यानं त्या सापळ्याच्या छातीवर डोकं टेकलं. आणखी किती क्षण गेले. त्यानं वर पाहिलं. म्हातारा विचित्रपणानं हसल्याचं त्याला जाणवलं. तो म्हातारा आपल्याकडे रोखून पहातोय असं त्याला भासलं आणि एकाएकी म्हाताऱ्याचा हात त्याच्या अंगावरून डोकीवरून फिरू लागल्याचं त्याला जाणवलं. त्या नजरेत काही वेगळीच विलक्षण ताकद असावी. त्या स्पर्शातही काही अनामिक जादू असावी. म्हटलं तर तो स्पर्श होता म्हटलं तर तो नसावाही. त्या दृष्टीच्या आणि त्या हाताच्या स्पर्शातून काही

आगळी-वेगळीच जाणीव अंतरात उदेल्याचा भास थोरल्याला झाला. त्या दृष्टीत सांत्वना होती. एक उत्तेजन होतं. एक आव्हान होतं. एक आदेशही होता. त्या अनामिक स्पर्शात एक हमी होती. काही क्षण-काही क्षणच तो त्या स्थितीत होता. तेवढ्यात दार लोटून मज्येला आणि धाकल्या त्याच्याकडे येऊन बिलगले आणि तो भानावर आला. त्यांच्या खांद्यांवर हात टाकून तो अजाणिवेच्या धुंदीत तसाच उभा राहिला. निस्तब्ध निस्पंद असा. बाहेर चांगलंच फटफटलं होतं. मागच्या गवाक्षातून येणारा एक कवडसा बाजेच्या वरच्या अंगाला भिंतीवर उजळला. थोरला संथपणानं त्या दोघांच्या खांद्यावर हात टाकून त्यांना बाहेर घेऊन आला. अद्यापही तो म्हातारा तिथंच असल्याचा त्याला भास होत होता. तसाच.

"आबा, बाबा काय करता ?" धाकल्यानं विचारलं.

"बाबा ? बाबा जाता हा."

"खंय ?"

"म्हातारो आजो तेव्हा न्हेवक इलो तेच्या बांगडा."

"परत केवा येतलो ?"

"आता केदवाच येंवचो नाय." त्यांना जवळ कवटाळीत तो बोलला आणि ते दोघेही क्षणभर स्तब्ध झाले. थोड्या अवकाशानं थोरला पुन्हा म्हणाला,

"आता आपलां सगळां आपणाकच बगूक हव्यां."

"म्हणजे ?" मज्येल्यानं विचारलं.

"आपलां काम आपणाक करूक हव्यां. दर्या जांवक हव्यां, माशे आणूक हवे, बाबान उठवलेलां ह्यां सगळां पडलां तां पुन्हा उभ्यां करूंक हव्यां-"

"आबा, हो दर्या कोणाचो ?" धाकल्यानं विचारलं.

"ह्यां बघ, ह्या डोंगराच्या माथ्याकडसून दर्यापार सगळां आमचां आसा, पण भावाशी कामां आपुन करूक हवी-"

"कामां ? मी करतंय बघ ! आबा ही झाडां आमी पुन्ना उभी करू या" म्हणत धाकल्या सरसरून पुढं झाला आणि त्यानं कोपऱ्यातल्या वल्हीला हात घातला. ती आणून मज्येल्याच्या हातात दिली. पुन्हा तसाच कोपऱ्यात गेला आणि अवसानानं त्यानं पहारीला हात घातला.

"चला, आमी कामाक लागू या !"

क्षणभर थोरल्याच्या डोळ्यांसमोर एक नवं विश्वच तरळून गेलं. पुन्हा उभं राहिलेलं, तरारलेलं आणि हिरवळलेलं असं विश्व. उगवतीच्या धारेपासून दर्याच्या तडीपार त्यांच्या छोट्या विश्वाचं नवं देखणं रूप ! धाकल्यानं पहार पेलली आणि त्यानं पाऊल उचललं. त्या विलक्षण अनामिका म्हाताऱ्याला त्या मनकटातली ताकद आणि उचललेल्या पावलातला खंबीरपणा भावला असावा आणि म्हणूनच उगवतीकडून डोकावणारी कोवळी किरणं हसली असावीत. ते अशरीरी ओझं पाठीवर मारून केव्हाच तो म्हातारा न संपणाऱ्या अज्ञात वाटेनं चालत राहिला होता. इवल्याशा काळजात तुफान ताकद उभारून चाललेल्या त्या पोरांना उद्देशून तो तिथूनच म्हणत असावा 'तथाऽस्तु ! तथास्तु !! तथाऽऽस्तु !!!'

हरिहर आठलेकर
२३६ क, भटवाडी
सावंतवाडी, ४१६५१०

△ △

आदिवासी जंगलात रहाणारे अस्पृश्य नव्हत

गीता सानें

वृत्तपत्रातले ते छायाचित्र, पंतप्रधानांना मायेने थोपटणाऱ्या एका वृद्ध आदिवासी स्त्रीचे होते. तिची हालचाल अत्यंत सहज आणि अकृत्रिम असल्याने मला ते चित्र मोह घालून गेले. ते बघतांनाच माझ्या मनात विचार आला; एखाद्या अस्पृश्य स्त्रीची होईल एवढी हिंमत ?

माझ्या मनांत पुढचा विचार एकदम उभा राहिला. आपल्याला अस्पृश्य स्त्रीच का आठवली ?

अनुक्रमणिका

इतर स्त्रियांना तरी अशी हिंमत होण्याचा किती संभव होता ? थोड्या विचारांती माझ्या लक्षात आले की आपल्या राजकीय विचारांत, आपल्या सामाजिक धोरणांत आपण गेली पंचवीस वर्षे SC/ST असे लिहीत आलो. आणि तेच आता आपल्या विचारात खोलवर रुजले आहे.

खरे तर आदिवासी आणि अस्पृश्य हे गट सर्वस्वी भिन्न आहेत. गावठाणाबाहेर राहून, गावामधले शिळेपाकेच काय पण उष्टे–खरकटे खाणारे, 'पाणी वाढ वो माय' असे विनवणारे अस्मिता मारून जगणारे लाचार अस्पृश्य आणि दूरदूरच्या जंगलात कडेकपारींनी नागरी समाजापासून दूर रहाणारा आदिवासी यांच्यात कुठलेही साम्य नाही; असण्याचा संभवही नाही. चार वर्णाच्या आपल्या संस्कृतीत आदिवासी बसत नाही. म्हणून आपण त्याला पंचमाच्या गटात घालतो आहोत. ही फार मोठी चूक आहे. ही चूक आदिवासींची फार मोठी हानी करीत आहे.

अस्पृश्य आपल्या समाजाच्या संपर्कात असल्यामुळे, त्यांच्या समस्यांचा आपला थोडा–फार अभ्यास आहे. त्याच्या जोरावर ज्या योजना आखल्या जातात; त्या अस्पृश्यांबरोबर आदिवासींवरही अवेळवळे लादल्या जातात आणि निरुपयोगी ठरतात. अस्पृश्याची मारली गेलेली अस्मिता पुन्हा जिवंत करण्याचा प्रश्न आपल्या समोर आहे. उलट आदिवासींची अस्मिता आजही जिवंत आहे, ताठ आहे. तिला गरज आहे खत–पाण्याची. संजीवनीची नव्हे. ह्या परिस्थितीत एका गटाच्या योजना दुसऱ्या गटाला काय उपयोगी पडणार ?

आदिवासींच्या गरजा सर्वस्वी भिन्न आहेत कारण त्या समाजांचे भौगोलिक स्थान बाहेरच्या वृहत् समाजापेक्षा भिन्न आहे. त्यामुळे त्यांचा आपला संपर्क फारसा आलेला नाही. त्यांनी ह्या अज्ञातवासाच्या काळांत स्वत चे अनेक गुण विकसित केलेले आहेत. गरज आहे, त्यांना आपल्यात मिसळून घेणारी यंत्रणा उभारण्याची. सर्वारंभे तण्डुला: प्रस्यमूला: असे म्हणतात. सर्व परिवर्तनाची जननी शिक्षण आहे. म्हणून आदिवासींच्या शिक्षणाचा विचार आपण येथे करू या.

आदिवासी भाषांना स्वत:ची लिपी नाही, त्यामुळे त्यांची मुले निरक्षर असतील पण त्यांनी शिक्षण नसते ही आपली समजूत भ्रामक आहे. त्यांना शिक्षण असते, धनुर्विद्येचे; शिकार करण्याचे, भोवतालच्या वनसृष्टीशी, जीवसृष्टीशी समरस होण्याचे. स्वसंरक्षणाचे, निर्भयतेचे ! त्याची विद्या, आपल्यालाही अवगत असतेच असे नाही. किंबहुना नसतेच. ती विद्या अक्षर करण्याचा मार्ग म्हणजे आदिवासींना अक्षर–ज्ञान देणे हा आहे. त्यांच्यासाठी प्राथमिक शाळा पाहिजेत, पण त्या शाळा, नागर संस्कृतीतील शाळांपेक्षा भिन्न असाव्या लागतील. मुलांच्या अनुभवाला दुजोरा देणारी, त्यांच्या अडचणीतून मार्ग सुचवणारी, त्यांच्या गुणांना प्राधान्य आणि विकासाला वाव देणारी, त्यांना आपल्या संस्कृतीची ओळख करून देणारी पुस्तके तेथे लागतील. ह्या शाळांची शिस्तही वेगळी असावी लागेल. अशा नवीन तऱ्हेच्या शाळांची बीजे पेरण्याचा प्रयत्न आपल्याला करता येईल. पण त्या शाळांच्या सर्वांगीण वाढीला जमातीच्या अनुभविक मंडळीच्या मार्गदर्शनाची, सहकाराची जोड द्यावी लागेल.

महाराष्ट्राने अस्पृश्यांना पारंपरिक शाळांची दारे उघडून दिली. नागरी संस्कृतीच्या पायाशी बसलेल्या ह्या अस्पृश्यांनी त्याचाही उपयोग करून घेतला. आज महाराष्ट्र दलित वाङमयाने दुमदुमत आहे. आदिवासींना मोठ्या प्रमाणांत त्यांना उपयोगी असणाऱ्या प्राथमिक शाळा आपण त्यांच्या क्षेत्रात काढू शकलो. समजून–विचार करून, त्या शाळांवर मुक्त हस्ताने आवश्यक तो खर्च करू शकलो तर पुढील वीस वर्षात आदिवासी वाङमयही मराठी भाषा समृद्ध करील. आदिवासी समाजाच्या भौगोलिक वेगळेपणामुळे, आपल्या समाजाबद्दल त्यांना अजून फारशी कटुता वाटत नाही, आपण जपून वागलो तर ती येणारही नाही; आणि आदिवासी वाङ्मय कटुतेपासून मुक्त राहील. त्यांचा वेगळेपणा, त्या वेगळेपणामुळे येणारे वेगळे अनुभव त्यांच्या लेखनांत प्रतिबिंबित होतील. त्याचे अनुभव, अनुभवातून निर्माण होणारे ज्ञान–विज्ञान अक्षरबद्ध झाले तर ते वाङ्मय आपल्या ज्ञानांत अमोल, आणि नवी भर घालील. आपल्या आजच्या धोरणामुळे आपण त्यांच्याबरोबर आपलेही नुकसान करून घेत आहोत.

शिक्षणाच्या अभावी, महाराष्ट्राबाहेरचा अस्पृश्य आज मुका आहे. आदिवासी तर सर्वत्रच मुका आहे. ह्या गटांना वाणी देण्याचे कार्य महत्त्वाचे आहे आणि ते काम त्यांच्या हातूनच करवावे लागणार आहे.

शिक्षण हा, आदिवासी आणि अस्पृश्य ह्यांच्यासाठी आखलेल्या वेगळेपणाची गरज स्पष्ट करणारा एक पैलू आहे. प्रत्येक प्रश्नावर त्यांच्या गरजा भिन्न असल्याचा अनुभव येईल आणि तेव्हाच ह्या दोन गटांसाठी दोन स्वतंत्र कमिशने काढण्याचे आपल्या ध्यानी येईल. आजवरच्या चुकीच्या परंपरांचे परिणाम, त्याची छाया, कमिशन्सच्या कार्यावर पडू नये म्हणून ही कमिशन्स भिन्न मंत्रालयाकडे सोपवण्याची कल्पनाही कोणाला सुचेल.

आदिवासी आणि अस्पृश्य हे गट सर्वस्वी भिन्न आहेत ही जाणीव सर्वत्र रुजल्यावर आदिवासींना आपलेसे करून घेण्याचे, बाहेरच्या समाजात त्यांना सरमिसळ करण्याचे भारताचे स्वप्न साकार होईल.

स्वतंत्र होताच, भारताला ईशान्य सीमेवरील आदिवासींचा प्रश्न हाताळावा लागला. नागा आणि मिझोंना आपण भारतीय आहोत हेच मान्य नव्हते. त्यांना भारतात विलीन करून घेतांना आदिवासी प्रश्नाचे स्वरूप, भारतीय नेतृत्वाला स्पष्ट झाले. तसेच आपली ईशान्य सीमा सुरक्षित करावयाची तर आदिवासी प्रश्न समाधानकारक रीतीने सुटावा लागेल ह्याची जाणीव झाली. स्वातंत्र्याच्या पहिल्या पाच वर्षांच्या आतच १९५२ मध्ये पंतप्रधानांनी भारताचे आदिवासी धोरण जाहीर केले. त्या धोरणाप्रमाणे आपल्याला आदिवासी आपलेसे करावयाचे होते. गिळंकृत करावयाचे नव्हते. त्यांच्या विविध संस्कृतींची बूज राखावयाची होती. बूज राखण्याची भाषा आदिवासींनाच लागू होती. कारण बूज राखण्याजोगी स्वतंत्र संस्कृती अस्पृश्यांजवळ नव्हतीच.

गेल्या वीस-बावीस वर्षांच्या अवधीत आपण आपली धोरणे विसरलो. SC / ST असे लिहून आदिवासी आणि अस्पृश्य गटांना एकरूप समजू लागतो त्यामुळे आदिवासींचेच काय पण आपलेही अपरिमित नुकसान झालेले आहे

आज आदिवासी जमातींमधून अस्वस्थता आहे आपला त्यांचा संपर्क वाढतो आहे. त्याच प्रमाणांत त्यांचा असंतोषही वाढतो आहे. एक अरुणाचलाचा अपवाद वगळता सारी ईशान्य सीमा सतत युद्धाच्या पवित्र्यात उभी आहे. देशाच्या आत झारखंड-मुक्ती-मोर्च्यासारख्या चळवळी उभ्या रहात आहेत. आज गरज आहे, १९५२ चे आदिवासींबद्दलचे धोरण अभ्यासण्याची; त्याचा अन्वयार्थ समजून घेण्याची आणि ते धोरण अंमलांत आणण्याची. भारताची एकात्मता, सीमेची सुरक्षितता देशातील अंतर्गत शांतता राखण्याचा तो एक महत्त्वाचा उपाय आहे.

△ △

गीता साने
संतोष, हिरापूर
पो. ऑ. धनबाद (बिहार) ८२६००१

अनुक्रमणिका

लोकप्रतिभचा अलौकिक आविष्कार : पक्षीकुळान

मधुकर वाकोडे

लोकमानस यक्षिणीच्या कांडीप्रमाणे कधी कधी एखादी अद्भूत किमया साधते. लौकिक जीवन जगता जगता अलौकिक जीवनाचा ध्यास लोकमानस धरते. तर कधी कधी अलौकिक विश्व लौकिक पातळीवर, मानवी भावभावनांच्या कोंदणात सामावून घेते. 'पक्षीकुळान' ह्या पारंपारिक गीतात अलौकिक पक्षीसृष्टी मानवी दृष्टीने

अनुक्रमणिका

टिपता टिपता लोकप्रतिभा लौकिक सोहळा अलौकिक मुशीतून साकार करते.

ग्रामीण मन कालपरवा पावेतो सामुदायिक जीवनाच्या कक्षेबाहेर नव्हते. ही सामुदायिकता धर्माधिष्ठित असे आणि सगळे लोक व्यवहार परंपरेच्या चौकटीत बंदिस्त होते. समाज हा जितका प्रकृतीच्या समीप तितका तो अधिक प्राकृतिक असतो. जी काही स्थित्यंतरे ग्रामजीवनात घडून आलीत त्या स्थित्यंतरांचे स्वरूप जातीच्या प्रतिसादावर अवलंबून होते. या समाज व्यवस्थेत व्यक्तीपेक्षा समूहाला, विविध कुळींच्या योगदानाला महत्त्व असते. हा सुखदु:खातील सहभाग यज्ञयागापेक्षा बलवत्तर होता. आणि याच कारणाने भिन्न भिन्न जातसमूह कौटुंबिक पातळीवर नांदत आलेले आहेत. व्यक्तिगत जीवन आणि व्यवहारातील जातीभेदाचे सायळी काटे सामूहिक जीवनात झडून जात. कारण ग्रामान्तर्गत वेगवेगळ्या जातींचे महत्त्व. लोकरूढी...लोक व्यवहारांनी प्रतिष्ठित केलेले होते. आज कालबाह्य झालेली पुरातन जातीव्यवस्था ग्रामनिर्भरतेच्या, श्रम विभागणीच्या तत्त्वांवर जरी आधारीत होती तरी मानवीमूल्यांना नाकारीत होती. सामुदायिक पातळीवरील अनेक पदरी वीण व्यक्तिगत. स्तरावर एक पदरी होत असे. अशा समाजव्यवस्थेच्या मुशीत लोकमानसाची जडण. घडण झाल्याने ते आदिम प्रेरणांशी जवळीक साधते.

कारू–नारूंचा सहभाग

ग्रामाचे नेतृत्व जरी पाटलाकडे होते तरी वतनदारीची अहंता कारू नारूंच्या रक्तात मुरल्याने अप्रतिष्ठित जीवनातही ते प्रतिष्ठेची उतरंड बाळगून होते. समूह टिकवून राहण्यासाठी श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार त्यांच्या प्रती ठरलेल्या होत्या. सुतार, लोहार, चांभार, सोनार, कुंभार, न्हावी, मातंग, परीट, महार, गुरव, मुलाणी वगैरे कारू–नारूंचा सहभाग हा सामुहिक पातळीवर अपरिहार्य होता. प्रत्येक कार्यात प्रत्येक जातीघटकाचे समाज व्यवस्थेनुसार महत्त्व प्रस्थापित झालेले दिसून येते. मानवी समूह ज्याप्रमाणे सामुदायिक प्रसंगी एका पातळीवर आलेला दिसतो त्याप्रमाणे पक्षी जगतातील भिन्न पक्षी जाती लोकप्रतिभेने एका पातळीवर आणून सोडलेले पाहिले की एका अद्‌भुत विश्वाचा सहज प्रत्यय येतो.

लोकप्रतिभेचा आविष्कार

परंपरेने आलेल्या 'पक्षीकुळान' या लोकगीतात विदर्भातील आखर–अंगणात आढळणाऱ्या पक्षीदुनियेचा एक मंगल सोहळा लोकप्रतिभेने यथार्थपणे रेखाटला आहे. या गीताचा आस्वाद घेण्याकरिता ते गीत उद्‌धृत करणे अपरिहार्य ठरते.

टकूम घारीनं हुकूम केला
गवू आनले ग नाना परी ।
या चिळीचे डोळे ग मोठे
निसत बसली संभोरी ।
या टिट्टीनं दयन घातलं
लाह्या बसल्या हारोहारी ।
या लाह्याईनं हयद दयली
बोलळचा बसल्या हारोहारी ।
लांडोरीनंन् कनिक भिजोली
शेव्या वयल्या सतवरी ।
राजहंसाचे लगीन नेमिले
झाली अनसया नवरी ।
लिवून पतरिका राघो हाती
— पक्षीकुळानं सारी ।
हिर्वा राघो फुलोर खातो
जावून बसला झाळावरी
पानबुळीनं पानी भरलं
कावळा देते उचलून ।
कुळ्ल्ली पापळाची करा तयारी
जोहोळ राह्यले लगन ।
घनचिळीसी मालूम झालं
टेकत आली चालूनं ।
त्या तितरानं गुमान केलं
संगं बाटूक घेवून ।
पिठोळीनं गुमाव केलं
का ग राह्यली घंरी ।
हिर्वा राघो फुलोर खातो
जावून बसला झाळावरी ।
चकवा चकवी बसली जोळपानं
चम्मक बिजली बठ्ठीनं ।

नैनमुखांची करा तयारी
घ्या तुमी काकन बांधूनं ।
लगन अक्षिदा वाटू ग लागली
मोठ्या ग हिरती पिरतीनं ।
लालमुन्या म्हनती ग
येतिल अहिर घेवून ।
हे बया ली बाशिंग घेवून
कपायी द्या तुमी बांधून ।

.... ।
चंबार कोकळचानं चतराई केली
जोळा सिवला नक्शगिरी ।
हिर्वा राघो फुलोर खातो
जावून बसला झाळावरी ।
हा नवरदेव परनू आला
सखे पंखर मेळून ।
वाद्ये वाजती नानापरी
संबय ठोकलं कावळचानं ।
संबय ठोकलं कावळचानं
सुरनी वाजोली गरूळानं ।
सुरनी वाजोली गरूळानं
सिंग फुकलं ढोकानं ।
हनुमंताच्या पासी जावून
मशाल धरली कोयशानं

.... ।
दो बरामन दो बाजूला
मंधात चासमोर मेळूनं
कोकस्ताचा बाळी आला
पाट चंदनाचे घेवून ।
मंगलअस्टमी बोलू लागला
लगना जातील लागूनं ।
घारससाना बोलू लागला
लगना आले कोन कोनं ?
हे बदक बोलू लागलं
लगना आले हो भारी ।
राजहंसाचे लगन लागले
झाली अनसया नवरी ।

निळावंतीच्या लोकआख्यानात निळावंतीच्या अलौकिक प्रतिभेचे, तिच्या अद्‌भुत शक्तीचे दर्शन घडते. पशुपक्षी यांची बोली ज्ञात असलेली 'निळावंती' आणि पक्ष्यांचा मंगल सोहळा रेखाटणारी ही अनामिका म्हणजे निसर्गकन्या होत.

'पक्षीकुळान' गीत केवळ कल्पना चमत्कृती नसून निसर्गाच्या पार्श्वभूमीवरील अनेक पदरी कलाकृती आहे. आदिम काळापासून निरागस; निष्पाप पक्षीसृष्टीचा पुरुषांनी वेध घेतलेला आहे. तर हळुवार मनाच्या स्त्रियांना मात्र त्यांच्या अनोख्या विश्वाचा वेध लागलेला दिसून येतो. 'झुनझून पाखरा जा माझ्या माहेरा' असा त्यांच्या भावविश्वाचा पसारा पक्ष्यांच्या विविधरंगी पिसासारखा फुललेला दिसतो.

वऱ्हाडी पक्षीगण :

राजहंस आणि अनसया यांच्या विवाहसोहळचात जे वऱ्हाडी सहभागी झाले आहेत ते मानवी पातळीवरच. पक्षीतज्ञ त्या त्या पक्ष्यांना वेगळचा नावाने संबोधित जरी असले तरी लोकप्रतिभेने लोकजीवनात त्यांची रूढ असलेली नामावळी योजलेली आहे. नर योनीतील राजहंस, राघो, तितर. बाटूक (बटेर), चकवा (चक्रवाक), चंबार कोकळा (चांभार कुकडी), गरूड, ढोक, चासमोर (खंजन) कोयसा (कोळसा), कोकस्ताचा वाळी (सुतार), घारससाना, बदक आणि मादी जातीतील घार, चिडी (चिमणी,) टिट्टी (टिटवी), अनसया (साळुंखी), लाई (भोरी), बालकळी (लाहोरी ?) लांडोर, पाणबुडी, धनचिडी, पिठोळी, चकवी (चक्रवाकी), वठ्ठीन (परीट पक्षी), लालमुन्नी (लालपक्षी), बया ही सर्व पक्षीसृष्टी मानवी व्यवहाराच्या पातळीवर अवतीर्ण झालेली आहे. आणि ही अद्‌भूत किमया साधली आहे एका अनामिकेच्या अवघड प्रतिभेने.

पक्षीवर्णन चातुर्य :

ही पक्षीदुनिया विविधरंगी, लोभस आणि निष्पाप आहे. निसर्गन्यायानुसार सारेच सुंदर परंतु मानवाने आपल्या आवडीनिवडीनुसार त्यात सुंदर आणि कुरूप असे पक्षी मानले; त्याचा नकळत परिणाम पक्षीवर्णनात झालेला दिसून येतो. चिमणी लांडोर, साळुंखी, चक्रवाकी, धनचिडी आणि पाणबुडी यांच्याविषयी लालसा तर घार, टिटवी, भोरी, लाहोरी, बया, वठ्ठी (परीट) यांच्या

विषयी तुच्छतेची भावना जनमानसात दिसते. नरं पक्ष्यातील राघो, राजहंस, चक्रपाक, गरुड, चांभार कुकडी (भारद्वाज), चासमोर (खंजन), सुतारपक्षी बदक यांच्याविषयी प्रीती तर कावळा, तित्तिर, बटेर, ढोक (गिधाड), कोळसा, घारससाणा यांच्याविषयी अप्रीती लोकात दिसते.

मानवाने काही गैरसमजापोटी जशी आपली आवड नावड पक्षी जातीविषयी ठरविली; तद्वतच त्या त्या पक्ष्यांचा स्वभावधर्मही यास कारणीभूत झालेला दिसून येतो. किटक वेचून, टिपून खाण्याची किंवा मृत पशुपक्ष्यांचे मांस भक्षण करण्याची सहज जन्मजात प्रवृत्ती सर्वच पक्षी जातीत दिसते. परंतु स्वच्छता बाळगण्याची जी मूलभूत आवड चिमणी, साळुंखी, लांडोर. पाणबुडी, चक्रवाकी, पोपट, राजहंस, चक्रवाक, भारद्वाज, खंजन यांच्या ठिकाणी दिसते ती घार, कावळा, ढोक, बदक यांच्या ठायी आढळत नाही.

टिटवीने गावावर चक्कर टाकणे, घार आणि ढोक यांनी बहुसंख्येने गावावर गिरक्या घालणे ही अशुभाची लक्षणे मानली जातात. कावळा, घार, ढोक हे पक्षी मृतपशूंचे आपल्या तीक्ष्ण चोचींनी ज्या पद्धतीने लचके तोडतात त्यात लोकांना रानटीपणा, पाशवीपणा जाणवल्यास गैर काय? स्वाभाविकच यांना लोकमानसाने पारंपारिक दृष्टीनुसार शूद्र लेखून वर्णनप्रसंगी निम्न श्रेणीचा दर्जा दिला. प्रचलित जातीव्यवस्थेच्या जाणिवेचा तो परिपाकही मानावा लागतो.

प्रकृतिधर्मानुसार दर्जा :

गीतान्तर्गत पक्षी सृष्टीत जशी निसर्ग सम्मत विविधता आहे तशी त्यांच्या प्रकृती धर्मानुसार कामाची विभागणीही आहे. त्यांच्या कामाचा दर्जा हा लोकजीवनातील त्यांच्या विषयीचा दर्ज्याचा द्योतक आहे. स्व–संरक्षण किंवा वंश रक्षणार्थ सामूहिक पातळीवर पक्षी जरी प्रतिकार करतांना दिसतात तरी त्यांचा वावर पृथक पृथक कळपाने चालतो. ह्या विवाह सोहळ्यात त्यांच्या कळपांचा लोप होऊन ते व्यक्तिगत पातळीवर सहभागी झालेले आहेत आणि त्यांच्या प्रकृती धर्मानुसार वाट्याला आलेली जबाबदारी त्यांनी आनंदाने पार पाडलेली आहे. अर्थात् मानव सुलभ मानापमानाचे प्रकार त्यांच्यात उद्भवले हा मोठा हृद्य पैलू आहे.

मानवी सहवासात वावरण्याची चिमण्यांची सहज प्रवृत्ती असल्याने आणि दळण, धान्य साफसूफ करणाऱ्या स्त्रियांच्या भवतीभोवती अळधा वेचणाऱ्या चिमण्यांना या कामाची माहिती असल्याने जणू काही धान्य निवडण्याचे काम चिमणीच्या वाट्याला आलेले दिसते. पिठाच्या गिरण्या नव्हत्या त्या वेळी वऱ्हाडनी रात्री किंवा पहाटे दळण दळायच्या. निशाचर असलेल्या टिटवींच्या वाट्याला ही अवघड कामगिरी रात्री जागण्याच्या सवयीचा भाग म्हणूनच आलेली आहे. हळद दळणाऱ्या बायकांचे हात पिवळे धम्म होतात आणि लाहीची चोच पिवळी जर्द असल्याने या रंग सादृश्यातून हे काम तिने पार पाडलेले आहे; हे वर्णन करण्यात कमालीचे औचित्य लोकप्रतिभेने साधले आहे.

कणिक तिंबण्याचे काम जरा ताकदीचे असल्याने इतर पक्षिणीमध्ये लांडोर हीच शरीरसौष्ठव लाभलेली म्हणून ही जबाबदारी तिने लीलया पार पाडलेली दिसते. पाणबुडीच्या वाट्याला पाणी भरण्याचे आणि बोल्लळयांच्या नशिवी रुखवताचे सामान तयार करण्याचे काम. असा ह्या वऱ्हाडनींचा सहभाग दिसतो.

चक्रवाक–चक्रवाकी हे युगल हंसकुळीतील असल्याने ओहर म्हणून ते वावरतात. ग्रामव्यवस्थेनुसार बया (माळीण) आणि वठ्ठीन (धोबीण) विधिवत सहभागी झालेल्या आहेत. केसाळीत पानविडा बांधलेला गेठा (काकण) अरिष्टनिवारणार्थ वठ्ठीन आणि बया (माळीण) नवरदेवाला बाशिंग बांधतात.

नरपक्ष्यांच्या वाट्याला जी कामे आलेली आहेत ती त्यांच्या त्यांच्या कौशल्यानुसार. अलुतेदारी बलुतेदारी ग्रामव्यवस्थेचे प्रतिबिंब प्रस्तुत गीतात मोठे मनोहारी उमटलेले आहे. कारु–नारु पैकी चांभार कोकडा पादत्राणे शिवून आणतो; सुतारपक्षी पाट तयार करतो आणि कोळसा मशालजीचे न्हाव्याचे काम पार पाडतो. कावळा, ढोक आणि गरुड हे वाजंत्रीवाल्यांची भूमिका पार पाडतात. ग्रामव्यवस्थेत जसा हा उपेक्षित वर्ग तसा ह्या गीतातील हा उपेक्षित पक्षीगण होय. संपूर्ण

वर्णनात पक्ष्यांच्या प्रकृतीधर्माचे वास्तवपूर्ण दर्शन घडविण्यात लोकप्रतिभा कमालीची यशस्वी ठरलेली दिसते.

विवाहविधीतील संस्कारशीलता ।

हिन्दुधर्म विवाहाला संस्कार तर ईस्लाम करार मानतो. करार तडकाफडकी होऊ शकतो पण संस्कार मुरवावा लागतो. नवरदेव–नवरी यांना वेगवेगळ्या विधींच्या संस्कारप्रक्रियेतून गेल्यावर पती–पत्नी या नात्यातील मांगल्याचे महत्त्व कळते. राजहंस आणि अनसया यांना अशाच विधिविधानातून संस्कारशीलता लाभलेली दिसते. तीन चार दिवस चालणाऱ्या विवाह समारंभात देवक बसविणे, जेवणार काढणे, हळद लावणे, रहान लावणे, न्हानोरा मांडणे, अहेर चढविणे, काकण बांधणे, ओहर बसविणे, अक्षर फिरविणे आणि भटजीबुवांनी अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणणे या विधींचा समावेश असतो. प्रस्तुत गीतात नानमुख, (मांडव उभारणी, देवकुंडी, देवक, अहेर व ओहर बसणे); काकण बांधणे, बाशिंग बांधणे, नवरदेवाने मारोतीवर जाणे वगैरे सर्व विधी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सूचित झालेले आहेत.

लोकमानसात साळुंखीच्या शालीनतेची प्रतिमा असल्याने तिचा विवाह राजहंससारख्या राजबिंड्या नवरदेवाशी लावण्यात लोकप्रतिभेने औचित्य साधले आहे. सौंदर्याबरोबर शालीनतेचा गौरव करण्यात लोकेच्छाच दिसून येते.

प्रस्तुत गीताचा आवाका मोठा असला तरी ते अपूर्ण असावे असे वाटते. वि. वा. जोशी यांना तीन चार कडव्यांचे त्रुटीत स्वरुपात हे गीत आढळले. प्रस्तुत लेखकाला त्यापेक्षा दीर्घ रचना आढळली एवढेच. परंतु ह्या पेक्षाही अधिक प्रदीर्घ स्वरूपात हे गीत आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

△ △

डॉ. मधुकर वाकोडे,
राजर्षी शाहू नगर,
अंजनगाव सुर्जी, ४४४७०५



चित्र । एस. एस. शिंदे

अनुक्रमणिका

॥ दोन दीर्घ कविता ॥

एक कविता अपुरी / सुरेश द्वादशीवार

रंगीत मेघांचे हे वादळ
वसले केव्हा दिवा होऊनी
स्मरतो का तो क्षण सोनेरी
तू मी विरलो हवा होऊनी ?

आठवतो का सूर्य निरोपी
धूसर गोजीरवाणा अनवट
तशात तू चालविला, स्मरते
'चला गडे'चा हेका खुळचट.

अजुन कोरला क्षितिजावर क्षण
अजुन मोहरे ओठावर व्रण
भिरभिरल्या एकांतावरची
संध्येची स्मरते का पखरण ?

असेच होतो बोलत आणिक
सभोवतीचे विश्व थांबले
गाज एक वाऱ्याची आणिक
ताऱ्यांनी आकाश गोंदले.

आठवते का,
मागितले, तुजजवळी मी तुज
आणिक झुकले अंगावरती निळे अंबर
निळी राधिका, कृष्ण निळा अन्
निळीच दिसली होती यमुना.
आणि निळ्या नेत्रांतून फुलले
निळ्या नवतीचे निळेच झुंबर.

स्मरते का तुज,
झरली होती अमृतवर्षा
गोड गुलाबी मेघकडातून
काही न शमले
काही न दमले

अजून तृष्णा अमृत स्पर्शी
अजून तृष्णा अतृप्तंकर
अजून ओठावरी नाचरे
श्वास गुलाबी अधिरे नवथर

स्मरते का ती मिठीतली सम
ओंजळीत अन् ओले गाणे
अर्ध्या अद्वैताची फुंकर
उभवीत देहावरती राने

तशात तुज दाखविले मी तुज
अमृतमय झालो तू-मी अन्
सभोवतीची दुनिया किंकर

स्मरते का ती कळ सळसळती
गोड अ-शरीरी आणि शहारा
हळव्या स्पर्शातून जागले
सगळ्या अंगांगातून संगर

होताना बोटाचा गुंता
सवेच गेलो गुंतत आपण
झुकलेल्या पापणीत कैसे
लपले नजरांचे अन् संकर

कुठवर तू अन् मी कुठवर
ते सरले सारे
मी-पण झाले अन् आपणपण.

दूर दूर क्षितिज दूर
त्यावर आभाळ चूर
निसरडेच देहकडे
आणि किनारेच क्रूर....!

तू नसते तेव्हा
आकाशच हे होते अंतर
तू असते तेव्हा
नसते कांही
सगळे नुसते नंतर नंतर

तू नसते तेव्हा
प्रकाशही अंधारत जातो
तू असते तेव्हा
सरते सगळे
ताऱ्यांनी मग भरते अंबर

□ □

दिशा हरवलेलं आभाळ / शशिकांत हिंगोणेकर

१

मृत्युशाळेतल्या प्रार्थना
आताशा तुझ्या ओठांवर येताहेत
कंठातली निखाऱ्यांची गाणी
कुठे विझवलीत !

२

दिशांच्या वाटेवर आला होतास !
पण....दिशांना अर्थ असतो
हे तुला अजूनही कळलेलं नाही.

३

असा कुठला पाऊस
तुझ्या स्वप्नांवर कोसळला
की....
तू त्यात उद्ध्वस्त झालास.

४

तुझ्याबद्दल झाडं
आता नेहमी म्हणतात.
शब्दांचा खून पचवून
जगण्याला काही अर्थ नसतो

५

क्रांतीची भाषा...
लिहायला–बोलायला–वाचायला
तशी सोपी असते मित्रा
पण....क्रांती कवटाळायला
आधी वादळ व्हावं लागतं.

६

त्या परंपरेच्या बेड्या
तुला तोडता आल्या असत्या
पण....तू इतकी घाई केली की
त्यात तुझेच तुकडे झाले

७

पंख फुटायच्या आधी...
पाखराने उडायचा प्रयत्न
केला तर....
उडता उडता पाखरू
कोसळतं....
हे तू समजून घ्यायला हवं होतं.

८

अलिकडे म्हणे तू
जिवंत जळतोयस
पण....मित्रा
जळत्या धुरांना लपेटणं
म्हणजे जळणं नसतं.

९

आता जगण्याचे नवे बहाणे
शोधू नको...
असेच बहाण्यांमध्ये आयुष्य
संपले तर....त्याला काय अर्थ ?

१०

जगताना तू स्वतःकडेच
पहात गेलास....
भोवताली किती झाडं सुकलेली होती
हे एकदा तरी पहायला हवं होतं,

११

जिवं आयुष्य....
तुझ्या खांद्यावर लादलं गेलंय
त्या चिमणीच्या आयुष्याचा खेळ
तू आता करू नकोस....
चिमणीच्या पंखांनी
आभाळ पेलता येईल का ?
हे चाचपून तरी पहा.

१२

यातनांचा डोह
तुला रोजच भेटतो
याचा काय अर्थ आहे
हे तपासण्यात गुंतू नको
नाही तर....पुन्हा गुंता वाढतच जाईल

१३

स्वतः विरुद्ध पेटणं
म्हणजे ते बंड नसतं.
बंड पेटवायला....
भोवतालचे निखारे वेचावे लागतात.

१४

तू जिथं तिथं
तुझ्या दिशांचा गवगवा केलास
आणि शेवटी आता
दिशा हरवलेलं आभाळ
म्हणून फक्त उरलाय

१५

अंधार फाडणं...इतकं सोपं नसतं
जितकं तू समजला होतास
अंधार फाडायला
दिशांचे हात घट्ट करायचे असतात.

१६

तुझ्या स्वप्नांचे मोर
उंचच उंच उडत होते
तेव्हा तू धुंदीत होता
म्हणून मोरांचे पंख
छाटले गेलेत....
हे तुझ्या खूप उशीरा लक्षात आलं !

१७

तुला कोणी समजून घेत नाही
ही तुझी तक्रार....
किती अर्थहीन आहे...
हे जरा आयुष्याची मागची
पानं वाचून बघ...
म्हणजे कळेल.

१८

रक्तफुलांचा सडा
तुझ्या अंगणात पडला असता
पण....झाडाला मुळासकट
छाटण्याचा विडा उचलला आहे
तुझ्याच हरेक श्वासांनी

१९

स्वप्नांचा पाचोळा
वाऱ्यावर उडतोय म्हणून
तुझा काळजपक्षी तडफडतोय.
आता या....
काळीज–पक्षाला नव्याने फडफडण्यासाठी
तुला पुन्हा पावलांना जपावं लागेल.

२०

शब्दांना जसे लगाम घालावे लागतात
तसे कधी कधी ओठांनाही लगाम हवे असतात
तुझ्या हातातले लगाम तुटून गेलेत
म्हणून हे तुझं आयुष्य
निरर्थ बेलगाम होण्याची
शक्यता नाकारता येत नाही.

□ □

(एकांकिका स्पर्धेतील निवड)

द डेथ!

विजय साळवी

[प्रवेश एक]

[जेलच्या एका कोठडीत एक कैदी सकाळी होणाऱ्या फाशीच्या शिक्षेची वाट पहात विचार करीत बसला आहे. मधेच उठून उभा राहतो आणि इकडे तिकडे विचारमग्न स्थितीत फेऱ्या मारतो. खिडकीतून बराच वेळ बाहेर पहात राहतो. काही वेळाने स्वतःशीच बडबडत]

अनुक्रमणिका

त्रिगेन्था : "छे ! साला विचार करून डोकं फुटायची वेळ आलीय ! विचारांचे हे किडे डोक्यात वळवळायला लागले ना, मग वाटतं नको ते जगणं. [सुस्कारा सोडून] हं, आता तेही आमच्या नशीबात आहेच कुठं म्हणा ? फक्त सात तास. सात तासांची ही मर्यादा संपली की मग आहे तो फक्त काळाकुट्ट अंधार. प्रकाशाकडे नेणारा ? नाही. हा अंधार प्रकाशाकडे नाही जाणार. कारण या अंधारातच संपणार आहे मी. संपूर्ण नष्ट होणार आहे मी. (हसतो) मला, मला फाशी झालीय. उद्या सकाळी पाच वाजता या इहलोकीची यात्रा संपणार आहे माझी. कुठंतरी दुसऱ्या लोकांत जाईन. छे, भंपक वार्ता आहेत सगळ्या या. कुणा भिकाऱ्यानं पोटाची खळगी भरावी म्हणून निर्माण केलेल्या. झूट आहे सारं. या जगात खरं काय असेल तर तो फक्त स्वार्थ, पण... पण मृत्यूनंतर नेमकं होतं तरी काय ? कुणीतरी म्हटलंय की पुनर्जन्म होऊ शकतो. अशा अनेक अनामिक सूर्यमालिका त्या डोक्यावरच्या विस्तीर्ण पोकळीत आहेत. त्यात पृथ्वीसारखे गरगरणारे अनेक ग्रह आहेत. अशाच एका पृथ्वीवरचा जीव इथूच उठून त्या पोकळीला छेदून दुसऱ्या मालिकेच्या तशाच आणखी एका पृथ्वीवरती पुन्हा उगवतो म्हणतात. पण तरीही नेमकं घडतं काय ? ती वेळ येते म्हणजे नक्की येतेच का ? समजा इथलं कुणी मेलंच नाही तर ? वास्तविक...वास्तविक निसर्गाला ही गरजच का भासावी ? का त्यानं हा जीवघेणा खेळ खेळावा ? ओह, डॅम इट. प्रश्नांची ही भुतावळ अशीच फेर धरून नाचणार आहे. (डोकं धरून खाली बसतो. क्षणभर शांतता. काही वेळाने हळूहळू उठतो. एकदम उसळून) नाही, नाही. मला मरायचं नाही. बास्टर्ड साले. फाशी द्यायला निघालेत लांडगे, एक नंबरचे हरामखोर. (थोडासा शांत होत) सर्वसामान्य माणसंही मरतात तसा फाशीला जाणाराही मरतच असतो. फरक फक्त एकच. फासावर जाणाऱ्याला ती नेमकी वेळ माहीत असते. इतरांना तेच समजत नाही, मृत्यू–फाशी–वेळ, काय त्रिकोणी सापळा आहे. पहाटेचे पाच. तत्पूर्वीच झोप लागली असेल तरच कुणाचं तरी हलवून जागं करणं. मग तो देहशुद्धीचा औपचारिकपणा. आंघोळीनंतरचं अत्तर शिंपडणं, मसणवाटेवरती ही अमली मूर्खासारखी फुलं पसरून साला त्याचा उपयोग काय ? हे म्हणजे बोकडाची गर्दन उडविण्यापूर्वी मंत्राची फुंकर मारल्यागत. तो प्रीस्ट येऊन म्हणे आत्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना करतो. वा ! छान. म्हणजे सगळाच भंपक बाजार. अरे, इथे तुझे मंत्र घेऊन काय चोंदलायचं आहे ? हो, आणखी एक महत्त्वाचे...शेवटची इच्छा. मडऱ्यांनो फासावर जाणाऱ्या कुठल्याही कैद्याची अखेरची इच्छा दुसरी कोणती असणार ? केवळ एकच.. मला फासावर देऊ नका. जगायचं आहे. पुरवताय अखेरची इच्छा ? मग झक मारायला विचारता कशाला ? सालं मरण अर्ध्या तासावर आल्यावर कोणता डोस्क खांद्यावर मौजूद असलेला माणूस दारू मागेल ? बाई मागेल ? परत खायला मिळणार नाही म्हणून दोन चार बोकड कापा म्हणेल ? भिकारचोट साले, अखेरची तृप्ती विचारताहेत ? साला उद्या कोणी विचारलं तर आपण एकच मागणार. देतोस तुझी बायको मजा करायला अर्धाएक तास ? पुरवतोस माझी इच्छा ? आणि इन केस तुझी बायको घरी नसेल किंवा माहेरी गेली असेल तर घरात तरणी पोरगीबिरगी असेल ना ? म्हणजे मग प्रॉब्लेमच नाही. जमत नसेल तर विचारत बसू नका. लवकरात लवकर रिकामं करा. आपणाला ते फुकटचं टेन्शन नको आणि इतकीच काळजी होती तर का त्या रामनला सेपरेट कोठी दिलीत ? का त्या ख्रिस्तोफरला क्षणभराकरताही बाहेर पडू दिले नाहीत ? कारण...कारण

अनुक्रमणिका

ते खतरनाक होते, म्हणुनच ना ? मग का त्यावेळी तुम्हाला त्या माणुसकीची जाण राहिली नाही ? ती अखेरची इच्छा कुठं गेली होती त्यावेळी. देहधर्म पार पाडायलाही तुम्ही त्याला कोठडीच्या बाहेर सोडलं नाहीत. ते सगळं तिथंच कागदावर करायचं आणि झालं की खिडकीजवळ नेऊन ठेवायचं. बाहेरच्या पोलीसानं मग ते बाहेर टाकायचं. इतकीही माणुसकी तुम्हाला पाळता आली नाही. इतकाही विश्वास त्याच्यावर ठेवता आला नाही. नुसती उर्मटगिरी. जसे काही तुमच्या बापाचे नोकरच पण तोही गडी वस्ताद निघाला. एक दिवस क्षुल्लकशा कारणावरून बाचाबाची झाली आणि त्यानं तो कागद सरळ पोलीसाच्या तोंडावरच फेकून मारला. खा साल्या. पोटभर खा. (हसतो आणि दरवाजाजवळ जातो. नंतर परत खिडकीजवळ येतो.)

खरं तर या रंगहीन आणि वेचव आयुष्याचा वीटच आलाय. पण कुठल्या जीवाला जगण्याचा मोह आवरलाय. मलाही जगायचंय. जगण्यासाठी आवश्यक आहे ते सर्व काही माझ्याजवळ आहे. उलट जीवन चैनीत घालवीन मी. इतरांसारखं रडतकुढत नाही जगणार मी. चैन करायला हवी असणारी संपत्ती आलीय माझ्याजवळ. सुख भरभरून घ्यायचंय मला. आणि का घेऊ नये ? अखेर मीही एक माणूसच आहे. खुनी असलो म्हणून काय झालं, मलाही मन आहे. मलाही वाटतं की माझा एक सुखी संसार असावा. छोटसंच पण टुमदार घर. पूर्ण समाधानी, सुखी संसार [भावविवश होऊन] आणि मेरी. माझ्या जीवनाची अर्धी वाटेकरीण. एक नुकतंच उमललेलं फूल. रात्रीची वेळ. बहुदा लास्ट शो सुटलेला. रूमकडे जायला वळलो. आणि चौकातच एक टोळकं कुणाचीतरी छेड काढीत असलेलं दिसलं. सहजच पुढे गेलो. आणि ती नजरेस पडली. लांबसडक केस आणि...आणि निमळत्या बोटांची ती सुंदर नखं. त्या अंधारातही घाबरलेले तिचे निळसर डोळे विलक्षण सुंदर भासत होते. मला राहवलं नाही. त्या लांडग्यांची बेदम पिटाई केली. भ्यायलेली हरिणी आता विश्वासाच्या नजरेनं माझ्याकडे पहात होती. माझीही नजर मी त्या नजरेला भिडवली. आणि...ती तशीच अडकून राहिली. मला खात्री आहे. ती अजूनही माझी वाट पहात असेल. माझ्यासाठी स्वत:चा जीवही द्यायला ती मागेपुढे पहाणार नाही. पण मी...हा सडत बसलोय या अंधारकोठडीत. बास्टर्ड ! बास्टर्ड आहे मी. साला एक खून पचवू शकलो नाही. सगळं पचवायची ताकद हवी अंगात. पण साला दगा दिला दैवानं. त्याची तरी काय चूक म्हणा ? जन्मापासूनच असा दगा दिला. मग मृत्यूच्या वेळीच का देऊ नये? अशाच कुठल्यातरी सडलेल्या गटारात जन्म झाला आपला ! कुठल्या पैसेवाल्याचं फळ होतो कुणास ठाऊक ? त्या हिरव्या नोटांनी घडवलं आपल्याला. त्याच गंद्या गल्लीत वाढलो. पाकीटमारी, चोरी आणि पुढं, पुढं इतरही धंदे. सगळ्यात एक्सपर्ट. मेरी भेटली नसती तर हे असंच चालू राहिलं असतं. या ब्रिगेन्झाला थांबवायची ताकद कुणाच्यात होती ? पण त्या लांबसडक केसांनी, त्या हिरव्या डोळ्यांनी भुरळ घातली या ब्रिगेन्झाला, आणि तो गुंततच गेला. कदाचित ही फाशी नसती झाली तर मेरीच्या मांडीवर डोकं ठेवून सुखानं झोपलेला आढळला असता हा ब्रिगेन्झा ! पण नाही. दैवाच्या मनात तसं घडू द्यायचं नव्हतं. पण मूर्खांनो ब्रिगेन्झा असा फालतू मरायला जन्माला नाही आलेला !" (जोरजोरात हसू लागतो इतक्यात बाहेरून आवाज येतो, " कैदी नं. अठरा, जेलर साहेबांनी तुला भेटायला बोलावलंय. त्यांच्या केबिनमध्ये चल. तावडतोब निघ. आणि हां, चलाखी करण्याचा प्रयत्न करू नकोस, चल आटप लवकर." आवाज बंद होतो. ब्रिगेन्झा हळू हळू पावले टाकत दाराकडे जायला निघतो. प्रकाश मंद मंद होत पूर्ण नाहीसा होतो).

प्रवेश दोन

(जेलरची केबीन, मधे टेबल बाजूला दोन खुर्च्या. दरवाजात व्रिगेन्झा हाताची बोटं एकमेकात गुंफून उभा आहे. जेलर खुर्चीत बसला आहे.)

जेलर : ये. ये. व्रिगेन्झा मी तुझीच वाट पहात होतो. ये बस इथं. (व्रिगेन्झा हळूहळू चालं खुर्चीजवळ येऊन उभा राहतो. जेलर परत एकदा त्याला बसायला सांगतो.) अरे बस ना. फिकीर करू नकोस. विश्वास बस.

व्रिगेन्झा : मी इथंच ठीक आहे. का बोलावलं होतं मला ?

जेलर : (उठून उभा रहात) मिस्टर व्रिगेन्झा मी तुला या केबिनमध्ये मुद्दाम बोलावलं आहे. तुला माहितच आहे. तुझी ही अखेरची रात्र आहे. (स्वर बदलून) या जेलरच्या धंद्यात आजकाल हे असं कोणाला फासावर द्यायचं म्हटलं की झेपत नाही. वय झालंय. तुझ्या इतकंच मलाही ती वेळ जवळ यायला लागली की अस्वस्थ व्हायला होतं. (पुढे येत) कम ऑन, लेट अस ड्रींक. अजून बराच अवधी आहे. (जेलर टेबलाखालून बाटली काढतो. बाजूचेच दोन ग्लास उचलतो आणि ते भरतो. ओव्हरकोटामधून सिगरेटचं पाकीटही काढून टेबलावर ठेवतो. ते पाहून व्रिगेन्झा खूष होऊन हसतो. प्रकाश कमी कमी होत व्रिगेन्झावर स्पॉट).

व्रिगेन्झा : अजून बराच अवधी आहे. हा माणूस स्पीक्स सेन्स ! नाही म्हणजे आता रात्रीचे दहा वाजलेत. सकाळी पाचची अपॉइंटमेंट आहे...यात्रेला अर्धा एक तास अगोदरच सुरूवात होईल. चालेल. दरम्यानच्या काळात काहीही घडू शकतं. (प्रकाश पूर्ववत्, व्रिगेन्झा मोठ्याने हसतो. जेलर दचकून त्याच्याकडे पहातो. व्रिगेन्झाला ग्लास देतो व आपणही घेतो)

जेलर : व्रिगेन्झा तुझ्या धाडसाची दाद देतो मी. नाहीतर फासावर जाण्याची रात्र आली की माणूस काय दंगा करतो. कोणी डोकं आपटून घेतो तर कोणी हातापाया पडून विनवण्या करतो. कोणी रडत बसतो. तर कोणी हसतच बसतो. पण तुझ्यातला हा जबरदस्त आत्मविश्वास पाहून मला अगदी तू इथं आल्यापासून तुझं कौतुक वाटत आहे. तुझं व्यक्तिमत्व, तुझी तडफ हे सारं पाहून माझ्या मनात तुझ्याविषयी आदर निर्माण झालाय.

व्रिगेन्झा : कर स्तुती कर पण तू कितीही स्तुती केलीस तरी तू कुठं थांबणार आहेस याची कल्पना आहे मला.

जेलर : ही स्तुती नाही व्रिगेन्झा. तुझ्या धाडसाचं खरंच कौतुक वाटतं मला. पण तरीही व्रिगेन्झा मृत्यू म्हणजे शेवटी माणूस कितीही जबरदस्त कुवतीचा असला तरी अखेर मृत्यूच. इथं मरायला कुणाला आवडतं ?

व्रिगेन्झा : तू मला भीती घालतोस काय ?

जेलर : व्रिगेन्झा तू घट्ट काळजाचा आहेस तरीही अखेर प्रेशर हे येणारच. ही वेळच चमत्कारीक असते. परंतु तू हे मान्य करशील की मी जातीने तुझ्याकडे तू इथं आल्यापासून लक्ष पुरवतोय. तू जाम आवडलास मला. अगदी तू खूनी आहेस हे माहीत असूनही (तो असे बोलत असताना क्षणभर थांबतो. व्रिगेन्झा हळूहळू पाऊल टाकत दरवाजाजवळ जातो. क्षणभर न्याहाळतो. स्मितहास्य करत मागे वळतो. जेलर त्याच्याकडे पाहतो आहे. व्रिगेन्झा जवळ आल्यावर)

जेलर : हे बघ व्रिगेन्झा, मला तुझ्याविषयी सहानुभूती वाटते. अलिकडं, सांगितलं ना की त्या खोलीची मलाच जास्त भीती वाटते. कधी कधी वाटतं की एका सकाळी जावं नी स्वतःच टांगून घ्यावं. तुला माहिती नसेल आकडा सांगतो, आता रिटायरमेंटला दोन वर्षे आहेत. आजवर या नोकरीत मी बरोबर सत्तेचाळीस जणांना त्या तसल्या खोलीत नेलंय. यू आर फॉर्टी एटथ् पर्सन !

व्रिगेन्झा : (थोडासा उसळून) तुला माझ्याविषयी कसली सहानुभूती वाटते माहिती आहे मला. यार आपण पोचलेलो आहोत. तू फासावर नेणारी माणसं मोजतोस—मी आजवर तसलं भिकार गणित कधी घालत

बसलो नाही. ठीक आहे, तरीही तू बोल. शेवटी तुला नेमकं काय पाहिजे ते मला माहिताय्. (तो टेबलाजवळ येतो. बाटली परत दोन्ही ग्लासात ओततो. दोघेही सीप करतात) बाहेर हळू आवाजात रडण्याचे दबक्या आवाजाचे हुंदके ऐकू येतात. ब्रिगेन्झा खिडकीजवळ जाऊन कानोसा घेतो.)

ब्रिगेन्झा : डरपोक साले. फाशी नक्की झाल्या-पासून रडायला लागलेत. साल्यांना इतकीही अक्कल नाही की मरण टाळणं तुमच्याच हाती असतं. फक्त मेंदू तल्लख हवा. मग मार्गही बरेच सापडतात.

जेलर : ब्रिगेन्झा तुलाही माहीत आहे की या व्यर्थ बडबडीचा काहीही उपयोग नाही.

ब्रिग्रेन्झा : असं तुला का वाटावं ?

जेलर : हे बघ, तुझ्यात धाडस आहे, मान्य करतो मी. पण पळून जाण्याचा मूर्खपणा करण्याचा विचार जरी मनात आणलास तरी तुझे हाल कुत्र्यापेक्षाही वाईट होतील. इथं राहून काळचाचे पांढरे झालेत माझे. अशा माणसांना दिल्या जाणाऱ्या शिक्षा किती भयानक असतात याची कल्पना आहे तुला ?

ब्रिगेन्झा : शिक्षेला घाबरण्याइतका भ्याड नाही मी.

जेलर : भ्याड नसशील पण माणूस तर आहेस ना हे बघ इथं दिल्या जाणाऱ्या शिक्षांचा बाहेर मागमूसही नसतो. कारण शिक्षा भोगणारा बाहेर जाऊच शकत नाही. आणि समजा गेलाच तरीही जेमतेम फाटकापर्यंत पोहोचेतोवर त्यानं वरचा रस्ता धरायला सुरुवात केलेली असते. जळक्या मेणबत्तीचे चटके वेदना असह्य करतील ना तेव्हाच लक्षात येईल तुझ्या.

ब्रिगेन्झा : हे बघ ज्याला उद्या फाशी होणार आहे तो या असल्या वेदनांची कदर करतोच कशाला ?

जेलर : ब्रिगेन्झा तू खरच घट्ट काळजाचा आहेस. माझ्या एका प्रश्नाचं उत्तर देशील ?

ब्रिगेन्झा : विचार पण खात्री देत नाही, प्रयत्न करेन.

जेलर : ब्रिगेन्झा, मी हा प्रश्न प्रत्येकाला अशा अखेरच्या रात्री आवर्जून विचारतोच. कारण माझा, आपल्या या कायद्यावर विश्वास नाही. इथं चालतं ते सारं औप-चारिक. ब्रिगेन्झा मी कित्येक खूनी माणसं वकिलांच्या हुशारीवर सहीसलामत सुटलेली पाहिलीत तशीच कित्येक निरपराधी माणसं पोलिसांनी खोटा पुरावा उभा करून फासात धडधडीत अडकवलेली बघितलीत. हा सगळा नशिबाचा भाग असतो. एकच सांग, कारण आता सत्य असत्याला फारसा अर्थ नाही. तू खरंच तिचा खून केलास ? (ब्रिगेन्झा उठतो आणि दोन्ही हात खिशात घालून केबिनच्या खिडकीजवळ जातो. डोळे बारीक करून बाहेर पाहातो. वाता-वरणात एक प्रकारचा भेसूर सन्नाटा पसर-लेला. ब्रिगेन्झा तसाच पाठमोरा वाकलेल्या स्थितीत. जेलर रागाने त्याच्याजवळ जात.)

जेलर : ब्रिगेन्झा तू तिला खरंच मारलंस ? बोल, का पोलिसांनी तुला यात गुंतवलंय ? (ब्रिगेन्झा सावकाशपणे वळतो आणि बेफिकीर हसतो.)

ब्रिगेन्झा : का विचारतोस ? तुला माझी सगळी केस सविस्तर माहिती आहे ना ?

जेलर : ब्रिगेन्झा मी मघाशी बोललोच आहे. मला त्या कोर्टातल्या खेळाशी काहीही कर्तव्य नाही. तिथं खऱ्याचं खोटं सहज होऊ शकतं. त्यावर माझा विश्वास नाही.

ब्रिगेन्झा : परंतु ते जाणून घेण्याची तुझी असली जगावेगळी इच्छा का ?

जेलर : म्हटलं ना सहज. खरंच तू खून केलास ? (जेलर विलक्षण अधिरतेने पाहतो आहे.)

ब्रिगेन्झा : तू हे का विचारतोस मला माहित आहे. ऐक. (ओरडून) मी तिचा खून केला यापेक्षाही तुला मी ते दागीने कुठे दडवलेत यात इंटरेस्ट जास्त आहे राईट ? (जेलर दचकून पाहतो आहे) मला हा प्रश्न अनेकांनी अनेक प्रकाराने विचारला. सुरुवातीला वाटलं की

तो तपासाचा एक भाग असावा. परंतु नंतर नंतर त्याचा खरा वास मला आला. आणि त्याचवेळी मी ठरवलं काहीही झालं तरी मी ते पाच लाखाचे दागिने कुठे दडवलेत हे सांगणार नाही. अगदी फाशी झाली तरी...

जेलर : पण मग आता तुला त्या पैशाचा काय उपयोग आहे ?'

ब्रिगेन्झा : नसेलही. पण मी ते दुसऱ्या कुणाला तरी का द्यावेत ? म्हणजे श्रम माझे, धाडस माझं आणि पैसे तिसऱ्याला. वा ! जेलर-साहेब वा ! बडे होशीयार है आप !

(जेलर पुढे होऊन ब्रिगेन्झाचे हात आपल्या हातात घट्ट धरतो. त्यांचे हात थरथरत असतात.)

जेलर : ब्रिगेन्झा उद्या सकाळी पाचला तुझी वेळ आहे. माझं ऐक. तुला त्या पैशाचा काहीही उपयोग नाही. मी संसारी माणूस आहे. या नोकरीत तुला माहितच आहे, धड पोटही भरत नाही. निदान मृत्युपूर्वी तेवढंच तुला पुण्य लागेल ब्रिगेन्झा !

(ब्रिगेन्झा पुन्हा एकदा त्याचं ते दणदणीत हास्य हसू लागतो)

ब्रिगेन्झा : (शांत होत पण चेष्टेखोर स्वरात) तुझं पोट भरत नाही म्हणतोस. पण माझ्या पोटाचं काय रे ! आणि इतके दिवस तुझं पोट भरतच होतास ना आणि संसारही आतापर्यंत चालवलासच ना ? मग माझ्या या संपत्तीनं त्यात अशी काय मोठीशी भर पडणार आहे ?

जेलर : तुला कळायचं नाही ते. (अगतिक होत) माझ्या...माझ्या तीन मुली लग्नाच्या आहेत. मुलगा कॉलेजात पाठवावयाचा आहे. शिवाय बायकोचं आजारपण आहे. फक्त दोनच वर्षात मी रिटायर होणारं आहे. कसं व्हायचं ?

ब्रिगेन्झा : हे तुला माहीत होतं ना ? मग कशाला केलीस एवढी पोरं ? कुटुंबनियोजनाचे बोर्ड वाचता येत नव्हते ? टाकायची होतीस शीर तोडून. पण तुलास हौस दांडगी. उब-वीत बसलास बायकोला !

जेलर : असं म्हणून नकोस, मुलगा हवा होता म्हणून करावं लागलं हे सगळं हे बघ, हे बघ ब्रिगेन्झा, काहीही असलं तरी तुला त्या पैशाचा आता काही उपयोग आहे का ? मरण फक्त सात तासावर येऊन ठेपलं आहे. तूही मान्य करशील की, तू इथं आल्या-पासून मी तुझ्याकडं जातीनं लक्ष पुरवतोय. मग माझंही एवढं काम कर. पोराला कॉलेजात शिकवायचा आहे. तुला माहीतच आहे पोरांचा कॉलेजचा खर्च हल्ली काय वाढलाय. त्यातून माझा पोरगा जेमतेम पास झालेला. डोनेशन मला परवडणार नाही. कॉलेजात तर घालायला हवा. सांग एवढा पैसा कुठून आणू मी ? (जेलर त्याच्या-कडे पहातो आहे.)

ब्रिगेन्झा : ऐकतोय मी. पुढे बोल.

जेलर : पोरींची लग्नं उरकायची आहेत. एकदा त्यांच्या अंगाला हळद लागली की मोकळा झालो. हुंड्याला कायद्याने कितीही बंदी असली तरी बऱ्यापैकी स्थळ मिळवायचं तर प्रत्येकीला वीस ते पंचवीस हजार खर्च करायलाचं हवेत. तिघींचा मिळून लाखाच्या घरात खर्च होईल. आणि माझ्याकडे तर सगळं मिळून जेमतेम वीस ते चाळीस हजार होतील. आणि हुंडा नाही तर मग सासरी होणारा तो छळ ! ते डाग देणं, ते भाजून मारणं, त्या किंकाळ्या... नाही... नाही... मला हे सगळं टाळायलाच हवं. प्लीज ब्रिगेन्झा ट्राय टू अंडरस्टॅंड मी.

ब्रिगेन्झा : ट्राय टू अंडरस्टॅन्ड यु, वट व्हाय ?

जेलर : म्हणजे ? व्हॉट यू मीन ?

ब्रिगेन्झा : आय मीन एक्झॅक्टली व्हॉट आय से ! तुझ्या पोराचा कॉलेजचा खर्च. तुझ्या पोरींची लग्न. आणि... आणि तुझ्या बायकोचं आजारपण. तिची औषधं, इंजेक्शनं डॉक्टरची फी ! ऑपरेशन. त्याचा खर्च. पण मी... मी त्याची काळजी का करावी ? व्हाट इज माय मिस्टेक ? आय ॲम नॉट रिस्पॉनीसबल फॉर ऑल दीज थिंग्ज ! तुझ्या पोराला पाकीटमारी शिकव. कशाला

अनुक्रमणिका

कॉलेजात जायला हवा. आणि तुझ्या तीन पोरींच्या लग्नाचा खर्च ? अं ? अरे लाव त्यांना धंद्याला. सगळी काळजी मिटेल तुझी. आणि बायकोला कशाला तडफडत ठेवतोस ? घाल एक गोळी कपाळात तिच्या काम तमाम ! (जेलर रागाने 'यू रास्कल' ओरडत त्याच्याकडे धावतो आणि त्याचा शर्ट पकडतो.)

जेलर : (थंड होत, शर्ट सोडून देत) सॉरी ब्रिगेन्झा ! पण तुला माझ्या परिस्थितीची कल्पना नाही म्हणून बोलतोस असा. तू जर माझ्या जागी असतास ना–जाऊदे सोडून दे तो विषय !

ब्रिगेन्झा : का ? सोडून का देऊ विषय ? तू मला रास्कल म्हणालास पण तुला माहित आहे, मी नुसता रास्कलच नाही तर बास्टर्ड देखील आहे. आय ॲम अ बास्टर्ड मॅन. अंडरस्टॅंड ? आय एम ए बास्टर्ड मॅन !

जेलर : (शांत करीत) शांत हो ब्रिगेन्झा मी तुला माझी सत्य परिस्थिती सांगितली. माझी काळजी, माझ्या विवंचना...

ब्रिगेन्झा : 'तुझी काळजी ? तुझ्या विवंचना ? तू काय समजतोस ? काळजी काय तुलाच आहे ? विवंचना तुलाच फक्त आहेत ? आणि आम्ही काय माणसं नाही ? (भावनाविवश होऊन) माझंही एक स्वप्न होतं. त्यात तुझ्यासारखाच किंबहुना त्याहुनही सुंदर संसार होता. माझ्या स्वप्नात ती परी होती. सुंदर...लांबसडक केसांची. निळ्याशार डोळ्यांची नाजूक जिवणीची. तुला...तुला माहीत आहे ? माझं स्वप्न स्वप्नच राहिलं नाही, ती हकीगत आहे. सत्यात उतरलंय ते !'

जेलर : 'अं ?'

ब्रिगेन्झा : 'होय !, ते स्वप्न साकार झालंय. ते अस्मानी सौंदर्य मला मिळालंय !'

जेलर : 'ब्रिगेन्झा तू खोटं तर बोलत नाहीस ना ?'

ब्रिगेन्झा : 'नाही रे जेलर. तुला...तुला माहीत आहे ती मला अशीच भेटली. अगदी सहज लाभली. गुंडांच्या तावडीतून सोडवली मी तिला. बस्स. तेव्हापासून तिने आपलं हृदयच माझ्या हवाली केलंय. माझं सर्वस्व झालंय ते आता. जेलर...जेलर तुला काय वाटतं ? ही...ही नशा नाहीय. खरंच मी नशेत बोलत नाहीये. अरे, खरंतर मला चढलीच नाहीय !'

(तो बोलायचा थांबतो तसा जेलर त्याच्या खांद्यावर थोपटतो. आणि ग्लास भरून त्याच्या हातात देतो.)

जेलर : 'रिलॅक्स ! शांत हो. तुझ्या भावना कळतात मला. पण हे बघ ब्रिगेन्झा, अगदी सिरीयसली सांग. त्या पैशाचा मलाच तुझ्यापेक्षा जास्त उपयोग आहे की नाही ? मग सरळ सरळ सांगून टाक ना ? कशाला उगाच व्यर्थ वेळ घालवायचा. (जवळ जाऊन खांद्यावर थोपटत) सांग बरं ? खून करून पळाल्यावर ते दागिने तू कुठे नेऊन ठेवलेस ? हं. हं. बोल.

ब्रिगेन्झा : (ग्लास त्याच्याकडे देत) 'मी...मी. त्याच नशेत जो पळालो तो सरळ मागच्या गल्लीत आलो. मला विलक्षण धाप लागली होती. तेवढ्यात सायरनचा आवाज ऐकू आला. मी कसंबसं गाठोडं सांभाळत कुंपणावरून उडी घेतली. अंगाला वरंच खरचटलं. कंबरेत लचक भरली. पण वेदनांकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. मी तसाच पुढे धावलो. तिथं एक मोटारवाला मोटारीशी काहीतरी खुडबूड करीत होता. रिव्हॉल्व्हर उलट करून दस्ता त्याच्या डोक्यात हाणला. तो वेडावाकडा होत खाली कोसळला. वेळ रात्रीची असल्याने रहदारी अजिबात नव्हती. त्याच्याच कोटातून चावी शोधून काढली. आणि सरळ मोटार घेऊन जो पळालो तो थेट माझ्या ब्लॉकवर आलो. तिथं...तिथं कोचाच्या खालच्या पोकळीत दागिने लपविले. सकाळी पळून जाण्याच्या विचारात असताना पोलीसांनी पकडले. बस्स ! म्हणूनच आज मी इथं उभा आहे' (जेलर त्याच्याकडे रोखून पहातो आहे. पुढे येत.)

जेलर : 'मिस्टर ब्रिगेन्झा तू...तू मला मूर्खं समज-

तौस काय ? तुझ्या घराची झडती केव्हाच घेऊन झालीय !' (ब्रिगेन्झा हसतो)

ब्रिगेन्झा : (सिरीयस होत थंड स्वरात) 'जेलर तुला मी पैसे देतो. एक काम करशील ?' (जेलर त्याच्या जवळ येतो. त्याचे हातात हात घेतो)

जेलर : 'सांग !'

ब्रिगेन्झा : 'मला इथून बाहेर सहीसलामत काढ ! (जेलर रागाने त्याचे हात झिडकारतो)

जेलर : 'इम्पॉसिबल ! माझी नोकरी जाईल.'

ब्रिगेन्झा : नाहीतरी आता दोनच वर्षे शिल्लक आहेत. माझ्यासारखाच तुलाही वेळ कमी आहे. मला इथून बाहेर काढ. निम्मा माल तुझा.

जेलर : 'काहीतरी मूर्खासारखं बोलू नकोस आणि बाहेर पडल्यावर तू मला पैसे देशील कशा-वरून ?'

ब्रिगेन्झा : 'तो विश्वास तू ठेवायचास. दॅटस् अ रिस्क. मान्य आहे मला. पण मी तुला फसवणार नाही. तू माझे प्राण वाचवलेस याची जाणीव राहील मला. दॅटस् अ प्रॉमीस !'

जेलर : 'ब्रिगेन्झा तुझ्या ध्यानात कसं येत नाही. माझी देखील जेलर म्हणून काही जबाबदारी आहे.'

ब्रिगेन्झा : 'तू मला सारे नियम धाब्यावर बसवून ही पार्टी तुझ्या केबिनमध्ये देतोयस. मग पुढचं काय अवघड आहे ?'

जेलर : 'नाही पोलीस मला सोडणार नाहीत. ते शक्य नाही. तुझ्यासारखा सडेसोट मी नाही. घरी बायकापोरं आहेत.'

ब्रिगेन्झा : 'ठीक आहे. मग दुसरा एक मार्ग आहे.'

जेलर : 'कोणता ?'

ब्रिगेन्झा : 'सांगतो. जेस्ट वेट ! (ब्रिगेन्झा दरवाजाजवळ जातो. स्वतःशीच हसत मागे वळतो. जेलरही टेबलापासून थोड्या अंतरा-वर उभा आहे)

ब्रिगेन्झा : 'तुला मघाशी बोललोच की तू मला इथून बाहेर काढणं हा मार्ग सोपा आहे. परंतु तुझी तयारी नाही.'

जेलर : 'ते शक्य नाही. दुसरा कुठला मार्ग आहे ?'

ब्रिगेन्झा : 'हे बघ एवीतेवी मला फाशी झाले-लीच आहे. आता रात्रीचे जवळजवळ अकरा वाजताहेत. राईट ? मी इथून निघणार आहे कारण तुम्ही दिलेली पाच ही वेळ मला मान्य नाही. मी प्रयत्न करणार आहे.

जेलर : ब्रिगेन्झा, गाढवासारखं काहीतरी बोलू नकोस. इथून पळून जाणं इतकं सोपं नाही.

ब्रिगेन्झा : (सोडा आवाज वाढवून) 'फार सोपं आहे ते. म्हटलं ना, की पाच ही वेळ मला मंजूर नाही. मी मरणार नाही.

जेलर : (ओरडून) 'ब्रिगेंझाऽऽ'

ब्रिगेंझा : (टेबलाकडे जात) एस, यू इडियट. माझ्या कपाळावरच असा फालतू मृत्यू लिहिलेला नाही. (जेलरच्या काही ध्यानात यायच्या अगोदरच टेबलावरची जवळपास रिकामी झालेली बाटली हातात घेऊन अंगात असेल नसेल तेवढी ताकद एकवटून जेलरच्या डोक्यात हाणतो. पिंजऱ्यात पिंजताना कापून उडवावा तसं जेलरचं रक्त खोलीभर उडतं. तो जेलरनं काढून ठेवलेला ओव्हरकोट अंगावर चढवतो. कॅप कपाळावर ठेवतो. त्याचं रिव्हॉल्वर हातात घेऊन उभा राहतो)

ब्रिगेंझा : (स्पाट लाईट) समजा, पुन्हा सापडलो किंवा इथून बाहेर पडता आलं नाही तरीही फारसं बिघडत नाही. परंतु प्रयत्न करणं क्रमप्राप्त आहे. ती वेळ टाळण्याची ही अखेरची संधी आहे. बस्स तेवढी जीप गाठली की पुढं सारं सोपं आहे. नाहीतरी साले सगळे शिपुरडे दारू पिऊन ताठरलेलेच असतात. आणि या अर्धवट प्रकाशात माझा चेहरा पाहण्याचा त्रास कोण घेणार ? (तो ओव्हरकोटमधून जेलरचं कार्ड बाहेर काढतो. एकवेळ थारोळयात पडलेल्या जेलरकडे पाहतो आणि गडगडल्यासारखा हसतो)

ब्रिगेंझा : पाच वाजता. मृत्यू वेळ...साले हराम-जादे त्या त्रिकोणी सापळ्याची भीती घालताहेत. (केबिनमध्ये दिवा बंद करून

तो बाहेर पडतो. यावेळी त्याची चालण्याची पद्धत हुबेहूब जेलरसारखीच असते. प्रकाश मंद मंद होत नाहीसा होतो.)

प्रवेश तीन

[ती खुर्चीवर बसली आहे. हार घातलेल्या त्याच्या छोटया फोटोकडे ती टक लावून पहाते आहे. मधेच पदराने डोळे पुसते आहे. अचानक तिचं लक्ष दाराकडे जातं. तो दोन्ही हात दरवाजाच्या चौकटीवर ठेऊन धापा टाकीत उभा आहे. ती 'तू...तू' असे म्हणत किंचाळत तोंड उघडते. तेवढयात चपळाई करून तो तिचे तोंड दाबून धरतो. काही क्षण तसेच एकमेकांकडे पहात दोघेही उभे आहेत. तेवढयात त्याचं लक्ष त्याच्या फोटोकडे जातं आणि तो हसू लागतो]

ब्रिगेंझा 'म्हणजे तू सुद्धा त्या भंपक माणसासारखी त्या पाचच्या वेळेवरती डोळे ठेऊन जागी होतीस. आय ॲम रीअली डिसॲपॉइंटेड ! (तो रक्ताने ओला झालेला ओव्हरकोट उतरवतो. त्याच्याकडे पाहून तिला हुंदका आवरत नाही. तोंड लपवून ती रडू लागते.)

ब्रिगेन्झा : अॅं ! रडतेस कशाला ? इथे कोणी मेलंय का ? जा, ते कपडे आणि तो ओव्हरकोट जाळून टाक आणि रडू नकोस. मला रडलेलं आवडत नाही. (ती आत जाते. तो आरामशीर खुर्चीवर रेलून बसतो. ती बाहेर येते.)

मेरी : (बाहेर येतानाच) तू...तू पळून कसा आलास ?'

ब्रिगेंझा : 'कसा म्हणजे ? स्वतःच्या पायांनी आलो.

मेरी : तू पायांनी पळून आलास ते कळतंय मला. पण तू जेलमध्ये होतास. सकाळी पाचला तुला फाशी देणार होते. आणखी कुणाचा खून केलास ?

ब्रिगेन्झा : जेलरचा, पण ते जाऊ दे. रमची बाटली काढ. (ती त्याच्याकडे बघत बघतच आत जाते. रमची बाटली आणते. ग्लास त्याला देते.)

ब्रिगेन्झा : (घुटका घेऊन) मेरी तुझ्याकडं माझं एक काम आहे.

मेरी : यापुढं तुझं कसलंही काम मी करणार नाही. हरामखोरा काय कमी पडलं होतं म्हणून तिच्याकडे शेण खायला गेला होतास ? मी, मी तुझ्यासाठी काय करायचं शिल्लक ठेवलं होतं ?'

(तो उठून उभा राहतो. ग्लास टेबलावर ठेवतो.)

ब्रिगेन्झा (शांत स्वरात) नाही मेरी, माझ्यासाठी तू काहीही करायचं शिल्लक ठेवलं नाहीत. कबूल आहे मला. पण ती श्रीमंत होती. तिचा पैसा मला हवा होता.

मेरी : बस्स. बंद कर तुझं तोंड, यापुढं तुझा एकही शब्द ऐकायची माझी इच्छा नाही.

ब्रिगेन्झा : लीसन, मेरी, तू समजतेस तसं अजिबात नाही.

मेरी : मग काय आहे ? हेच ना की तुला पैसा हवा होता म्हणून तू तिच्याकडे शेण खायला गेलास. अरे, इतक्या चटकन विसर पडला तुला माझा ? काय केलं नाही रे तुझ्यासाठी. तुला वाचवावं म्हणून गुन्ह्यातही तुझ्याच बाजूने साक्ष दिली. प्रसंगी अर्धपोटी राहिले पण तुला काही कमी पडू दिले नाही. या...या सर्वांचा विसर पडला तुला ? इतक्या चटकन ?

ब्रिगेन्झा : तसं नाही मेरी. तू सुखात रहावीस म्हणूनच पैसा हवा होता मला. तुला क्षणभर तरी विसरेन का मी ? जेलमध्ये असताना असा एकही दिवस आणि अशी एकही रात्र गेली नाही की तुझ्या आठवणीवाचून तळमळलो नाही. या क्षणापर्यंत मला फक्त तुझा आणि तुझाच मोह आहे.

मेरी : बस्स कर, नाही ऐकवत आता तुझ्या तोंडची ही वाक्यं आता नकली वाटू लागलीत. झूट वाटू लागलीत.

ब्रिगेन्झा : बिलीव्ह मी मेरी. खरंच हे सत्य आहे.

मेरी : होय ना ? मग का तिच्याकडे गेलास ? का माझ्या मनाशी खेळ खेळलास ? त्या कवडीमोल पैशासाठी केलंस हे सर्व. अरे...

अरे मला नको होता रे तुझा तो पैसा. मला फक्त तू हवा होतास. मातीची चुल मांडली असती. पण तुझा संसार फुलवायचा होता मला. हे जीवन तुझ्या चरणी वहायचं होतं. खरं सांगू, तू तू माझा देव होतास. ज्या क्षणी तू मला त्या गुंडांच्या तावडीतून सोडवलंस ना त्याचक्षणी मी तुझी झाले. नाहीतर बसले असते एव्हाना कुठल्यातरी कोठीवर जाऊन. पण तू नशीब फिरवलंस. तू माझ्या नशिबाचा तावेदार आहेस. कुठच्या कुठे भरकटत गेले असते. केवळ तुझ्यामुळे मी या मार्गाला आले. नाहीतर खरंच कुठल्या कुठे भरकटत गेले असते. तुला माहिती आहे, मी मी कशी सापडले तुला ? केव्हा सापडले ? आठवतं ?

व्रिगेन्झा : रात्रीची वेळ होती. कुठल्या तरी टोळक्यात तू अडकली होतीस.

मेरी : होय. त्या चौघांनी माझ्या पाठलागाला केव्हा सुरुवात केली मला कळलंच नाही. निर्जन रस्त्यावर आल्यावर ते माझ्या अंगाला झोंबू लागले. त्याचक्षणी माझ्या लक्षात आले, आपण संपलो. पण नाही. तू माझं रक्षण केलंस. पण का मला अशा रात्रीच्या वेळी फिरायची हौस आली होती ? तुला माहिती आहे ? (तो मानेनं नाही म्हणतो.)

मेरी : ती एक गोष्ट आहे. तूही कधी विचारलं नाहीस आणि मीही स्वतःहून कधी सांगितलं नाही. माझे वडील जाऊन पाचसहा वर्षे झाली होती आणि वडील गेल्यापासून मला अगदी एकाकी वाटू लागलं होतं. आई असूनही मला वडिलांची आठवण यायची. आईपेक्षाही त्यांनी माझ्यावर अपार प्रेम केलं. लहानपणापासून त्यांच्या मायेच्या वर्षावाखाली मी न्हाऊन निघत होते. आमच्या घरी फार पूर्वीपासून माझ्या वडिलांचे एक मित्र यायचे. फार गोड बोलायचे. जिभेत साखरच होती जणू. नेहमी येत असल्याने ते आमच्यातलेच एक झाले होते. पण पण एक दिवस अघटित घडलं. माझ्या वडिलांचं आणि त्यांच्या त्या मित्राचं कडाक्याचं भांडण झालं. माझ्या मम्मीचंही नाव अधूनमधून त्यामध्ये येत होतं. पण माझ्या लक्षात काहीच आलं नाही. आणि त्यानंतर दोन दिवसांनी डॅडी गेले. ती पोरळी मम्मी कधीच भरू शकली नाही. आणि त्या दिवशी... मी पहायला नको ते पाहिले. डॅडींचा मित्र मम्मीच्या रूममध्ये होता. दुसऱ्या दिवशी मी मम्मीला खडसावून विचारलं. वस्स. त्याचवेळी माझ्या सारं काही लक्षात येऊन चुकलं. डॅडींना ब्लडपॉयझनींग होऊन ते गेले. त्याचक्षणी मी तिरमिरीत बॅग घेऊन घरावाहेर पडले मी विचारांच्या इतकी तंद्रीत होते. की गुंडांनी मला कधी घेरलंय हे माझ्या लक्षातच आलं नाही. (सुस्कारा सोडून) हं, आता तरी काय उपयोग आहे म्हणा, ज्याला माझा समजले तोच उलटा फिरला !

व्रिगेन्झा : 'स्टॉप इट मेरी. मला बोलू दे. मग ठरव तू.'

मेरी : 'बोल बाबा ! तेवढंच शिल्लक राहिलंय !'

व्रिगेन्झा 'मी गेलो होतो तिच्याकडं. कारण मला माहीत होतं, ती श्रीमंत आहे. मला पैसा हवा होता तिचा. त्या पैशाच्या राशीत मी तुला लोळू देणार होतो. त्या दागदागिन्यांनी मी तुला सजवणार होतो. तुझी सारी हौस मला पुरी करायची होती. शिवाय, मी स्वतःहून तिच्या मागं लागलो नव्हतो तीच माझ्यावर भाळली. मला बंगल्यावर घेऊन गेली.'

मेरी : 'आणि तू तिचा खून केलास ! बेशरम ?'

व्रिग्रेन्झा : 'काय करणार ? मध्यरात्री उठलो तेव्हा ती झोपेच्या पूर्ण आधीन झाली होती. उशाखालचा टॉर्च घेतला आणि तिजोरीजवळ आलो. एकवार कानोसा घेतला आणि किल्ल्या शोधू लागलो. बराचवेळ किल्ल्या मिळत नव्हत्या. खूप वैतागलो. तोंडाजवळ आलेला घास निसटतो की काय अशी शंका वाटू लागली. पण अखेर चाव्या मिळाल्या. तिच्याच उशाखाली होत्या. अलगद काढल्या

आणि पुन्हा तिजोरीजवळ आलो. चाव्या मिळाल्याचं समाधान चेहेऱ्यावर होतं. त्याच धुंदीत तिजोरी उघडली सावधपणे आत टॉर्च फिरवला. आणि माझे डोळेच दिपले. असंख्य दागिन्यांनी तिजोरी गच्च भरलेली होती. सगळ्या प्रकारचे दागिने, हिऱ्याचे, पाचूचे, सोन्याचे. क्षणभर माझाही मनावरचा ताबा उडाला. पण दुसऱ्याच क्षणी स्वतःला सावरलं. तिथल्याच एका पिशवीत दागिने भरू लागलो. भरून झाल्यावर पिशवीचं तोंड बांधलं. आणि जायला दरवाजाकडे निघालो. माय गॉड! ती तिथं उभी होती. तिच्या डोळ्यात भयानक अंगार फुलला होता. भीतीची एक थंड लाट अंगावर शिरशिरी आणून गेली. ती आता फोनजवळ जात होती. चपळाईने मी तिला मागे ओढलं. ओरडण्यासाठी म्हणून तिने तोंड उघडलं आणि मी ते दाबून धरलं. मी तिला विनवत होतो पण ती अजिबात ऐकत नव्हती. तोंडाजवळ आलेला घास तसाच पाठी फिरणार होता. मला ते कोणत्याही परिस्थितीत नको होतं. आय वूड नॉट कंट्रोल. मी तिच्या तोंडावरचा पंजा आवळू लागलो. दुसऱ्या हातानं तिचा गळा धरला. तरीही ती ऐकेना आणि आय वूड नॉट हेल्प! मी तोही पंजा आवळू लागलो. आणि काही क्षणातच ती निश्चेष्ट होऊन जमिनीवर कोसळली. आय किल्ड हर!'

मेरी : (रागाने) 'हलकट. थोडी तरी दया माया! तुला पोलीसांनी धरल्याचं वाचलं आणि ठरवलं की तुझं तोंड पहायचं नाही आयुष्यात.'

ब्रिगेन्झा : (हसत हसत) 'फार चांगलं केलंस. त्यामुळे तर मी आज इथं आलो. तुझी माझी ओळख आहे हे कुणालाही माहीत नाही (तो घड्याळात पाहतो).

एव्हाना शोधाशोध सुरू झाली असेल. इथं मी आहे हे कुणाच्या बापालाही समजणार नाही. साले फाशी देताहेत मला. चिअर्स!' (ग्लासातलं मद्य वर उडवितो. तिच्याकडे हळूहळू येऊ लागतो. ती त्याला थांबवत.)

मेरी : जवळसुद्धा येऊ नकोस माझ्या. माझ्या दृष्टीने तू केव्हाचं मेलायस. तिचा खून खून केलास तेव्हाच. मला सोडून तिच्याकडं गेलास तेव्हाच. जा. तुझं तोंडही बघायची इच्छा नाही माझी.

ब्रिगेन्झा : मेरी मी तिचा नुसता खूनच केला नाही तिचे पाच लाखाचे दागिनेही माझ्याजवळ आहेत.

मेरी : "काय ऽऽ"?

ब्रिगेन्झा : होय पोलिसांनी रिमांड रूममध्ये वाटेल तेव्हा छळलं परंतु मी दोन गोष्टी केल्या. पहिली म्हणजे ते दागिने कुठे लपविलेत ते कुणालाही सांगितलं नाही. आणि तुझं नाव मी तोंडातून बाहेर काढलं नाही. वाटलं होतं, सालं, सुटलो की सरळं तुझ्याकडं दागिने घेऊन यायचे. परंतु भडव्यांनी फाशी दिली. तुला काय वाटलं पोलिसांनी ते दागिने तिच्या वारसाच्या ताब्यात दिले असते? त्यामुळंच तर त्यांनी माझ्या केसमध्ये चोरी हा उद्देश शेवटपर्यंत दाखवला नाही. रेप अँड मर्डर. बलात्कार नी खून हेच शेपूट धरलं. त्यात मीही तोंड बंद करून बसलो. त्या जज्जानं फाशीचा निकाल दिला. आणि सगळ्या पोलिस अधिकाऱ्यांनी कोर्टाच्या आवारात मिठ्या मारल्या. मेरी त्या फाशीच्या तुरुंगात असताना दररोज एक पोलिस अधिकारी मला भेटायला यायचा. विचारायचा, ब्रिगेन्झा तू मरणार आहेस तर हे दागिने कुठे ठेवलेस तेवढं तरी सांग.

मेरी : काय म्हणतोस?

ब्रिगेन्झा : मग त्या जेलरला का मारला मी? त्यानंही आज रात्री स्वतःच्या केबिनमध्ये माझ्या नरड्यात दारू ओतून तेच विचारलं, साला म्हणतो कसा मी संसारी माणूस आहे. तुला त्या पैशाचा काहीही उपयोग नाही. या नोकरीत धड पोट भरत नाही. यूसलेस! (तोच त्याच्या घामेजलेल्या चेहऱ्यावरून हात फिरवितो.)

ब्रिगेन्झा : माझा कुणावरती भरवसा नाही. फक्त

तुझ्या असण्याची खात्री होती. म्हणून तुरुंगातून पळालो. वाटेत जीप सोडली आणि इकडे आलो. तुझ्याकडं !

मेरी : पण तू असा किती दिवस लपून राहणार ?

ब्रिगेन्झा : इडियट, मी इथं आहे हा साधा संशय सुद्धा कुणाला येणार नाही. इतक्या मोठ्या शहरातल्या एका अंधाऱ्या बोळकांडीत तुझं घर आहे. आजुबाजूला तुझे कुणाशीही संबंध नाहीत. तुझं हे घरही मोठं आहे. मी सहज महिना दोन महिने इथं लपून राहू शकतो.

मेरी : त्यानंतर काय करणार ?

ब्रिगेन्झा : सांगतो ! आता चार वाजताहेत. तू कपडे कर. रेल्वे स्टेशनवर जा. तुझा कुणालाही संशय येणार नाही. तिथल्या लॉकर्समध्ये मी दागिने लपवलेत. तू बॅग घेऊन पुन्हा इथं ये. जाताना दरवाजाला बाहेरून कुलूप लावून जा.

मेरी : आत्ताच काय गरज आहे. मी नंतरही जाऊ शकते.

ब्रिगेन्झा : नाही ! तुला आत्ताच जायला पाहिजे. अजून मी सुटलोय हे कदाचित समजलं नसेल. किंवा जरी समजलं असलं तरी हालचालींना अजून वेळ लागेल. उद्या कुणातरी पोलिसांच्या सुपीक डोक्यात शिरलं तर साले रेल्वे स्टेशनवरच्या लॉकर्सवरती डोळे लावून बसतील. तू ताबडतोब कपडे कर मोटारीने जा. मी इथं झोपतो, तुला यायला तासभर वेळ लागेल.

मेरी : परंतु तू नंतर करणार काय ?

ब्रिगेन्झा : खुळी आहेस. किती कसून तपास केला तरी मी त्यांना सापडणार नाही. तपास ढिला झाला की दोन महिन्यानंतर आपण हे गाव नी हा देश सोडून बाहेर निघून जाऊ. मलाही माणसं माहित आहेत. जाताना मी वेशांतर करू शकतो. खोटा पासपोर्ट मिळू शकतो, डोन्ट वरी.

मेरी : स्मार्ट बॉय ! (ती कौतुकाने हसते. तो तोंडात बोट घालून लॉकरची किल्ली बाहेर काढतो. तिच्या हातात देतो. तिला जायला खुणावतो. ती 'बाय' करून निघून जाते. तो रमचा ग्लास तोंडाला लावतो.)

ब्रिगेन्झा : साले फाशी देताहेत. वेळ पाच वाजता. हरामखोर लेकाचे (भरपूर दारू पितो. स्वतःचा तोल सावरता येत नाही. बरळत राहतो.)

ब्रिगेन्झा : मृत्यू पाच वाजता. कुठला गाढव म्हणतो की वेळ टाळता येत नाही म्हणून ? हरामजादे आहात सगळे. टाळक्यात मेंदू आणि छातीत धमक असली तर वेळही टाळता येते. परंतु अक्कल पाहिजे. जेलमध्ये असताना साला तो खुळ्याचा डॉक्टर माझी मुलाखत घ्यायला आला होता. नाही म्हणजे नेमकी वेळ समजली की मनाची अवस्था नक्की कशी असते. साला संशोधन करतोय. कर साल्या. आम्ही जाणार जीवानिशी आणि तुम्ही संशोधन करीत बसा. हा...हा... तुम्ही खरंच खून केलात का हो ? ते वर्तमानपत्राचं पोरगे विचारतंय. आयला मरणार मी, नि चिंता या फोद्रींच्यांना. काय दुनिया आहे. म्हणे दुनिया रंगीन है, म्हणे दुनिया संगीन है हा..हा..हा. फाशी ! सकाळी बरोबर पाच ! सगळ्या पेपर्समध्ये छापून आलंय. आता छापा म्हणावं.मृत्यू टाळता येत नाही. गाढव आहात ! मुर्ख, बेअक्कल..षंढ.. खुळे बस्स ! आता फाशी जाणारे सगळे हाच विचार करत असणार. साला, ब्रिगेन्झा सटकतो मग आपण प्रयत्न करायला काय हरकत आहे. जेव्हा ब्रिगेन्झा वेळ टाळू शकतो. कसा ? याऽर एकदम सोपं आहे. एखाद्य फालतू जेलर आदल्या दिवशी पार्टी देणार. आणि ही बाटली (बाटली इकडे तिकडे उडवतो. तिच्यावर उभा राहण्याचा प्रयत्न करतो. घसरतो. परत हातात घेतो) बस्स ! झक्कासपैकी टाळक्यात बाटली हाणायची. साल्याचं डोस्कं एका दणक्यात फुटलं पाहिजे. (स्वतःच्याच डोक्यात बाटली हाणतो. हात लावून बघतो) आँ ? साला रक्त कसं येत नाही ? त्या भडव्या जेलरच्या डोक्यातून तर पिंजऱ्यानं पिंजताना कापूस

उडवावा तसं खोलीभर रक्त उडालं होतं. छे! साला, आणखी जोरात मारायला पाहिजे. (परत डोक्यात वाटली हाणतो. तेचतेच सारखं करत राहतो. हे करतानाच बडबडत असतो.) मेंदूचा भुगा झाला पाहिजे. भुगा...चिंध्या झाल्या पाहिजेत... मेंदूच्या रक्त...चिंध्या...वेदना! आणि सगळं खल्लास! काम तमाम! (वेडा-वाकडा होऊन खाली कोसळतो. त्याचक्षणी लाईटस् ऑफ. दुसऱ्याच क्षणी लाईटस् ऑन. त्यावेळी दरवाजात ती उभी आहे. हातात बॅग. त्याला पडलेली बघून हातातल्या घडाळचात पाहते. माय गॉड! म्हणत ती बॅग टाकून त्याच्याकडे धावते. ती त्याच्या-जवळ पोहोचते आणि त्याचवेळी घडचाळात पाचचे ठोके पडायला सुरुवात होते. ठोके संपतात आणि स्टेजवरचा प्रकाश संपूर्ण नाहीसा होतो. पडदा पडतो.)

प्रयोगासाठी लेखकाची पूर्व परवानगी आवश्यक आहे.

विजय शांताराम साळवी
सुशांत, ६७१, जी
मारुती मंदिर, विवेकानंद रोड,
रत्नागिरी

△ △ △

हस्तलिखिते : आवाहन

महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जुनी मौल्यवान हस्तलिखिते प्रकाशित न होता तशीच पडून आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा असा विचार आहे की, मौल्यवान हस्तलिखिते एकत्र करून आवश्यकतेनुसार त्यांची छपाई करून ती प्रकाशित करावी किंवा मायक्रोफिल्म करून त्यांचे जतन करावे. अशाप्रकारची हस्तलिखिते साधारणतः कुठे आहेत व हीकुठल्या स्वरूपात आहेत याची माहिती जर साहित्य संस्कृती मंडळाला देण्यात आली तर मंडळास कार्यवाहीच्या दृष्टीने ते सोईचे होईल. हस्तलिखिताची माहिती देताना मूळ लिखाण मोडी लिपित किंवा देवनागरीत आहे याचाही खुलासा करावा. प्राथमिक माहिती आल्यानंतरच मंडळ त्यावर पुढील विचार करील. याबद्दल संबंधितांना मंडळाकडून मानधन देण्याची सोय सध्या तरी नाही.

आपला
सु. द्वा. देशमुख
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई–४

(एकांकिका स्पर्धेतील निवड)

आम्ही बाकीचे

शंकर परचुरे

रंगमंच : काळया विंगा

पात्रे : चार पुरुष पात्रे. आवश्यकतेनुसार इतर कितीही पुरुष पात्रांचा समावेश करता यईल.

सूत्रधाराचे संवाद 'रंगमच' म्हणून लिहिले आहेत. पडदा उघडतो तेव्हा 'रंगमंच' बोलतो आहे हे सूचित व्हावे. ही अपेक्षा.

रंगमंच : ...सुस्वागतम् ! मी रंगमंचाच्या वतीनं

बोलतोय. म्हणजेच प्रत्यक्ष रंगमंच बोलतोय.

मी म्हणजे रंगमंच ! म्हणजेच मराठी माणसांची आवडती वस्तू. अहो, अहो वस्तू म्हटल्यावर एवढं रागवायला काय झालं ? चुकलं माझं, बस्स ! मंदिर, मदिर म्हणतो, मग तर झालं. एवढ्या तेवढ्या गोष्टीवरून तुमची म्हणजे मराठी माणसांची अस्मिता दुखावते, होय ना ? स्वाभाविकच आहे ते. कारण तुम्हाला इतिहास आहे, तुमची संस्कृती आहे. तुम्हाला परंपरा आहेत, मानचिन्ह आहेत. सरस्वती लक्ष्मीचा तुमच्यावर वरदहस्त आहे आणि एवढं सगळं असल्यावर मला तरी तुमच्या इगोला जपलं पाहिजे. पण मंडळी, साहित्य, कला हे समाज जीवनाचं चित्र असतं, असं कुणीसं म्हटलंय, आठवतंय ना ? हूं, करेक्ट ! माणसाचं नाव जरी आठवत नसेल ना तरी वाक्य निश्चित आठवतंय, होय ना ? चित्र म्हणा हवं तर पण मंडळी मी ती माणसं प्रत्यक्ष प्रकाशमान करतो. आपल्या समाजात माणसांचे स्तर असतात. मी जरी मराठी माणसांचं मानचिन्ह असलो तरी माझ्या व्याप्तीला मर्यादा नाहीत. तर मंडळी, जग हीच खऱ्या अर्थानं रंगभूमी आहे. होय ना ? आता तिकीट काढून दोन तीन तास थिएटरात बसून नाटक पहाण्याचे दिवस केव्हाच संपले मंडळी. स्ट्रीट शोज हा नाट्यप्रकार पाहिलात ना ? च्...च्...च्...च् त्या पथनाट्याबद्दल नाही बोलत मी. तर आपल्या दैनंदिन जीवनात रस्तोरस्ती जी 'नाटकं' चालतात ना त्याबद्दल म्हणतोय मी. हूं हूं त्याच नाटकांबद्दल बोलतोय मी. अं, काय म्हणालात ? त्यात काय विशेष ? अहो विशेष आहे म्हणून तर तुम्हाला आज इथं निमंत्रण दिलंय ना, आम्ही बाकीचे, म्हणून !

(बाकीचे तिघे एकापाठोपाठ रंगमंचावर येतात व ओळीने शेजारी शेजारी उभे रहातात)

तर मंडळी, जगाच्या सॉरी इतकं लांब कशाला जायचं तर आपल्या दैनंदिन जीवनात ज्या काही घटना घडतात म्हणजे राजकीय असो, सामाजिक असो, किंवा आणखी कोणत्याही असोत, त्यात आम्ही सहभागी असतो पण कसे एक प्रेक्षक म्हणून. त्यालाच आम्ही नाव दिलंय आम्ही बाकीचे होय ना रे ?

दुसरा/तिसरा/चौथा : हो हो हो...

दुसरा : आम्ही हळवे आहोत.

तिसरा : आम्ही सवळे आहोत.

चौथा : आम्ही विटाळ गेलेले आहोत.

पहिला : चुप हरामखोर लेकाचे. स्पष्ट का सांगत नाहीत की आम्ही षंढ आहोत म्हणून.

दुसरा : (खोचक) अस्मिता जागी आहे म्हणायची ?

तिसरा : अरे कसलं काय ? बोलण्यात पटाईत. हातभर गप्पा मारायच्या, थोडीशी ठिणगी टाकायची अन् भडका झाला की बॅकबोन पर्यंत तंगड्या ताणत पळायचं

पहिला : जाऊ द्या. कंटाळवाणं होत चाललंय सगळं. आपण बाकीचे म्हणून नाही चालत आपल्याला हे असलं मिळमिळीत जिणं. समाजानं कसं जागृत असलं पाहिजे ही आमची धडपड. त्यासाठी चर्चा, परिसंवाद लेख, अग्रलेख, टी.व्ही., रेडिओ, भाषण एक ना दोन अनेक मार्गानं आम्ही समाज प्रबोधनाचा वसा घेतलाय. उतत नाही मातत नाही, घेतला वसा टाकत नाही.

तिसरा : तुलाही थोडक्यात सांगताच येत नाही का रे ? समाजात आपण कुठं कुठं, काय आणि कसं कसं करतो, एवढं इथं दाखवतां आलं तरी ही समोरची माणसं समजून घेतील सगळं.

पहिला : ठीक आहे, चलो हरिअप. (सर्वजण तयारीत) ...ए, ए, एक मिनिट. आपण हे सगळं कोणत्या भाषेत करायचं हे प्रथम ठरवू यात.

तिसरा : कोणत्या भाषेत म्हणजे ? असं का विचारतोस-मराठीतच !

पहिला : तसं नाही रे. मी म्हणतो शहरी बोलीभाषा की ग्रामीण ?

तिसरा : हूं, असं म्हणतोस होय-(विचार करू

लागतो)

पहिला : ए त्यात काय विशेष (अडखडतो) हं– थोडासा प्रॉब्लेम आहे. बरं का–(विचार करीत) हं–तर असं करू यात ह्या रंगभूमीचे संवाद शहरी व आपण ग्रामीण भाषेत बोलू.

तिसरा : कां, असं का ?

पहिला : असं बघ, त्यात सगळ्या समाजाचं प्रतिनिधित्वही दिसेल अन् सुशिक्षित समाजानं प्रबोधनाचा वसा घेतलाय असं आपण म्हणालो. त्यांच्या प्रतिक्रियाही त्यामुळं लोकांना कळतील.

तिसरा : बरं ठीक आहे चला व्हा म्होरं अन् करा सुरुवात.

चौथा : म्हणे व्हा म्होरं अन् करा सुरुवात. अरे नाटक करायला मूड लागतो. आपला नाही मूड आज. असं वाटतं घरी जावं आणि आरामात टी. व्ही. पाहात बसावं.

तिसरा : (उत्सुकतेनं) ए तुझ्याकडं टी. व्ही. घेतलाय ?

चौथा : एस् ! परवाच घेतलाय. खरं तर आज मला इथं यायचंही नव्हतं पण (दुसऱ्याकडं पहात) हे आले अन् म्हणाले चला, आलो झालं.

तिसरा : तुमचं बरं आहे बुवा. आलं मनात की आणला टी. व्ही.

दुसरा : अरे यालाच 'जगणं' म्हणतात.

तिसरा : मलाही नेहमी वाटतं रे– नुसता पैसा मिळवावा, चैन करावी पण सालं आमचं नशिबच– फुटकं ! शेवटी परवा हिलाच सांगितलं.

पहिला : ग्रामीण टोन प्लीज...

तिसरा : (टोन घेत) तुज्या मथाऱ्याकडून टी. व्ही. आन अन् त्योबी कलर. नाय तर घरात पाय ठिवू नगंस.

चौथा : मंग आनला कां ?

तिसरा : आज येनारे, बगाव आन्ते की नाय ते–

पहिला : अन् न्हाय आणला तं–

चौथा नाय् आणला तं– नाय् आणला त ऽ र (पुढं जातो व काडचाच्या पेटीतील काडी पेटवतो व ती जळेपर्यंत तिच्याकडं तीक्ष्ण नजरेनं बघत असतो.)

रंगमंच / पहिला : ......तर मंडळी, सचित झालात ना ? पण अशा माणसांची ही नेहमीचीच सवय असते. स्वतःच्या अंगात सामर्थ्य नसलं की अशा माणसांना समोर दिसतो तो फक्त सासरा. मग तो गरीब असो, श्रीमंत असो की मध्यम असो. बायकोला खूप छळायचं, त्यामुळे सासरा जखमी होत जातो. मग त्याला नाडवायचं. बायकोकरवी किंवा स्वतः त्याची मानहानी करायची, धमक्या द्यायच्या एक ना दोन हजार मानगडी करून सावकारासारख्या एकेक किमती वस्तू लाटायच्या अन् नच ऐकलं तर–

(चौथ्याकडे फक्त निर्देश करतो.)

(चौथा–सासरा, तिसरा जावई (बाबुराव))

चौथा : बाबुराव माज्या पोरीला तुमी सोता जाळलीत असा मला संशे येतो म्हून मी पुलिसात फिर्याद देणार हाये.

दुसरा : नाही इनामदार सायेब, बाबुराव तसं न्हाईत. त्याचं बायुकंवर लई परेम हुतं.

तिसरा : तिनं टी.व्ही. साटी हट धरला म्या म्हनलो आनून देतो पण न्हाई जमलं. तेवढ्यासाठी तिनं सोताला (रडू लागतो.)

पहिला : हे बगा इनामदार सायेब, आता तक्रार करून बी तुमची पोरगी तुम्हास्नी भेटनार हाये का ? नाय जरा इचार करा, मानसानं जरा सयेम ठिवला पाहिजे. आज तुमी तक्रार कराल, त्याची चौकशी व्हईल. त्याचा तुमालाबी तरास. कोर्ट कचेऱ्या, जाब जबाब अन् इतकं करून शिक्षा झालीच त बाबुराव फासावर जातीन. इनामदार सायेब, तुमचा जवई फासावर चढन अन् त्येचा परिणाम– तुमची वेश्रबु... थोडा इचार करा, आजून तुमच्या दोन पोरीची लगीन व्हायचीय– त्याचं लगीन व्हईन का अशानं ?

दुसरा : आमचं ऐका. हे समदं प्रकर्न आमी बाकीच्यांनी मिटवत आनलय ते तुमच्या हितासाठी.

तिसरा : (थोडा पॉज) नाय, नाय ऐकयचे त्ये... द्या मला फांशी द्या... ती गेली तसा मीबी

जातो. (वेडयागत) बगा, बगा... ती मला बलावून राह्यलीय...राधा, राधा, मी येतो... काळजी करू नगंस.... नाही नाही रहायचं मला या जगात...... कोन राह्यलं या जगामंदी ? कोणीबी नाय... राधा, राधा... ऐकत न्हवं तू ? हे... हे... लोक म्हंत्यात म्या तुला जाळली... राधा, राधा आता माह्याकडं कोन पाहिल ? राधा, राधा ग ऽ (चौथ्याच्या खांद्यावर मान टाकतो)

चौथा : (गहिवरत) बाबुराव तुमी काळजी करू नगा–मी, मी हाये ना, तुमच्या बा सारका... मी मी माझ्या रमेशी तुमचं लगीन लाऊन येतो. राधा काय अन् रमा काय सारक्याच.

रंगमंच / पहिला : वाईट वाटलं ना मंडळी, नेहमीच वाटतं तुम्हाला ते. पण ते तेव्हढ्या पुरतंच बरं का... आपण सकाळी आरामात उठतो. चहा पिता पिता पेपर वाचतो. जगातल्या अशा भीषण घडामोडी आपण बाकीचे किती त्रयस्थपणे वाचतो, नाही का ? अन् दैनंदिन जीवनात विसरूनही जातो. अहो, तुमचं तर सोडाच पण ज्यांच्या घरात असले प्रसंग घडतात ना, काळ हे सर्व दुःखाचं औषध आहे म्हणतात, तो काळही त्या दुःखी लोकांना हे विसरायला भाग पाडतो. कधी स्वेच्छेने, कधी अनिच्छेने, पण यात परावलंबनच जास्त, बरं का. कारण तक्रार करू म्हटलं तरी आम्ही बाकीचे त्या कुटुंबाला साथ देत नाही. त्याला मागे ओढतो. कधी परिस्थितीचा बागुलबुवा उभा करून तर कधी कायद्याच्या पळवाटा दाखवून. कधी प्रतिष्ठा, कधी उपेक्षा. कधी पैसा तर कधी दारिद्र्य. कधी सुशिक्षितपणा तर नेहमीच अशिक्षितपणा. एक ना दोन पण हे नित्य घडतं, हे निश्चित ! यालाच नाटक म्हणतात मंडळी, यालाच नाटक म्हणतात.

(दुसरा बाहेरून आल्यासारखा. पहिला, तिसरा, चौथा बसलेले)

दुसरा : इथं बाबुराव म्हणून कुणी राहतात का ?

तिसरा : हां, मीच त्यो ! आपन कोन ?

दुसरा : मी माने. हे माझं ओळखपत्र ! (काढून दाखवितो)

तिसरा : (घाबरून) अ...अ...आपन...

चौथा : घाबरू नका बाबुराव. मी बोलतो साहेबासंग–

दुसरा : आपण ?

चौथा : जळून मेलेल्या पोरीचा बाप हाये मी.

दुसरा : तुम्हीही भेटलात हे बरं झालं. मी तुम्हाला आता काही प्रश्न विचारतो. फक्त त्याची उत्तरे द्या.

पहिला : पन त्ये अपघाती मरन हुतं–

दुसरा : तुम्ही मध्ये बोलू नका.

चौथा : सायब मी शपतेवर सांगतो की त्यात आमच्या जवयाचा काय बी दोस नवता.

दुसरा : शपथेवर कोर्टात सांगा. माझ्या समोर त्याचा काहीही उपयोग नाही. आपल्या जबानीत संशय वाटला तर तुम्हा सर्वांना माझ्यासोबत यावं लागेल.

पहिला : पन यवढा उपद्व्याप करताच कशाला ? सरळ जवान्या लिहून घ्या.

दुसरा : ते तुम्ही सांगायची आवश्यकता नाही. माझ्या कामात अडथळा आणू नका.

तिसरा : माझं डोस्कं आधिच ठिकानावर न्हाई भलतेच परस्न इचारून–

चौथा : सायब किर्पा करा अन् हे समदं प्रकनं मिटवून टाका.

दुसरा : मिटवून टाकू ? (आवाज चढवून) काय मिटवून टाकायचं ? आत्महत्या, खून की आणखी काही ?

पहिला : तसलं कायबी नाही. फकस्त आमच्या बाबुरावाची तब्येत–काय पायजे असंन त्ये आमी–

चौथा : व्हय व्हय, मागान त्ये देवू. पन जाब-जबाब, कोर्टकचेऱ्या–

तिसरा : माफी करा सायेब, माफी करा.

दुसरा : हे बघा मला जाब जबाब तर घ्यावेच लागतील पण–

पहिला : हा, हां, त्येच म्हनतूया आमी. हा 'पन' कितीचा हाये तेवढं सांगा.

दुसरा : पाचा मुखी परमेश्वर (हसतो)

चौथा : अं ? अरं बाप्परं...

पहिला : हाऊ म्हना आता...

चौथा : (तिसऱ्याकडं पाहतो. तो काकुळतीला आलेला, दुसऱ्यास) बरं हरकत नाय. उद्या भेटतो मी तुमास्नी, तुमच्या घरीच.

दुसरा : ठीक आहे वाट बघतो मी तुमची. वेळ चुकवलीत तर याद राखा. गाठ माझ्याशी आहे. (जायला नुसता वळतो. जात नाही.)

रंगमंच/पहिला : हो हो...थांबा, थांबा, थांबा ! तडकलात ना ? चालायचंच. इटस् अ प्रोसेस. लांच देणं घेणं यात नाविन्य काय आहे ? नवरा बायकोत, आईमुलांत, बाप लेकात लांच घेणं देणं चालूंच असतं. एखादं छोटंस काम करण्यासाठी आपला छोटा मुलगा आपल्याकडून टॉफी घेतो. बायको साडी उपटते ते कशासाठी ? (हंसत) ते तुम्ही जाणताच. आई, मुलांचा पापा घेते ही सुद्धा लाचंच असते बरं का, अं, कळलं ना ? लांच देण्याघेण्याचं शिक्षण मुलांना आपण लहानपणापासूनच देत असतो, (हसत) खराय् की नाही ?

(परत मागच्या तिघांत मिसळतो)

दुसरा : (पुढाऱ्याच्या थाटात) अरं काय झालं ? असं कावून बसलात ? का घरातलं कुणी कुचकलं ?

चौथा : आताच त्यो माने यऊन गेला. हे समदं प्रकर्न मिटवायचे त्याला पाच हजार रुपये पाहिजेत अन् त्ये बी उद्या सकाळीच...

दुसरा : हा लांच खान्याचा प्रकार म्हंजे भयानक. मढ्याच्या टाळूवरचं लोनी खानारी ही असली हलकट मानसं पाहिली की अंगाचा नुस्ता निखारा होतो. इच्या बायलीला...

पहिला : मंग द्यायची का त्याच्या इरुद्ध केस ?

तिसरा : अरं माज्या जीवाकडं बगा रं...माझी राधा...

दुसरा : (तिसऱ्याची अवस्था बघून) नकू. मान्या इरुद्ध तक्रारबी नको अन् त्याची चौकशीबी नको. माझा इंगाच दाखवितो त्या हराम-खोराला (पहिल्यास) जाय तं, जरा त्या रस्त्याकडच्या दुकानातून फोन लाव बरं–

पहिला (उठत) हं सांगा नंबर–

दुसरा : पाच तीन नऊ आठ सात.

पहिला : कुणाचा फोन हाये हा ?

दुसरा : अरं हाये असाच. आता बगतो त्या मान्याकडं. फोन जातात बदली व्हईल साल्याची.

चौथा : पन उद्या सकाळीच बोलीवलंय ना त्यानं–

दुसरा : उद्या (हसतो) उद्या त्याचा बाप आटवेल त्याला. हलकट लेकाचा.

रंगमंच/पहिला : ही वशिलेबाजी का भ्रष्टाचार, कुणास ठाऊक ? आपल्याला तर काहीच कळत नाही. नाही म्हणजे त्याचं काय आहे की आम्हा बाकीच्यांना ते इतकं अंगवळणी पडलंय मंडळी, की आजकाल त्यातल्या सीमारेषाही पुसट होत चालल्यात. वशिले-बाजीतून भ्रष्टाचार की भ्रष्टाचारातून वशिलेबाजी हेच समजेनासं झालंय. तसं तर मंडळी हा आपण म्हणतो तो भ्रष्टाचार किंवा वशिलेबाजीस अगदी पुरातन आधार आहे. इंद्राचं आसन डळमळीत झालं की मेनकेची मनधरणी अन् त्याचा परिणाम विश्वामित्राचा तपोभंग. रावणाच्या गादीवर बिभिषणाची नियुक्ती. इंद्राचा भ्रष्टाचार म्हणजे अहिल्लेचं शिळेत रूपांतर...एक ना दोन हजार भानगडी आहेत. मंडळी पण हे सगळं होऊन गेलंय. पुराणातील वांगी पुराणात. आपल्याला काय करायचंय. आम्ही बाकीचे कथा ऐकतो, कीर्तन करतो, पुराण लावतो त्याचाच परिणाम तर नसेल ना मंडळी हा–

(चौघेजण खेडूत होऊन बसलेत. त्यांचा दारू पिण्याचा कार्यक्रम संपलेला दिसतोय.)

चौथा : तु मी म्हंतो बाबुराव आमची राधा गेली, जळाली, काओ खराय की न्हाई ?

दुसरा : आक्शी बराबर. ती हुतं न्हाई, शेहरात न्हाई म्हंजी मेलीच की ओ, म्हंजी जळालीच.

तिसरा : अरं असं म्हनू नका, लई दुख होतंय बगा.

पहिला : अरं नाटक्या, कसलं दुख होतंय रे तुला ? चांगला खातुस पितुस अन् म्हनं

दुख होतंया.

चौथा : अरं, खान प्येनं का कुनास्नी चुकलंय ? आपला जीव हाये तंवर खानं प्येनं–काय ?

दुसरा : (उचकी देत) न्हाई त काय ? बास रेट झालं आता. त्यो हुलकट माने बी गेला अन् दारू बी संपली.

चौथा : संपली ? (हसत वेडावत) येडा का खुळा तू. त्यो माने संपला असनं तर आपन जींदे अन् आपली दारू बी जिंदी हाये. (हाक देत) नारायन, ये नारबा, अरं दारूची शिशी आन आनखी.

पहिला : हांगे अस्सं ! घ्या बाबुराव–आता रमा संग परत लगन करायचंय तुमास्नी. (चौथ्यास) का ओ ?

चौथा : लगीन होन्या अदुगर राधाची शांती कराव लागन. बोकड कापून, म्हसुबाला निवूद चढवितो अन् मंग–

तिसरा : लगीनाच्या खर्च्या पान्याचं बोला.

दुसरा : कसं रीतीनं समदं झालं पाहिजे. वर-दक्षिणा धा हजार रुपयं रोख, गाव जेवन समदं झालं पाहिजे. मामास्नी पागुटं, लेकरास्नी टावल टोपी–

चौथा : बोलनं येन्हढ्यावरच थांबवा पाव्हनं. लगीनाइषयी बोलू म्होरं. पहेले मला राधाची शांती करू द्या. मंहं लेकरू भरल्या संसारातून उटलं हो. तिची विच्छा पुरी होऊं द्या. (रडू लागतो)

दुसरा : बरं तसं !

रंगमंच/पहिला : मजा आहे की नाही मंडळीही. ही अंधश्रद्धा आम्ही हजारो वर्षांपासून जोपासलीय–ही फक्त खेड्यातच शिल्लक राहिलीय असं तुम्ही तावातावानं म्हणाल, पण खरं सांगू–अहो राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमांत सुद्धा पूजेला महत्त्व देतात हो. मग तुम्ही मोठमोठ्या शहरातल्या फ्लॅटस्-मध्ये राहून सत्यनारायण घातला तर बिघडलं कुठं ? आपण मारे गप्पा मारत असतो की आमचा देवावर, दैवावर विश्वास नाही वगैरे वगैरे. पण पुढारलेल्या शहरातली पूजास्थानांसमोरील दर्शनार्थींची रांग पाहिली ना मंडळी, की आपण स्वत:ला किती फसवतो याची खात्री पटेल. अन् हीच अंधश्रद्धा कित्येक वेळा आपलं दैनंदिन जीवन नासवून टाकायला कारणीभूत होते. श्रद्धा ही केव्हाही डोळस असावी असं आपण मानतो. निर्गुण, निराकार, विश्वव्यापी परमेश्वराची संकल्पना आपण संकुचित करून ती या शेंदुर लावलेल्या किंवा सफेदी केलेल्या दगड–विटात का मानतो, कळत नाही. आता हेही बघा ना–

(रंगमंचावरील चौघांपैकी तिसऱ्याच्या अंगात संचार होतो त्यामुळे तो घुमतोय व बाकीचे तिघे त्याच्या भोवती)

तिसरा : हः हः हः हः (अंगास आळोखे पिळोखे देतो आहे.)

चौथा : माफी करा द्येवा. माफी करा...माज्या राधाची काई आशा राह्यली का ? सांगा... (पाया पडतो)

दुसरा : सांगा द्येवा सांगा. राधाची काय विच्छा राह्यली का ?

पहिला : विच्छा अपूर्न राह्यली कां ?

तिसरा : हाः हाः हाः हाः राह्यली...राह्यली...हाः हाः हाः

चौथा : कोनची ? सांगा द्येवा कोनची ? (पाया पडतो) लग्नाची का ?

तिसरा : हाऊ...हाः हाः हाः हाः...

पहिला : कोनासंग ?...बाबुरावसंग कां ?

दुसरा : रमाचं लगन बाबुराव संग लागलं त चालन का ?

तिसरा : हाः हाः हाः हाः चालन...चालन... हाः हाः

चौथा : (दुसऱ्यास) निवुदा इषयी इचारा.

दुसरा : जय द्येवा, जय, जय द्येवा जय (सर्वजण पाया पडतात) अनुमान करू नका द्येवा, आम्ही नेवूद चढवितो. चालनं ना ?

तिसरा : हाः हाः हाः हाः चालन...हाः हाः बोकुड पाहिजे. नायतर कोप व्हईन. हाः हाः हाः हाः

चौथा : नाय द्येवा नाय किर्पा करा. असिर्वाद ठीवा. निवूद चढवितो द्येवा; चढवितो.

दुसरा : आनंद माना घेवा, लेकरावर दया करा.

तिसरा : हाः हाः हाः हाः

चौथा : (लोटांगण घालतो) जय द्येवा जय, जय द्येवा जय (बाकीचेही पाया पडतात. तिसरा हळूहळू शांत होतो)

रंगमंच/पहिला : चला राधाची शांती तर झाली; पण बाकीचे अशांतच राहिलेत ना–खरंच माणसाला मृत्यूनंतर शांती मिळते का? नक्कीच मिळत असेल. कारण सर्व अशांतीचा अतृप्ततेचा शेवट मृत्यूनेच होतो ना...नाही नाही तसंही नाही. कारण परत भूत, पिशाच्च, हडळ हे जर सत्य मानलं तर– म्हणजे मृत्यूनंतरही अशांतीच! मंडळी, या तिन्ही लोकातही शांती अस्तित्वात आहे की नाही कुणास ठाऊक? कारण चहा–दारू ढोसणारे आम्ही अशांत व तिन्ही त्रिकाळ अमृत प्राषन करणारे देवही (हंसत) अशांतच नाही तर काय–

(लग्नाची बैठक बसलेली दारू पिणं झालंय.)

दुसरा : असं कसं, समदं रीतीनं झालं पाहिजे. वरदक्षिना धा हजार रुपये, गाव जेवन, मानपान समदं–हांऽ

पहिला : दुसरं लगीन अन् नवरदेव लईच सैल सुटलाय. म्हनं धा हजार रुपये, गाव जेवन आन् मानपान. वारं वाः

चौथा : आपली ताकत न्हाय एवढी.

दुसरा : न्हाऊ द्या. आमचा पोरगा काई नाटा-बाटाचा न्हाई. जवान हाय, मिळवता हाये.

पहिला : अरं जाऊं द्या, अशे छपन्न पल्डेत. आमची पोरगी खाल्ली, खल्लास केलीस अन् वर हा तोरा–(तावातावानं उठून बाह्या सरसावतो) इच्या बायलीला.

तिसरा : (आवाज चढवत) ये हेकन्या, जरा दबान घी. जादा तोंड वाजवू नगस. बत्तिसी भाईर काढीन, गुमान पड.

पहिला : (खाली बसत) लेकरा बाळाची पाटी हाये मागं म्हून–नायतर–नायतर–

तिसरा : नायतर काय?

पहिला : नायतर तुझी कवटी काढून गाव्हडभाळा दिली असती नाचवायला.

तिसरा : (चौथ्यास) ओ मामा, ऐकताय न्हवं. हे असल्या बाजार बुनग्याचं भ्योव दावू नगा. सौदा मंजूर असन तं बोला. न्हायतं हा निंगलो बगा–(उठतो)

चौथा : जेवून जावा पाव्हन, जवई जेवून जावा.

तिसरा : जेवन गेलं खड्ड्यात (हेलपाटतो) आदी सौद्याचं बोला. धा हजार घेईन. गावजेवन अन् मानपान पाहिजे.

पहिला : अरं पोरीचं लगीन म्हंजी काय सौदा असतो व्हय रे शान्या. मार निगालास इंद्राचा पूत. योवाड बगीतलस का आईन्यात?

तिसरा : ए मातुड्या, तू आनली असशीन बायकु पळवून. मी राजरोस लगीन करून नेनारे, बेंडबाज्यासंगट. चाललो मी – (जाऊ लागतो.)

चौथा : बैठक मोडू नका जवई. आदीच नाट लागला.

पहिला : अरं येडं का खुळं तुमी. ह्याला कशापायी मानाचा मुजरा देवाव, गेला उडत.

तिसरा : अरं चपना, टाकं तुटतोस्तवर का वरडतूस? टाकं द्यायला मानुस बी भेटायचा न्हाई.

पहिला : तू हैस की–

तिसरा : अरं मी कशापायी? बोलाव ना, असंन कुनी तुझा बाप–

चौथा : अरं गप बसा म्हंतू ना. शांत व्हा पाव्हनं. मला मंजूर हायेत तुमच्या समद्या अटी. चला जवून घ्यावा. (जेवायला उठतात.)

पहिला/रंगमंच : अहो अहो तुम्ही कशाला उठताय जेवायला? तुम्हाला कुठं बोलावलंय त्यांनी? आणि जरी बोलावलं तरी त्याचा आनंद तुम्हाला वाटणारही नाही. कारण घरदार, पत्रे, बैलं आणि कमी पडल्यास जमिनीचा तुकडा विकून हा सासरा हुंडा देणार अन् हे लग्न पार पडणार मंडळी, निश्चित पार पडणार. हुंडाबंदीच्या कायद्याचं इथं काहीही चालणार नाही. कारण आम्ही बाकीचे तशी अडचणच येऊ

अनुक्रमणिका

देणार नाही. कारण आम्हाला मांडवावर तोरण चढवायचं पुण्य हवंय ना–

(आता चौघापैकी चौथा (सासरा) तिसरा (गावकरी) बाकीचे दोघे सुशिक्षित तरुण असतील)

चौथा : (तिसऱ्यास) तर गावकऱ्यांची एक पंगत शेपरेट रामाच्या देवळात व्हईल अन् दुसरी पंचायतीच्या समूर.

पहिला : दोन पंगती वेगवेगळ्या का? सर्वांची एकच पंगत बसेल.

दुसरा : आम्ही दलित म्हणून वेगळे बसणार नाहीत. एकाच पंगतीत आमचे सर्व लोक जेवले पाहिजेत.

तिसरा : अवो, ही काय रीत झाली का? पायंडा मोडू नका, नायतर आमी येनारच न्हाई.

चौथा : अवो जरा शांती धरा. (तरुणांना) हे बगा आमच्या जवयास बी ते पसंत पडनार न्हाई. तवा दोन पंगती होतीन.

पहिला : नाही. तुमच्या जावयास आम्ही चांगले ओळखतो. हॉटेलमधलं त्यांना चालतं अन् मग आमच्या सोबत? काही बिघडणार नाही.

तिसरा : ती गोठ येगळी. गावाभाईर कुनीच पाळत न्हाई. पण गावात न्हाई चालनार ये खेळ, सांगून ठिवतो.

पहिला : ओ शहाणे, गप बसा. जग कुणीकडं चाललंय अन् तुम्ही कुणीकडं. आम्हाला वेगळी वागणूक दिलीत तर खबरदार!

तिसरा : ओ चिपडोजीराव, चार बूक शिकला म्हून शानपन येत न्हाई. गावात आमची वस्ती जादा हाये. हे इसरू नगंस.

चौथा : (तिसऱ्यास) ए भिम्या, दया कर माज्या-वर. कानून वेकार हाये, जरा सबुरीनं घे–

तिसरा : अरं कसला कानून अन् कसलं काय? येळ आली तर दवापान्याला येक बी नाय दिसायचा.

पहिला : वरं बघून घेऊ. चल रे (उठू लागतो)

चौथा : (रागरंग पाहून) मं पंगतच देत न्हाई मंग तं झालं–

पहिला : पंगत द्यावीच लागेल अन् नाही दिलीत तर आम्ही देऊ. अन् तुम्हाला बोलावू कलेक्टर साहेबांच्या सोबत जेवायला.

तिसरा : अरं ओ गपना, सावकाराचा पूत लागून गेलास का? झोपड्याचं झापडं नीट लाव आदी अन् मंग बोल पंगतीचं–

दुसरा : शासन आम्हाला घर बांधून देणार आहे. गावात तुझ्या घरासमोर मी राहीन.

तिसरा : अरं जा, कालच मुंबैहून वंदुबस्त केलाय त्याचा.

पहिला : ते बघू नंतर (चौथ्यास) हं बोला काय करणार आहात?

तिसरा : दोन पंगती होतील नायतर होनारच न्हाईत.

पहिला : एकच पंगत होईल, नाहीतर लग्नच होणार नाही.

चौथा : अरं वापरं, ह्योतर जुलुमच झाला.

पहिला : जुलूम आमच्यावर चालवाय इनामदार. पंगत होईल अन् ती ही एकच, एकत्र!

दुसरा : माणसंच आहोत आम्ही. तुमच्या सोबत जेवल्यानं मोठेपण मिळणार नाही आम्हाला पण ही रूढी बदलली पाहिजे, गाव बदललं पाहिजे. गावाची मतं बदलली पाहिजेत अशी आमची इच्छा आहे. आम्हाला मानानं जगायचंय. ती भीक नाही, तो आमचा हक्क आहे व त्यासाठी आम्ही वाटेल तो त्याग करू.

तिसरा : भासन, भासन देतूस? घे! अगदी नरडे फुटेस्तोवर घे. घे कोकलून म्हसाडा-सारखा. चलतो म्या.

चौथा : अवो भिमराव जरा सबुरीनं घ्या. हृये चांगलं लक्षीन न्हाई, गाव बुडंन अशानं.

दुसरा : बुडेना का गाव, त्यांना काय त्याचं? मुजोर, हरामखोर खुनशी माणसं ही. आम्हा लोकांना ही वर येऊ देणारच नाहीत. पण आम्हीही आता हक्कासाठी भांडणार.

तिसरा : तु बी उटला का आता? हे बग वेरडा. आपली पायरी सोडू नगस. मानसानं कसं मुंगी व्हऊन साकर खावी, हत्ती व्हऊन लागडं फोडू नयत. तुमी दोगंबी शिकल्यात,

शेहरात जाऊन नौकरी धरा. पोटा पान्याला लागा. गावाचं काय करायचं ते आमी बगू. अरं तुहं म्हाथार वी ऐकतंय माजं. नायतं हे बगा असं करू उरलेलं समदं अन्न गाई म्हसाडाला द्येया ऐवजी तुमच्या वस्तीवर धाडू मंग तं झालं...

पहिला : (संतापत) काय ? उष्ट खरकटं अन्न आम्ही खायचं ? भिम्या, भिम्या इथंच तुझ्या नरडीचा घोट घेतो. (उठतो व त्याच्याकडं झेपावतो. त्याचं नरडं दाबतो. दुसरा तरुण त्याला कसंबसं सोडवतो) हलकट साला. कुणाला उष्ट अन्न खाऊ घालतोस हरामखोर...हे बघ भिम्या आता बोललास ते बोललास पुन्हा कधी...कोथळा बाहेर काढीन.

दुसरा : जाऊं दे शांत हो. नंतर बघू आपण.

तिसरा : (सावरून उठत) बगून घेईन. तुमा दोगाकडं...कोन कुनाचा कोथळा भाईर काडतो ते दिसनच. इनामदार पंगत व्हायलाच पाहिजे अन् त्यावी दोन.

दुसरा : इनामदार पंगत व्हायलाच पाहिजे अन् तीपण एकच. (तिघेही बाजूस सरकतात. चौथा डोक्यास हात लावून निमूट होतो.)

रंगमंच/पहिला : आता निर्माण झाला की नाही टेन्स ? यालाच नाटक म्हणतात की नाही ? बघितलंत आम्ही बाकीचे एखाद्याला किती आणि कसे अडचणीत टाकतो ते...आता इकडं आड अन् तिकडं विहीर. बघा सासरेबुवाकडं बघितलंत ना ? किती हताश झालेत ते. या संघर्षात नक्कीच काहीतरी भीषण घडणार, असं दिसतंय. (काळोख) (काळोखात हातात पलिते घेतलेले लोक वस्तीवर जाळपोळ, आरडाओरड करताना दिसतात. थोडक्यात म्हणजे दंगल, आक्रोश व आगीचा डोंब उसळलेला दिसावा. नंतर सगळं शांत होतं. हळूहळू प्रकाश येतो तेव्हा तिसरा व चौथा रंगमंचावर बसलेले. इतक्यात दोन वार्ताहर येतात. म्हणजे पहिला व दुसरा येतो.)

तिसरा : कुनास्नी भेटायचंय पाव्हनं ?

दुसरा : आम्ही वार्ताहर आहोत.

तिसरा : असं का ?

पहिला : आपलं नाव काय ?

तिसरा : आमच्या नावाचं काय घेऊन बसलात हो. गावात गरीब जन्तेचं काय हाल झालं ते बगावं आदी. काय मदतगिदत भेटते का बगावं. उगाच ढवळ्याचं काळं करून काय उपेग ?

चौथा : माझ्या लेकराच्या लग्नात इघ्न आलं हो...(रडू लागतो)

दुसरा : जाऊ द्या बाबा. त्यात तुमचा काय दोष... गरीब बिचारे दोघे दलित तरुण, गावकऱ्यांनी जाळून मारले त्याचं वाईट वाटतंय.

तिसरा : तरी आमी वरडून सांगत हुतो की बाबारं त्ये बी आपलं भाऊचं हायत. जेवू द्या त्यास्नी आपल्यासंग. लेकरंच हायत ती, पन नाय ऐकीलं कोनी...

चौथा : न्हाईत काय ? जो उठे तो चालला वस्ती जाळाया. अरं गुरंढोरं, चारापानी, यवढंच कशाला बाया लेकरास्नी बी सोडलं न्हाय वो ह्या चांडाळांनी. काय मानुसकी शिल्लक ठुली न्हाय बगा...

पहिला : आम्हाला त्या जळालेल्या झोपड्यांची, वस्तीची छायाचित्रं हवी आहेत. त्याची माहिती हवी आहे.

तिसरा : असं का ? तं तुमी दोगं बी असंच म्होरं रामाच्या देवळाकडं जावा, तकडंच पलीकून होती त्यांची वस्ती.

पहिला : होती ? म्हणजे आता...

तिसरा : काय बी शिलकीला ठिवलं न्हाई वो या दुष्टांनी. कसं राक्षसावानी थैमान घातलं बगा. अररं दवा धेवा. इठुला, पांडुरंगा !

दुसरा : आम्ही जातो आता. पण तुम्ही दाखवायला आला असतात तर बरं झालं असतं. माहितीही मिळाली असती.

तिसरा : मला बी कुठं माहिती हाये संमदी. सांगावांगी म्या बी बोलतो.

पहिला : का, तुम्ही होतात ना इथं ?

तिसरा : न्हाई बा, तोबा तोबा ! लेकीकडे गेल्तो

चार दिस. काल आलो तं ह्या धिंगाना. म्हनलं आदी ह्या मथाऱ्याकडं पहावं. हैबत खाऊन मेलं का काय ?

पहिला : असं म्हणता, ठीक आहे. चलतो आम्ही. (चौथ्यास) बाबा, तुमचा फोटो घेणार आहोत आम्ही जाताना.

चौथा : अरं माजा फोटू कशापायी ? ती गरीब जनता, त्यास्नी काहीबाही द्या रं सरकार-कडून.

तिसरा : न्हाऊं द्या सायब, आमचं सोडा. फोटू काढला काय अन् नाय काढला काय, आमा स्नी राग लोभ न्हाई. पन गरीब बिचाऱ्या जन्तेचं बगा. धुळधान झालीय त्येंची. (वार्ताहर जातात.)

बरं झालं, पुलिसापुढं काय जबानी द्येयाची त्याची तालीम झाली.

चौथा : एवढा खुषीत येवू नगंस भिम्या तू. अजून डोक्शानं नीट इचार कर. ही मान्सं लई बारूळी असत्यात.

तिसरा : जरा धीर धरा. काही वाकडं व्हनार न्हाई. आजच वकिलास्नी भेटून येतो. आपला वकील लई फर्डा हाय. ताड ताड विग्रजीत बहेस करतोय जज्जासमूर. फाशीची मान-संवी खाली उतरविलीत त्यानं हं‌ऽ म्हतारबा पैका गेला तरी हरकत न्हाई; पण काम फत्ते झालं पाहिजे. मला शा दित हुता शाना. चारी मुंड्या चित् केला. ना राहिली राख ना राह्यलं हाडुक–

रंगमंच / पहिला : ना राहिली राख ना राहिलं हाडुक ! कशी जिद्द आहे नाही ? पण मंडळी, बसल्या बसल्या तुम्ही काय करीत होतात हो ? नाही म्हणजे थोडा विचार करा. एवढी जाळपोळ झाली, घरदारं, गुरंढोरं, माणसं, स्त्रिया मुलं सगळीच्या सगळी आगीच्या भस्यानी पडली आणि आम्ही बसल्या जागी फक्त सुस्कारे सोडत होतो. मंडळी, जाळपोळ, लुटालूट, मारामाऱ्या, खून करणारे काही गावभरचे सारेच लोक नसतात. हे सगळं करणारे फक्त दहा वीस टक्केच लोक असतात. ही मंडळी अत्याचार करतात आणि आम्ही फक्त (सुस्कारतो); आम्ही गप्प असतो. आम्ही घरात बसून टी. व्ही. बघतो, रेडिओवरून बातम्या ऐकतो, गप्पा मारतो, चर्चा करतो, भाषण ठोकतो, लेख लिहितो पण हे दुष्टचक्र आम्ही थांबवू शकत नाही. अत्याचार करणाऱ्या ह्या लोकांना आम्ही आवरू शकत नाही. देशप्रेमाच्या घोषणा देत ते दंगल करतात. दंगलखोरांना देशप्रेम आहे आणि आम्ही काय देशद्रोही आहोत ? ते मर्द आहेत आणि आम्ही षंढ आहोत ? खरंच परिस्थिती पाहिली की वाटतं आम्ही बाकीचे षंढ आहोत, नामर्द आहोत.

आम्ही षंढ आहोत नामर्द आहोत.

(पडदा पडत असतांना 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा' या गाण्याचे स्वर ऐकू येत असतात.)

सूचना : या एकांकिकेचे प्रयोग हक्क सौ. प्रभा परचुरे, प्रकाशिका प्रनश्री प्रकाशन, जुना जालना, यांचेकडे आहेत. प्रयोग करण्यापूर्वी लेखी परवानगी घेणे आवश्यक !

शंकर परचुरे
प्रनश्री, कपूरगल्ली,
जुना जालना, ४३१२०३

△ △

(एकांकिका स्पर्धेतील निवड)

एक असतो कावळा . . .
एक असते चिमणी

प्रकाश जोशी

(ढोलकीच्या तोडयाने प्रारंभ. गर्दीमधून एक आजीबाई येते...एकाला पंढरपूरचा रस्ता विचारते. त्यानं सांगितलेल्या मार्गानं निघू लागते. एकदम काहीसं सुचून तो इतरांना म्हणतो)

तो : अरे...ए...ऐकलंत कां ? म्हातारी पंढरपूरला चालली आहे. आजीबाई पंढरपूरला चालली आहे बरं कां...

(गर्दीतून ४, ५ जण धावत, उत्सुकतेनं येतात)

१ : अरे वा ! आजीबाई पंढरपूरला निघाली ?

२ : आजीबाई ! ए आजीबाई, कुठे, निघालीस कुठे ?

आजी : बाबांनो, मी चालले पंढरपुरास, माझं मन नाही लागत इथे...कंटाळले मी इथे.

३ : अगं पण एकदम कशी काय निघालीस ?

४ : हो नाही तर काय ? ...कुणाला सांगितलं नाही कुणाशी बोलली नाही. उठली नि निघाली तरातरा.

आजी : कुणाला सांगू ? कोणाशी बोलू ? सगळेच शहाणे झाले आहेत. अरे माझं ऐकायला कोणी तयार नाहीत. माझ्याशी बोलायला कोणाला फुरसत नाही.

१ : पण म्हणून काय आजी एकदम गाव सोडून निघून जायचं ?

२ : हो आणि तेही एकदम पंढरपुराला ?

३ : आजीबाई ! पण तू पंढरपूराला जातेसच कशाला ?

आजी : पाहते...तिथं विठ्ठल रखुमाई कोणी भेटलं तर. (सर्वजण हसतात...) काय रे मेल्यांनो... मी पंढरपुरास निघाले त्यात हसण्यासारखं काय आहे ?

१ : आजीबाई...तुला पंढरपुरात आता विठ्ठल रखुमाई भेटणं शक्य नाही.

२ : विठ्ठलानं पंढरपुर केव्हाच सोडलंय.

आजी : काय वेडयासारखं आणि खुळचटासारखं बोलताय रे मेल्यांनो...म्हणे विठ्ठल पंढरपुराला सोडून गेला. जीभ जळो मेल्यांनो तुमची...छे...कसली दळभद्री कार्टी निपजलीत देव जाणे...

३ : अगं आजी आम्ही खरंच सांगतोय...तुला पंढरपुरात विठ्ठल भेटणार नाही.

आजी : भेटणार नाही असं कसं ? म्हणजे गेलाय कुठे तो पांडुरंग.

१ : आजी...जेव्हा धर्माचा बाजार सुरू झाला, विठ्ठलाच्या पूजेचा लिलाव होऊ लागला... तेव्हाच त्यानं पंढरपुराहून आपला गाशा गुंडाळला.

आजी : रे रांडेच्यांनो...असं म्हणताय ! म्हणजे मला विठुराया भेटणार नाही ?

४ : छे छे विठ्ठल तुला अजिबात भेटणार नाही.

५ : पाय तुडवीत, थंडी पावसाचं इतक्या लांब जाशील...थकशील...आजारी होशील... कुठेतरी पडशील.

३ : आधीच तू वृद्ध झाली आहेस. तुझ्याच्यानं धड चालवत नाही. तुला धड दिसत नाही.

आजी : अरे...पण...

१ : पण कसला ? या वयात काही पण बिण करू नकोस.

३ : आजीबाई ! अगं तूच तर सांगतेस ना की देव देवळात नसतो. तो असतो माणसांच्या हृदयात...

(सर्वजण गाणं म्हणतात 'देव देव्हाऱ्यात नाही...)

४ : आणि म्हणूनच म्हणतो आजी...पंढरपुरात आता विठोबा राहिलेला नाही. तो इथेच आहे...ह्या आपल्या गावात ह्या आपल्या माणसात...बघ...प्रत्येकाच्या हृदयात विठ्ठल उभा आहे.

(गातात...विटेवरी उभा...कटीवरी हात...विठ्ठल विठ्ठल...जय जय विठ्ठल...)

आजी : नाही. नाही...जळलं तुमचं लक्षण मेल्यांनो विठ्ठल पंढरपुरात नाही तर मग तो तुमच्या हृदयात पण नाही...ह्या गावात नाही, रानात नाही, पानात नाही...फुलात तर नाहीच नाही...

१ : असा कसा नाही...अगं आम्ही माणसं आहोत. आमच्या हृदयात तो असलाच पाहिजे...

आजी : मला नाही खरं वाटत...अरे तो जर माणसांच्या हृदयात असता तर मग काल... ती माणसं अशी राक्षसासारखी वागली नसती.

सर्व : काल ?...काय झालं आजीबाई ? आम्हाला सांग काल काय झालं ?

आजी : काल संध्याकाळची गोष्ट आहे. आपल्या झोपडपट्टीच्या टोकाशी असलेल्या देवळाच्या पारावर मी बसले होते...झोपडपट्टी जीवंत झाली होती...लोक घरी परतत होते...

चुली पेटत होत्या...एवढ्यात एक इसम, त्याच्या बायकोला अन पोराला घेऊन आला...मोकळी जागा पाहून झोपडी उभारू लागला.

(ढोलकीचा तोडा. म्हातारीचं बोलणं सुरू होताच इतर तरुण झोपडपट्टीवाले येतात... एक जण दारुडा)

दारुडा : ए...ए...ही झोपडी इथं कोनी बांदली ? चला उचला फेकून द्या ही झोपडी...ए... कौन हे बे अंदर...बिना परवाना साले झोपड्या बांधते है...चलो बाहर निकलो...

(एक जण बाहेर येतो).

तो : साब पैर पकडता हूं... इस शहर मे रहनेकू किधर भी जगाच नै है...

दा : जगाच नै है...तो फिर यांपर कायकू आला ? कहाँ से आला ?

तो : साब ! हम मद्रास से आया... साब इस पापी पेट के लिए आया... बिवी बिमार है... बच्चे भुखे है. साब पाव पडता हूँ... झोपडी लगाने दो...

दा : तेरे कू मालूम नै क्या रे ?... ही झोपडपट्टी कालू दादाची आहे.

तो : हमकू क्या मालूम साब... हम लोग नए है...

दा : नवीन आहेस नं... तर मग चल काढ २० रुपये. झोपडी बांधायचा टॅक्स आहे हा...

तो : बीस रुपिया ? अयय्यो... साब... इतना रुपिया कहाँ लाएंगे... पाच, छे, रुपये तो रोज की कमाई है.

दा : तो फीर फुटो यहाँ से... उस्मान, फिलीप्स

दोघं : यस बॉस !

दा : इसकी झोपडी उखाडकर फेकदो... साले नझूल की जमीन पर झोपडी बांधते है...

तो : नही... नही साब... ऐसा मत करो... मेरी बिबी बिमार है... अच्छा ये लो १२ रुपिया...

दा : (घेतो) अच्छा ठीक है अब हर महिने १५ रुपये देना पडेंगा.

दोघं : बॉस ! कालू दादा आया (कालू दादा येतो.)

दा : सलाम बॉस... दहा रुपयात त्या मद्रास्याला झोपडी बांधू दिली... कल हकाल देंगे

कालू : (पैसे घेत) साली आफत आली... उद्या आपल्या सगळ्यांनाच हाकलून देतील.

तिघं : क्यों क्या हुवा ?

कालू : अरे साले कॉर्पोरेशनवाले ही झोपडपट्टी पाडणार आहेत.

दा : काय ? झोपडपट्टी उठवणार आहेत ?

१ : अरे आइकलं का ? उद्या झोपडपट्टी उठणार आहे (लोक गोळा होतात.)

२ : त्यांच्या बापाची आहे काय झोपडपट्टी ?

बाई : ह्या पान्या पावसाच्या दिवसात लेकरा बाळा-स्नी घेऊन शानं आमी जावं कुठं ?

३ : अरे साले... स्वतः मोठमोठे बंगले बांधून राहतात. आम्हाला इथे ह्या मैदानात पण राहू देत नाहीत ?

४ : ते काही नाही... ही जागा आता सोडायची नाही...

मद्रासी : हां... हां हम खून बहाएंगा जी... यांसे नै जाएगा...

सर्व : हां हा... हम दंगा करेंगे... मोर्च्या निकालेंगे

१ : कालू दादा... तुम कुछ तो बी करो...

का : वो लोग पुलीस को भी लेकर आने वाले है... तुम ऐसा करो चंदा जमा करो... उनकी खिलाई पिलाई करना पडेंगी

दा : चलो लाव पैसा... (सर्वजण पैसे देऊन निघून जातात...)

कालू : (पैसे मोजत साथीदारांना) चला अन्तोन च्या गुत्त्यावर आजची सोय झाली.

(जातात... कॉर्पोरेशनचा ट्रक येतो... पोलिस शिट्या फुंकत येतात... झोपडपट्टी पाडली जाते... रडारड आरडाओरड... सगळं शांत... पुन: पहिलं दृश्य)

आजी : तर असं झालं... तो मेला दादा त्यांना फसवून गेला. कार्पोरेशनवाल्यांनी त्यांचे संसार उध्वस्त केले. अक्षरशः सैतान संचारला होता त्यांच्या अंगात... दिसेल त्याला मारत होते. ठोकत होते...एक गर्भार बाई झोपडी पाडू नका म्हणून विनवायला आली तिच्या पोटावर सप्पकन काठी बसली... केविलवाणी किंकाळी फोडून ती खाली

पडली... एवढं रक्त पडलं... मेल्यांनो यांना माणसं म्हणायचं काय रे? ह्यांच्यात विठ्ठल राहतो काय?

१ : हूं... आजीबाई! तू फारच इमोशनल आहेस अगं... ह्या गोष्टी होतच राहतात... काल ती झोपडपट्टी साफ झाली ना? उद्या बघ नवीन झोपडपट्टी उभी राहील तिथे...

२ : आजी... तुमच्या सारखे मानवतावादी असतात म्हणून हे झोपडपट्टीवाले शेफारतात... साल्यांनी सर्व शहर घाण आणि गलिच्छ करून टाकलंय...

३ : असं वाटतं... एक मशीनगन घ्यावी आणि सगळया झोपडयांवरून फिरवावी ढिश्युं ऽ ऽ ग ढिश्युं ऽ ऽ ग

आजी : वा! वा! काय बहादुरी दाखवितोस. अरे झोपडयात रहायची का त्यांना हौस आहे... पोटासाठी विचारे कुठून कुठून येतात... रहायला जागा मिळत नाही म्हणून वाटेल तिथे वाटेल तसे राहतात... अरे ते तुमचे समाजबांधव आहेत... थोडा त्यांचाही विचार करा. मुलांनो तुमचं म्हणणं खरं आहे विठ्ठल इथेच या गावात, तुमच्या माझ्यात आहे पण त्याला आपण ओळखायला हवं.

१ : आजी! आजीबाई! तुझा विठ्ठल पंढरपुरातच, आहे... तू जा पाहू... फार भाषणं द्यायला लागली आहेस.

आजी : मी तर मधाच निघाले होते पण तुम्हीच मला परत बोलावून आणलीत.

२ : हो आणलं नं...पण ते कशाला माहिताय कां?

आजी : कशाला?

१ : म्हातारी सारखं, आजीसारखं वागायला आजीचं काम काय असतं? गोष्टी सांगायच्या... बस्स तर तुला आम्ही आम्हाला गोष्टी सांगण्यासाठी थांबवून घेतलं आहे.

२ : त्या सांगायचं सोडून तू लागली भाषणं द्यायला.

सर्व : आम्हाला छानपैकी गोष्ट सांग आजी.

आजी : गोष्ट सांगू? कोणती बरं गोष्ट सांगू?

३ : कोणती पण सांग.

आजी : कावळा चिमणीची सांगू?

२ : हूंत...आजीबाई...ती नको...ती खूप जुनी झालीय.

३ : तर काय आम्ही ऐकली. आमच्या आईनी ऐकली.

४ : तिच्याईनी ऐकली.

५ : तिच्या आईच्या आईच्या आईच्या...

१ : पुरे...पुरे...म्हणजे आजीबाई ती गोष्ट सर्वांनीच ऐकली आहे.

आजी : अरे पण मला हीच गोष्ट येते रे...

४ : छे बुवा! ही म्हातारी फार बोअर आहे. आपण काय आता कावळा चिमणीची गोष्ट ऐकायच्या वयाचे आहोत काय?

३ : आजी बाई...कावळा चिमणीची गोष्ट २ मिनिटात संपेल...आम्हाला मोठ्ठी गोष्ट हवी आहे खूप मोठ्ठी...

आजी : अरे पण माझी गोष्ट मोठीच आहे.

२ : काय? कावळा चिमणीची गोष्ट अन् खूप मोठी? (हसतात)

१ : बरं जाऊ दे...सांग आजीबाई तुझी गोष्ट सांग.

आजी : हां...तर ऐका ऐका ऐका...आजीबाईची गोष्ट ऐका.

काही : ममी डॅडी ऐका. अन आई बाबा ऐका.

काही : उषा मीना ऐका शांता दूरपदा ऐका
आजीची गोष्ट समद्यांनी ऐका
झींग झँग झींग झँग झींग झँग झिकी
देवानंद दिलीपकुमार राजकपूर हो ऐका
झींग झँग ऽऽऽ
धर्मेंद्र, जितेंद्र, पूनम, शबाना ऐका
गोष्ट ऐका फुकटात ऐका
अमिताब देवलसनी
नका आणू ब्लॅक मनी
झिंग झँग झिंग ऽऽ
कावळे चिमण्या उडत उडत आले
गोष्ट ऐकायला पुढारीपण आले
आमदार आले अन् खासदार आले
अहो एवढंच काय ते बघा
'झेड पी' वाले पण आले
सर्वजण आले... कुलूप लावून घरा
आजीबाई तुमची आता गोष्ट सुरू करा...

आजी : तर ऐका माझी गोष्ट...म्हणजे तसे खूप खूप हजारो, लाखो कावळे होते नि तेवढ्याच, दोन, चार कमी असतील चिमण्या होत्या...त्यातल्याच एका कावळ्या अन् चिमणीची ही गोष्ट
(सर्वजण झोपडपट्टीवाले होतात...)
कावळ्याचं घर होतं शेणाचं
(एक जण इंद्रपुरी झोपडपट्टी नं. १ असा फलक लावतो)
अन् चिमणीचं घर होतं मेणाचं
(एक जण 'भाग्यरेखा हाऊसिंग सोसायटी' असा फलक लावतो)
एकदा काय झालं...ढग भरून आले...खूप वारा सुटला...आता पाऊस कोसळणार हे पाहून कावळा पण घाबरला अन् चिमणीपण घाबरली.
(पाऊस पडतोय...झोपडपट्टीवाले पावसापासून झोपड्यांचे रक्षण करतात...पाणी साचू लागलंय. तानी पोराला कडेवर घेऊन येते)

तानी : सुकदेवा...ओ सुकदेवा...

सुकदेव : ताने...अवं एवढ्या पान्यात इकडं कुठं आली ? मरायचं हाय काय ?

तानी : सुकदेवा...माज्या पोराला तुज्या झोपडीत ऱ्हाऊ दे...माज्या झोपडीत पानी घुसलं...

सुक : अवं पन पोर तापलंय तापानं इथं कुठं ठिवतीस ?

तानी : बाबा...तुजी झोपडी पक्की हाय गळायची नाय...उच्चावर हाए पानीबी नाय घुसनार...

सुक : माजी झोपडी पक्की हाय म्हनतेस...अवं निस्ता सडका तट्टचा हाय...पाय आता पासून कुचूकुचू कराया लागला. अजूक तर रात बितायची हाय.

तानी : देवा ! आता काय करू ? पोराले कुठं ठिवू (आवाज–आरं पानी चढलं...नाल्याले पानी चढलं...धावा धावा)

आजी : इकडे कावळा घाबरला तिकडे चिमणी देखील घाबरली.
(भाग्यरेखा सोसायटी)

ती : राजू...पपी...कमॉन...तुझा वुलनचा स्वेटर घाल...आणि नाकाला व्हिक्स लावा. तुमचे डॅडी कसे नाही आले अजून...हे बघा. दूध आणि सँडविचेस ठेवले आहेत ते खाऊन घ्या.

राजू : ममी...मी...रेन पाहू का ? ती झोपडपट्टीतली मुलं पहा कशी रेनमध्ये खेळत आहेत.

ती : ओह ! व्हॉट अ डर्टी फिल...नो...काही रेन पेन नाही बघायचा...ती घाणेरडी मुलं आहेत पावसात खेळतात, त्यांच्याकडे बघायचं नाही...चला मी टीव्ही ऑन करते... त्यात दाखवला रेन तर बघा. राणी तुझं होमवर्क झालंय की नाही ! छे बाई असा पाऊस कोसळत राहिला तर कशी होणार पार्टी.

सर्व : येरे येरे पावसा...पाऊस आला मोठा.

आजी : तर अशा प्रकारे खूप मोठा पाऊस आला. कावळ्याचं घर गेलं वाहून...कावळ्याला प्रश्न पडला आता रहावं कुठे ?
(झोपडपट्टी)

१ : आरं नाल्याला पूर आलाय बगा.

२ : ए पोऱ्या आरं माही झोपडी वाहून गेली रं.

३ : आलं पानीवर आलं...खालतुल्या झोपड्या बुडल्या बगा...ओ...दादा...आरं वर या... ऱ्हाईतर डुबशान पान्यात.

४ : आरं माजं समान वाहून गेलं...झोपडी बी पडली.

तानी : (धावत येते) सुका ओ सुक्या...आरं रामा तुज्या झोपडीत बी पानी घुसलं. माजं पोर कुठं हाए ?

सुका : ताने...पोर तुजं पार भिजलं. तिकडं मुन्शीपाल्टीच्या साळंत पाय जागा भेटते काय रातच्या पुरती.

तानी : त्या साळंत दुसऱ्या झोपडपट्टीचे लोक हाएत ते येऊ देत न्हाई आपल्याले.

सुका : मंग आता पोराले पान्यात डुबोते काय ? कावं याचा बाप कुठं गेला ?

तानी : तो गावात अडकून बसला हाए...नाल्याचं पूर वोसरल्यावर यील...सुका आपून तं रात कशी बी काढू पन पोराचं कसं ?

अनुक्रमणिका

सुको : ताने... आन मी बंगल्यातल्या सायबाकडं जातो त्याले घिऊन. व्हरांड्यात तर जागा दील.

तानी : जाय बाबा...साईबिनीले म्हनं पोराले कुठं बी कोपऱ्यात जागा देजा.

आजी : मग त्या पावसात कावळ्याचं घर गेलं वाहून...चिमणीचं घर गेलं राहून. चिमणीच्या फ्लॅट मध्ये त्या रात्री पार्टी रंगली होती.

(सोसायटी)

१ : वा! वा! हे रेनीवेदर आणि ही पार्टी. वावा...मिस्टर नाडकर्णी यू आर सिंपली ग्रेट.

२ : पार्टीचं कळताच मी इतक्या लांबून आले. आय स्पेंट थर्टी रुपीज फॉर टॅक्सी...पण यार नाडकर्णी तुझ्या घराकडे यायचा रस्ता किती घाण आहे रे ?

३ : अरे त्या साल्या झोपडपट्टीवाल्यांनी सगळी घाण केली. आमच्या कॉलनीची शान घालविली.

१ : पण काय रे परवाच ती झोपडपट्टी उठवली होती ना ?

३ : कसंच काय...दुसऱ्या दिवशी पुन: नवीन झोपडपट्टी हजर. आम्ही पोलिसांकडे कंप्लेंट केलीय...बघू या काय होतं ते.

आजी : मग कावळा चिंब भिजला. कुडकुडत कुडकुडत चिमणीच्या घरापाशी आला... त्यानं कॉलबेल दाबली.

१ : ट्रींग ऽऽ ट्रींग ऽऽ

३ : कोण आहे ते ?

१ : मी कावळा आहे त्या झोपडपट्टीतला...आपण कोण ?

३ : मी...मी चिमणी आहे...भाग्यरेषा हाऊसिंग सोसायटी फ्लॅट नं बी ऑबलीक पाच... कावळ्या तुझं काय काम आहे ?

१ : अच्छा अच्छा...चिऊताई...अगं खूप मोठा पाऊस झाला माझं घर वाहून गेलं...माझ्या घरट्यातला एक लहान कावळा चिंब भिजला आहे. त्याला घेऊन मी आलो आहे. चिऊताई चिऊताई दार उघड.

३ : थांब माझ्या मित्रांना दारू पाजू दे.

(दारू ग्लासात ओतते)

या साल्या कावळ्यांना स्वत:ला रहायला घरं नाहीत नि इतकी पोरं तरी कशाला होऊ देतात देव जाणे.

२ : तर काय...आपण चिमण्या बऱ्या...हम दो हमारे दो...आपलं मेणाच्या घरात मेणासारखं रहावं. मेणासारखं जीवन जगावं.

१ : चिऊताई...चिऊताई...दार उघड.

३ : थांब माझ्या मित्रांना सिग्रेट पाजू दे.

२ : पण मला समजत नाही...चिमण्यांच्या घरट्यांच्या अगदी जवळच ह्या कावळ्यांनी आपली घाणेरडी ओबडधोबड घरटी का बांधावी ? सगळा परिसर खराब होतो नाही का ?

४ : उद्या आपण एका मोर्चा काढू आणि ह्या साल्यांची घरटी पुन: तोडून टाकू.

१ : चिऊताई चिऊताई दार उघड.

३ : अहो मिसेस नाडकर्णी.

५ : काय डार्लींग.

३ : तो बघा...बाहेर एक कावळा आलाय.

५ : काय म्हणतोय ?

३ : तूच ऐक...मला आता दारू चढलीय मला कांहीच ऐकू येत नाही...

५ : कोण आहे ते ?

१ : चिऊताई चिऊताई दार उघड.

५ : थांबा माझ्या पाव्हण्यांना जेवायला वाढू दे.

३ : खरंच समाजातल्या ह्या कावळ्यांची घरटी नाहीशी करण्यासाठी काय उपाययोजावा ?

४ : त्यांना म्हणावं दुसरीकडे जा...इकडे आमच्या सोसायटीशेजारी ही घाण नको. अहो चोऱ्या-माऱ्या करतात. रस्त्यावर घाण करून ठेवतात. दारू काय पितात, पाण्याचे नळ फोडून ठेवतात.

३ : दिवसेंदिवस ही समस्या उग्र बनत चालली आहे.

१ : चिऊताई...चिऊताई दार उघड.

५ : थांब माझ्या मैत्रिणींना फोन करू दे. हॅ... हॅलो...मिसेस टिकले ... आहे...हाऊ फनी आज तुम्ही फोनवर भेटलात...अैया आणि

मिसेस कांचवाला पण तिथेच आहेत गुड...
तरहे बघा...उद्या दुपारी ४ ला आपल्या महिला आघाडीचा मोर्चा आहे. ह्या कावळ्यांची घरटी इथून काढायलाच हवीत सर्व जणी या...काय म्हणताय ? शिफॉन नेसू का ? तुमचं तुम्ही ठरवा...मी मात्र अडीचशेची टेरीनच नेसणार आहे. अहो कलेक्टरांवर इंप्रेशन नको का पडायला ?

१ : चिऊताई चिऊताई दार उघड.

५ : छे बाई वैताग आणलाय ह्या कावळ्यांनी (दार उघडते)

आजी : अन मग चिऊताईनी दार उघडलं... कावळ्याचं चिंब भिजलेलं, तापानं फणफणलेलं पोर आत घेतलं...बाथरुमच्या एका कोपऱ्यात त्याला जागा दिली. कावळ्याचं पोर टुकूटुकू चिमण्यांच्या पार्टीकडे बघू लागलं...चिमण्या दारू पिऊन तर्र झाल्या... तिथेच आडव्या झाल्या, त्यांच्या पुढ्यातलं मसालेदार अन्न पाहून, कित्येक दिवसापासून पोटभर न जेवलेल्या त्या पिल्लाच्या तोंडाला पाणी सुटलं...ते पुढे झालं. आधाशासारखं खात सुटलं.रात्री त्याला अपचन झालं... त्यानं चिमणीच्या घरात घाण केली. सकाळ होताच गुपचाप बाहेर पडलं...चिमण्यांना जाग येताच सर्वत्र घाण पाहून त्यांचं माथं सणकलं...त्यांनी मोर्चे काढले, आंदोलनं केली. कावळ्यांची घरटी उसकटून टाकली.

१ : आजीबाई संपली का गोष्ट ?

आजी : नाही बाळा...कावळ्यांनी पुन: घरटी बांधली. पुन: पावसाळा आला. पुन: तेच चिऊताई चिऊताई दार उघड.

२ : आजीबाई ह्या गोष्टीला अंत नाही का ?

आजी : नाही... ही गोष्ट कधीच संपणार नाही.

४ : खोटं आहे ते...ही गोष्ट संपू शकते. चिमण्यांनी मनात आणलं तर. ही गोष्ट संपू शकते.

सर्व : काय म्हणतोस ? ह्या गोष्टीला एन्ड आहे ?

४ : होय आहे...पण त्यासाठी चिमण्यांनी आपली मनं मोठी करायला हवी...समाजाचं आपणही काही देणं लागतो हे ध्यानात घ्यायला हवं...कावळे आपल्याच समाजाचे घटक आहेत, त्यांची सतत हेटाळणी करून चालणार नाही हे लक्षात ठेवायला हवं...अरे कावळे इथे का येतात ? तुम्हीच शहरं वाढवून, कारखाने उभारून त्यांच्या पुढे शितं फेकता...खेड्यापाड्यात उपाशी राहणारे कावळे या शितांच्या मोहानं समूहासमूहानं येतात...आणि मग ह्या गोष्टी निर्माण होतात...महात्मा गांधींची पुस्तकं रोज वाचणाऱ्या, गांधी जयंतीला भाषणं ठोकणाऱ्या, गांधीजींची पूजा करणाऱ्या तुम्ही स्वार्थानं आंधळ्या झालेल्या चिमण्याच ह्या गोष्टीला जबाबदार आहेत. गांधींनी सांगितलं होतं खेडी समृद्ध करा, शहरांची वाढ करू नका, उद्योगधंदे खेड्यात न्या...पण तुम्ही ते ऐकलं नाहीत...अजूनही वेळ गेलेली नाही...खेडी समृद्ध करा...तिथे शितं फेका...कावळे शहरात फिरकणार सुद्धा नाहीत. मग तुम्ही, तुमचं मेणाचं घर आणि तुमचा मेणाचा संसार, मेणाचं आयुष्य मजेत घालावा...

'चिऊताई चिऊताई दार उघड' असं म्हणायला कावळे कधीही येणार नाहीत...

(असं म्हणत तो जाऊ लागतो...म्हातारी त्याच्या मागे जाते... तरुण आश्चर्यात पडतात)

१ : आजीबाई तू कुठे चाललीस ?

२ : अगं पंढरपूरचा रस्ता तर इकडून जातो.

आजी : मुलांनो माझी खात्री पटली माझा विठोबा ह्या तुमच्या गावात नाही, तुमच्या हृदयात नाही, पंढरपुरात तर बिलकुल नाही... मात्र ह्या तरुणाला तो कुठे आहे ते ठाऊक आहे. माझा विश्वास आहे हाच तरुण मला विठोबाचं दर्शन घडवेल... चला... तुम्ही पण चला.

(सर्वजण जातात)


(जय जय विठ्ठल ऽऽ जय हरि विठ्ठल ...आणि गात असतांनाच 'स्टॉल' घेतात.)

(लेखकाची प्रयोगपूर्व परवानगी आवश्यक आहे.)

△ △

प्रकाश जोशी
पारिजात, उमरी,
अकोला–४४४००५

अनुक्रमणिका



आता / वासंती इनामदार

किती सोसले वादळ
किती उठले तुफान
तुला कळणार नाही
काही निरपेक्ष दान....! !

आता शिकले पाहिजे
काही ठेवायचे नाही
आणि उरले सुरले
कुठे बोलायचे नाही....! !

□ □

सावट / राजीव प्रभाकर पांडे

एकटा मी, फक्त माझे दुःख नाही एकटे
धावते माझ्या दिशेने रोज त्याचे कारटे !

ठेचले मी, मारले दुःखास माझ्या एकदा
दुःख मेले त्या क्षणाला नाचली त्याची भुते !

का असा होऊन गेलो त्या भुतांचे 'झाड' मी
रक्त माझे आटते अन् पालवी त्यांना फुटे ।

गोठले आयुष्य माझे, हुडहुंडी भरली, तरी
ही दिली आणून कोणी पांघराया सावटे !

□ □

तीन कविता / शिवा राऊत

१. दिवेलागण

डोळेच वाटा झाल्या
घरा आली न पाऊले
बाई तुळसमाउले.

दिवेलागणीला उगा
सांजव्याकूळ नकोसे
कसे अंधारउसासे.

उभी रात पापण्यांच्या
काजळाची लागे झरू
किती चंद्रखुणा स्मरू.

बोरकाटीचा आकडा
तसे उरात काजवे
सले वाटेतली गावे.

भुरं पहाटपाखरा
उडायचे लवलाही
माझा भरतार पाही.

तुला देईन जरीच्या
सोनटिक्कुलीचा खण
चोच मधाने भरेन.

२. आठव

सायीच्या सुईने
काढलास काटा
डोळे पाणवठा / पुनवेचा

पायीचा फुपाटा
वेचलास ओठी
पापण्यांच्या काठी / सांजवात

कितीकदा श्वास
पाचुची पैंजणे
दुःखाला देखणे / कोंदण वो

इथेतिथे आता
धूळ आठवांची
आणि आसवांची / मृगजळे

□ □

३. गोष्ट

देठदुखरा हात झाला
चढत गेली बांगडी
काय पुसशी मैत्रिणीला
गोष्ट थोडी वाकडी

पार पिकली लिंबकाती
वहर झाला बावरा
गे तुझ्या लावण्यगेही
मोर आला नाचरा

आपुली घेऊन जाशी
दीपोत्सवाला कुंडले
चालतांना काळजाशी
काचशी तू मेखले

वाढत्या मासादिसांना
उर्वशीचा वाण आला
काय छळशी मैत्रिणीला
देठ पिकला ओठ झाला.

□ □

कविता / राम खंडाळकर

फुले जुईची वेचित असता—
राघू आले
छेलछबेले....
घेऊन गिरकी

फांदीवरती झुलत राहिले.
संगमरवरी शुभ्र मनाच्या हिंदोळयावर
भिरभिर भिरली
हळुच सरकली
लुब्री छाया;
आडोश्याला
कातरवेळी
थरार् बिथरली
नवथर काया

□ □

कलावंतिणीचं गाणं / वसुधा पाटील

बाई मी
  नार नवतीची
  शोंग चवळीची
  उभर ज्वानीची
    दागिन्यांनी सजवा हो ऽऽऽ
    शालु नवा नेसवा हो ऽऽऽ
    घुंगुर पायीं बांधवा हो-ऽऽऽ

बाई मी
  चमक बिजलीची
  सळक सर्पिणिची
  तळप तल्वारिची
    तालामधी नाचु द्या हो ऽऽऽ
    लयीमधी धुंदु द्या हो ऽऽऽ
    साजियांनो साथ द्या हो ऽऽऽ

बाई मी
  सपन जरातारी
  कवन सरमरी
  चितर मनहारी
    मंन कुणि उसवा हो ऽऽऽ
    जखम परी हसवा हो ऽऽऽ
    मर्त माझी ठसवा हो ऽऽऽ

बाई मी
  पिरीत गाइन
  पिरीत पीइन
  पिरीत भिनविन
    नंस नस भिनू द्या हो ऽऽऽ
    रोम रोम फुलू द्या हो ऽऽऽ
    अंगअंग जळू द्या हो ऽऽऽ

बाई मज
  जहर पिरितचं
  अगिन ज्वाळांचं
  जिंदगिप्यासाचं
    घडिभर सोसू द्या हो ऽऽऽ
    जिवा आच लागू द्या हो ऽऽऽ
    सोनं कसा येऊ द्या हो ऽऽऽ

बाई मी
  गरती होइन
  सौभाग्य लेइन
  पाखर घालिन
    जलमभर सजणासि हो ऽऽऽ
    सती पतिवर्ता नौरी हो ऽऽ
    आभाळाचि सावलीसी हो ऽऽऽ

□ □

तुझा श्रावण / नामदेव कांवळे

तू येशील का घरी माझ्या
मागे एकदा आली होती तशी
मला आठवते—
तू आली होतीस तेव्हा
आषाढघन बरसत होता
बाहेर अन् माझ्या घरात सुद्धा
तू तुझी इंद्रधनुष्यी छत्री
गोलाकार फिरवीत आली होतीस
आकाश पांघरून
बरसातीची कातर वेळ
तू आषाढ घनागत बरसत होतीस
मी घरात गळणारे थेंब मोजीत होतो.... ! !
तुझ्या माझ्यातल्या दुवा तुटणार नाही
याची दक्षता घेत
मी अंतर्बाह्य ओलाचिंब
तुझे थरथरते अंग
टळटळून ओघळणाऱ्या पाऊस थेंबामुळे
आठवते तुला ?
तेव्हा मी हसून म्हणालो होतो
बघ मी कसा आषाढघनासारखा बरसतोय
तेव्हा तू
श्रावणाच्या सरीसारखी मीही कोसळेन रे सख्या
असेच काहीसे अभिवचन देऊन गेली होतीस
म्हणूनच म्हणतोय—
तू येशील का मागे आली होती तशी
कारण तिथे तुझा श्रावण झरत असेल
माझ्या डोळ्यातल्या श्रावणसरीसारखा !

□ □

अनुक्रमणिका

शिकस्त / बाळकृष्ण वझोरे

किती काळ व्हावे असे शिकस्त
अंतर्बाह्य धस्स....
दिवाभितासारखे
दिवसा–ढवळया लपत छपत
रात्री–बेरात्री
ढवळल्या पोटाने कूस बदलत
वरून मटकत
आतून गुरगुरत
साहेबांच्या केबीन समोर
जोडा कुठे चावतो
हे ज्याचे त्यालाच कळते
असे अकारणच निक्षून सांगत
व स्वत:च अवघडत
नंतरी बसच्या कोलदांडयाशी ताटकळत
घामट स्पर्शांच्या विळख्यात
कंडक्टरने टोचलेल्या थांब्यावर
दचकून कोलमडत.

नागा–गणा–फागाच्या
सोग्याने पाटी पुसत पुसत
घरातून घराकडे
असा या सिंदबादच्या सफरीच्या
ल. सा. वि. मांडत
किती काळ व्हावे असे शिकस्त....
वेळापत्रकातील सुटीच्या
मधल्या तासात
एखाद्या उनाड मुलासारखे
रस्त्याच्या कडेकडेने
भटकत....थांबत
दफ्तरात कोंबत
पानाफुलांच्या नि रानझरांच्या
तवकडयांचे मुखडे,
घेकडीच्या मागून कालच फुटलेल्या
टमाक्यानं उखडलेली
मीना बाजारातील मंदिर–मीनारीचे
जळकी थोटके
बेवारशी हाडांचे पत्रे
पसरवून वर्गातील मेजावर
" मुलांनो हा आजचा
नवा वस्तुपाठ
साक्षात्–पद्धतीचा."
असे नक्कलवजा
मिरगीच्या पथ–लयीत
उडत पडत आंचके मोजत
किती काळ व्हावे असे शिकस्त....

□ □

लाट / सुखदेव ढाणके

उगा सांडविशी फुले
भर देहाची परडी
नको दवडू नकोस
मत्त सुगंधाची घडी.

जाई मोगरा न् चाफा
तुला घालतो शपथ
येत आहे प्राजक्ताची
दंवादंवातून लाट.

□ □

कैदी / विजय कविमंडन

असे बांधले भिंतींनी मला
की विसरत चाललोय
अथांग निळे आकाश.

खिडक्यांमधून काचेच्या
उदास झिरपत राहतो
घड्याळी सूर्यप्रकाश.

छत्रीच्या टोकातून पडतो
इंचांनी मोजण्याचा पाऊस
सावकाश....सावकाश...

पण जिवंत आहे रे माझ्यात
झाडांची उभेपणाची वेदना,
एकदाच घेऊ द्या छातीभरून
मला मातीचा वास.

□ □

बुद्धाच्या पाच कविता / सिद्धार्थ मेश्राम

१
त्या दिवशी बुद्ध मला
बर्डीवर भेटला
तेव्हा त्याचे कपडे
रक्तानं माखलेले होते
डोळे पेटलेले होते
पण स्मित (मात्र) अद्यापही
शांतच होते
नुकताच पंजाबातून आलो, बुद्ध बोलला
म्हटलं कॉंग्रॅट्स, परतून आल्याबद्दल
बुद्ध माझ्या खांद्यावर मान टेकून
ढसढसा रडत होता
त्याचे अश्रू
नायट्रीक ॲसिडप्रमाणे तप्त वाटत होते
बुलेटप्रुफ जॅकेट नसल्यामुळे
माझी पाठ जखमांचं शेत झाली
आता मी कधीच रडणार नाही,
बुद्धानं प्रॉमिस केलं
...माझ्या जखमा विझत चालल्या होत्या

२
बुद्धाला त्या दिवशी
त्यांनी न्यायालयात हजर केलं
दहशतवादाचा त्याच्यावर खटला
चालविण्यात आला
न्यायाधीशांनी विचारलं, गुन्हा मंजूर आहे का ?
बुद्ध खळाळून हसला
नि भूकंपाचा जोरदार धक्का बसल्याची
आकाशवाणी, टी. व्ही. नि तमाम
वर्तमानपत्रवाल्यांनी
बातमी दिली
तिकडे मात्र
न्यायाधीशांच्या पेनमधून
ज्वालामुखीच्या तप्त लाव्ह्यासारखी
शाई उफाळून वर आली
नि तमाम कायद्याचं राज्य
क्षणात बेचिराख झालं.
बुद्धाला आता प्रशांत महासागरात बुडवून टाका
शांत होण्यासाठी, कुणीतरी बोलला
म्हणजे आतापर्यंत बुद्ध शांत नव्हता का ?
कुणीतरी विचारलं
नि त्याचं उत्तर, नाही.
आता बुद्ध शांत राहणार नव्हता !

३
बुद्धाला कुणीतरी बुलेटप्रुफ जॅकेट दिलं
नि बोलला, माझ्या निवडणूक प्रचारासाठी चल.
तुझी 'सर्व' व्यवस्था करतो
आता ह्या व्यवस्थेला
मला बळी पडायचे नाही. बुद्ध शांतपणे बोलला.
हे जॅकेट त्या व्यवस्थेला वापरू दे
कारण ही व्यवस्था
कधी ३०३ च्या गोळीला बळी पडेल,
ह्याचा नेम नाही
आता उठावांचे जुलूस येतील.
नि मग बुलेटप्रुफ जॅकेट दूर भिरकावत
बुद्धाला तो बोलला,
अरे तू पहिला माणूस भेटलास
यार, दोस्त वाटणारा
दोघांनी शेकहँड केलं
नि जगतमध्ये जाऊन चहा घेतला.

४
मागच्या बुद्धजयंतीच्या वेळी
बुद्धासमोर मेणबत्त्या लावल्या गेल्या
तेव्हा बुद्ध नाराज झाला होता
आता मेणबत्त्यांना मी कंटाळलो आहे,
ह्यापुढं मला पलिते हवेत
नाहीतर मी
कायमचाच श्रीलंकेत निघून जाईन,
असंही तो बोलला होता.

५
पोलिसांनी कर्तव्य म्हणून
बुद्धावर ३७६ चा गुन्हा कायम केला
नि मग बुद्ध पुन्हा न्यायालयात
न्यायाधीश जुनेच. ओळखीचे.
संजय गांधीच्या पाच कलमीचा हा शिकार आहे,
हा निर्दोष आहे,
असा निकाल देत न्यायाधीशांनी

पोलिसांवर शरा मारला,
आजकाल प्रशिक्षण काळात
पोलिसांच्या अभ्यास क्रमात
मथुराप्रकरण अभ्यासाला ठेवावे !
वृद्ध शांतपणे बाहेर आला
तेव्हा पत्रकारांनी त्याला घेरलं
वृद्धाला घेरी आली नि तो खाली पडला
बेशुद्धावस्थेत तो
राहूल राहूल म्हणून बडबडत होता
कुणीतरी पत्रकार राहूल आला म्हणून ओरडला
नि वृद्ध ताडकन उठून बसला
तथाकथित राहूलला गळयाशी धरून
हमसून हमसून रडू लागला
नि रडण्याच्या वडबडीत त्यानं राहूलला
उपदेश केला,
काहीही करून हा देश सोडून
तू त्वरीत निघून जा कुठेही
त्वरित निघून जा कुठेही

□ □

तुला यायचे झाले तर ये / श्रीपाद गंगाधर कावळे

तुला यायचे झाले तर ये
नृत्य नभीचे सरल्यानंतर
पूर्व प्रबोधन उत्तररात्री
नसेल कलरव, इथे इतःपर

पक्षीवृंदही कोटरामधे
निविड वनेही निवांत निर्भर
भ्रमर कमल पत्रात झाकले
चंद्र नभीचा ढळल्यानंतर

तुला यायचे झाले तर ये
निवांत, कोलाहल सरल्यावर
पवन जसा ये टिपीत परिमल
तरंगावली जललहरीवर

तुला यायचे झाले तर ये
अंगाईचे स्वर सरल्यावर
असेल निर्मळ एक अचेतन
निश्वासित मधुस्वप्ने सुंदर

तुला यायचे झाले तर ये
सुखवित हिरवळ अंगांगावर
हरिण पाउली टिपून घ्यावा
पराग कोमल भाव मधुरतर

तुला यायचे झाले तर ये
निश्वासित ये ते अंतिम स्वर
गहिवरल्या हृदयातील दहिवर
तुझे तुझेपण सरल्यानंतर

□ □

गाऊ नकोस / वसंत वाहोकार

गाऊ नकोस आता खिडकीत फुलांची गाणी
रस्त्यावर ऊन दिवाणे एकटे फिरे अनवाणी
ते अंबर हरवून गेले पाखरू उगी मिरमिरते
उन्हात शोधते पाणी–पाण्यात ऊन थरथरते
झाडांचे छंद छविले मिथुनात शोधती रंग
सन्यस्त उदासीन वारे वावरे फिरे निःस्संग
व्याकूळ होऊन तूही सागितलीस जी कहाणी
आता उरली नाही माझ्याशी दिशा शहाणी
निळया अंबरातली तू नक्षत्रे वेच ना राणी
रस्त्यावर रात्रीही चांदणे फिरेल अनवाणी.

□ □

पक्षी / बवन सराडकर

पिंजऱ्यात आसक्तीच्या
झुलतात मनाचे पक्षी
निर्मोही आकाशाला
उरतात व्यथांच्या नक्षी....

हे कोडे सुख–दुःखाचे
उलगडते जेव्हा केव्हा
त्या अनंत आत्मव्यथ्यांचे
साम्राज्य गवसते तेव्हा...

—मग कळते क्षितीजवेडे
पक्षीच भ्रमाचे होते
स्वप्नांच्या इंद्रधनूला
ते उगा लपेटुन होते !

□ □

मागोवा / सदानंद देशमुख

किती मागोवा घेतला नाही चाहूल लागली
पायातली पायवाट पुढे पुढेच लांबली
कशी पावलाची खूण नाही जातांना रेखली
जगावेगळी ही कला कुण्या पुण्याईनं आली.

किती जपले धांडयाना निगा झटून राखली
शेलपानाच्या गर्भात काळी काणीच झोंबली
अशी कशी अनाहूत तुझी सावली रुसली
एक एकामागे हळू हळू पाखरे उडाली....

कुठे गेली मेघा तुझी काया स्नेहलं सावळी
नभ रिकामे रिकामे काळी भुई भेगाळली।

□ □

राधा / वामन इंगळे

तू जर नव्हती राधा तर मग
यमुनेवर कां वाट पाहिली ?
कशास 'लाडामधी' येऊनी
नणदेची चुगली सांगीतली ?

मीं तर नव्हतो कान्हा हेही
पुरते ठाऊक होते तुजला
होऊं नये ते झाल्यानंतर
ताक फुंकूनी पिणे कशाला ?

□ □

म्हणींचे अभंग / नीळकंठ घोडे

बोले तैसा चाले त्याचे वंदु पाय
गोकुळाची गाय कसावात

दुभत्या गायीच्या लाथा गोड झाल्या
देवळाशी हेल्या मंत्रमुग्ध

आपलेच दात आपलेच ओठ
भ्रष्टाचारी मोट पाणी वल्हे

नाचता येईना अंगण वाकडे
बिलोरी झापडे डोळयावरी

पूढच्यास ठेच मागचा शहाणा
नाजूक बहाणा ज्याचा त्याचा

□ □

दोन कविता / रत्ना बऱ्हाणपुरे

१. अंकूर

आपल्या
अमर प्रीतीचा अंकूर मनातून
तनातही रूजला
अस्तित्व गडद !
मी मोहरून गेले अंगोपांगी गुल्मोहरासारखी
बहरून धुंद झाले चाफ्यासारखी
गिरक्या घ्यायला लागली—
स्वतःभोवतीच
असे कसे रानभर भाजून गेले
वैशाखाचे ऊन.
रान होरपळले
अंकूर ही जळाला.
कळी गळाली गुलाबाची
सहकंप आणि स्पंदने
विझू विझू आली.
आता नुसतंच जळत रहायचं.
आणि श्वासावर श्वास मोजत जायचं
ओथंबल्या आभाळाखाली
वांझ धरतीसारखं.

२. सोनपहाट

दुरस्थ जिवलगाच्या
विरहाने विभोर होणाऱ्या मनासारखी
अंतर्मुख झालीस सृष्टी सारी
मिटल्या डोळयांनी कोसळतो आहे
पाऊस नुसता !
कधीतरी अनोळखी झालेल्या
माझ्याच जुन्या ओळी
लगट करतात ओठांशी
अन्
अकस्मात उगवून जाते
एक सोनपहाट
दाटलेल्या ढगांआडून.

□ □

अनुक्रमणिका

झानी ओघळ / सुलभा हेर्लेकर

एखाद्या वेगवान घोड्यासारखे
दु:ख फरफटत धावत आले....दमछाक होईपर्यंत.
आता श्वास घेत थबकून हळूच वळून बघते
एकेक गोष्टी कशा लख्खकन
समोर येतात....
तुझ्या मनाचा बाह्य झगमगाट
नी आतल्या मोडक्या भिंती
स्वत:बद्दलचा तीव्र अहंकार
आणि इतरांबद्दलची आत्मकेंद्रित उदासिनता
घडवून तयार झालेल्या घड्याला
श्रय द्यायला नकार अन् नाते
जपण्याची, फुलवण्याची अक्षमता...
सारे पूर्ण समजूनही तुझ्यात भरून
येणारी माझी फुलती सांजसकाळ......
किती क्षुद्र होऊन जातात हे
माणुसकीचे वाहते झानी ओघळ......

□ □

पोर / नारायण कुळकर्णी कवठेकर

पोरी
सांभाळ.
डोळ्यांच्या फुलपाखरांवर
असू दे पापण्यांची जरब सतत.
पाडलेल्या खांद्यांच्या खोबणीत
लपव सशासारखे स्तन.
एकेरी वेणीचा जाड शेपटा
कुणाच्या छातीवर
सापासारखा अवजडेल.
हसायचं तर
बावळटपणे हास.
चालताना फदडक फदडक चाल
नाहीतर नितंबांचे लयबद्ध हेलकावे
काळजाचं पाणी डहुळून काढतील.
बोलूच नकोस
किनऱ्या आवाजानं कानांच्या
ठिकऱ्या उडवू नकोस.
तळहातांच्या मृदुपणाला
नको देऊस
मर्दांची मैहिरप.
पायघोळ झगे घालून
झाकून ठेव
पोटऱ्यांची सुडौल वीज.
अन् मेहरबानी करून
फ्रॉकचे टोक उचलून
नाक पुसू नकोस-
अगदी मोक्षच लाभेल
आमच्या हलकट आत्म्यांना !

□ □

घाला / लक्ष्मीकांत तांबोळी

असा अवचित घाला
कोण्या नवसा पावला !

टाहो फोडोनिया काय
आग गिळोनिया जाय.

उचलिला, आला वाटा
नको उगीच बोभाटा.

श्वास आपुला सांगाती
दिला दिवा त्याचे हाती.

□ □

ओळखीची खूण / अनुराधा पाटील

चिमण्यांच्या पाठीमागं
धावत गेलेल्या एखाद्या मुलासारखी
उधळत गेलेली वाट

हिरव्या झाडीत लपलेल्या
नदी किनाऱ्याचे
काही सांगू पाहणारे
अबोल घाट

पक्षांच्या थव्यांसोबत
पाण्यावरून भिरकत जाणाऱ्या सावल्या
आणि हळवं झालेलं ऊन

मावळत्या उन्हाची किरणं
केसात अडकवून
घरी परतणाऱ्या पोरी
एवढीच ओळखीची खूण.

□ □

अनुक्रमणिका

आमंत्रित

उत्तरपत्रिका

शिरीष गोपाळ देशपांडे

लोक प्रेमात पडून लग्न करतात.

किंवा सेटल्ड मॅरेज करतात.

आणखीही काही तुरळक महत्त्वाचे प्रकार असतील; ते मी नाकारत नाही. ह्या सर्व प्रकारांना डावलून आपण काही वेगळ्या पद्धतीने लग्न करावें वगैरे कोणताही माझा फण्टास्टिक विचार नव्हता. स्वप्नमय वगैरे कुछ नही.

काय घडले की, ती आणि मी एक महिना एकत्र शिकायला होतो. फारसा परिचय नाही. पण थोडा फार होता. नंतर मी ते गाव, ते कॉलेज काही कारणानं सोडून दिलं दुसरा अभ्यासक्रम करून शिकलो. सर्वोच्च पदवी मिळवली. प्रतिष्ठा मिळवली. मानाची नोकरी मिळवली. कलाक्षेत्रात प्रस्थ जमवलं.

मग प्रवासी हिंडत हिंडत राजकन्येच्या गावाला गेला काही काम होते त्याचे. मधला काळ त्याने राजकन्येची प्रतिमा मनात कोरून ठेवली होती. प्रतिमेवरच प्रेम केले.

मला वाटतं, मी प्रतिमेवर पूर्वीच घाव करून ती छिन्न भिन्न करून टाकली असावी; असं मला कोणत्या तरी कोपऱ्यात जाणवायचं. प्रतिमेला चैतन्य हवे होते. प्रतिमेच्या मूळ रूपाला प्रवाशाने मनोगत सांगितले.

ती अविवाहित होती.

तिचे कुठे ठरलेले नव्हते.

परीस्थिती निर्विकार होती; ती अनुकूल करण्याचा प्रयत्न केला. चारदोन दिवस चांगले घालवले.

मग शेवटच्या दिवशी तिने सांगून टाकले. "मी तुला ओळखत नाही." (मग ? माझ्या प्रेताला ओळखतेस ?)

"तू निरंकुश कवी आहेस, हेच खरं !" (थँक्स फॉर द कॉम्प्लिमेंट्स्.)

"तुमचे मनोगत ऐकून आश्चर्याचा धक्का बसला." (वास्तविक दुःखाचा धक्का बसायला हवा होता. एक अनोळखी माणूस—तूच म्हणतेस तसं —रस्त्यात अडवून चक्क विचारतोय– 'लग्न करतेस का ?' म्हणून ! काय असतात आजची मुलं ! विश्वासच नाही बसत कोणावर !)

"तुमचा जसा परिचय आहे, तसा सर्वच विद्यार्थ्यांशी आहे. त्यांच्याशीही मी चार शब्द बोलले आहे."('म्हणून काय त्या सर्वांनीच मला लग्नाची मागणी घातली का ?' त्यांचं खरं मत सांगू तुला ? पण नकोच. राहू दे. त्यांना, बघ, वेड नाही लागलं... त्यांचं एक एक बोलणं सांगितलं तुला तर झडून जाईल त्वचा तुझी आणि वितळून पण जाशील तू !... तुला असं तर नाही म्हणायचं, मी काय मग त्या सर्वांशी लग्न करायला तयार होऊ ?')

"मला तुझ्या प्रस्तावाबद्दल अजिबात इंटरेस्ट नाही," (तो क्रिएट करण्यास मी असमर्थ ठरलो, हे खरं !)

"मी ह्याबाबत माझ्या आईवडिलांशी बोलले आहे." (थँक्यू ! गंभीर प्रकारात त्यांचा सल्ला घेणं हितावह ! पण इंटरेस्टच नव्हता तर त्यांना त्रास का ? की...)

ह्यापुढे तुझ्या बोलण्यात धमकी आहे.

"ह्यापुढे पत्ररूपानं किंवा प्रत्यक्ष भेट घेण्याचा प्रयत्न मुळीच करू नका. ह्या विषयावर वा कुठल्याच विषयावर मला तुमच्याशी काहीच बोलायचे नाही." ('सी यू' तोड. तोड. तोड. झोड. झोड. झोड.)

हे बघा, मॅडम ! ही शेवटची दोन वाक्यं शहाण्या माणसानं बोलायची नसतात. माणसं आपोआप तुटतात. त्यांना तोडायचं नसतं. कालपरवापर्यंत जे ठीक होतं ते एकदम उद्ध्वस्त करायचं नसतं.

म्हणजे काय की, स्वतःला खूप ग्रेट, शहाणं ह्यातलं काही समजायचं नसतं.

मी तसा समजूतदार माणूस आहे. रागानं मी काही बोललो नाही. दात ओठ चावले नाहीत. मूठी वळल्या नाहीत. हात उगारले नाहीत. केवळ हसलो. मनच पुटपुटलं, 'वेडी आहेस अजून. अजाण आहेस.'

सी, मॅडम ! स्वतःविषयी माझ्या काही खूप कल्पना नाहीत. तुझ्या मात्र स्वतःविषयी तशा असाव्यात असं वाटतं. तू आपलं पाठबळ शोधून बघलीस. माझं बुद्धिबळ दुबळं नाही. पण तू वेडी आहेस की मूर्ख आहेस की शिष्ट आहेस की असमंजस आहेस, हे मला कळलं नाही.

की मी तुझ्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालून तुला नसते प्रश्न विचारल्यामुळे तू चिडलीस ? तुझा शांत प्रवाह मी बांध धोंड्यांनी विचकला, असं तुला वाटतं का ? की एक माणूस आपल्या प्रेमात आहे, ह्या ऐटीनं खूष होऊन, आता आपण त्याचे कसे तुकडे तुकडे करतो, ह्या तिरीमिरीनं तू तुटून पडलीस ?

नैकाराच्याही पद्धती असू शकतात, ह्यावर तुझा विश्वास आहे काय? सामाजिक गुन्ह्यांबद्दल तुझे मत काय, आहे? भारताचे परराष्ट्रीय धोरण कितपत बरोबर आहे? (कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या.)

हुं ऽ ऽ !
मेंदूचं पोतेरं झालंय.

मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम आहे, असं समजा. वेश्या पाहणं आणि त्यांत काय फरक आहे?

प्रेमात दोघं पडले.
एकमेकांचा अंदाज येत नाही. मग केव्हातरी जीवनात पातळी मध्येच बदलते. बेबनाव होतो.

मग एकमेकांना जोखून पारखून पाहण्यात काय हरकत होती?
(वरील प्रश्नावर किती गुण आहेत?)
(शेरा : उत्तर-पत्रिकेवर प्रश्न विचारायचा नसतो.)

कत्तलखान्यात कोणालाही डांवता येते काय?
चांगल्या मुलांनी हुंडा का घ्यावा?
हुंडा न मिळाल्यास त्यांनी मुली नाकारल्या तर अशावेळी मुलींना काय वाटते?
(वाटल्यास; निबंध लिहा :)

समजा; ती, मी एका वर्गात नसतो.
ती, मी पुन्हा भेटलो नसतो.
घडले, ते घडले नसते.
समजा, असे घडते की–


मुलीच्या पित्याला स्थळ सांगितले जाते. अमूक अमूक गाव. अमूक अमूक घराणं, नाव. लौकिक, वय अमूक, उंची तमूक. उच्च शिक्षण, मान, सन्मान पगार, गलेलठ्ठ, मुलगा बांधेसूद. देखणा. कर्तबगार, वर्तनखोर, आदबशील.
मुलगी शीलवती, सुंदर, नाकी नीटस, डोळी नीटस, शिकलेली, इतकी उंची, भाऊ इतके, बहिणी तितक्या, इतक्यांची लग्ने झालीत. तेवढ्यांची केव्हाही जमू शकतील, तूर्तास कर्तव्य हिचेच.

आटपाट नगरीत मुलगी पहायला या.
छे: ! शक्य नाही. मुलीस येथे आणा.
ठीक. आणतो. पैसे खर्चून आणतो.
ते तर भाग आहे. मुलीची बाजू आहे.
तेच म्हणतो. येतो.
या.
कोणाचे तरी नाते. त्यांतून कुठे तरी मुक्काम. आलू पोहे, शिरा, चहा, लाज, खोटी, खाली मान, मुलगी म्हणाले तशी आहे.
परतीचा प्रवास, एक, दोन, तीन, रिक्षा, गाडी, टॅक्सी, चार, पाच सहा मुलगी नापसंत.
कसा झकास आहे, नाही, प्रसंग!!
(ह्याला 'ऑर' प्रश्नही सोडवतो. मार्क विभागून द्या. प्रिय परीक्षक. कृपा करा.)
समजा असे की,–
मी ते गाव सोडत नाही. तिथेच शिकतो. अनुनय. करतो नुसता अनुभव अभ्यासात लक्ष नाही. नुसतेच लफडे. नापास, नापास, मी उदास. ती उदास, ती उदास तर तिचे घर उदास, मी नापास. माझा तलास, घर भकास.
"पप्पा, कुछ भी कहो. मैं उससेही शादी–करूंगी."
"वह बेबकूफ आवारा लडकेसे?..."
"वो आवारा नहीं, पप्पा. मैं उससे मुहोब्बत करती हूँ। मैंने उसे मेरा दिल दिया है!"
डार्लिंग ऽऽऽ ङ् ङ् ङ् ङ् ऽऽऽ! ढुर्र र्र र्र ऽऽऽ!
इन्स्पेक्टर तुम उस कालो गाडी का पीछा करो.
व्हॅंव व्हॅंव व्हॅंव व्हॅंव व्हॅंव...

कसा गेला पेपर.
बरा. बरा गेला.
आपली परीक्षापद्धती भविष्याचा विचार करतच नाही.
उदाहरणार्थ :
मॅडम!! एक दिवस तुला वाटेल; नक्की वाटेल, आपलं ह्याच्याशीच लग्न व्हायला हवं होतं. तेव्हा तू काय करशील?...

△ △

डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे
३२१, शंकर नगर, नागपूर



(निमंत्रित)

सरोवरापलिकडे

डॉ. विश्वेश्वर सावदेकर

'या ठिकाणी आता रस्ता संपतोय. यापुढे आपल्याला जाता येईल असं मला वाटत नाही.' इकडे तिकडे बघत आपल्या सहकाऱ्यांना उद्देशून कोलमन म्हणाला. त्याचं म्हणणं खरंच होतं. त्याच्या बरोबरच्या दोघांनी आजूबाजूला पाहिलं. समोर जायला कुठेच जागा दिसत नव्हती. कोलमनला त्यांचं ते वाहन इथेच थांबवणं भाग होतं. या

अनुक्रमणिका

ठिकाणापासून शुक्राचा दक्षिणध्रुव फारसा दूर नव्हता. पण ते आठ-दहा किलोमिटरचं अंतर पार करून जाणं त्या वातावरणात महा कठिण काम होतं.

तसं पाहिलं, तर शुक्रावरचं वातावरण आज खरोखरच खूपच चांगलं होतं. समोर कित्येक फूटांपर्यंत वस्तू अगदी स्पष्ट दिसत होत्या. पर्वतांच्या रांगाही त्या गूढ निसर्गाचं सौंदर्य वाढवत होत्या. शुक्रावरच्या रंगीत ढगांमधून पाझरणारा हिरवट रंगाचा मंद, धूसर प्रकाश सगळीकडे पसरला होता. या प्रकाशामुळे आपण पाण्याखालीच वावरतो आहोत, आणि गढूळ पाणी चारी बाजूला पसरलंय असा काहीसा विचित्र भास होत होता. दूरवर दिसणाऱ्या पर्वतांवर होत असलेल्या प्रकाशाच्या प्रवर्तनामुळे या भासात भर पडत होती. त्या तिघांनाही आपण उथळ समुद्रातून जातोय, असं अनेकदा वाटलं. जेरी गारफिल्डला तर आपल्या आजूबाजूला मासे सळसळत गेल्याचा भास दोन-तिनदा झाला.

'आपण आपल्या यानाला परत बोलावून इथून निघायचं का ?' जेरीनं विचारलं. 'इतक्यात नको डॉ. हचिन्स म्हणाला, 'मला थोडा विचार करायचा आहे.'

जेरीनं आपल्या तिसऱ्या सहकाऱ्याकडे अपेक्षेनं पाहिलं-पण त्याच्याकडून काही प्रतिसाद मिळेल, असं त्याला त्या सहकाऱ्याच्या निर्विकार चेहऱ्याकडे पाहून मुळीच वाटलं नाही. या दोघांच्या वाद-विवादात कोलमन सहसा पडत नव्हता. त्याच्या मते हचिन्स आणि जेरी गारफिल्ड हे दोघंही शास्त्रज्ञ होते. त्यामुळे त्यांच्या विक्षिप्त आणि लहरी स्वभावाबद्दल कोलमनच्या मनात शंका नव्हती. या दोघांनी पुढे जायचं ठरवलंच असतं, तर केवळ आपला निषेध नोंदविण्यापलिकडे कोलमन काहीच करू शकला नसता.

हचिन्स जागेवर बसल्याबसल्या मागे-पुढे डोलत होता. डोलता-डोलता तो आपल्या हातातले नकाशे आणि कागदाच्या गुंडाळ्यांवर नजर टाकत होता. त्याने कारचे सर्चलाईट समोरच्या पर्वतरांगांकडे फिरवले आणि आपल्या गळ्यातली दुर्बिण डोळ्यांना लावून तो त्या पहाडांकडे पाहू लागला. 'हा आता आपल्याला त्या पहाडांपर्यंत न्यायला सांगतो की काय ?' कोलमननं मनातच विचार केला.

अचानक हचिन्सच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. काहीतरी सापडल्याची लहर त्याच्या चेहऱ्यावरून सरकली. जेरीकडे वळून उत्साहानं तो म्हणाला, 'बघ जेरी, त्या समोरच्या काळ्या डागाजवळ डावीकडच्या बाजूला बघ. तुला काय दिसतंय, सांग मला ?

जेरीनं हचिन्सची दुर्बिण घेऊन त्या ठिकाणी नजर लावली. 'मला वाटलं हचिन्स, तू म्हणतोस ती कोरड्या पडलेल्या एखाद्या धबधब्याची खूण असावी. तुझा अंदाज बरोबर आहे. हा जर कोरडा धबधबा असेल, तर शुक्रावर कुठतरी नद्या, नाले असलेच पाहिजेत.' विचारपूर्वक एकएक शब्द वापरत जेरी म्हणाला.

'म्हणजे मी आपली शर्यत जिकली असं म्हणायला हरकत नाही,' हचिन्स उद्गारला. 'एक मिनिट प्लीज;' कोलमन मध्येच म्हणाला, 'ही चर्चा कशाबद्दल सुरू आहे, हे या पामराला कुणी समजावून सांगेल का ?'

'दोन मोठी माणसं गंभीर चर्चा करत असताना त्यातलं काही न कळणाऱ्या लोकांनी मध्ये बोलायचं नसतं,' हचिन्स म्हणाला, 'पण आता तू विचारलंस म्हणून सांगतो. आम्ही शुक्रावरचे धबधबे, नद्या, नाले यांच्या शक्यतेबद्दल विचार करतोय.

'पण यावर चर्चा करायची गरजच काय ?' कोलमन म्हणाला, 'आणि ही चर्चा तुमच्यासारख्या शास्त्रज्ञांनी करावी, याचं मला जास्त आश्चर्य वाटतं. शुक्र भूमीवर पाणी द्रवरूपात सापडणं जवळ जवळ अशक्य आहे, हे आता सगळ्यांना माहित आहे. या ग्रहाचं उष्णतामानच इतकं भयंकर आहे, की या उष्णतामानात पाण्याची वाफ एकत्र येऊन त्याचं पाणी होणं केवळ अशक्य आहे. त्यासाठी आवश्यक अशा ढगांची निर्मितीच या वातावरणात शक्य नाही.'

'अरे हो...हो, संधी मिळाल्याबरोबर किती बोलशील मिश्रा ? तू इतक्यात आपल्या उष्णतामापकाकडे नजर तरी टाकली आहेस का ?' जेरीनं विचारलं.

'नाही बुवा. मी आपली दिव्य कार चालवण्यात दंग होतो!'

'म्हणूनच तू अशा मोठमोठ्या गप्पा मारतोऽस्,' हचिन्स म्हणाला, 'सध्या इथलं उष्णतामान २३० डिग्री आहे, आणि ते अजून उतरतंय.' आपण आता या ध्रुवाजवळ आहोत. शिवाय तू आणखी एक गोष्ट लक्षात ठेव. आपण या ग्रहाच्या सपाटीपासून बरेच उंचावर आहोत. हे उष्णतामान समोरच्या पर्वतांच्या टोकांवर आणखी कमी असणार. तसं असलं, तर आपल्याला तिथे पाणी सापडणं अगदीच अशक्य नाही.'

'पण समजा पाणी असलंच तुमच्या म्हणण्याप्रमाणे, तरी ते अगदी उकळत असणार याबद्दल माझी खात्री आहे' कोलमननं आपलं मत व्यक्त केलं.

'कबूल आहे. पण उकळतं का होईना, आपल्याला जर इथे पाणी सापडलं तर शुक्राच्या संशोधनात एक नवी आणि महत्त्वाची गोष्ट आपल्या हाती येणार आहे. त्यामुळे आजवरचं या ग्रहाचं सगळं चित्रच एकदम पालटणार आहे' हचिन्स म्हणाला.

'कसं काय?'

'अगदी साधी गोष्ट आहे. पाणी सापडलं तर इथे जीवन अगदी नक्कीच सापडणार. आतापर्यंत आपण शुक्रावर सजीव सृष्टी नाही असं अगदी ठामपणानं सांगत आलोय. याचं कारण या ग्रहांच प्रचंड उष्णतामान. आपल्या यांत्रिक उपकरणांनी इथे चारशे डिग्री उष्णतामानाची नोंद केल्यावर इथे सजीव सृष्टी सापडणे अशक्य आहे असं आपण मानलं.' हचिन्स म्हणाला.

'पण मला आठवतंय्' जेरी म्हणाला, 'पृथ्वीवरचे काही शास्त्रज्ञ या निष्कर्षाच्या विरुद्ध होते. एका परिसंवादात यावर बराच वाद झाला होता. शुक्रावर खूप उंच पर्वत आहेत. शुक्राच्या जमिनीवर किंवा आपल्या भाषेत आपण त्याला समुद्रसपाटी म्हणू—जरी उष्णतामान खूप असलं, तरी या पर्वतांच्या टोकांवर नक्कीच कमी उष्णतामान असेल, असं काही शास्त्रज्ञ मानत होते.'

'त्यामुळेच मला शुक्राच्या ध्रुवांबद्दल विशेष आकर्षण वाटलं. या ध्रुवांवर नक्कीच कमी उष्णतामान असेल, त्यामुळे तिथे आपल्याला काही तरी सापडेल असं मला अजूनही वाटतं' हचिन्स आत्मविश्वासानं म्हणाला.

'पण पाणी असलं, तरी ते अगदी उकळतं असणार. त्या उकळत्या पाण्यात कोणती सजीव सृष्टी जिवंत राहणार आहे?' कोलमन निषेधपूर्वक म्हणाला.

'पृथ्वीवर शेवाळांच्या काही जाती आहेत. त्या उकळत्या पाण्याचं उष्णतामान सहन करू शकतात. आणि इतक्या दिवसांच्या परग्रहांच्या अभ्यासावरून मी एक गोष्ट चांगली शिकलोय. ती म्हणजे, कुठल्याही वातावरणात थोडीशी जरी संधी मिळाली, तरी तिथे सजीवांची जगण्यासाठी धडपड सुरू होते. मला वाटतं, शुक्रावरचं इतकं कमी उष्णतामान हीच जीवनासाठी एकमेव संधी असावी. पाण्याचा एक तरी थेंब सापडला, तरी तिथे जीवन सुरू होणार हे नक्की.' हचिन्सनं आशावाद प्रकट केला.

'तुम्हा दोघांची स्वप्नं प्रत्यक्षात उतरलेली बघायला मला आवडलं असतं मित्रांनो', त्यांना चिडवण्यासाठी नाटकी आवाजात कोलमन म्हणाला, 'पण आपल्याला इथून पुढे जाणं शक्य नाही.'

'आपण या वाहनानं जाऊ शकणार नाही. पण खाली उतरून या खडकांवरून चालत जाणं आपल्याला कठीण जाऊ नये. आपल्याला आपले हे अवजड पोषाख घालून फक्त काही किलोमिटर चालायचं आहे, बस्स. त्यानंतर शुक्राबद्दलचं सगळ्यात महत्त्वाचं रहस्य आपल्याला कळणार आहे. फक्त चार-पाच तासांचा प्रश्न आहे. यापेक्षा कितीतरी जास्त वेळ आपण सगळेच यापूर्वी वाहनाबाहेर चाललेलो आहोत. आता धीर सोडू नका'—हचिन्सनं सगळ्यांना सांगितलं.

हचिन्सचं म्हणणं खरंच होतं. त्यांच्या सगळ्यांच्याच अंगावर संरक्षक पोषाख होते. शुक्रावरचे प्रचंड उष्णतामान सहन करण्याची त्यात क्षमता होती. त्यामानानं या ठिकाणी, ध्रुवाजवळ तर खूपच कमी उष्णतामान होतं.

'काही हरकत नाही', हचिन्सला सहमती

दाखवत कोलमन म्हणाला, 'पण तुम्हाला आपले नियम माहित आहेतच. आपण तिघंही आपलं वाहन असं सोडून समोर जाऊ शकणार नाही. नियमाप्रमाणं कुणीतरी एकानं इथं थांबणं आवश्यक आहे. आपल्यापकी कुणी थांबायचं हे ठरवा.'

'तुझी हरकत नसेल, तर तूच थांबावंस असं मला वाटतं. मी आणि जेरी जाऊन येतो'— हचिन्सनं सुचवलं.

'ठीक आहे. पण या ठिकाणी मी सहा तास-पर्यंत तुमची वाट पाहीन. त्यापेक्षा जास्त वेळ आपल्याला थांबता येणार नाही. एवढ्या वेळात तुम्ही परतला नाहीत, तर मला नाईलाजानं इथून निघावं लागेल. आपलं यान उतरण्याच्या ठिकाणी जाऊन सिग्नल्स देणं मला भाग आहे. तिथे मी तुमची वाट पाहीन. मी इथं नसलो तर तुम्ही सरळ आपल्या तंबूकडेच या. आपलं यान आपल्याला घेण्यासाठी उतरणार आहे, ती वेळ तुम्हाला माहितच आहे ?

'ठीक आहे. बायऽ'

कोलमनचा निरोप घेऊन हचिन्स आणि जेरी शुक्राच्या ध्रुवाकडे निघाले. पण आधी हचिन्सला वाटलं होतं, तितकं त्या खडकांवरून चालणं सोपं काम नव्हतं. उतार खूपच कठीण नसले, तरी पाठीवरचं प्राणवायूचं नळकांडं, थोडी फार छोटी उपकरणं, अवजड पोषाख आणि कोरडं वातावरण यामुळे चालणं अवघड होत होतं. पृथ्वीपेक्षा कमी गुरुत्वाकर्षण असल्याने त्यातल्या त्यात दिलासा होता. त्यांच्या सभोवती पौर्णिमेच्या चंद्रापेक्षा थोडासा जास्त प्रकाश पसरला होता. शुक्रावरून त्यांना चंद्र दिसला नव्हता. आणि त्याचं काही कामही नसावं. कारण चंद्राला नियमात बांधण्या-साठी शुक्रावर समुद्र नव्हते.

साधारण एक हजार फूट चढून गेल्यावर त्यांना एका टेकडीच्या पायथ्याशी नाल्यांसारख्या स्पष्ट खुणा दिसल्या. 'या नाल्या नक्कीच वाहत्या पाण्यामुळे तयार झालेल्या आहेत.' हचिन्सनं सांगितलं. या नाल्यांच्या काठाकाठानं शोध घेत आणखी पुढे गेल्यावर त्यांना छोटी नदी म्हणता येईल इतकी रुंद, वाहत्या पाण्यामुळे तयार झाल्यासारखी दिसणारी खूण सापडली. आनंदाच्या भरात ते या कोरड्या नदीच्या काठाकाठानं चालू लागले.

'माझ्या मनात या नदीकडे पाहून एक विचित्र विचार येतोय', काही अंतर शांतपणे चालून गेल्यावर जेरी म्हणाला, 'समजा या नदीत पाणी असताना अचानक पूर आणि वादळ आलं असतं, तर आपल्याला एकदम उकळत्या पाण्याच्या वादळाला तोंड द्यावं लागलं असतं, नाही का ?'

'समजा अजूनही असं एखादं वादळ अचानक आलं, तर आधी ते आपल्याला ऐकू येईल, आणि आपल्याला इथून पळून जायला भरपूर वेळ मिळेल. तू काही काळजी करू नकोस' हचिन्स म्हणाला.

त्याचं म्हणणं अगदी बरोबर होतं. पण जेरीला काही ते फारसं पटलं नाही. याच्या नादी लागून आपण विनाकारण अनामिक संकटाच्या दिशेने जात आहोत, असं त्याला मनातल्या मनात वाटत होतं. त्याच्या मनाचा अस्वस्थपणा क्षणाक्षणाला वाढत होता. त्यात भरीस भर म्हणून एक टेकडी उतरून ते खाली आले, तेव्हा त्यांचा कोलमनशी असलेला रेडियो संपर्क तुटला. जेरीला अशा प्रकारचं एकटं पडणं असह्य झालं. त्यानं हा अनुभव यापूर्वी कधीच घेतला नव्हता. यापूर्वी 'मॉर्निंग स्टार' नावाच्या यानातून त्यानं चंद्रा-भोवती फेऱ्या घातल्या, तेव्हा तो सतत आपल्या सहकाऱ्यांशी आणि कुटुंबियांशी संपर्क साधून होता पण आता मधे आलेल्या टेकडीमुळे हे दोघं सगळ्या मानव जातीपासून वेगळे पडले होते. या ठिकाणी जर त्यांचं काही बरं वाईट झालं असतं, तर कुणाला त्याबद्दल काही कळण्याची शक्यता नव्हती. एकटेपणाच्या या जाणीवेनं जेरी मनात भयंकर अस्वस्थ झाला. कोलमन ठराविक वेळपर्यंतच त्यांची वाट बघणार होता. त्यानंतर त्याला परतणं भाग होतं.

'मी उगाच या शुक्र प्रवासाच्या भानगडीत पडलो,' जेरी मनाशीच म्हणाला, 'केवळ आवड. म्हणून मी परग्रहांचा अभ्यास सुरू केला. अंत-रिक्षातली ही यानं कुठं नेणार आहेत याची मला

कधी कल्पनाच आली नाही. आणि आता इतका उशीर झालाय की माझी चूक कदाचित मला कधीच सुधारता येणार नाही.'

असाच काही वेळ प्रवास झाल्यावर एकाएकी हचिन्सनं जेरीला थांबवलं. 'बघ, जेरी. उष्णतामान आणखी कमी झालंय्. फक्त १९१ डिग्री ! आतापर्यंत शुक्रावर नोंदवलं गेलेलं हे सगळ्यात कमी उष्णतामान आहे.' तो म्हणाला.

जेरीनं कोलमनशी संपर्क साधण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न केला. पण त्याला यश आलं नाही. 'अरे ! जेरी, आणखी एक चांगली खूण,' हचिन्स ओरडला, 'बघ, वातावरणातलं प्राणवायूचं प्रमाण वाढतंय. बघ, आपलं हे यंत्र तीन टक्के प्राणवायू दाखवतंय. आपण कारजवळ होतो, त्यावेळी प्राणवायू फक्त एक टक्का होता आणि सपाटीवर तर या प्राणवायूचा पत्ताही लागत नव्हता.'

'यार हचिन्स,' जेरी म्हणाला, 'तीन टक्के प्राणवायू ठीक आहे, पण सत्याण्णव टक्के विषारी वायू वातावरणात असताना या तीन टक्क्यात कोणता प्राणी श्वासोश्वास करणार आहे ?'

'अगदी बरोबर ! माय डियर, या प्राणवायूत कुणी श्वासोश्वास करत नाहीये, तर 'कुणीतरी' तो निर्माण करतोय. आलं लक्षात ? आपल्या पृथ्वीवर प्राणवायू कसा तयार होतो, माहित आहे तुला ? सगळ्या हिरव्या वनस्पती तो बनवतात. पृथ्वीवर वनस्पतींची सृष्टी नव्हती, तेव्हा तिथेही असंच अमोनिया, मिथेन आणि कार्बन डाय ऑक्साईडचं वातावरण होतं. नंतर वनस्पती आल्या आणि त्यांनी पृथ्वीचा कायापालट केला.'

'अच्छा. तुला असं म्हणायचं आहे का हचिन्स, की पृथ्वी उत्क्रांतीच्या वेळी ज्या टप्प्यांमधून गेली, त्याच टप्प्यांची आता शुक्रावर सुरवात होते आहे ?

'मला तरी असंच दिसतंय. शुक्र ही जीवनिर्मितीच्या प्रक्रियेची प्रचंड प्रयोगशाळा आहे. इथे 'कुणीतरी' प्राणवायू तयार करतंय आणि हे 'कुणीतरी' आपल्यापासून फार दूर नाहीय्ये. हे 'कुणीतरी' म्हणजे एकपेशी अतीसूक्ष्म वनस्पती असू शकतात. हेच याला सगळ्यात सोपं उत्तर आहे.'

'आणि ज्या अर्थी इथे वनस्पती असण्याची शक्यता आहे, त्याअर्थी आज ना उद्या प्राणीही येतील. बरोबर.' जेरीनं विचारलं.

'अगदी बरोबर. हा 'उद्या' कदाचित लक्षावधी वर्ष दूर असू शकेल.'

'पण समजा हचिन्स, तुझा हा 'उद्या' आजच उगवलाय् आणि इथले प्राणी आपल्यावर चाल करुन आले अचानक, तर आपल्याजवळ प्रतिकारासाठी शस्त्रेही नाहीत.'

'आणि त्याची काही गरजही पडणार नाही आपण कसे दिसतो आहोत हे तू विसरलास की काय ? अरे, आपला अवतार पाहूनच इथले प्राणी मैलभर दूर पळत सुटतील' हचिन्स हसत म्हणाला.

आणि त्याचं हे म्हणणं बरंचसं खरंही होतं. त्यांच्या अंगावरच्या संरक्षक पोषाखामुळे ते बरेचसे लठ्ठ आणि आकाराने मोठे दिसत होते. डोळ्यावरच्या शिरस्त्राणापासून निघालेल्या दोन मोठ्या ॲन्टेना त्यांच्या विचित्रपणात आणखी भर घालत होत्या. या शिरस्त्राणावर डोळ्यांच्या जागी लावलेली भिंग निर्विकार पण वटारलेल्या डोळ्यांसारखी दिसत होती.

असा विचार करत करत आणि गप्पा मारत मारत ते दोघं शुक्रावरच्या त्या तलावाजवळ केव्हा आले, ते त्यांना कळलंच नाही. तो प्रचंड तलाव-ते सरोवर असं अचानक समोर आलेलं पाहून त्यांना शुक्रावरच्या जीवनापेक्षा आपल्या मृत्यूच्या भावनेनंच घाबरवून टाकलं. दोन टेकड्यांच्या मधे, त्यांच्या पायथ्याशी काळाशार आरशाप्रमाणे ते प्रचंड सरोवर पसरलेलं दिसत होतं. त्याचा पलिकडचा काठ दृष्टीला पडत नव्हता. परंतु त्या काठावर पाण्याच्या वाफेचा प्रचंड स्तंभ त्यांच्यासमोर नाचत होता. एखाद्या महाकाय अशा कढईतल्या तेलावरून वाफा तरंगत असाव्यात, तसं ते दृष्य होतं. आजूबाजूला झाडंझुडपं असल्याचा प्रश्नच नव्हता शुक्रावरच्या मंद, धुसर हिरव्या प्रकाशानं त्या गूढ वातावरणात भर टाकली होती.

समोरचं ते दृष्य पाहून दोघांच्याही मनात भीती उभी राहिली. परग्रहावरच्या संशोधनातलं एक महान आश्चर्य त्यांच्या समोर त्या सरोवराच्या

अनुक्रमणिका

रूपानं उभं ठाकलं होतं. शुक्राच्या भूमीवर पाणी असेल ही कल्पनाच मूळात हास्यास्पद ठरवली गेली होती. आणि आता ते काळशार पाण्यानं भरलेलं आरशासारखं सरोवर त्यांच्या समोर पसरलं होतं. या सरोवरापलिकडे काय असेल ? सारंच अनाकलनीय होतं.

जेरीनं हचिन्सकडे नजर टाकली. गुडघ्यात वाकून तो बारकाईनं त्या सरोवराचं निरीक्षण करत होता. या सरोवराच्या पोटात काही सृष्टी असेल का ? हे पाणीच आहे, की आणखी काही ? त्या दोघांनाही कल्पना नव्हती.

सरोवराच्या काठावर उभं राहून हचिन्सनं आपल्या बॅगमधून छोटया छोटया काचेच्या बाटल्या काढल्या. त्यात काळजीपूर्वक ते पाणी त्यानं भरून घेतलं. नंतर आपल्या खिशातून छोटा मायक्रोस्कोप काढून तो त्या पाण्याच्या थेंबांचं निरीक्षण करायला लागला.

'तुला त्यात काही दिसतंय, हचिन्स ?' जेरीनं उत्सुकतेनं विचारलं.

'सध्या तरी काही नाही, या सूक्ष्मदर्शकाची शक्ती फार कमी आहे. आपल्या जवळच्या मोठ्या, शक्तिमान सूक्ष्मदर्शकातून कदाचित यात काही सापडू शकेल,' असे म्हणत हचिन्सन त्या बाटल्या काळजीपूर्वक बंद केल्या. एखाद्या सोनारानं सोन्याचा दागिना घडवताना काळजी घ्यावी, तसा तो त्या बाटल्यांना जपत होता. त्या पाण्यात आजवर अज्ञात असे, शुक्रावरचे जिवाणू असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. ते जिवाणू कदाचित उत्क्रांतीच्या पहिल्या पायरीवरचेही ठरू शकले असते.

त्या बाटल्या घेऊन हचिन्स सरोवरापलिकडे दूरवर नजर टाकत काठाकाठानं चालायला लागला. अचानक तो एकदम थबकला. इतका अनपेक्षित की मागून येणारा जेरी त्याच्या अंगावरच आदळला. 'असं अचानक थबकायला काय झालं ?' जेरीनं विचारलं. 'तुला असं काय दिसलं त्या पाण्यात, हचिन्स ?'

'सरोवरापलिकडे बघ. तिकडच्या काठाजवळ दूरवर तो खडकासारखा, गडद रंगाचा तुकडा दिसतोय. तू पाहिलंस का ?'

'आपण तलावाकडे येत असतानाच मी तो खडकासारखा तुकडा पाहिला. त्यात काय विशेष ?'

'विशेष काही नाही. पण मला वाटतं, त्याचा आकार हळू हळू वाढतोय. तो खडक आपल्या दिशेनं सरकतोय.'

'बाप रे !'–जेरीच्या अंगावर नखशिखान्त शहारे आले. आपल्या आयुष्यात तो इतका कधीच घाबरला नव्हता. तो खडक म्हणजे काय असेल ? सरोवरापलिकडून येणारा एखादा प्राणी असेल का ? खरंच त्याचा आकार वाढतोय का ? अनेक प्रश्नांनी त्याच्या मनात गर्दी केली. शुक्रावरचा फिकट प्रकाश, ते काळशा आरशासारखं सरोवर, त्याच्यावर तरंगणारी वाफ या सगळ्या दृष्याचा त्याच्या मनावर फार विलक्षण परिणाम झाला होता. या क्षणी हचिन्स जे काही सांगेल ते खरं असं मानायची त्याची मानसिक तयारी होती.

जेरीनं त्या खडकाकडे नजर टाकली. तो त्यांच्यापासून अंदाजे पाचशे फुटांवर होता. अर्थात शुक्रावरच्या धूसर प्रकाशात एखादी वस्तू नक्की किती दूर असेल ते सांगणं तसं कठीणच होतं. तो खडक किंवा खडकासारखं 'काहीतरी' समोर आडवं पसरल्यासारखं दिसत होतं. त्याचा रंग गडद काळा होता. त्या सरोवराच्या काळ्या पाण्यातही ते स्पष्ट दिसत होतं. त्या आडव्या भितीजवळ थोड्याच अंतरावर दुसरा, तसाच दिसणारा तुकडा होता. दोन तुकड्यांमधलं अंतर किती असेल हे पाहण्याचा जेरीनं प्रयत्न केला. पण त्याला फारसं यश आलं नाही.

तो 'खडक' हळू हळू त्यांच्याजवळ सरकत होता. काठावर उभे असलेले दोघं आणि काळा खडक यांच्यातलं अंतर कमी कमी होत होतं. सारा प्रकार पाहून जेरी स्तंभित झाला होता.

ती काळी भित जवळ आल्यावर त्यांच्या लक्षात आलं, की ते ज्याला 'खडक' समजत होते, तो खडक नव्हताच. काळ्या रंगाची एक प्रचंड लाट त्या पाण्यावरोबर त्यांच्याकडे येत होती. आता तिचा वेग अचानक मंदावला होता. कुठल्याही प्रकारचा आवाज नव्हता. पाण्याचे तुषार त्या लाटेतून उडत नव्हते. जेरी त्या लाटेकडे एकटक बघत

होता. हचिन्सनं आपली दुर्बिण तिच्यावरच रोखली होती. तो एक वनस्पतीशास्त्रज्ञ होता. त्या लाटेपासून आपल्याला काही धोका असेल, असं त्याला स्वप्नातही वाटलं नाही.

'हचिन्स, हा नक्की काय प्रकार आहे ?' त्याची तंद्री मोडत जेरीनं घाबरत घाबरत प्रश्न केला, आणि हचिन्स एकदम भानावर आला.

'सॉरी, यार. मी तुला विसरूनच गेलो होतो,' हचिन्स त्याच्याकडे वळून म्हणाला, 'काही नाही. ही लाट म्हणजे आपल्या शेवाळासारखी वनस्पती आहे. निदान मी तरी असंच म्हणेन.'

'वनस्पती इतकी मोठी, अशी लाटेसारखी असू शकते का ? आणि झाडं कधी हलतात का ?'

'अरे, शेवाळासारख्या तंतुमय वनस्पती एकमेकात अडकून त्याचं मोठं जाळं तयार होऊ शकतं. पाण्याच्या लाटेबरोबर त्यांना हलता येणार नाही का ?' हचिन्स म्हणाला, 'पण ते झालं आपल्या समुद्रात. इथलं आपल्याला काय माहित ?' समोरून येणाऱ्या लाटेचा विचार करत जेरी उद्गारला. हचिन्सच्या म्हणण्याप्रमाणे ती एक प्रकारची वनस्पती होती. त्या आडव्या पसरलेल्या भिंतीसारख्या लाटेची जाडी सगळीकडे सारखीच नव्हती. काही ठिकाणी तिचा थर अगदी पातळ होता, तर काही ठिकाणी ती एक दोन फूट जाड होती. जसजशी ती लाट जवळ आली. तसतशी जेरीला ती व्हेल्वेटचा गालिचासारखी दिसायला लागली, हिला हात लावला, तर या गालिच्याचा स्पर्श कसा असेल ? मऊ, गुळगुळीत की खडबडीत ? जेरीच्या मनात विचार आला. पण लगेच त्याला शुक्रावरचं प्रचंड तापमान आठवलं. या उष्णतामानात आपण या व्हेल्वेटला हात लावला, तर हातच भाजून निघेल हे त्याच्या लक्षात आलं.

आता ती लाट अगदी जवळ आली होती. तरी तिनं या दोघांच्या अस्तित्वाची दखल घेतल्याची चिन्हं काहीच दिसत नव्हती. अगदी सर्वसामान्य पाण्यावरच्या लाटेसारखी ती सरकत होती. ती किनाऱ्याला येईपर्यंत तिथेच थांबायचं असं दोघांनी ठरवलं.

–आणि अचानक, त्या दोघांपासून दहा फुटावर असताना ती लाट एकदम थांबली ! डोळे विस्फारून हचिन्स आणि जेरी त्या लाटेकडे पहायला लागले. हळूहळू त्या लाटेचे दोन भाग होऊन एक डावीकडे आणि एक उजवीकडे असे विभागून ते किनाऱ्याकडे यायला लागले. परंतु त्या दोघांच्या अगदी समोर ती स्थिरच राहिली.

'हचिन्स ही लाट आपल्या भोवती पसरतेय. ती आपल्याला पद्धतशीर 'घेराव' घालतेय. बघ; ती किनारा ओलांडून बाहेर येतेय. आपल्याला इथून लवकर पळायला हवं.' जेरी घाईनं म्हणाला, 'शिवाय तिकडे कोलमन वाट बघतोय'

त्याचं बोलणं ऐकल्याबरोबर हचिन्सनं दोन पावलं मागे उडी मारली. त्याबरोबर मघाशी स्थिर झालेली ती लाट तितकंच अंतर समोर आली आणि पुन्हा दहा फुटांवर स्थिर झाली. त्यानंतर हचिन्सनं मागे पुढे बऱ्याच उड्या मारल्या. त्याबरोबर ती लाटही मागेपुढं नाचायला लागली.

'वनस्पतीला पाहून असा माकडासारख्या उड्या मारणारा आणि तिला नाचायला लावणारा शास्त्रज्ञ मी आजवर कधी पाहिला नव्हता' जेरीनं अभिप्राय दिला.

'अरे, ही त्या लाटेची आपल्या उष्णतेवरची प्रतिक्रिया आहे. तिला आपल्या या अवकाशपोषाखातून परावर्तित होणारी उष्णता सहन होत नाहीये. या थर्मोफोबियामुळे ती आपल्यापासून अशी दहा फुटांवर राहतेय,' हचिन्सनं स्पष्टीकरण दिलं.

'आता ही वनस्पती उजेडाला कसा प्रतिसाद देते ते पाहू या,' असं म्हणत हचिन्सनं आपल्या शिरस्त्राणातला प्रखर दिवा सुरू केला. त्याबरोबर त्या हिरव्या प्रकाशात एकदम प्रखर पांढरा उजेड पडला. मानवानं पाऊल टाकेपर्यंत ह्या ग्रहावर पांढरा शुभ्र प्रकाश कधीच पडला नव्हता. हचिन्सनं प्रखर प्रकाश त्या लाटेवर टाकल्याबरोबर एक विलक्षण दृष्य त्यांच्या नजरेसमोर उभं राहिलं. ते पाहून भान हरपून ते दोघं त्या दृष्याकडे आश्चर्यचकित नजरेनं बघत राहिले. प्रकाशाच्या झोताबरोबर त्या लाटेतला गडद काळा रंग निघून गेला होता. त्याजागी चकाकणारा लालभडक रंग दिसत होता. अधून मधून त्या लाल रंगात सोनेरी ठिपके

अनुक्रमणिका

दिसत होते. इतक्या सुंदर रंगाचा गालिचा कुणा बादशहाला सुद्धा करवून घेणं शक्य झालं नसतं. हे सगळं शुक्रावरच्या वनस्पतीत तिथल्या निसर्गानं घडवलं होतं. पृथ्वीवरच्या एका कृत्रिम प्रकाशाच्या दिव्यानं हा अद्भूत गालिचा उजेडात आला होता.

'शेवटी टीकोव्हचं म्हणणं खरं निघालं'– हचिन्स मनाशीच पुटपुटला.

'कशाबद्दल बाबा?' जेरीनं विचारलं. त्याला आता परतण्याची घाई होती.

'साधारण पन्नास वर्षापूर्वी टिकोव्ह या रशियन वनस्पतीशास्त्रज्ञाला कधी वनस्पती सापडल्या होत्या. या वनस्पती कमी उष्णतामानात निळ्या आणि जांभळ्या रंगाच्या उजेडात चांगल्या वाढतात आणि उष्णतामान जास्त असेल, तर त्यांना वाढीसाठी लाल किंवा नारिंगी रंगाचा प्रकाश लागतो असं त्याला प्रयोगात आढळलं होतं. यावरून त्यानं निष्कर्ष काढला होता, की मंगळावर वनस्पती असल्याच तर त्या जांभळ्या रंगाच्या असतील आणि शुक्रावरच्या वनस्पती नक्कीच लाल रंगाच्या असतील. त्याचा हा निष्कर्ष शुक्राच्या बाबतीत खरा ठरला आहे.'

'आपण या लाल गालिच्याकडे किती वेळ पाहणार?'

'तू काळजी करू नकोस. ती वनस्पती कुठल्याही स्थितीत आपल्या शरीराला स्पर्श करणार नाही पण आता ती आपल्या बाजूनं सरकतेय हे खरं'– हचिन्स म्हणाला.

ती संपूर्ण लाट त्या दोघांभोवती जवळजवळ वर्तुळाकार पसरली होती. वाऱ्याबरोबर ढगांनी हळूहळू तरंगत यावं त्याप्रमाणे ती लाट आता जमिनीवर तरंगत येत होती. तिला काठाचं बंधन उरलं नव्हतं. लाटेच्या मार्गात येणाऱ्या खडकांवर बारीक बारीक छिद्रं पडत होती.

'बघ जेरी, ती वनस्पती खडकांना बारीक छिद्र पाडतेय. आपल्या पृथ्वीवर 'दगडफूल' या प्रकारची वनस्पती अशीच खडकांना छिद्र पाडून तिथे वाढत असते. त्यासाठी तिच्यात विशिष्ट प्रकारचं ॲसिड असतं,' हचिन्समधला वनस्पती-शास्त्रज्ञ म्हणाला.

'म्हणजे या लाटेत काही ॲसिड–बिसिड असेल का?' जेरीनं विचारलं.

'प्लीज, आता काही प्रश्न विचारू नको. तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मी यानात देईन.' हचिन्स त्या लाटेचं निरीक्षण करण्यासाठी खाली वाकला आणिअचानक ती लाट उसळी मारून त्याच्याकडे धावत आली. ते पाहून दोघंही घाबरले. काही पावलं मागे आल्यावर हचिन्स म्हणाला, 'यात घाबरण्यासारखं काहीच नव्हतं. आपल्या शिर-स्त्राणांवरच्या दिव्यामधून निघणाऱ्या प्रखर प्रकाशामुळे तीवनस्पती आपल्याकडे धावत आली. प्रकाशाकडे धाव घेणं हा वनस्पतींचा गुणधर्मच आहे.'

पण आता त्या लाटेला प्रकाशाची चटक लागली होती. ती लाट त्या दोघांचा पाठलाग करायला लागली. त्यांच्या मागोमाग उसळायला लागली. हचिन्सच्या डोक्यात अनेक प्रश्न उभे राहिले. त्याला त्या वनस्पतींचे नमुने हवे होते. पण आता वेळ घालवण्यात अर्थ नव्हता. जेरी थांबायला तयार नव्हता. लाटही त्यांच्या आजूबाजूला पसरत चालली होती. मार्गात येणारा कुठलाही अडथळा त्या लाटेला रोखण्यात असमर्थ होता. त्या गालिच्या-सारख्या पसरलेल्या अनोळखी वनस्पतीचा काही भाग आश्चर्यकारक गतीनं धावत होता.

लाटेच्या या संशोधनामुळे हचिन्सच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले. पण आता त्याला विचार करायला वेळ नव्हता. कदाचित ही वनस्पती शुक्रा-वर अगदी सहज वाढणारी, सामान्य वनस्पती असेल. त्या वनस्पतींचं पुनरुत्पादन कसं होत असेल? सोन्यासारखे चमकणारे ठिपके म्हणजे पुनरुत्पादनासाठी तयार झालेले वनस्पतीचे भाग असतील कां? यासारख्या प्रश्नांनी त्याला भंडावून सोडलं.

लाटेचं ते अस्ताव्यस्त पसरणं पाहून ते पळत सुटले. भूक आणि थकवा यामुळे अवजड पोषाखां-सह धावणं कठीण होतं. कसेबसे धापा टाकत ते आपल्या वाहनापर्यंत आले. तेव्हा कोलमन कंटाळून तिथून निघून जाण्याच्या तयारीतच होता.

परतीच्या मार्गावर आल्यावर त्यांना सुटल्या-सारखं वाटलं. आता शुक्र हा काही मृतवत ग्रह राहिला नव्हता. शुक्रावर सजीव सृष्टी आहे याचा

भरपूर पुरावा हृचिन्सजवळ होता. पाणी आहे हे सिद्ध करणाऱ्या बाटल्या त्याच्या खिशात होत्या. मंगळ आणि पृथ्वी यांच्या बरोबरीनं आता शुक्र हा सुद्धा सजीव सृष्टी असलेला ग्रह होता; आणि ते शोधून काढण्याचं श्रेय हृचिन्सला मिळणार होतं.

सजीवांच्या शोधात पृथ्वीवरचे मानव वर्षानुवर्ष अंतराळात भटकत होते. आपल्याला कुणीतरी साथीदार मिळेल या वेडया आशेनं भ्रमंती सुरू होती. अजून त्यांना त्यांच्यासारखा सोबती मिळाला नव्हता. पण जी सृष्टी सापडेल. तिचा अभ्यास करणं, ती जपून ठेवणं त्यांचं कर्तव्य होतं. याच सृष्टीतून उत्क्रांती होऊन बुद्धिमान प्राणी तयार होण्याची शक्यता होती. त्यासाठी हजारो, लाखो वर्षं वाट पहायची होती.

ग्रॅहॅम हृचिन्स आता पृथ्वीवरचा सगळ्यात सुखी वनस्पतीशास्त्रज्ञ होता. सरोवरच्या पलिकडच्या काठावरून आलेल्या त्या लाटेमुळे त्यांना आज पळ काढावा लागला होता. तरी काही हरकत नव्हती. काही महिन्यांनी पुन्हा अशीच मोहिम आखता आली असती. पूर्ण तयारी करून, जास्त सुसज्ज होऊन इथे पुन्हा येता आलं असतं. सगळ्या जगातल्या वनस्पतीशास्त्रज्ञांचे डोळे त्यांच्या संशोधनाकडे लागले असते.

हृचिन्स आणि जेरी पळत सुटल्यावर त्या ठिकाणी थोडावेळ काहीच नव्हतं. ती 'वनस्पतीची लाट' थोडावेळ थबकली, आणि परत फिरली. नंतर काही वेळानं ती गालिच्यासारखी लाट परत आली. ही ती गेलेलीच लाट परत आली होती. की सरोवरापलिकडून दुसरी एखादी लाट आली होती, कुणास ठाऊक. पण दुप्पट वेगानं ही लाट सगळीकडे पसरत गेली. मार्गात येणारे खडक, टेकडया, पहाड सर्व तिने हळू हळू पादाक्रान्त केले. हृचिन्स आणि जेरीनं ज्या ठिकाणी शिळे ब्रेडचे तुकडे टाकले होते. तिथे ती लाट किंचित थबकली. त्या तुकडयांना गिळंकृत केल्यावर अचानक तिचा वेग वाढला. कार्बोहायड्रेट आणि प्रोटीन्सयुक्त असा पहिलाच पदार्थ त्या लाटेला सापडला होता. तिला त्याची चटक लागली. त्या अन्नाच्या शोधात ती लाट फिरायला लागली. तीन अंतराळयात्रींनी आपला तात्पुरता तंबू टाकला होता त्या जागेवर त्या लाटेला कागदी कप, ब्रेडचे तुकडे, सिगारेटची थोटकं अशा अनेक वस्तू सापडल्या. त्या सगळ्यांना अगदी सहज गिळून टाकत ती पसरतच गेली.

आपल्या अवकाशयानातून हृचिन्सनं शुक्राकडे नजर टाकली. दुरून विलोभनीय दिसणाऱ्या या ग्रहावर तो पुन्हा आपले सहकारी घेऊन त्याच ठिकाणी उतरणार होता. त्या लाटेचा अभ्यास करणार होता.

—आणि खाली अक्राळ विक्राळ पसरलेली, ब्रेडची चटक लागलेली ही लाट कुणीतरी येण्याची आणि पृथ्वीवरच्या प्रकाशकिरणाची वाट बघत होती.

△ △

डॉ. विश्वेश्वर सावदेकर
१०६, मयुरा,
गांधीनगर, नागपूर

(ऑर्थर क्लार्क यांच्या 'बिफोर एडन' या विज्ञानकथेचे स्वैर मराठी रूपान्तर.)


कवीमित्रांना आवाहन

'संवाद' या कवितांना वाहिलेल्या अनियतकालिकास कविता व काव्यावरील लिखाण हवे आहे.

आपल्या कविता व कवितेच्या संबंधातील विविध टिपणे/समीक्षा/संशोधनपर लेख खालील पत्यावर पाठवून सहकार्य करावे.

मानद संपादक
सोवत अ. ८ उपादर्शन सोसायटी,
आग्रारोड कल्याण ४२१२०१

अनुक्रमणिका



[निमंत्रित]

त्या तरुतळी विसरले गीत—

निलिमा भावे

निघायची तारीख ठरल्यानंतर पहिले काम म्हणजे रेल्वेचे रिझर्वेशन करणे. मुंबईहून पाटण्याला जायचे आहे, तेव्हा रिझर्व्हेशनशिवाय जाणे शक्यच नाही. जायचे खरे म्हणजे पाटण्याच्याही पुढे, मुझफ्फरपूर जिल्ह्यातल्या एका छोटयाशा गावात आहे. माझ्या नवऱ्याची फील्ड ड्यूटी यंदा त्या भागात आहे. त्याने पत्रातून मला कळवले आहे

की पाटण्याला पोचल्यानंतर स्टीमरने गंगा पार करून उत्तर बिहारमध्ये जायचे, आणि तिथून बसने हाजीपुरला पोचायचे. हाजीपुरला पोचल्यानंतर सायकलरिक्षाने दिघी या आमच्या कॅंपच्या गावी पोचायचे. अशी छानपैकी लांबलचक वरात निघायची असते. दोन महिन्यांपूर्वी लग्नात पुरवली गेली नव्हती, ती हौस आता पुरणार बहुतेक !

पण स्लीपरचे रिझर्व्हेशन काही मिळत नाही. चांगले ६–७ तास तिथल्या त्या कळकट, तेलकट पुरभय्यांच्या रांगेत उभे राहिल्यानंतर, आमच्या जायच्या ठरलेल्या तारखेचे रिझर्वेशन संपले असल्याचे कळते. मग सीटस् रिझर्व्ह करण्यासाठी पुन्हा एकदा बोरीबंदरची फेरी करावी लागते आणि मग जायच्या दिवशी सर्व सामानसुमानासकट तिसरी फेरी. ही फेरी मात्र शेवटची.

मुंबई आता जवळजवळ कायमचीच सुटते आहे. पण त्यावद्दल हुरहूर वाटण्याइतका निवांतपणा गेल्या काही दिवसात मिळालेला नाही. रूढ अर्थाने सासरी जायचे नसले, तरी पाठवणीची गडबड आहेच. शिवाय आत्तादेखील गाडीच्या डब्यामधे गच्च कोलाहल आणि गर्दी आहे. प्रवास करणाऱ्यांच्या चौपट लोक त्यांना पोचवायला म्हणून आले आहेत. जाणाऱ्यांच्या गळयात झेंडूच्या फुलांचे हार घालून आणि मिठया मारून त्यांना निरोप देताहेत. त्या सगळया गदारोळामधे डब्यातले आम्ही दोघे, आणि प्लॅटफॉर्मवरचे माझे आईवडील आम्ही एकमेकांना सलगपणे दिसतही नाही. मी नक्की कुठे, कशा प्रकारच्या ठिकाणी चालले आहे, याची मला नीट कल्पना नाही. ज्याच्याबरोबर चालले आहे, त्याच्याबद्दल देखील बेताचीच, आणि ढोबळ माहिती आहे. आईवडील आता बऱ्याच अर्थांनी दुरावणार आहेत. आजूबाजूच्या गोंगाटातून माझ्या मनाची अधांतरी अवस्था नकळत आपला स्वर पकडते आहे.

शिटी वाजते. गाडी हळूहळू चालायला लागते. प्लॅटफॉर्मवर हलत असणाऱ्या असंख्य हातांमधून माझ्या आईवडिलांचे हात शोधून काढून मी तिकडे पहात बराच वेळ रुमाल हलवीत रहाते.

गाडी वेग घेते. आमचे सहप्रवासी आपापले बस्तान बसवून घेतात. आम्ही दोघेदेखील आपल्या सीटस्वर बसून त्यातल्या त्यात नीट कसे झोपता येईल, याचा विचार करू लागतो.

कशी निघेल, असे वाटत असलेली रात्र तशी बरीच नकळत संपते. दुसऱ्या दिवसाचा प्रवास आजूबाजूचा प्रदेश पहात, आणि आम्ही जिथे जाणार त्या गावाची, तिथल्या कॅंपची माहिती ऐकत सुरू होतो. हळूहळू त्यात आम्ही लग्नापूर्वी एकेकट्याने पाहिलेल्या ठिकाणांच्या हकीकती येतात. संदर्भातून संदर्भ निघत रहातात. एकमेकांच्या आवडीनिवडींची माहिती मुद्दाम नकळत दिली घेतली जाते. लग्नाच्या आधी केवळ बायोडेटाच्या स्वरूपात असलेल्या ओळखीत आता नवे रंग भरत चालले आहेत.

गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी पाटण्यास पोचते, तेव्हा तिला ठरलेल्या वेळेपेक्षा अडीच तास उशीर झालेला असतो. पाटण्याहून मुजफ्फरपुरला जाण्यासाठी गंगा ओलांडायची असते. गंगेच्या उत्तर तीरावर असलेल्या सोनपुरहून मुजफ्फरपुरला जाणारी बस मिळणार असते. सोनपुरास जाणारी स्टीमर महेंद्रुघाटावर पकडायची असते. आणि हा महेंद्रुघाट स्टेशनच्या विरुद्ध दिशेला, पाटणा शहराच्या दुसऱ्या टोकास असतो. घाईघाईने सामान काढून आम्ही स्टेशनच्या बाहेर येतो, आणि सायकल रिक्षात बसून महेंद्रुघाटाच्या रस्त्यास लागतो. वाटेत पाटण्याचे धावते दर्शन होत असते.

जुन्या पाटलीपुत्रांचे आणि बौद्ध विहारांचे अवशेष कुठे दिसतात का, ते पहाण्याचा शाळकरी प्रयत्न मी करीत असते. तर ब्रिटिशांनी बांधलेली धान्याची प्रचंड कोठारे माझा नवरा मला दाखवीत असतो.

आम्ही महेंद्रुघाटावर पोचतो, तो समोर स्टीमर निघालेली दिसते. तिकिट ऑफिसात चौकशी केल्यावर कळते की आता दिवसभर दुसरी स्टीमर नाही. म्हणजे आता एक दिवस पाटण्यात मुक्काम करावा लागणार की काय ? पण नाही. आणखी थोडया प्रश्नोत्तरांमधून माहिती कळते की पलीकडच्या बांसघाटावरून दुसरी एक खाजगी स्टीमर सर्विस चालते. तियली स्टीमर बहुधा जरा उशीरा सोडतात. ह्याप्रमाणे पुन्हा त्याच रिक्षात बसून

पाटण्याची उरलेली परिक्रमा पुरी करीत आम्ही बांसघाटावर पोचतो. पाटणा पहायला म्हणून पुन्हा केव्हातरी आले पाहिजे, असे वाटण्याइतपत त्या शहराशी जवळीक उत्पन्न होते.

बांसघाटावरची स्टीमर हळहळू भरते आहे. आम्ही तिकिटे काढून शिडीवरून चढून डेकवर पोचतो. तेवढ्यात स्टीमर सुरू होत असल्याचा भोंगा वाजतो. आम्ही कठड्याशी येऊन उभे रहातो. हळूहळू पाटणा शहर दूरदूर जाते आणि चारीकडे क्षितिजापर्यंत गंगेचे निळसर पाणी पसरू लागते. ही नदी कसली. हा तर समुद्रच वाटतो आहे. पाण्यावर हलक्या हलक्या लाटासुद्धा येताहेत. पलीकडच्या किनाऱ्यावर म्हणजे आम्ही कुठे पोचणार आहो, कोण जाणे ! मात्र रेल्वेच्या डब्यात चाळीसेक तास अंगाची जुडी करून काढल्यानंतर आता या खाली पाणी आणि वर आकाश या अवस्थांतरात मन आणि शरीर दोन्ही मोकळे मोकळे वाटते आहे, एवढे खरे !

यथावकाश स्टीमर गंगेच्या उत्तर किनाऱ्यावर पहलजा घाटाला लागते. स्टीमरमधल्या प्रवाशांना जवळपासच्या गावात नेणारी बस घाटावर उभी आहे. सगळे प्रवासी तिकडे धाव घेतात. बघता बघता ती बस माणसांनी फुलून जाते. आत शिरू न शकलेले प्रवासी टपावर, खिडक्यांमधून, सामान चढवायच्या शिडीवर, थोडक्यात म्हणजे जिथे कुठे हात किंवा पाय ठेवायला जागा मिळेल, तिथे चिकटून बसतात. मी चकित होऊन ते दृश्य पहात रहाते माझा नवराही सामान सांभाळीत बसच्या दिशेने धावत असतो आणि मधून मधून मागे वळून मलाही यायच्या खुणा करीत असतो. पण मग त्याला देखील जाणीव होते, की आमचे या बसमध्ये चढणे अशक्यच आहे. मग तो धावता धावता मधेच थांबून जातो आणि वळून माझ्याकडे पहात थोडेसे हसतो.

बसमधे आता आणखी एखादा माणूसच काय, पण मुंगीदेखील बसवून घेता येणार नाही. याची खात्री मग कंडक्टरला देखील पटते आणि तो जोरात शिट्टी वाजवून ड्रायव्हरला बस सुरू करण्याचा इशारा देतो.

आता घाटावर आम्ही दोघेच काय ते उरलो आहो. जवळपासच रहाणारे दोनचार प्रवासी आपापली बोचकी खांद्यावर टाकून त्यांच्या मार्गास लागले आहेत. आम्हाला इथून आणखी पंधरा–वीस मैल पुढे जायचे आहे आणि आमचे होल्डॉल, बॅगा असे शहरी सामान हमालाशिवाय वाहून नेणे शक्य नाही. इथली बस सर्विस खाजगी, त्यामुळे पुढची बस केव्हा येणार वगैरे काहीच नेम नाही. जवळ कुठे चहाचे खोपटे देखील नाही. वेळेवर स्टीमर पकडायच्या घाईत आम्ही पाटण्यालाही काही खाणे पिणे केलेले नसते. दुपारचा एक–दीड वाजलेला असतो आणि मार्च महिन्यातही पूर्वेकडची दुपार तळपत असते. आता कॅंपपर्यंत पोचायचे कसे ?

मी नवऱ्याच्या जिवावर पूर्णपणे विसंबून निर्धास्त आहे. उत्तर शोधणे आपल्या हातात नसले, तरी आपला प्रश्न म्हणून तरी आपण यात थोडे लक्ष घातले पाहिजे, असेदेखील मला वाटलेले नाही. माझ्या नवऱ्याचा चेहरा थोडा चिंताक्रांत दिसतो आहे का ? कोण जाणे ! मोकळ्या वाऱ्याची चव चाखत इकडे तिकडे पहाताना मला सगळ्या गोष्टींचे फक्त कुतुहलच वाटते आहे, आणि जराशी गंमत देखील ! समोर क्षितिजापर्यंत सरसोंची हिरवी–पिवळी शेते पसरली आहेत.

नव्या बायकोला पहिल्यांदा घेऊन यायचे, ते सुद्धा अनोळखी प्रदेशात आणि उतरड्यावरच्या संसारात म्हणून त्याच्या मनावर थोडे दडपण असावे. त्या उपऱ्या, उघड्यावरच्या संसारापर्यंत पोचायचं निदानपक्षी काही वाहन तरी पाहिजे ! उभयतांनी, भरदुपारी, उपाशी पोटी, खांद्यावर सामान लटकावून लेफ्ट-राइट करीत बारा–पंधरा मैलांचा पल्ला गाठायला सुरुवात करायची, आणि तीदेखील जायचा रस्ता नीट माहीत नसताना, म्हणजे पुढच्या आयुष्याची सुरुवात फारच प्रतीकात्मक होणार होती म्हणायची ! त्यालाही तसेच वाटते आहे का ? पण चेहऱ्यावरून मनातले समजण्याइतकी अजून मी त्याला ओळखतेच कुठे ?

लहान मुलांचा जरा वराचसा आनंद अज्ञानातला असतो, तसा नवीन लग्न झालेल्यांचादेखील असतो. त्या आनंदाच्या जाणिवेतच आमच्या पुढच्या, कदाचित् खडतर असू शकणाऱ्या प्रवासांचीदेखील

मी उत्सुकतेने वाट पहाते आहे. मुंबईत मागे सोडलेले सुरक्षित, प्रेडिक्टेबल् आयुष्य गेल्या जन्मीचे असल्यासारखे वाटायला लागले आहे.

पण बस निघून जाणे, आणि काही प्रवासी मागे रहाणे, हा इथे नेहमीचाच प्रकार असावा. कारण आता एक सायकल रिक्षावाला आमच्याजवळ आला आहे, आणि आम्ही कुठे जाणार ते विचारतो आहे. फक्त तीन रुपयांमधे तो आम्हाला सामानासकट बारा मैलांवरच्या हाजीपुरला पोचवणार असतो. मुंबईत त्यावेळी तीन रुपयात टॅक्सीने दादरहून बोरीबंदर काही होत नसते. त्यामुळे रिक्षात बसताना मन जरा अपराधी वाटते. पण आपण मागितलेले पैसे लगेच ठरले, म्हणून रिक्षावाला अगदी खुषीत असतो. पॅडल मारताना मजेत गाणे म्हणायला लागतो.

दुपारी दोनचा सुमार. चैत्रामधले जाणवू लागलेले ऊन. आधीचे जवळ जवळ दोन दिवस नुसते बसून काढलेले. धड झोप नाही, आणि धड जेवणखाणंही नाही, आंघोळीबिघोळीचे तर नावच सोडा. या साऱ्यांमुळे खरे म्हणजे जीव अगदी वैतागून जायला हवा. पण रिक्षांच्या गादीवर रेलून अंगावर पूर्वेकडचा स्वागतशील वारा झेलत आम्ही दोघे अगदी आरामात आहो. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना हिरव्यागार शेतांमधून पिवळी धम्मक सरसो फुलली आहे. साथीला रिक्षावाल्याच्या सनातन गाण्याचे स्वर आहेत. थोडक्यात, उन्हाचे चांदणे झाले आहे. याहून सुंदर वरात कुणाची कधी निघाली असेल !

जाताना वाटेत सोनपूर लागते. इथे म्हणे जगातला सगळ्यात मोठा गुरांचा बाजार भरतो आणि इथला रेल्वेचा प्लॅटफॉर्म म्हणे आशिया खंडामधे सगळ्यात लांबलचक आहे. इथून जवळच मोकामेहला गंगेवर मोठा थोरला पूल बांधणार आहेत. तो तयार झाला की गंगा पार करून उत्तर बिहारमधे यायला स्टीमरवर अवलंबून रहावे लागणार नाही.

नवरा सांगत असलेली ही अवडक चवडक माहिती मी वाऱ्याने उडणारे केस सावरीत, आणि इकडे तिकड पहात "हूं, हूं" करीत ऐकते आहे.

अशा लहान मोठ्या गप्पागोष्टी करता करता आमची रिक्षा हाजीपुर गावामधे पोचते. "कुठे सोडायचे" म्हणून रिक्षावाला विचारतो. आम्हाला तिथून पुढे आणखी तीन–चार मैलावर असलेल्या दिघी या खेड्यात जायचे असते. कॅंप तिथे असतो. एक रुपया जास्त देण्याच्या बोलीवर रिक्षावाला आम्हाला तिथपर्यंत घेऊन जातो. रिक्षा कॅंपवर पोचते तेव्हा उतरणाऱ्या उन्हात त्याची घामाने थबथबलेली काळी पाठ चमकत असते. पाचाच्या नोटमधले उरलेले पैसे ठेवून घे, असे त्याला म्हटल्यावर त्याच्या तोंडभर पांढरेशुभ्र हसू पसरते.

रिक्षा परत गेली आहे, आणि आम्ही एका आमराईसमोर उभे आहो. राईमधल्या मोहोरलेल्या झाडांच्या पिवळट–हिरव्या रांगांमधून पांढरे तंबू शिस्तीत ताठ उभे आहेत. आमची चाहूल लागून त्यातल्या एका तंबूमधून एक गृहस्थ बाहेर येतात. कडेवर तान्हे बाळ घेतलेल्या एक बाईही त्यांच्या मागोमाग येतात. ओळखी करून दिल्या जातात. नमस्कार–चमत्कार होतात. चहा–फराळाचे आमंत्रण मिळते.

आम्ही सर्वजण खाली वाकून त्या मंडळींच्या तंबूमधे शिरतो. तंबूच्या आत सगळे भातुकलीच्या खेळासारखे वाटते आहे. बाहेरच्या भागात चिकाच्या पडद्यांचा आडोसा आहे, तिथे बैठकीची सोय आहे. मधल्या भागात झोपण्यासाठी खटिया ठेवल्या आहेत, आणि मागच्या भागामधे जेवणासाठी टेबल खुर्च्या. या मोठ्या तंबूच्या मागे स्वैपाकासाठी एक छोटा तंबू, त्याच्यामागे स्नानाचा तंबू, आणि त्याच्याही पलीकडे छोटासा, चर खणलेला तंबू. त्याचे कॅंपच्या भाषेमधले नाव "नेसेसरी टॅंट !"

स्वैपाकाच्या तंबूमधे या मंडळींचा नोकर चहासाठी स्टोव्ह पेटवतो आहे. एव्हाना आमचा नोकर येऊन, त्यांच्या साहेबांना आणि मला सलाम करून तिकडेच त्यांच्या मदतीला गेला आहे. तंबूमधले सगळे संसार नोकरांच्याच जिवावर चाललेले दिसताहेत.

चहापाणी आटोपल्यावर, यजमानांचा निरोप घेऊन आम्ही दोघे आमच्या तंबूमधे येतो. बाहेरच्या चिकांच्या आडोशामधल्या सतरंजीवर पांगाऱ्याची एक लालभडक पाकळी पडलेली दिसते. ही पाकळी इथे आणि कुठून, झाड तर कुठे दिसले नाही, असे

अनुक्रमणिका

नैवले करीत मी ती उचलून घ्यायला खाली वाकते. इतक्यात ती पाकळी सरकन् पड्याच्या फटीशी जाते, आणि तिथे क्षणभर थबकते. कोपऱ्यातल्या सतरंजीखालच्या मातीशी लागल्यावर त्या पाकळीचा रंग हळू हळू काळपट तपकिरी व्हायला लागतो. तेव्हा ती फुलाची पाकळी नसून, सरडा आहे हे लक्षात येते; आणि मी जरा चकितच होते. मग वाटते की परीकथांमधली राजपुत्र, राजकन्या वगैरे मंडळी अशाच पद्धतीने बेडूक, कोळी असल्या प्राण्यांमधे रूपांतर पावत असावीत !

"तंबूमधे असे बाहेरचे प्राणी बरेच येतात." माझा नवरा सांगायला लागतो. सरडे, बेडूक, झाडांवरचे कोळी, मुंगळे वगैरे तर सोडाच, पण पुष्कळदा विंचू, घोणी आणि कधी कधी तर सापही येतात. एकदम कुठे हात घालून काही काढायचे नाही, रात्रीच्या वेळी टॉर्चशिवाय बाहेर पडायचे नाही, वगैरे सूचना तो देत असतो. मी एकीकडे "हूँ, हूँ" करीत सामान उघडत असते. काय कुठ ठेवायचे, ते पहात असते. माझ्या रक्षणाची जबाबदारी आता त्याच्यावर आहे, असा भाव त्यांच्या स्वरातून जाणवत असतो, आणि मला आतल्याआत आत अगदी बरे वाटत असते !

तंबूच्या चार "भितीं"पैकी समोरासमोरच्या दोन बाजूंना दारे आहेत आणि दुसऱ्या दोन बाजूंच्या "भितीं"ना जाळीच्या कापडाच्या दोन खिडक्या आहेत. आतून पडदे सोडून त्या बंद करता येतात. "पण दारांचे काय ?" मी नवऱ्याला विचारते. प्रश्नाचा रोख त्याला समजलेला दिसतोय ! तो हसतो, आणि दारावर गुंडाळून अडकवलेले पडदे खाली सोडून, ते बाजूला पक्के बांधून टाकण्याची व्यवस्था मला दाखवतो. मला त्यातल्या त्यात हायसे वाटते !

दुसऱ्या दिवशी सकाळी पडदे उघडून बाहेर यायला जरा उशीरच होतो. मागल्यादारी येऊन मी परत एकदा तंबूच्या आत नजर टाकते, आणि मग नोकरास चहासाठी हाक मारते.

त्याचा चहा करून होईपर्यंत इकडे तिकडे पहायला खूप काही असते. एका झाडाच्या बुंध्याशी कावळ्याहून थोड्या मोठ्या आकाराचा, आणि तांबूस, तपकिरी चमकदार पंख असलेला एक पक्षी दिसतो. त्या दिवशी आईला, लिहिलेल्या पोचल्याच्या पत्रात त्याचीही नोंद होते. आणि नंतरच्या तिच्या उत्तरामधून तो पक्षी भारद्वाज असल्याचे कळते. याची नावाने पहिली ओळख "फुलराणी" मधे झाली होती, हे मग आठवते. तशी फुलराणी मधली बरीचशी मंडळी अवखळ संध्यावातासह इथे भेटत असतात, भेटणार असतात. आमच्या तंबूच्या दोऱ्यांवर रोज बुलबुलच्या जोडचा अगदी चिमण्यांसारख्या रांगेने येऊन बसतात. सात बायासाळुंक्या सकाळ-संध्याकाळ अंगणात साळकाया-माळकायांसारखा कालवा करतात. आमराईतच मुक्काम आणि भोवती वसंत फुललेला, त्यामुळे कोकिळेचे कु हू ऽ, कु हू ऽ ऽ दुपारभर सोबतीला असतेच. शिवाय अधून मधून एक नवीनच अनोळखी साद ऐकू येते. विशेषत: संध्याकाळी, कातर वेळेला. आर्त खरी, पण आग्रही साथ असते. एक दिवस जवळच्या तंबूतल्या उत्तरप्रदेशी शेजारणीशी गप्पा मारताना ह्या सादेचा उल्लेख होतो. "पी कहाँ ऽ, पी कहाँ ऽ ऽ" असे सारखे विचारीत रहाणारा तो पपीहा आहे, असे तिच्याकडून कळते. कोकिळेसारखाच पपी हा देखील लपून-छपून वावरतो.

या उलट रोज सकाळ-दुपार-संध्याकाळ पोपटांचे हिरवेगार थवे चीत्कार करीत सूर मारल्यासारखे झाडांच्या शेंड्यांवर उतरतात, आणि उडून जातात. आंब्याच्या पानांच्या काळपट हिरव्या गर्दीत अधून अधून एकादा पिवळा धम्मक सूर्यपक्षी दिसतो. आणि नशीब फारच बलवत्तर असेल तर एकाद्या दुपारी काळा-पांढरा पॅरेडाईज् फ्लायकॅचर चुटपुटते दर्शन देतो.

माझा नवरा सांगतो आहे की त्यांचा कॅप राजस्थानमधे असताना तंबूमधे मोर फिरत फिरत यायचे. त्यांची गळलेली पिसे गोळा करून लोकांनी त्यांचे पंखे, मोरचेल वगैरे बनवून घेतले होते.

आमच्या कॅपपासून जवळच एक ओसाड पडलेला बगीचा आहे. त्याला साधुगाछी म्हणतात. त्या ओसाड गाछीत एक ओसाडच मठी आहे. त्या साधूच्या नावाचीच असावी बहुतेक. चैत्र पौर्णिमेच्या रात्री फिरत फिरत आम्ही दोघे त्या गाछीकडे

जातो. राईपासून गाछीकडे जातांना वाटेत रान आहे. लहान–मोठ्या झाडाझुडुपांच्या तळाशी गवत वाढले–पसरले आहे. गुराख्यांच्या आणि काटक्या वेचणाऱ्यांच्या येण्याजाण्याने मळलेल्या वाटा त्या गवतामधून कुठूनतरी कुठेतरी जात असतात. आज त्या वाटांवरोवर आम्हीही जायला निघालो आहो. टिपूर चांदणे वाऱ्याच्या मंद लहरींबरोबर अंगाला हलकेच स्पर्श करते आहे. चंदेरी प्रकाशामधे झाडे अगदी स्तब्ध उभी आहेत उमलत असलेल्या फुलांचा सुगंध लांबून कुठूनतरी येतो आहे.

हा आवाज कसला झाला ? पक्षी झोपेमधे बोलतात का ? कसले कसले भास होताहेत. आपण लक्ष देऊन ऐकले तर, या वातावरणात विहरणाऱ्या अर्थलहरी आपल्याला समजायला लागतील, असे वाटायला लागते. हे सगळे खरेच चालले आहे का ? हळूहळू काही कळेनासे होते. कुठेतरी म्हणून जायला निघालेले आम्ही वाटेतच हरवून जातो. तिथून परतेपर्यंत कॅंपमधे सामसूम झालेली असते.

पौर्णिमेनंतर चांदणे हळूहळू ओसरत जाते, आणि आमच्या साधुगाछीकडल्या फेऱ्यादेखील कमी कमी होत जातात. अमावस्येच्या रात्री तंबू समोरच्या अंगणामधे चारपाई टाकून माझा नवरा तिथे पहुडलेला असतो. पाठीमागचे आवरून मीही तिथे येते. चमचमणाऱ्या लहान–मोठ्या तारकापुंजांनी खच्चून भरलेले ते काळे मखमली आकाश पहाता पहाता विचार पार मागे जातात. डोळे अरुंधतीला शोधायला लागतात.

कॅंपमधली सकाळ तशी गडबडीची असते. इथे पूर्वेकडे आधीच उजाडते लौकर. कामावर जाणाऱ्या मंडळींना उन्हे वर येण्याआधी निघायचे असते. त्यांना वेळेवर उठवायला म्हणून कामाच्या गाड्यांचे कर्णे भल्या पहाटेपासूनच वाजायला लागतात. मजूर लोकांची जा–ये सुरू होते. एक-मेकांना हाका मारल्या जातात. दिवसभर करायच्या कामाचे आराखडे पुन्हा तपासले जातात. सामानाची जमवाजमव होते. गाड्यांची दुरुस्ती तपासली जाते. सूर्य वर येता येता नाश्ता केलेल्या मंडळींना घेऊन गाड्या कॅंपबाहेर पडतात. त्यांचो धूळ खाली बसेतो पाणीवाले पाणी भरून जातात. मग बायका आपापली स्नानं–प्रसाधने आटोपून एकमेकींकडे गप्पा मारायला जातात. रूटीन स्वैपाक नोकरांवर सोपवलेला असतो. नवे पदार्थ एकमेकींकडून शिकले जातात. स्वेटरच्या विणीची देवाण–घेवाण होते. एकमेकींच्या प्रांतातल्या चालीरीतींची चर्चा होते. आपापल्या नवऱ्यांच्या आवडी–निवडी कौतुकाने सांगितल्या जातात. सासू आणि नणंदा यांच्या कागाळ्या देखील तेवढ्याच चवीचवीने केल्या जातात. एकूण वेळ कसा भुर्रकन उडून जातो !

दुपारी बारा वाजता जेवणाचे डबे घेऊन एक जीप कामाच्या ठिकाणी जाते. मग कामाला गेलेली माणसे परतेपर्यंत आराम असतो. ५–५॥ वाजता पुन्हा एकदम गडबड उडते. परतणाऱ्या गाड्यांचे कर्णे, त्यांच्या येण्यामुळे उडालेली धूळ, सामान काढणाऱ्या–नेणाऱ्या मजूरांचे ओरडणे, धुळीने माखून आलेल्या साहेब लोकांनी नोकरांच्या नावाने मारलेल्या हाका, त्या साऱ्यांचा एकच गलका होतो.

कॅंपमधे रोज सगळ्यांचा संध्याकाळचा चहा तंबूच्या बाहेर झाडाखाली खुर्च्या–टेबले मांडून तिथे घेतला जातो. चहाबरोबरच्या खाद्यपदार्थांची देवाण घेवाण चाललेली असते. रोजचीच गार्डन पार्टी असते. चहा झाल्यानंतरचा आमचा दोघांचा संध्याकाळचा फेरफटका कधी गावाच्या दिशेने, तर कधी गावाबाहेर होतो.

गावाबाहेर जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला दोन्ही बाजूंनी शेते डोलत असतात. वरचे निळे आभाळ कुठे कुठे तांबूस झालेले असते. शेतातून सळ-सळणाऱ्या वाऱ्याव्यतिरिक्त इतर कसलाही आवाज नसतो. अगदी पक्ष्यांचादेखील. रस्त्याने चालता चालता हळूहळू आमचेही बोलणे कमी कमी होऊन बंद होऊन जाते.

गावात जायला निघाले, तर कधी कधी वाटेत रिक्षा मिळते. तिच्यात बसूनच बाजारपेठेमधून फेरफटका मारला जातो. प्रत्येक वेळी रिक्षात बसल्यावर "त्या" पहिल्या प्रवासाची आठवण ताजी होते ! बाजारात चांगलीच गर्दी असते– मालाची आणि माणसांची. चौकातल्या दवा खोर

अनुक्रमणिका

दारूच्या दुकानांत विलायती दारूच्या बाटल्या वरपासून खालपर्यंत रांगेने भरलेल्या असतात. मी प्रोहिबिशनच्या प्रांतातून आलेली असल्यामुळे त्या दारूच्या बाटल्या आहेत, हेही मला प्रथम कळत नाही ! आणि कळल्यानंतर देखील, " ड्राय " जीन म्हणून लेबल लावलेल्या बाटलीत ते पाण्यासारखं काय दिसतंय् असले मूलभूत प्रश्न मी नवऱ्याला विचारीत राहते ! त्याचे उत्तर त्याला कसे माहित झाले, याच्याबद्दलची काही शंकाकुशंका देखील माझ्या मनात डोकावत नाही ! कारण या लहानशा गावात इतकी सगळी दारू कोण पीत असेल, हा दुसरा एक मूलभूत प्रश्न मला तेव्हा सतावीत असतो !

चौकातून गावातली रसिया मंडळी टोळकी करून हिंडत असतात. तोंडात पानाची गिलोरी घोळवत, मलमलीच्या पांढऱ्या शुभ्र कुर्त्याच्या चुण्या केलेल्या अस्तन्या मागे सारीत, आणि मनगटाला गुंडाळलेल्या मोगऱ्यांच्या गजऱ्याचा वास घेत नजरेचे अंदाज आजमावीत असतात.

वसंतऋतूतली संध्याकाळ आपल्या पूर्ण वैभवाने आणि प्रसन्नतेने फुललेली असते.

चौकातल्या एका सरबताच्या दुकानासमोर रिक्षा थांबवून दोन मोठे ग्लास भरून ताजे, थंडगार लिंबाचे सरबत प्यायचे, हा देखील आमच्या अशा संध्याकाळच्या कार्यक्रमातला एक आवडीचा भाग असतो. रिक्षा थांबलेली बघून मोगऱ्याचे हार विकणारी मुले तिथे येतात. त्यांच्याकडून घेतलेला गजरा माझ्या नवऱ्याने मनगटावर बांधायच्या ऐवजी, मी केसात माळते आहे, हे पाहून त्यांना फारच अचंबा वाटतो. ती एकमेकांच्या कानाशी लागून कुजबुजतात. मी या रिक्षात बसलेल्या "मालकाची" कोण असेन, याचा अंदाज त्या कुजबुजीत असावा बहुधा ! कारण बायकोबरोबर फिरायला जाणारे रसिये या भागात दिसतच नाहीत !

अशाच गमतीजमतीत एक दिवस कॅंपशिफ्टची वेळ येते. जवळपासच्या भागामधले काम करून संपलेले असते. तेव्हा आता दिघीहून बिऱ्हाड-बाजले उचलायचे, आणि आगेकूच करायची. पुढचा मुक्काम लालगंजला.

काही लोकांनी आधी जाऊन तिथे कॅंपसाठी जागा पाहून ठेवली आहे. तंबूच्या कोन्या कोपऱ्यां-मधून ठेवलेले लहान मोठे सामान काढून ट्रंकांमधे, पेट्यांमधे, बॅगांमधे भरले जाते. चारपाईची नवार गुंडाळली जाते. टेबले, खुर्च्या घड्या होऊन पडतात. सतरंज्या उचलल्या जातात. सगळे सामान जीपच्या ट्रेलरमधे भरले जाते. तंबूचे खुंट उखडले जातात. दोऱ्या सैल होऊन तंबू खाली पडतो. त्याचे गाठोडे वळून तेही ट्रेलरमधे सामानावर ठेवले जाते. अमराई ओकीबोकी दिसायला लागते. तंबूंच्या खालच्या वापरून चोपल्या गेलेल्या जमिनी, तंबूंच्या सीमेभोवती खणलेले चर, फुटलेल्या कप-बशा-ग्लासांचे तुकडे, जुन्या वर्तमानपत्रांचे कागद असले काही बाही मागे उरते. मोहोर ढाळणारी आंब्याची झाडे उदासवाणी दिसायला लागतात.

सामान भरून होते. जीपचा हॉर्न वाजतो. निघायला हवे. पण पावले जड झाली आहेत. माझ्या नव्या आयुष्यातले एक गुपित या आम-राईत, तिच्या शेजारच्या रानात, तिच्या पली-कडच्या गाछीत लपले आहे. त्याचे काय करू ? मी क्षणभर घुटमळते. मग मधुबिंदूंनी भारावलेल्या त्या राईत माझे गुपीत मी हलकेच सोडून देते, आणि जीपमधे जाऊन बसते.

निलीमा भावे
प्रभात कॉलनी,
बी/७ ओ. एन. जी. सी. फ्लॅटस्,
सांताक्रूझ (पूर्व) मुंबई ४०००५५

△ △ △

प्रा. न. र. फाटक

ज्ञानसाधनेचा एक अखंड प्रवाह

ज. बा. कुळकर्णी

(प्रा. न. र. फाटक म्हणजे प्रचंड ज्ञान-वटवृक्ष. अनेकांनी या वृक्षाखाली सावलीसाठी आश्रय घेऊन आपली ज्ञानसाधना पुरी केली. त्यांच्या काही आठवणी.)

*   *   *

मृत्यूपूर्वी अवघ्या दहा दिवस अगोदर प्रा. न. र. फाटकांनी मुंबईच्या इतिहासाचे शेवटचे प्रकरण

अनुक्रमणिका

हातावेगळे केले आणि लेखणी खाली ठेवली ती कायमची. फेब्रुवारी, १९६८ मध्ये त्यांच्या एका डोळ्यात मोतीबिंदू झाला म्हणून ऑपरेशन झाले होते. ते यशस्वीही झाले होते. परंतु दुसऱ्यावर करण्याइतकी प्रकृती ठीक अशी नव्हती; त्यामुळे एका डोळ्यावर अखेरपर्यंत पुढील कार्य उरकावे लागले. याचा ताण त्यांच्या एकंदर शरीरप्रकृतीवर उत्तरोत्तर होत गेला. पुढे शरीरातील ताकद क्षीण होत गेली. तथापि, त्याही परिस्थितीत आमच्या-सारख्या त्यांच्या घरी जाणाऱ्या निकटवर्तीयांशी गप्पागोष्टी, चर्चा चालू असायची. त्याचबरोबर त्यांची लेखणीही चालायची.

ज्ञानाचा उपासक

"मुंबईच्या इतिहासाबरोबर" महात्मा गांधी चरित्राची टिप्पणे काढणे चालू होते. यासाठी अनेक इंग्रजी, गुजराथी पुस्तकांची गर्दी त्यांच्या टेबलावर झाली होती. फाटकांना रानडे ते गांधी या राष्ट्र-वादी पुरुषांच्या मालिकेतील म. गांधींचे मराठीत एक अद्यावत चरित्र लिहायचे होते. न्या. रानडे, गोखले व लोकमान्य टिळक ही चरित्रे लिहून झाली होती. महात्मा गांधींचे चरित्र लिहायचे बाकी राहिले होते. इतर व्यापामुळे हे चरित्र त्यांनी उशीरा हाती घेतले हे खरे. याचबरोबर राम-दासांच्या दासबोधावर त्यांचे विचारमंथन चालू होते. दासबोधाला त्यांना एक प्रदीर्घ प्रस्तावना जोडावयाची होती. "शिवकाल" खंड व "तुका-रामाची अभंग गाथा" ही पुस्तके त्यांच्याकडे बराच काळ पडून होती. शिवकालाचे काम साहित्य संस्कृती मंडळाने त्यांच्यावर सोपविले होते. त्यांनी एक–दोन प्रकरणे लिहून काढली होती. मी ती पाहिली होती. सर्व काही डोक्यात होते. परंतु एवढे खरे की ते कागदावर उतरले नाही. "तुकारामाच्या अभंग गाथेची" हीच स्थिती. मुख्यमंत्री कन्नमवार यांनी घरी बोलावून हे काम त्यांच्याकडे सोपविले होते. यासंबंधी नामवंतांशी अटीतटीचे वादविवादही झाले होते. संत तुकारामाशी निगडीत असलेल्या सर्व ज्ञात फडात जाऊन त्यांनी अभंगांची कसोशीने छाननी केली होती. सुमारे पंचवीस वर्षे खपून त्यांनी हा उपक्रम केला. एक ट्रक भरून संशोधित कागदपत्रे गोळा केली होती. तुकारामाचे मूळ अभंग कोणते व पुढे घुसडवून दिलेले प्रक्षिप्त अभंग कोणते याचे विवेचन करायचे होते. सर्व प्राथमिक काम पूर्ण झाले होते आणि कामाला सुरवात केव्हा तरी होणार होती. अशी ही उरलेली कामेही उत्तरार्धात पूर्ण करायच्या ते प्रयत्नात होते. परंतु ही अपुरी कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. तथापि, आयुष्याच्या अखेरपर्यंत चाललेली ही ज्ञानसाधना पाहिली म्हणजे कोणीही थक्क होईल यात शंका नाही.

योगायोग

अभ्यासपूर्ण लिखाणामुळे फाटकांचे मराठी साहित्यक्षेत्रातील स्थान निश्चित झाले होते. यामुळे १९४७ साली हैद्राबाद येथे होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाचे त्यांना अध्यक्ष म्हणून निवड-ण्यात आले. परंतु काही अपरिहार्य अडचणींमुळे फाटकांनी याला नकार दिला. तथापि, हैद्राबाद-करांना हे पटले नाही. शिष्टमंडळ एके दिवशी सकाळी येऊन फाटकांच्या घरी थडकले. मंडळींनी फाटकांशी चर्चा करून फेरविचार करण्याचा आग्रह धरला. फाटकांनी याला संमती दर्शविली. परंतु निर्णय देण्यापूर्वी त्यांनी साहित्य संघात डॉ. भालेराव यांना भेटावे व मग संध्याकाळी ४.३०–५.०० वाजता आपल्याला भेटण्याची सूचना केली. मंडळींनी ती मान्य केली. डॉ. भालेरावांना भेटून मंडळी सायंकाळी फाटकांना भेटली. फाटकांनी होकार दिला आणि ते अध्यक्ष म्हणून जाहीर झाले.

१९३१ साली हैद्राबाद येथे ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या साहित्य संमेलनाचे ते कार्यवाह होते आणि १९४७ साली हैद्राबाद येथेच होणाऱ्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष म्हणून निवडले होते, हा योगायोग म्हणायला पाहिजे.

भारतीय राष्ट्रवादाचा विकास

प्रा. न. र. फाटक हे सन १९२३ पासून १९४७ पर्यंत कट्टर खादीवादी होते. महात्मा गांधींच्या खादीवाल्यांच्या खास यादीत त्यांचे नाव कित्येक वर्ष अंतर्भूत होते. सन १९२३ ते ३५ सालापर्यंत ते नवाकाळच्या संपादक मंडळात असल्यामुळे त्यांचा भारतीय राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास झाला होता.

याचा परिपाक म्हणजे त्यांनी लिहिलेले "भारतीय राष्ट्रवादाचा विकास" हे पुस्तक होय. मराठीत हे पुस्तक या विषयावरील आधारग्रंथ म्हणून मानले जाते. श्री. गोपीनाथराव तळवलकर यांच्या "साधना" पुस्तकाचा परामर्श घेणारे काही लेख फाटकांनी लिहिले होते–ते लेख व काही इतर माहितीची भर घालून हे पुस्तक लिहिले आहे.

आचार्य जावडेकरांच्या सतत तगाद्यामुळे फाटकांनी हे पुस्तक राष्ट्रीय सुलभ ग्रंथमालेसाठी लिहिले हे ह्या ग्रंथाचे खास वैशिष्टच.

स्वातंत्र्य चळवळीचा एक पाईक

फाटकांनी स्वातंत्र्य चळवळीत तुरुंगवास असा भोगला नाही. परंतु त्या चळवळीच्या संदर्भात इतरांना सर्वतोपरी मदत केली. इतरांबरोबर तुरुंगात जाण्याची त्यांनी तयारी केली होती. परंतु काकासाहेब खाडिलकरांनी त्यांना परावृत्त केले. ते म्हणाले, "सर्वांनीच तुरुंगात जाण्याची जरूरी नाही. काहींनी बाहेर राहून काम केले पाहिजे." यामुळे तुरुंगात जाण्याचा विचार सोडला.

परंतु असे असूनही फाटकांनी कार्यकर्त्यांना निर्वेध आश्रय दिला. ४२ ची चळवळ चालू होती. एके दिवशी सायंकाळी सुमारे ७०० वाजता कर्नाटकाचे ख्यातनाम कॉंग्रेस पुढारी श्री. रंगराव दिवाकर, श्री. पंत व एक अनोळखी गृहस्थ हे फाटकांच्या घरी येऊन थडकले. फाटकांनी त्यांना घरी ठेवून घेतले. पहाटे ४ च्या सुमारास ही मंडळी ठरविलेल्या एका मोटारीतून अज्ञातस्थळी रवाना झाली. सकाळी पोलिस गाडी आली. चौकशी केली. फाटकांनी ते लोक येऊन गेल्याचे सांगितले. परंतु वॉरंट निघाल्याचे माहित नसल्यामुळे आपण पोलिसांना कळवू शकलो नाही; आता ते परत आल्यास पोलिसांना जरूर कळवीन असा जबाब दिला. पोलिस अधिकाऱ्याचे समाधान झाले आणि फाटक विवंचनेतून मुक्त झाले.

संगीताचार्य फाटक

रशियाच्या दौऱ्यात उझबेगिस्तानला भेट देण्याची संधी मिळाली. यावेळी त्यांच्याबरोबरच्या शिष्टमंडळात पंडित ओंकारनाथ ठाकूर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गायक होते. शिष्टमंडळाचा सत्कार करण्यात येऊन त्यांना रशियन संगीत ऐकविण्यात आले. ते ऐकून पं. ओंकारनाथ फाटकांना म्हणाले, या रशियन संगीताची धून ऐकताना त्या मालकंसाकडे अधिक जवळच्या आहेत असे वाटते. फाटकांनी होकार दिला.

ही दोघात कुजबूज चालू असताना स्थानिक रशियन मंडळींनी पं. ओंकारनाथ ठाकूरांना गाणे म्हणण्याचा आग्रह धरला. यावेळेस पंडितांच्याकडे तंबोरा होता. परंतु साथीदार नव्हता. अडचण उद्भवली.

पंडित ओंकारनाथ ठाकूर फाटकांना म्हणाले, "फाटक, आपण दोघे एका गुरूचे चेले...तेव्हा तुम्ही तंबोरा हाती घ्या आणि अब्रू वाचवा"... ही गोष्ट खरी होती की, फाटक संगीताच्या ज्ञानसाधनेपुरते पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे पहिले शिष्य होते आणि पं. ओंकारनाथ हे नंतरचे होते. फाटकांनी ३५–४० वर्षांत तंबोरा हाती घेतला नव्हता. परंतु परिस्थिती पाहून फाटकांनी तंबोरा हातात घेतला आणि उत्तम साथ देऊन गाण्याचा कार्यक्रम पार पाडला. याबद्दल खुद्द पं. ओंकारनाथ ठाकूरांनी फाटकांचे मनःपूर्वक आभार मानले.

ज्ञानी माणूस

या उझबेगिस्तानच्या दौऱ्यात फाटकांनी एका वस्तुसंग्रहालयाला भेट दिली. वस्तुसंग्रहालय भव्य-दिव्य होतेच, परंतु त्यात उत्तमोत्तम गोष्टींचा संग्रह होता. संचालकांनी सांगितले की, भारतातील मोगलकालीन नाणी, तवारीखा इत्यादी येथे आहे. फार काय मूळ अकबरनामा त्यांच्या संग्रही आहे.

यावेळी एक विद्यार्थिनी "अकबरनाम्यावर" प्रबंध लिहीत होती. फाटकांची पूर्व माहिती दिली असल्यामुळे तिने फाटकांना काही शंका विचारण्याची इच्छा व्यक्त केली. फाटकांनी त्या विद्यार्थिनीच्या सर्व शंकांचे निरसन केले. ही चर्चा सुमारे दोन तास चालली होती. संचालक फाटकांच्या अचाट बुद्धिमत्तेबद्दल आश्चर्यचकित झाले, तर ती विद्यार्थिनी समाधान पावून परतली.

ज्ञानाची कमतरता

सुशिक्षितांनी सतत ज्ञानसाधना न करता, आहे त्या तयार माहितीवर गुजराण करण्याच्या प्रवृत्तीबद्दल फाटकांना राग येई. याबद्दल ते वेळोवेळी संतापही व्यक्त करीत. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रा-

अनुक्रमणिका

तील एक विद्वान गृहस्थ त्यांच्याकडे आले आणि त्यांनी आपल्या पुस्तकासाठी काही आधारभूत ग्रंथांची नावे सुचविण्याची विनंती केली. फाटकांनी त्यांना टाऊन् हॉलमधील एशियाटिक ग्रंथालयात नेऊन काही पुस्तकांच्या नावाच्या याद्या दाखविल्या. पुस्तकेही दाखविली.

कालांतराने त्या विद्वानाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. फाटकांनी ते पुस्तक पाहिले. त्यात फाटकांनी दाखविले तेवढयाच पुस्तकांच्या नावाची यादी अंतर्भूत होती. एकही पुस्तकाची अधिक भर नव्हती. फाटकांनी याबद्दल असमाधान व्यक्त केले. असे होते फाटक.

ज. बा. कुळकर्णी
१५, हरिहर निवास,
रामनगर, डोंबिवली, (पूर्व)
मुंबई, ४२१२०१

△ △

युगवाणी

वि. सा. संघ सभासद व वर्गणीदारांसाठी

विदर्भ साहित्य संघाचा वाढता व्याप, कागद, छपाई आणि अन्य मुद्रण-खर्चात झालेली वाढ व साहित्य संघाचे मर्यादित उत्पन्न यांचा ताळमेळ घालण्यासाठी येत्या जानेवारी महिन्यापासून 'युगवाणी'चे प्रकाशन जोड अंकाच्या स्वरूपात तीन महिन्यातून एकदा करण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. विदर्भ साहित्य संघाचे सभासद आणि वर्गणीदार यांनी या बदलाची नोंद घ्यावी ही विनंती.

—संपादक

अनुक्रमणिका

गुहांचे प्रश्न

यशवंत पाठक

लहानपणापासूनच मला गुहांचे आकर्षण वाटे. झोपल्या झोपल्या भाऊ मला गुहेत तपस्या करणाऱ्या ध्रुवाची, प्रल्हादाची, नचिकेत्याची, ज्ञानदेवाची, निवृत्तीनाथाची गोष्ट सांगत. त्यातल्या कथांमधून हिंस्र प्राणी आपल्या रस्त्यावर फिरणाऱ्या निरुद्योगी माणसांसारखे भटकत. मला त्यांच्या गुरगुरण्याची किंवा डरकाळ्या फोडण्याची

अनुक्रमणिका

अजिबात भीती वाटत नसे. छोट्या खाटल्यावर लिंबोळीच्या झाडांच्या मच्छरदाणीत मी एकटा शालीत पडलेला असे. भाऊ दुसऱ्या मोठ्या खाटेवर झोपत. माझ्या शेजारी वशामामा गुडघ्यांच्या वाटीवर दुसरा पाय डबल बारच्या दांड्यासारखा टाकून झोपे वशामामा आणि भाऊ या दोघांच्या मधे मी झोपी. एकदम झोप लागत नसे. मग मी भाऊंना गोष्ट सांगायचा आग्रह धरी. भाऊ गोष्ट सांगायला सुरुवात करीत.

"एक होता ध्रुवबाळा. असाच तुझ्यासारखा छोटासासा होता. घरात तो सगळ्यांचं ऐकत होता. आई–बाबा सांगेल ती कामे तो करी. तो कधीही रागावला नाही–"

"अजिब्बात–रागावला नाही तो? खरं–खररं–कधीच रागावला नाही?" मी.

"अरे ऽऽ खरंच ऽ ऽ खरंच. कधीही तो रागावला नाही. पण एक दिवस त्याच्या दुसऱ्या आईने ऽ ऽ त्याला त्याच्या बाबांच्या मांडीवरून ढकलले–"

"दुसरी आई ?– म्हंजे आपल्या मोठीआईसारखी–" मी शाल फेकीत म्हणालो.

"च् च्–म्हंजे तुझी आई तशी–" भाऊ समजावणीच्या स्वरात म्हणाले.

"मग तुझी दुसरी आई कसं म्हणालात?" मी उजव्या कुशीवर वळून म्हणालो.

"अरे ऽ ऽ म्हंजे ऽ ऽ तीच ती आई ऽऽ-तीच–' भाऊंची बोलता बोलता पंचाईत झाली. त्यांना माझ्या बोलण्याचे नीट स्पष्टीकरण देता येईना हे मला नंतर खुप दिवसांनी कळले. हे मलाही कितपत कळले यावद्दलची शंका रोजच्या दिवसागत ताजीतवानी आहे.

"हं ऽ ऽ–मग पुढं काय झालं भाऊ ऽ ऽ—" मी मानेखाली डावा हात घेऊन म्हणालो.

"ध्रुवबाळाला फार वाईट वाटलं. तो लागला रडायला. त्याच्या बाबांनी त्याला जवळ घेतलं, पण त्याचं रडणं काही थांबेना. अखेर त्याच्या बाबांनी त्याला सोडलं. तो आपल्या आईकडे गेला. आईला म्हणाला,

"अं अं अं अं ऽ ऽ आई ग ऽ ऽ मला ऽ ऽ त्याऽऽ अं अं आई नं ऽ ऽ बाबांच्या मांडीवरून ढकलून दिलं. अं अं अं ऽ ऽ–"

आईनं त्याचे डोळे पुसले. म्हणाली ऽ ऽ–

"बाळा ऽ ऽ जाऊ दे. रडू नकोस. तू आपल्या देवाला सांग बरं ऽ ऽ–मग तो तुला मोठ्ठ मोठ्ठ राज्य देईल. छान छान खाऊ देईल."

ध्रुवबाळ म्हणाला, "आई ऽ ऽ तो देव कुठं असतो ग ऽ ऽ–"

आई म्हणाली, "दूर– लांब– लां... ब... जंगलातल्या गुहेत. तिथं वाघ, सिंह, कोल्हे, अस्वल, हत्ती राहातात. तिथं देव असतो."

ध्रुवबाळ म्हणाला," मग तो मला दिसेल का ग आई ऽ ऽ."

"हो ऽ ऽ तू सारखं देवाचं नाव घे. मग तो तुला भेटेल."

"मग इथं तुझ्याजवळ बसून देवाचं नाव घेतलं तर चालेल–" ध्रुवबाळ म्हणाला. आई म्हणाली, 'अहं. आईजवळ नाही घ्यायचं देवाचं नाव. नाही तर देवाकडे लक्ष जाणार नाही. आईकडेच लक्ष जाईल. यासाठी लांब–जंगलात जायचं."

ध्रुवबाळ गेला. लांब–जंगलात. तिथं खूप खूप सिंह–वाघ–हत्ती होते. तिथून ध्रुवबाळा पुढे गेला. तो त्याला एक गुहा लागली नि तो त्या अंधारगुहेत शिरला..."

मी पालथा पडलो. शाल अंगाभोवती घट्ट लपेटली. जिवाचे कान करून ऐकू लागलो. भाऊ अगदी सहज वाहत्या पाण्यासारखे ध्रुवबाळाची गोष्ट सांगत होते. पण मला काही चैन पडेना. ध्रुवबाळ गुहेत शिरला. गुहा या शब्दानेच मला धस्स झाले! इतका छोटासा ध्रुव. तो एकटा गुहेपर्यंत गेला. त्याला भीती वाटेली नसेल ? तो थोडा तरी घाबरला असेल, रडला असेल. त्याचा आवाज आईला कसा ऐकू जाईल. भाऊंना तरी काय माहीत तो रडला की नाही. पण तरीही तो गुहेत शिरला; हे भाऊंना कसे काय समजले ? तोकोणत्या रस्त्याने जाणार होता हे त्याने आईला सांगितले का ? आई त्याच्या पाठोपाठ धावली नाही ? आईला त्याच्याशिवाय करमले ? आई त्याला जाताना रागावली कशी नाही ? बाबांनी थोड्या वेळाने त्याला घेतलेही नाही ? त्याला कसे काय सोडले ? त्याला कुणी मित्र नव्हता का ? त्याच्याबरोबर कसं कुणी गेलं नाही ? मग त्यानं कुणाचं बोट धरलं असेल ?

कुणाकुणाला जंगलात काय काय सांगितलं असेल? कुणाकुणाला तो दिसला? की कुणी कुणी त्याला पाहलं? तो तस्साच कसा काय राहिला?

पुढच्या गोष्टीकडे माझे लक्ष लागेना. मी चिमणीसारखे डोळे घट्ट मिटले. मोठा अंधार लिंबोणीच्या झाडावरून माझ्या अंगात शिरशिरला. झाडांच्या सावल्या चंद्राने डिवचल्या. त्या मला गुहा झाल्या. शालीवरच्या नक्षीसारख्या पसरलेल्या सावल्यांनी माझ्याभोवती गुहा गुंफली. माझे डोळे उघडायची छाती होईना. भाऊंना गुहा काय असतात हे विचारण्याची हिंमत होईना. डोळ्यातल्या अंधारलेल्या वर्तुळात गुहा दिसल्या. माझ्या मामाचं पत्र हरवलेल्या वर्तुळासारख्या सतत फेर धरून नाचल्या. त्यांच्यातल्या अंधारात खूप खूप बागुलबोवा दडले. ते बागुलबोवा आपल्या कानटोप्या हातात घेऊन तयार राहिले. ध्रुवबाळ कधी आत येतो नि आपण त्याच्यावर कधी कानटोपी घालून त्याला उचलतो! एकटा ध्रुवबाळ, नि इतके बागुलबोवा; तो या सगळ्यांना कसा काय पुरणार? त्या वर्तुळात मला ध्रुव दिसला नाही. अंधारातली वर्तुळे भराभरा पुढे आली. मीही ध्रुवाला शोधले. त्याच्यासाठी अर्धी शाल रिकामी सोडली. कुणी बागुलबोवा पकडण्याच्या आत आपण शालीत गुंडाळून घ्यावे. मग बघू या कोण त्याच्या अंगाला हात लावते. ध्रुव काही दिसेना. मी तरी किती वेळ डोळे बंद करणार? मी हळू डोळे किलकिलले. भाऊ घोरत पडले. मासा उताणा पडला.

मग मात्र मी काही ध्रुवासाठी अर्धी शाल ठेवली नाही. त्याची किती वाट पहाणार. तो दिसलाच नाही. अर्ध्या शालीत गुहा घुसायला लागल्या. त्या काय, एकदा घुसल्या की कायमच्या ठाण मांडून बसतात. त्या आपल्याला शालीसकट घेऊन जातात. पुन्हा भाऊ शोधत बसतील. गुहांचे आणि भाऊंचे भांडण कशाला. उगाच माझ्यामुळे भांडण व्हायचे. मी गुडघ्यातली वाटी पोटापाशी नेली. शाल गुरफटून घेतली. डोळे पुन्हा गच्च मिटले. पण झोप लागेना. झोप येईना. लिंबांच्या सावल्याही बऱ्याच्याशा वाटेना. किंचित्शी चुळबूळ केली. छोटयाशाशा उशीला जवळ घेतले. दोन तीनदा डोके आपटले. भराभरा वाऱ्याने उडणाऱ्या पानांसारख्या कुशी बदलल्या. कसेही झोपा. झोप येईना. वाऱ्याला तेवढ्यात जोराची उबळ आली. पानांनाही यावेळी पळापळी खेळण्याची हुक्की आली. त्यांनी मलाच भोज्ज्या केला. भोज्ज्या व्हायला फार त्रास होतो ना! कुणीही येतो नि आपल्याला पकडतो. पानांनाही शालीत शिरावेसे वाटले. काही माझ्या कानात सांगून शालीत शिरले. त्यांना जास्त थंडी वाजत असावी. कार्तिकातला शुक्ल पक्ष. तसा हिरवाच महिना ना. खळी हिरवीकंच. पिकांनी भरलेली. त्या खळ्यांच्या जवळच्या अंगणातच खाटा पडलेल्या. नि तिथंच राखण म्हणूनही झोपायचो. तसा मिल्या जागल्या होत्या. पण तो नावापुरताच जागल्या होत्या.

गुहा सारख्या दिसत होत्या. पण त्या कशा होत्या हे काही सांगता येत नव्हते.

मी चुळबुळ करायला नि मोठ्या आईने बघायला एक वेळ झाली. हातात कंदील धरलेली मोठीआई बघत बघत माझ्यापाशी आली नि म्हणाली,

"का रे राजा ऽऽ-झोप नाही येतय ना–"

मी झोपेचे सोंग केले. मोठ्या आईच्या हे लक्षात आले.

"चला ऽऽ– राजश्री ऽऽ तुम्हाला एकट्याला झोपायला अजून वेळ आहे. चला ऽऽ– चला ऽऽ."

"नाही– मी एकटा ऽऽ झोपणारेय–भाऊं-सारखा ऽऽ–" मी म्हणालो.

"अरे ऽऽ– तुला झोप नाही लागणार. चल. माझ्याजवळ चल. लवकर चल.", मोठी आई.

"चू ऽऽ माझी झोपमोड करू नको ग ऽऽ-" मी डोक्यावर शाल घेत म्हणालो.

यावर मोठी आई सायलीसारखी हसली. मी शालीच्या आत आतून हसलो.

"झोप मग." असं म्हणत मोठी आई कंदील घेऊन घरातल्या कट्ट्यापाशी गेली. मी बघत राहिलो. शाल बाजूला केली. मोठी आई खाटेवर झोपली. तिने आढयाला बारीक कंदील करून टांगला. कृष्णाच्या प्रतिमेकडे हात जोडले. शाल घेतली.

पडल्या पडल्या ती माझ्याकडे बघत होती. मधेच घोडी उंचावून पहात होती. ध्रुवबाळाला मोठी आई नव्हती का? ती तिच्या मागे मागे गेली नसेल का? पुन्हा गुहांमधले प्रश्न माझ्यासमोर

अनुक्रमणिका

नाचू लागले. गाऊ लागले. डोलू लागले. मी शाली-सकट उठलो. पळत पळत मोठ्या आईच्या खाटेवर धाडकन् पडलो.

मोठ्या आईने तिच्या शालीत मला माझ्या शालीसकट घेतले. ती हसतच राहिली. "आलाच किनईऽऽ माझा बाळकृष्ण शेवटीऽऽ." असे दोनदा म्हणाली.

मोठ्या आईच्या कुशीत शिरलो. तिने माझ्या डोक्यावरून हात फिरवला. काही क्षणात गुहाच पळाल्या. गुहेतला अंधार लिंबाच्या सावलीपाशी खेळायला गेला. वर्तुळे संपली. डोळ्यांपुढची अंधारगुहाही धूम पळाली. मी केव्हा झोपलो ते मलाच कळले नाही. चांगली झोप लागायला काहीही कळावे लागत नाही असे मोठी आई घरात नेहमी म्हणे.

मोठा होत गेलो, वाढत्या दिवसासारखा. थोडासासा वडाच्या सूरपारंब्यासारखा उंचही झालो अंगास किंचित् राकटपणाही आला. नदीच्या पात्रात डुंबू लागलो. खूप खूप वेळ पोहायलाही पळालो. नाव शाळेचे नि अंगण नदीचे. नाव शाळेचे नि डवे गाभुळलेल्या चिंचेचे. नाव मळ्यातले भोपळे आणण्याचे नि आवळ्याभोवती वळायचे. असे ते गर्द अंकुरलेले दिवस कसे रान-पक्ष्यांसारखे भुर्रर्रर् उडत होते. मग कळाले की कोणतीही चांगली गोष्ट फार कमी वयाची असते. तिच्या हव्याहव्यात एखादे जीवनसूत्र मंगळसूत्रा-सारखे आयुष्यभर जपायचे असते. तोच आपला देह बनवायचा असतो. पण या गोष्टींच्या गंधाला मात्र मरण नसते. तुम्ही त्या केव्हाही उगाळा. त्यांना उगाळलेल्या गंधांचा गंध असतो; मनातून उमलून येणाऱ्या अनुभवाच्या बीजासारखा. किती किती पोत या आठवणींनी पकडावे तेच समजत नाही ?

पाचवीत असताना आमच्या वर्गाची सहल नगरकरसरांनी त्र्यंबकेश्वरला नेली. गंगाद्वारला साडे सातशे पायऱ्या चढायला लागलो. पळत पळत पायऱ्या चढता येणे कठीण झाले. पायऱ्या जड होत्या. पायऱ्या चढावाच्या होत्या. काही पायऱ्या गुळगुळीत होत्या. पायऱ्या चढता चढता एक मुलगा हाऽऽहाऽऽ करीत जोरजोराने श्वास घेत बसला. तोच नगरकरसरांनी त्याच्या पाठी-वरून गऊशार हात फिरविला. सर त्याला म्हणाले,

"विन्याऽऽ-ती बघ. ती बघ. बारीक टिंबा-एवढं दिसलं का काही-तीच आपल्या गहिनीनाथांची गुहा. तिथं निवृत्तीनाथ अभ्यास करायचे. तिथं आपल्याला जायचंय. आता काय थोडं राहलं. अगदी थोडं. कित्ती कित्ती छान गुहा दिसते बघ." विन्याच्या शेजारीच मी बसलो. मला ध्रुवबाळाची गोष्ट आठवली नि धस्स झाले.

नगरकरसर आता आपल्या सर्वांना गुहेत नेणार. ध्रुवाची गुहा भयंकर होती. तिथे हिंस्र प्राणी होते. इथे मात्र माकडे फार होती. पावलो-पावली माकडे येत होती. पण माकडांना आमच्यापेक्षा शिस्त होती. माकडिणीने तिच्या पिलाला उजव्या पायाने वर खुणावयाचा अवकाश की ते पिल्लू रस्त्याच्या कडेला निमूटपणे बसे. पुढचे दोन पाय वर केले की ते पिल्लू आपल्या आईभोवती टाळ्या वाजवीत आनंदाने नाचे. त्याच्या बरोबर आईलाही नाचावे लागे. आम्ही फुटाणे घातले की माकडांच्या पिल्लाला पोटात घेऊन ती माकडीण आई इतक्या गोजिरवाण्या पावलांनी पळे की आम्हाला फार गंमत वाटे.

ज्या गुहा माकडांच्या सहवासात असतात त्या त्रास देणाऱ्या नसाव्यात असे मला उगीच वाटले. गंगाद्वारच्या छोट्या पायवाटेने गुहेचा मार्ग होता. ही पायवाट पाणिनीच्या सूत्रासारखी होती. दिसायली छोटी; पण न संपणारी. एका बाजूला प्रचंड, डोळे न पोहोचणारी दरी. दुसऱ्या बाजूला मान मोडणारा ब्रह्मगिरीचा ताठर कणा, ध्यानस्थ स्थितप्रज्ञ परमहंसासारखा. असा कडा चढून जाणारेही काही योगी आहेत हे कळताच मला उभारी आली. कणा किती उत्कटतेने शुचितेच्या अधिष्ठानावर जीवन जगतो हे त्या कण्याकडे बघून समजले.

गुहांकडे सावकाश जावे लागते. घिसाडघाई करून भागत नाही.

आम्ही एकमेकांना धरत धरत गहिनीनाथांच्या, गोरक्षनाथांच्या गुहांकडे जात होतो. श्रावण होता. ऊनपाऊस अंगावर झेलत झेलत जात होतो, जाता

जाता हसत होतो. एकाचा पाऊस दुसरा ओढत होता. आपल्या अंगातले ऊन शेजारच्या मुलावर फेकताना तो हसत होता. डोंगराला हिरवी सर्दी झाली. पाण्याचे प्रवाह धुतल्या तांदळासारखे दिसत होते. तरीही आम्ही पायवाटेशी खेळत होतो. कोणत्याही अवघड वाटा चढताना आपण खेळत खेळत चढलो की काहीही अवघड नसते.

गहिनीनाथांच्या गुहेपाशी आलो. तो पायऱ्यापाशी आम्हाला सरांनी थांबविले.

"थांबा. सगळे एका रांगेत उभे राहा. आपण सगळेजण गुहेत जाऊ शकणार नाही. थोड्या थोड्या जणांमिळून गुहेत जायचे. प्रत्येक वेळी मी येईन. मी बरोबर असल्याशिवाय कुणीही आत एकदम शिरायचे नाही. मी सांगेन तेव्हा आत जायचे."

आम्ही सगळ्यांनी ऐकले. तरीही गुहेच्या आत काय असेल याची फार फार उत्सुकता लागली. आम्ही डोके काढून, टाचा वर करून बघत होतो.

गुहेत गेलो. आत एक साधू पाटावर बसला. त्याच्या गळ्यात कवड्यांच्या माळा होत्या. जटा बांधलेल्या. लांबशार दाढी. डोळे तांबारलेले. कटोऱ्यात विभूती. काळ्या कपाळावर भस्माचे तीन पट्टे. दंडावर दोन कडी. कानात कवड्यांची कुंडले. मिशांमुळे त्याचे ओठही बंद झालेले. त्याच्या शेजारी गोरक्षनाथांची काळ्या पाषाणाची खरखरीत मूर्ती होती. तिच्या गळाभर कण्हेरीच्या फुलांच्या माळा होत्या. पायाशी बेलाची पाने पसरलेली होती. काही रानफुलेही होती. त्याच्या पुढे मोठा काळा पाट होता. त्या पाटावर काही नोटा पसरलेल्या होत्या. काही सुट्या पैशांची नाणीही होती. हा सगळा भाग बघितला नि गुहा मला गंगाकाठचे मंदिरच वाटले. या गुहेत आणखी एक गुहा होती. तिथे मात्र कडवा गारठा होता. पाणीही झिरपत होते. नि या जागेवर काहीही नव्हते. गुहेत सर घोगऱ्या आवाजात म्हणाले,

"मुलांनो ! इथे श्री निवृत्तीनाथ महाराज अभ्यास करीत. जप करीत. सगळ्यांनी नमस्कार करा."

आम्ही सर्वांनी नमस्कार केला. मी सरांना विचारले, "सर ! या छोट्याशा जागेत निवृत्तीनाथमहाराजांनी अभ्यासाचं दप्तर कसं काय ठेवलं असेल."

यावर सर इतके जोरात हसले की गुहाच खळखळून हसली. सर म्हणाले,

"अरेऽऽ ते पर्वताच्या खालच्या मंदिरातून वाचून ते लक्षात ठेवण्यासाठी इथे बसत. इथे त्यांना महादेव शिकवायला येत."

गुहा बघितली. गुहेची भीती गेली. पण गुहेत वर्षानुवर्षे राहणाऱ्यांविषयी कुतूहल वाढले. गुहा अतिशय स्वाभाविक होती. ती जन्मजात दणकट नि सहनशील होती. इथे माणूस कधीही आजारी पडणार नव्हता. तो अशक्त होणार नव्हता. गुहा निर्भय बनवीत होती. आत्मविश्वासाचे ब्रह्मगिरी निर्माण करीत होती.

गुहा बघण्याचा छंद जडला. वेरूळच्या गुहा बघितल्या. माहूरगडावरच्या गुहा बघितल्या. रामटेकच्या गुहा न्याहाळल्या. नाशिकजवळच्या पांडवलेण्यातही गुहा आहेत. तपोवनात गुहा आहेत. हृषिकेशला काही आहेत. दौलताबादेच्या किल्ल्याच्या पाठीशी काही उघड्या गुहा आहेत.

गुहांना आपल्या जीवनात केवढे स्थान आहे. गुहा सखोल असतात. चिंतनाला व साधनेला निवांत असतात. सगळ्याच गुहा सारख्या नसतात. त्यांच्यात कमीअधिकपणा असतो. काही सखोल एकांतातल्या असतात. काही बिनधास्त एकांताला आकांत करायला लावतात. काही लोकांतात उत्सव करणाऱ्या असतात. काही घडविण्यासाठी असतात; तर काही बिघडविण्यासाठी असतात. काही गुहा महंत विकत घेतात. आपली गरगरीत पोटे कायमची भरण्याची ही सेवानिवृत्तीवेतनयोजना असते. काही गुहा नसतात. गुहांचे मुखवटे घेऊन लोकांच्या श्रद्धांच्या खाचा करणाऱ्या असतात. काही आध्यात्मिक तळघरांना गुहाच संबोधतात. पण त्या तळघरांना वासनांची घरघर अखंड लागलेली असते. गुहा प्रदर्शनीय नाहीत; त्या दर्शनीय आहेत. गुहांना अखंड श्वास असतो ज्ञानाचा; नि उच्छ्वास असतो विशुद्ध कृतींचा. गुहांना माणुसकीचे उगमस्थान असते. यातच ईश्वरी शांतीचा मोठा साक्षात्कार असतो. गुहा टाळ्या घेणाऱ्या नि कृतिशून्य माणसाला समाजात

घडीत नाहीत. गुहा स्वयंभू असतात. स्वभावी असतात. अन्यूनअनतिरिक्त असतात.

ऋषिमुनींच्या ध्यानचिंतनाचे संदर्भ गुहांना आहेत. मानवी जीवनाची समग्र जाणीव सखोलपणे देणाऱ्या समर्थ रामदासांची रामघळगुहा, चाफळची गुहा; शिवथरघळ या आयुष्यात एकदा तरी बघाव्यात. जीवनाची स्वाभाविकता कशी सहज फुलासारखी उमलून दाखविते ती गुहा. आपल्याला भक्कम कणा देते ती गुहा. नवसृजनाची, नवनिर्मितीची बीजे रुजविते ती गुहा. अरण्यातल्या आनंदमयींचे विश्रामस्थान निर्माण करते ती गुहा.

गुहांना आता कोण .तपस्या देईल ? गुहांना अभ्यासाचा आनंद कोण देईल ? चिंतनाचा पाझर आज कुणात राहिलाय ? आत्मशोधाची धडपड कोण करणार ? प्रसिद्धीऐवजी सिद्धी हवी कुणाला ? आत्मभानाचा उत्सव गुहेत कोण करणार ? हे सगळे प्रश्न घेऊन गुहा उघड्या तोंडाने बसल्या आहेत. ही प्रश्नांची आवाहने आपल्यापर्यंत पोहचवायची गुहांची केव्हाही तयारी आहे. यासाठी त्या वाट बघताहेत. त्यांना आपली शून्य नावे नकोत; ज्ञानसाधनांचे महोत्सव सर्वांसाठी करायचे आहेत.

△ △

अनुक्रमणिका

३७ वे विदर्भ साहित्य संमेलन–घाटंजी जि. यवतमाळ

दिनांक २३, २४ व २५ नोव्हेंबर, ८५.

यवतमाळ जिल्ह्यातील वाघाडी या नदीच्या काठावर वसलेल्या घाटंजी या लहानश्या गावात उपरोक्त तारखांना हे संमेलन अतिशय उल्हसित वातावरणात पार पडले. तिन्ही दिवशी सर्व कार्यक्रमांना घाटंजीकर व पंचक्रोशीतील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संमेलनाचे अध्यक्ष होते सुप्रसिद्ध कवी व शैलीकार लेखक प्रा. मधुकर केचे.

पहिल्या दिवशी म्हणजे शनिवार दि. २३ नोव्हें. रोजी सकाळपासूनच साहित्यिक व रसिकांची या गावात व या निमित्ताने उभारलेल्या नृसिंहनगरांत वर्दळ सुरू होती. ठीक दुपारी ३ वाजता निरनिराळ्या धर्माचे ग्रंथ असलेली ग्रंथ–दिंडी निघाली. सोबत रेणुका मातेचीही पालखी होती. अभंग/भजने/टाळ–मृदुंग व लेझिम–संदल यांच्या गजरात निघालेली ही दिंडी शहरातील प्रमुख रस्त्यावरून फिरून संमेलनस्थळी सायंकाळी ५–३० वाजता पोचली. रस्त्यांत ठिकठिकाणी तोरणे, पताका लावून, सडा शिपून व रांगोळ्या काढून संपूर्ण दिंडी–मार्ग सजविलेला होता. विशेष म्हणजे गावातील मुस्लीम बांधवांनी सुद्धा उर्दू भाषेत लिहिलेल्या पताका लावून व दिंडीला सामोरे जाऊन अभिवादन केले.

संमेलनाचे अध्यक्ष प्रा. मधुकर केचे, वि. सा. संघाध्यक्ष राम शेवाळकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. सुरेश लोणकर व संमेलनाला आलेली साहित्यिक, रसिक मंडळी, तसेच स्थानिक शाखेचे व स्वागत समितीचे सदस्य या ग्रंथ–दिंडीत सहभागी झाले होते.

नृसिंहनगरात ही दिंडी आल्यावर संमेलनाच्या उद्‌घाटन सोहळ्याला सुरुवात झाली. नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू, थोर संशोधक व ज्ञानतपस्वी डॉ वि. भि. उपाख्य भाऊसाहेब कोलते यांनी दीप प्रज्वलित करून समेलनाचे रीतसर उद्‌घाटन केले. आपल्या उद्‌घाटनपर भाषणात, मराठी भाषेचा सन्मान राखण्याकरिता प्रत्येक मराठी भाषिकानी व मराठी भाषेविषयी प्रेम, आस्था बाळगणाऱ्या इतर भाषिकांनी सतर्क राहिले पाहिजे; असे कळकळीचे आवाहन भाऊसाहेब कोलते यांनी, गोव्यात सुरू असलेल्या घटनांच्या संदर्भात केले. प्रा. केचे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात दलित साहित्य/ग्रामीण साहित्य/वऱ्हाडी साहित्य अशा वेगवेगळ्या चुली न मांडता त्यांना वि. सा. संघाने आपल्यात सामावून घेऊन त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे असे प्रतिपादन केले. प्राचार्य राम शेवाळकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून वि. सा. संघाच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. मराठवाडा साहित्य परिषद व वि. सा. संघ यांच्या संयुक्त विद्यमाने माहूर येथे एक संयुक्त साहित्य संमेलन घेण्याचा प्रयत्न चालू आहे, असेही त्यांनी घोषित केले.

स्वागताध्यक्ष श्री. सुरेश लोणकर यांनी आपल्या भाषणात सर्व उपस्थितांचे स्वागत करून परिसराची माहिती करून दिली व थोड्या आडवळणावर असलेल्या या लहानश्या गावी आल्याबद्दल सर्व साहित्यिकांचे आभार मानले.

अनुक्रमणिका

प्रा. माईणकर यांनी माननीयांचे संदेश वाचून दाखविले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेश शं. बल्लाळ यांनी केले. रात्री "इथे ओशाळला मृत्यू" ह्या, जवळच असलेल्या येराबारा या गावच्या कलाकारांनी सादर केलेल्या, नाटकाचा सुरेख प्रयोग झाला.

परिसंवाद, कविसंमेलन

दुसरे दिवशी २४-११-८५ रविवारी सकाळी "वैदर्भीय संतांनी केलेली वाङ्मयीन व सामाजिक कामगिरी" या विषयावर एक परिसंवाद झाला. या परिसंवादाचे अध्यक्ष होते प्राचार्य डॉ. भाऊ मांडवकर. यात प्रा. श्रीकांत तिडके (गाडगे महाराज), बावा मोहोड (गुलाबराव महाराज), प्रा. त्र्यं. वा. खटी (नगाजी महाराज), प्रा. पुरुषोत्तम नागपुरे (महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी व गोविंद प्रभु), प्रा. बा. द. जोशी (उत्तम श्लोक), प्रा. देविदास सोटे (तुकडोजी महाराज) व प्रा. हरिश्चंद्र भेले यांनी आपले विचार मांडले.

प्रा. अशोक राणा यांनी स्वत: लिहिलेली व दिग्दर्शित केलेली दोन पथनाटये "भोपाळ" व "जागर" ही आपल्या सहकाऱ्यांच्या समवेत सादर केली.

परिसंवादानंतर सुप्रसिद्ध कथालेखक श्री. बाजीराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन झाले. यात सौ. उर्मिला निनावे, सतीश तराळ, सौ. संजीवनी देशमुख, वसंत निगवेकर, सौ. गरे व सौ. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथा सादर केल्या. यानंतर दुपारी ४ ते ६ पर्यंत नवोदितांचे कविसंमेलन प्रा. विठ्ठल वाघ यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. या कविसंमेलनाचे संचालन आर्णीचे श्री. कलीमखान यांनी केले. या नवोदितांसोबतच मान्यवर कवी श्री. शंकर बडे, शिवा राऊत, कलीमखान व स्वत: अध्यक्ष प्रा. विठ्ठल वाघ यांनीही आपल्या रचना सादर केल्या.

रात्री नियोजित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

संमेलनाच्या तिसरे दिवशी म्हणजे सोमवार दिनांक २५-११-८५ रोजी सुरुवात झाली ती "आजच्या वैदर्भीय साहित्यात विदर्भाचे यथार्थ व प्रामाणिक चित्रण आढळत नाही" या विषयावरील परिसंवादाने. अध्यक्ष होते प्रा. राम डोके. यात प्रा. गोविंद देशपांडे, सौ. देवस्थळे, सौ. विद्या कावडकर, श्री. दादा घाटोड यांनी आपले विचार मांडले. या परिसंवादानंतर सकाळी ११ वाजता निमंत्रित कवींचे कवि-संमेलन झाले. यात श्री. उ. रा. गिरी, विजय सरदार, सुरेश गांजरे, विठ्ठल वाघ, शंकर बडे, शिवा राऊत, नारायण कुळकर्णी कवठेकर, प्रा. अशोक थोरात, प्रा. राम शेवाळकर, श्रीपाद भालचंद्र जोशी, सुखदेव ढाणके, नीलकृष्ण देशपांडे, दिलीप अलोणे, सुभाष उसेवार, मिर्झा रफी अहमद बेग, गौतम सूत्रावे, भगवान ठग, कृष्णा लाडसे, नरेशचंद्र काठोळे इत्यादींनी आपल्या कविता सादर केल्या. या कविसंमेलनाचे अध्यक्ष होते बाबा मोहोड, तर संचालन केले होते प्रा. गोविंद देशपांडे यांनी.

ठराव

दुपारी झालेल्या खुल्या अधिवेशनात, दूर चित्रवाणीने या संमेलनाची दखल न घेतल्याबद्दल दूरदर्शनच्या निषेधाचा ठराव करण्यात आला.

दुसऱ्या एका ठरावाद्वारे, मराठी ही गोव्याची राजभाषा व्हावी, अशी मागणी करण्यात आली. समारोपाचे वेळीच पूर्वाध्यक्ष व जुन्या पिढीतील कवी पां. श्रा. गोरे, राम शेवाळकर, आनंदराव डंभारे, बाबुराव झाडकर, प्रा. गोरखेडे, चित्रकार अरुण मोरघडे, बळवंत घुसे व सौ. नेगे यांचा सत्कार करण्यात आला.

संमेलनाचे अध्यक्ष प्रा. मधुकर केचे यांनी संमेलनाचा समारोप करताना वाङ्मयाबरोबरच चित्रकला, लोककला, नकला यांनाही वि. सा. संघाने प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले.

खुल्या अधिवेशनाला सुरुवात होण्यापूर्वी अहेरी येथे झालेल्या संमेलनानंतर या संमेलनापर्यंत ज्या मान्यवर व साहित्यिक मंडळींचे दु:खद निधन झाले, त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्राचार्य राम शेवाळकर यांनी घाटंजीकरांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. माईणकर यांनी केले व त्यांनीच सर्व साहित्यिकांचे व मान्यवर उपस्थितांचे आभार मानले.

समारोपाचा कार्यक्रम संपल्याबरोबर पुसद येथील वि. सा. संघ शाखेने सादर केलेल्या "मूक" या पथनाटयाचा सुरेख प्रयोग झाला.

हे संमेलन यशस्वी होण्यास स्वागताध्यक्ष सुरेश लोणकर, वि. सा. संघ घाटंजी शाखेचे अध्यक्ष प्रा. सु. शं. बल्लाळ, सहचिटणीस प्रा. माईणकर, आबासाहेब तायडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच समर्थ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न केले.

या संमेलनाच्या निमित्ताने प्रा. गौरखेडे यांचे रांगोळी प्रदर्शन व माहिती अधिकारी श्री. बळवंत घुसे यांचे चित्रप्रदर्शन भरले होते.

योगेश ब्ऱ्हाणपुरे

वाडेगावचे अकोला जिल्हा साहित्य संमेलन

विदर्भ साहित्य संघाच्या वाडेगाव शाखेच्या वतीने दिनांक १४ व १५ डिसेंबर रोजी वाडेगावच्या श्रीजागेश्वर मंदीर परिसरात अकोला जिल्ह्याचे दुसरे जिल्हा साहित्य संमेलन सुप्रसिद्ध कवी प्रा. विठ्ठल वाघ यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. लोकवाङ्मयाचे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोड हे या संमेलनाचे उद्घाटक होते.

शनिवारी दुपारी ग्रंथदिंडीने सम्मेलन सुरू झाले व रविवारी दुपारी संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्याचा समारोप झाला.

'विदर्भातील पारंपारिक कला' या विषयावरील प्रा. श्रीकांत तिडके यांच्या अध्यक्षतेखाली झालेला सुविहित परिसंवाद, सुप्रसिद्ध कवी प्रा. नारायण कुळकर्णी कवठेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेले कविसंमेलन आणि श्री. गो. रा. वैराळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेले कथाकथन हे या संमेलनाचे वैशिष्टय होते. परिसंवादात सौ. इंदुमती लहाने (गोंधळ), संमेलनाध्यक्ष प्रा. विठ्ठल वाघ श्री. वाजीराव पाटील (तमाशा) व डॉ. मधुकर वाकोडे (दंढार) यांनी रंगत आणली. शनिवारी रात्री झालेल्या कविसंमेलनात अकोला जिल्ह्यातील जवळपास ३० कवींनी आपली हजेरी लावली. रात्री अडीच वाजेपर्यंत चाललेल्या कविसंमेलनाचे नारायणराव कुळकर्णी यांनी अतिशय खुमासदार रीतीने संचलन केले. प्रत्येक कवीला त्यांनी आवर्जून वाव दिला. प्रा विठ्ठल वाघ, श्री. उ. रा. गिरी, प्रा. श्रीकृष्ण राऊत, श्री. बाबुराव झटाले, देवीदास महाजन, सुभाष गढीकर, लक्ष्मीकांत देशपांडे, श्री. असनारे व अध्यक्ष नारायण कुळकर्णी कवठेकर यांच्या रचनांना श्रोत्यांकडून उत्स्फूर्त साद मिळाला. विठ्ठल वाघांच्या 'तिफण' या कवितेने कविसंमेलनाची रात्र अविस्मरणीय ठरली.

रविवारी सकाळी कथाकथन झाले. सर्वश्री वाजीराव पाटील, सुभाष गढीकर, सुषमा ओक, बाबाराव मुसळे यांच्या कथा चांगल्या वठल्या. नवोदितांनी कथनाऐवजी कथावाचन केल्याने या कार्यक्रमाला रात्रीच्या कविसंमेलनासारखी रंगत मात्र चढू शकली नाही.

शनिवारी दुपारी सुरुवात झाल्यापासून तो रविवारी दुपारी संमेलन संपेपर्यंत वाडेगावकरांनी त्याला मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. वाडेगावचे आबालवृद्ध नागरिक, शेतकरी, कष्टकरी वर्ग आणि गावचा विद्यार्थिनी व भगिनी वर्ग मोठ्या संख्येने या संमेलनात सहभागी झाला होता.

स्वागताध्यक्ष श्री. घाटोळ यांनी उद्घाटनप्रसंगी साहित्याच्या खालावत चाललेला दर्जा आणि समारोपप्रसंगी गावकऱ्यांच्या वतीने बोलताना, मराठी पुस्तकांच्या वाढत्या किंमती असे दोन महत्वाचे मुद्दे उपस्थित मान्यवरांसमोर मांडले.

संमेलनाध्यक्ष प्रा. विठ्ठल वाघ यांनी आर्थिक दृष्टचा खेडयांची जी धूप होत आहे, त्यावद्दल चिंता व्यक्त केली आणि जनसामान्यांचे प्रश्न घेऊन कलावंतांनी समोर आले पाहिजे, असे तळमळीचे आवाहन केले.

विदर्भातील लोककलांचा शास्त्रीय दृष्टचा अभ्यास होण्याची आणि तो समोर येण्याची आवश्यकता 'दंढार'च्या संदर्भात बोलतांना डॉ. मधुकर वाकोडे यांनी प्रतिपादन केली.

विदर्भातील लोककलांच्या अभ्यासाचे क्षेत्र अजूनही किती ओस आहे हे वाडेगावच्या जिल्हा साहित्य संमेलनातील परिसंवादातून दिसून आले. एका अर्थी या संमेलनाची ही महत्वाची उपलब्धीच झाली.

संमेलनाचे उद्घाटनाचे वेळी वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी आणि समारोपाचे वेळी अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांनी वि. सा. संघाच्या कार्याचा परिचय दिला.

संमेलन यशस्वी करण्यासाठी वाडेगावकर नागरिक, तेथील वेगवेगळ्या संघटना, अकोल्याहून आलेले श्री. विजय कौसल व प्रा. पंढरीनाथ मांडवगणे आणि वाडेगांवचे उत्साहमूर्ती श्री. तिरुख गुरुजी, वाडेगांव शाखेचे वक्टे गुरुजी, मानकर गुरुजी, सरप गुरुजी, श्री. राठोड, श्री. शेषराव मोपारी आणि अन्य सदस्यांचे परिश्रम कारणीभूत ठरले.

संमेलनाला धरून जागेश्वराच्या परिसरास श्री. सरप गुरुजी यांनी भरविलेले त्यांच्याकडील प्राचीन नाण्यांच्या संग्रहाचे प्रदर्शन हे या जिल्हा संमेलनाचे आगळे वैशिष्टय म्हणावे लागेल. श्री. सरप गुरुजींकडील नाणे–संग्रह महत्वाचा आहे.

वामन तेलंग

△ △

अनुक्रमणिका

केन्द्रीय कार्यवृत्त : विदर्भ साहित्य संघ

दि. २२ ऑक्टोबर ते २५ डिसेंबर १९८५

दिनांक २३ ते २५ ऑक्टोबर : कै. ना . के. बेहेरे स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. य. दि. फडके, मुंबई यांनी "कॉंग्रेस आणि महाराष्ट्र–१८८५ ते १९२०, १९२० ते १९४७ व १९४७ ते १९६०" या विषयावर तीन पुष्पे गुंफली. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते प्रा. भा. ल. भोळे. या रोचक व्याख्यानमालेला तिन्ही दिवस चांगलाच प्रतिसाद होता.

दिनांक ३१ ऑक्टोबर : भारताच्या माजी पंतप्रधान कै. श्रीमती इंदिरा गांधी ह्यांचा प्रथम स्मृतिदिन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पाळण्यात आला.

दिनांक ४ व ५ नोव्हेंबर : वि. सा. संघाच्या सांस्कृतिक समितीतर्फे दिनांक ४ व ५ नोव्हेंबर १९८५ रोजी गडकरी सभागृहात पुणे येथील एक अभ्यासक श्रीयुत नारायण यादव जोशी यांची "मंत्रशास्त्र आणि आधुनिक विज्ञान" या विषयावर दोन व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. गडकरी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दिनांक ४ नोव्हेंबर रोजी उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी भूषविले व दिनांक ५ नोव्हेंबर रोजी अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष डॉ. शि. गो. देशपांडे हे होते. श्रीयुत जोशी यांनी आपल्या व्याख्यानात वेदातील प्राचीन मंत्रांचे सध्याच्या युगातील विज्ञानाशी सांगड घालून अतिशय सुलभपणे उकल करून दाखविली. दुसरे दिवशी श्री. जोशी यांनी श्रोत्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. डॉ. शि. गो. देशपांडे यांनी समयोचित समारोप केला. दोन्ही दिवशी कार्यक्रमाचे संचलन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

वि. सा. संघ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नागपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक ५ नोव्हेंबर ८५ रोजी सायंकाळी ६ वाजता टिळक सभागृहात मराठी रंगभूमिदिन साजरा करण्यात आला. नागपुरातील प्रथितयश नट व दिग्दर्शक श्री. राजाभाऊ पाठक यांच्या हस्ते नटराजपूजन झाले. याप्रसंगी सर्वश्री राजाभाऊ पाठक, ज. रा. फणसळकर, प्रा. गोखले (अमरावती) हजर होते. मदन गडकरी यांच्या "नाटक झाले जन्माचे" या एकपात्री नाटकाचा त्यांनी स्वत: प्रयोग सादर केला. श्रीयुत मदन गडकरी यांचे वि. सा. संघातर्फे श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्री. विलास तरणकंठीवार यांनी केले.

दिनांक ६ ते १० नोव्हेंबर : विदर्भ साहित्य संघाने दिनांक ६ ते १० नोव्हेंबर ८५ पर्यंत धनवटे रंगमंदिरात झालेल्या बालनाट्य स्पर्धेत रंजन कला मंदिरने सादर केलेल्या "आम्ही अजाण पाखरे" या नाटिकेने निर्मिती, दिग्दर्शन, लेखनादी एकूण सात पारितोषिके पटकावून आजपर्यंतच्या बालनाट्य स्पर्धेच्या इतिहासात विक्रमच केला आहे.

रविवार दिनांक १० नोव्हेंबर १९८५ रोजी उपरोक्त नाट्य स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्रीयुत वामन तेलंग यांच्या उपस्थितीत पार पडला. परीक्षकांपैकी

श्रीयुत अमर रामटेके यांनी यथोचित शब्दात स्पर्धेतील एकांकिकांचे परिशीलन केले. दुसऱ्या परिक्षिका सौ. नलिनी लाडकर यांनी निकाल घोषित केला. पारितोषिक वितरणाअगोदर बाल प्रेक्षकांसाठी हैद्राबाद येथील जादूगार कु. के प्रसुना यांचे जादूचे प्रयोग वि. सा. संघाने श्रीयुत राजीव रत्नपारखी यांच्या सहकार्याने सादर केले. वि. सा. संघातर्फे कु. प्रसुना हीस रु. ५१/– मानधन देण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन श्रीयुत प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

श्री. अमर रामटेके, सौ. सुहासिनी लाडकर व सौ. शोभा उवगडे या तीन परीक्षकांनी स्पर्धेत झालेल्या १२ एकांकिकांचे मूल्यमापन करून खालील निकाल जाहीर केला.

निर्मिती–प्रथम (रु. ३०१) रोख व रंजन कला मंदिर फिरता चषक : "आम्ही अजाण पाखरे" (रंजन कला मंदिर), द्वितीय (रु. २०१) रोख : "यंत्रयुगाची ऐसी तैसी' (उषःकाल कलानिकेतन) आणि तृतीय (रु. १०१) रोख : "नवे गोकुळ" (म. पां. देब स्मृती लोकांची शाळा)

दिग्दर्शन–प्रथम (रु. २५) रोख–श्री. पराग कुळकर्णी (आम्ही अजाण पाखरे)–द्वितीय (रु. १५) रोख सौ. अंजली अहिरकर (नवे गोकुळ) आणि तृतीय (रु. १०) रोख श्री. रंजू पैठणकर (यंत्रयुगाची ऐसी तैसी)

लेखन–सौ. पुष्पा काणे (आम्ही अजाण पाखरे)

अभनय–(मुले)–प्रथम (रु. २५ व रु. १५ पालकर पारितोषिक) राजेंद्र हरकरे (पाखरे मधील मन्या)–द्वितीय (रु. १५ रोख) पराग काळे (भातुकली निर्मित "गोकुळचा चोर" मधील श्रीकृष्ण) व तृतीय (रु. १०) स्वप्निल चौधरी (पाखरे मधील पप्पू)

अभिनय–(मुली)–प्रथम (रु. २५) कु. शीतल पाटील (यंत्रयुगाची ऐसी तैसी मधील डॉली)–द्वितीय (रु. १५) कु. अपर्णा केळकर (नवे गोकुळमधील सोंगाड्या) व तृतीय (रु. १०) कु. रेश्मा कुळकर्णी (पाखरे मधील चिमी)

उत्तेजनार्थ–उज्वल मुठाळ (यंत्रयुगाची मधील विनय) आणि कु. सीमा काळे (पाखरे मधील पिंकी).

दि. १४ नोव्हेंबर : भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन साजरा करण्यात आला.

दि. १५ नोव्हेंबर : कै. पू. विनोबाजी भावे ह्यांचा स्मृतिदिन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पाळण्यात आला.

परीक्षा समिती :

सप्टेंबर १९८५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध परीक्षांचे निकाल दिनांक १५ नोव्हेंबर ८५ रोजी जाहीर करण्यात आले. सर्व केन्द्रांना प्रमाणपत्रे पाठविण्यात आली.

शासकीय कर्मचाऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या मराठी प्रवीण परीक्षेत श्री. केशव गणेश जोशी सर्वप्रथम आले व मराठी प्राज्ञ परीक्षेत श्री. मुरलीधर होत्तचंद झामनानी सर्वप्रथम आले. मराठी प्रवीण परीक्षेचा निकाल ४२ प्रतिशत व मराठी प्राज्ञ परीक्षेचा ५० प्रतिशत लागला.

आगामी सत्रातील परीक्षा दिनांक १ व २ फेब्रुवारी ८६ रोजी आहेत.

दिनांक १६ नोव्हेंबर : वि. सा. संघ सांस्कृतिक समितीच्या वतीने महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भारताच्या एक थोर समाजकार्यकर्त्या श्रीमती गोदावरीबाई परूळेकर यांचे "वास्तव परिस्थिती व आजचे वाङ्मय" ह्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. ह्या व्याख्यानाला असंख्य श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अनुक्रमणिका

विख्यात चित्रकार श्री. वि. रा. उपाख्य बापुसाहेब आठवले ह्यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव पारित करण्यात आला व श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दिनांक २१ नोव्हेंबर : विदर्भ साहित्य संघाच्या घाटंजी येथे दिनांक २३ व २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या ३७ व्या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. मधुकर केचे ह्यांचा सत्कार समारंभ गडकरी सभागृहात सायंकाळी ६–३० वाजता आयोजित करण्यात आला होता. ह्या समारंभाचे अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर होते. प्रा. या. वा. वडस्कर यांच्या भाषणासमवेतच डॉ. वि. भि. कोलते ह्यांचे आशीर्वादपर भाषणही ह्या समारंभात झाले.

दिनांक २३, २४ व २५ नोव्हेंबर वि. सा. संघाचे ३७ वे साहित्य संमेलन घाटंजी जि. यवतमाळ येथे या दिवशी झाले. संमेलनाचे अध्यक्ष विदर्भातील सुप्रसिद्ध कवी प्रा. मधुकर केचे होते.

दिनांक २४ नोव्हेंबर : वि. सा. संघाच्या संगीत समितीतर्फे श्रीराम संगीत महाविद्यालयाचे संस्थापक कै. पंडित शंकरराव सप्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मुंबईचे सुप्रसिद्ध गायक ज. वि. भातखंडे यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांना हार्मोनियमवर श्रीराम सप्रे व तबल्यावर दिलीप मूर्ते यांनी उत्तम साथ केली. श्री. भातखंडे यांनी सकाळचे राग उत्तम रीतीने सादर करून जाणकार रसिकांची वाहवा मिळवली. श्री. पी. व्ही. कामत मुख्य कार्यकारी अभियंता यांनी कलाकारांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व आमंत्रक श्री. केशव जोशी यांनी आभार प्रदर्शन केले.

दिनांक २७ नोव्हेंबर : कै. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांचा स्मृतिदिन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजरा करण्यांत आला.

दिनांक २९ नोव्हेंबर : शासकीय विभागीय ग्रंथालय व वि. सा. संघ यांच्या संयुक्त विद्यमाने "दिवाळी अंक १९८५" हे प्रदर्शन गडकरी सभागृहात भरविण्यात आले. हे प्रदर्शन दोन दिवस सर्वांसाठी विनाशुल्क खुले होते.

दिनांक ३० नोव्हेंबर : महाराष्ट्र कवी य. दि. पेंढारकर उपाख्य कवि यशवंत यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव पारित करण्यात येऊन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कीर्तन महोत्सव

पहिला वैदर्भीय कीर्तन महोत्सव वि. सा. संघाने धनवटे रंगमंदिरात आयोजित केला. हा महोत्सव ३० नोव्हेंबर व १ आणि २ डिसेंबर ह्या तीन दिवसात झाला. संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी महोत्सवाचे उद्घाटन केले. विदर्भातून ह. भ. प. राजाभाऊ दिग्रसकर, सौ. जानकीबाई पोतदार, ह. भ. प. बाबासाहेब साल्पेकर, ह. भ. प. प्रा. न. चिं. अप्पामार्जने, मुकुंदबुवा देवरस, सौ. संध्याताई डबीर, प्रा. शंकरराव शास्त्री, मोहनबुवा कुबेर, ह. भ. प. मधुकरबुवा गणोरकर, दादाबुवा देवरस, श्यामबुवा धुमकेकर, प्रा. ह. चं. घोंगे, प्रा. डॉ. दिलीपबुवा डबीर इत्यादी नामवंत कीर्तनकारांनी विविध पौराणिक, धार्मिक, राष्ट्रीय, ऐतिहासिक कीर्तने सादर करून आपल्या रसाळ वाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. ह्या संमेलनांचे संयोजक श्री. मामासाहेब भांबूरकर व आमंत्रक प्रा. डॉ. दिलीप डबीर होते. संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकरांनी अपेक्षा व्यक्त केली की, कीर्तनकारांनी सांस्कृतिक प्रदूषण दूर करावे. आम्ही साहित्यिक हे शब्दांचे पुजारी असतो, तर कीर्तनकार हे अर्थाचे उपासक असतात. त्यामुळे कीर्तनकारांना हे शक्य आहे. कीर्तन संमेलनाच्या समारोपाचे दिवशी गोपालकाला करण्यात आला. कीर्तन महोत्सवाला तिन्ही दिवशी रंगमंदिर श्रोत्यांनी गजबजून गेले होते. कीर्तन संमेलनाचा समारोप डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे ह्यांनी प्रो. नी. र. वऱ्हाडपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत केला.

दिनांक १ डिसेंबर : मूर्तिजापूर येथे झालेल्या ९ व्या वऱ्हाडी साहित्य-संमेलनात वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग व चिटणीस श्री. योगेश बऱ्हाणपुरे यांनी प्रतिनिधित्व केले.

दिनांक २ डिसेंबर : प्रा. डॉ. वि. गं. कावळे व दादा धर्माधिकारी यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव पारित करण्यात आला व श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दिनांक ४ डिसेंबर : नागपूरच्या प्रबोधन विचार मंच व्यासपीठाच्या वतीने व विदर्भ साहित्य संघाच्या सहकार्याने म. फुले पुण्यस्मृतिनिमित्त गडकरी सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ प्रकाश खरात होते व वक्ते डॉ. खांदेवाले, नेताजी राजगडकर व डॉ. लाघवे हे होते. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रदीप मुक्तिबोध ह्यांनी केले.

दिनांक ६ डिसेंबर : कै. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

दिनांक १० डिसेंबर : विदर्भ साहित्य संघातर्फे गडकरी सभागृहात "किल्ले रायगड" हा स्लाईड शो श्री. जगन्नाथ चव्हाण, पुणे यांनी आयोजित केला. या स्लाईड शोचे रसाळ निवेदन सुप्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. बाबासाहेब पुरंदरे यांचे होते तर संगीत श्री. हृदयनाथ मंगेशकर यांचे होते.

दिनांक १४ डिसेंबर : कै. ग. दि. माडगूळकर ह्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

वि. सा. संघाच्या परीक्षा समितीच्या वतीने इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी "मराठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले."

कार्यशाळेच्या ह्या सत्राला १४ डिसेंबर पासून सुरुवात झाली. हे सत्र जानेवारी ८६ च्या ५ तारखेपर्यंत प्रत्येक शनिवार-रविवार होईल. ह्या सत्रात सर्वश्री बाबासाहेब नंदनपवार, किरण देशपांडे व वसंतराव पाठक ह्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

दि. १४ व १५ डिसेंबर वि. सा. संघ शाखा वाडेगांव, जिल्हा अकोला येथे दिनांक १४ व १५ डिसेंबर या दोन दिवशी जिल्हा साहित्य संमेलन घेण्यात आले. उद्‌घाटक होते डॉ. मधुकर वाकोडे तर या संमेलनाचे अध्यक्ष संमेलनाध्यक्ष होते सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी प्रा. विठ्ठल वाघ. या संमेलनाचा समारोप वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य. राम शेवाळकर यांनी केला.

दिनांक २१ डिसेंबर विदर्भ साहित्य संघ व नाट्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य संघाच्या टिळक सभागृहात, सुप्रसिद्ध नाटककार व पटकथालेखक श्री. मधुसूदन कालेलकर आणि नाट्यपरिषदेचे उपाध्यक्ष श्री. भाऊसाहेब सप्रे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त करण्यात आल्या व त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. साहित्य संघाचे उपाध्यक्ष श्री. वामन तेलंग हे अध्यक्षस्थानी होते.

शाखावृत्त

मारेगाव : मारेगाव येथे दिनांक २९-१०-८५ रोजी विदर्भ साहित्य संघ शाखेच्या विद्यमाने कोजागिरी कार्यक्रमामध्ये नवोदित कवी-कथाकार-लेखक यांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. आयोजक प्रा. ताकसांडे, कार्याध्यक्ष वि. सा. संघ शाखा मारेगाव हे होते. श्री. कवीश्वर काळे, जेसीज अध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नेरपरसोपंत : गेल्या महिन्यात डॉ. सुधाकरराव पुरी ह्यांचे अध्यक्षतेखाली वार्षिक सभा घेण्यात आली. या सभेत खालीलप्रमाणे कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

(१) कार्याध्यक्ष : डॉ. राजाभाऊ खोडवे (२) कार्योपाध्यक्ष : श्री. विलास राखडे (३) सचिव : श्री. श्रीरंग गोळे (४) सहसचिव : (१) श्री. भैयासाहेब देशमुख (२) श्री. सुधीर कुळकर्णी (५) खजीनदार : श्री. सुखदेवराव भाकरे, (६) सदस्य : सर्वश्री पुरी, पांडे, मिसाळ, पं. पांडे, घोरे, डॉ. शर्मा, पासुळकर, मिर्झा रफी बेग, बावू पाटील, सु. खोडवे, प्रा. निकस.

अनुक्रमणिका

नांदुरा : ३१-१०-८५ रोजी शाखेतर्फे श्री. श्याम काळवीट यांनी इंदिराजींच्या प्रथम स्मृतिप्रीत्यर्थ भाव पुष्पांजली अर्पण केली.

बुलढाणा : दिनांक ३१-८-८५ व १-९-८५ रोजी शाखेतर्फे बुलढाणा जिल्हा महिला साहित्य संमेलन, संमेलन अध्यक्षा सौ. विद्या कावडकर यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. उद्घाटक सौ. इंदुमती लहाने, वाशीम ह्या होत्या. कथाकथन : उत्तरा कुळकर्णी ह्यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. ह्यात सौ. गोदावरी पाटील, सौ. धामणेकर, सौ. सुमन कुळकर्णी, सौ. सावजी, सौ. खोत व सौ. मालती निमदेव चिखली आदींनी भाग घेतला.

३१-८-८५ ला रात्री पुढील विषयावर परिसंवाद सौ. तारे ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाला. विषय : साहित्यातील स्त्रीचे रेखाटन अवास्तव आहे. ह्यात इंदुमती लहाने, सौ. विद्या कावडकर, सौ. खडकीकार यांनी भाग घेतला. संमेलन प्रमुख सौ. सरला राजनकर ह्यांनी संचालन केले.

१-९-८५ रोजी "स्त्री स्वतंत्र आहे" या विषयावर वादविवाद झाला. त्यात युवती व वयस्क वक्त्या होत्या. माधुरी सरदेशमुख, सौ. दामले, सौ. धामनेकर, सौ. शुक्ला. सौ. पाठक, मंगलाताई तारे, क्रांती चव्हाण, जया मिश्रा, शोभा पाटील, चंद्रावती वानखेडे, सुधा धामणेकर, शुभदा धांडे, माधुरी बोहटे, सौ. प्रभा चित्रोले, छाया डोळे, आदी होत्या. अध्यक्षस्थानी सौ. खडकीकर होत्या.

काव्यमैफील या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. गोदावरी पाटील होत्या व संचालन सौ. सुरेखा भगत यांनी केले. ह्यात सुमन फडके, मालती वर्तक, निलीमा काळकर, नीला केळकर, सौ. बयाणी, मीरा देशपांडे, मीरा दंडवते, पारल झगडे, रजनी जोशी, विद्या साठे, सरोज शुक्ला, सौ. सुमंगला पाठक, वर्षा सूर्यवंशी, गोदावरी पाटील, माधुरी सरदेशमुख, सुमन कुळकर्णी, वैशाली अंजनकर, छाया डोळे, आदींनी भाग घेतला होता.

खुले अधिवेशन (समारोप) सौ. गाडगीळ ह्यांचे अध्यक्षतेखाली झाले. प्रास्ताविक व संचलन सौ. उषाताई देशपांडे ह्यांनी केले. अधिवेशनात पाच ठराव घेतले. वरील कार्यक्रमासाठी संमेलन प्रमुख सौ. सरला राजणकर व कोषप्रमुख सौ. अरुणा कुल्ली ह्यांनी काम केले. रंगमंच व्यवस्था श्री. वाडेकर, भोजन व्यवस्था पाटील, म्हस्केंनी केली. संमेलन यशस्वितेसाठी श्री. शंकर कन्हाडे, श्री. गो. या. सावजी, श्री. मधुसूदन इंगळे, श्री. रंगनाथ गायकवाड ह्यांनी अतिपरिश्रम केले.

दिनांक १५-९-८५ रोजी येथील रविंद्र करमरकर ह्यांचे अमेरिकन व भारतीय संस्कृती मधील विरोध या विषयावर भाषण झाले. प्रास्ताविक भास्करराव देशपांडे, व आभारप्रदर्शन गो. या. सावजी, संचलन श्री. शंकर कन्हाडे व व्यवस्थापन श्री. मधु इंगळे व रंगनाथ गायकवाड ह्यांनी केले.

दिनांक ३-१२-८५ रोजी मासिक सभेत महाराष्ट्र कवी यशवंत ह्यांना शाखेतर्फे श्रद्धांजली अर्पण केली.

दि. २२-१२-८५ रविवारला ह्या शाखेची विदर्भ साहित्य संघाच्या ३८ वे सम्मेलन बाबत आमसभा होवून तीत सम्मेलन यशस्वितेसाठी २ समित्या नियुक्त करण्यात आल्या-सम्मेलन सचिवसाठी शंकर कन्हाडे व निधी प्रमुख साठी रंगनाथ गायकवाड ह्यांच्या नियुक्त्या झाल्यात.

दि. २३-१२-८५ सोमवारला चंद्रपूरचे प्रा. सुरेश द्वादशीवार ह्यांचे राजकारणातील सत्य व संभ्रम विषयावर भाषण झाले. संचलन शंकर कन्हाडे ह्यांनी केले.

अकोला : सोमवार दिनांक १८-११-८५ रोजी सायंकाळी रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाच्या परिसरात घाटंजी येथील वि. सा. संघाच्या ३७ व्या साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. मधुकर केचे यांचा सत्कार शाखेचे ज्येष्ठ सभासद प्राचार्य म. गो. जोशी यांनी श्रीफळ व पुष्पहाराने सन्मानित केला. या प्रसंगी प्रा. केचे यांनी एक पंजाबी कथाकथन करून कार्यक्रमात रंजकता आणली.

गोंदिया : दिनांक २१ ते २३ नोव्हेंबर ८५ पर्यंत शाखा व विवेकानंद वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर (निपाणी) येथील प्रा. रंघुनाथ ज. भालेराव यांचे "युगाचार्य स्वामी विवेकानंद व समग्र अभ्यास" या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम पार पडला. श्री. दीपक एदलाबादकर यांच्या प्रास्ताविकाने सुरुवात झाली तर श्री. भागवत कातरकर यांनी समारोप केला.

पांढरकवडा : दिनांक ५, ६ व ७ नोव्हेंबर ८५ रोजी शाखेतर्फे प्रथितयश कवयित्री व विख्यात विदुषी प्रा. डॉ. प्रभा गणोरकर मुंबई यांची पं. कासमभाई खेताणी स्मृती व्याख्यानमालेंतर्गत "आजचे मराठी साहित्य", "मराठी साहित्यातील स्त्रीदर्शन" व "स्त्री मुक्ती : काही समज काही गैरसमज" या विषयावर स्थानीय श्रीगोपाल कृष्ण मंदिरात व्याख्याने झालीत. शाखा सचिव प्राचार्य उत्तम रूद्रवार यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. ही व्याख्यानमाला साहित्य संघाला दिल्याबद्दल शाखेचे उदारमनस्क आश्रयदाते श्री. मजीद सेठ खेतानी यांचे स्वागत करण्यात आले. शाखाध्यक्ष श्री. राजाभाऊ शेकदार याप्रसंगी उपस्थित होते.

उमरखेड : महाराष्ट्रातील ख्यातनाम संत-साहित्याचे व्यासंगी अभ्यासक व वारकरी सांप्रदायाचे प्रसारक ह. भ. प. श्री. शंकर महाराज खंदारकर ह्यांचे निधनानिमित्त एक शोक सभा घेण्यात येऊन त्यांच्या पावनस्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

यवतमाळ : वि. सा. संघ शाखेच्या वतीने 'जागर' हे अंधश्रद्धेवर आधारित व प्रा. अशोक राणा दिग्दर्शित. 'भोपाळ' हे शंतनू अभ्यंकर लिखित व अरुण राऊळकर दिग्दर्शित आणि 'प्रतिज्ञा' हे श्यामला वनारसे लिखित व सुरेश बारसे दिग्दर्शित अशी तीन पथनाटचे बसविण्यात आलीत.

घाटंजी येथे संपन्न झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनात या तिनही पथनाटचांचे एकूण आठ प्रयोग सादर करण्यात आले. भोपाळ वायु दुर्घटनेच्या पहिल्या स्मृतिदिनी यवतमाळ येथे शहरात सात प्रयोग सादर केले गेले व नगरभवन येथे अ. मा. सगणे यांचे व्याख्यान नगराध्यक्ष अॅड. काकासाहेब चमेडिया यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

१५ डिसेंबर रोजी नगरभवनात 'युवासर्वस्व द्वारा आयोजित युवा संमेलनातही वरील तिन्ही पथनाटचांचे प्रयोग झाले.

या पथनाटचात सर्वश्री अशोक राणा, अरुण राऊळकर, अविनाश शिर्के, कु. सुजाता देशमुख, सुलभा सरोदे, प्रज्ञा देशपांडे, विकास पंडित, मंगेश हातगावकर, गजानन वानखडे, शांती जाधव, मंगेश बुटके, मयूर राजा, संतोष धाये, अशोक काळे व अरविंद गोरे यांनी भूमिका केल्या.

मूर्तिजापूर येथेही २४ डिसेंबर रोजी ही पथनाटचे सादर केली गेली.

जवाहरनगर : जवाहरनगर शाखेची सर्वसाधारण सभा सोमवार दि. २ डिसेंबर रोजी श्री. मधुकरजी कणेर यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. सभेत दिवंगत साहित्यिक महाराष्ट्र कवी यशवंत, आचार्य काका कालेलकर स्थानिक अध्यापिका श्रीमती सिंधु जोशी यांचे स्व. पती वसंतराव जोशी आणि गेल्या वर्षी दुर्वी भोपाल दुर्घटनेत मृत पावलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सध्याच्या अस्थायी समिती ऐवजी पुढील कार्यकालासाठी (३ वर्षे) स्थायी कार्यकारी मंडळाची सर्वानुमते निवड करण्यात आली.

स्थायी कार्यकारी मंडळ

१. कार्याध्यक्ष-श्री. मधुकरजी कणेर-मुख्याध्यापक, फॅक्टरी स्कूल २. कार्योपाध्यक्ष-श्री. माधवराव ब्राम्हणकर, चार्जमन / बी. ई. ३. सचिव-श्री. हिरामण लांजे, रमानंद / डब्ल्लू. आई. ४. सहसचिव-श्री. सुरेश कवडसकर, सुपरवाईजर बी. टी. ५. खजिनदार-श्री. चंद्रकांत बोरकर, सुपरवाईजर / एन. आर. ६. कार्यक्रम प्रमुख-श्री. विनोद दुरगकर, चार्जमन / डब्ल्यू. आई. ७. सदस्य श्री. देवरामजी महाजन, अध्यापक / फॅ. स्कूल श्री. राजाभाऊ काळबांधे, सुपरवाइजर / बी. ई. श्री. रूपरोशन रोटके, सुपरवाइजर / बी. ई. श्री. मुकेश लांजेवार, चार्जमन / सी. पी.

सिंदेवाही : नवीन वर्षाकरिता खालील कार्यकारिणीची निवड झाली :

कार्याध्यक्ष–भुजंगराव वगडे गुरुजी (आमदार) कार्योपाध्यक्ष–सुधाकरराव मुल्लेवार सचिव–सहसचिव–बाबुराव परसावार खजिनदार–प्रा. देवराव बोरकर, अशोक साळवे सदस्य सर्वश्री–दे. वि. कळमकर, म. वि. बोटकावार, एन. यु. कुंदावार, अ. वा. चिंतलवार स्पर्धा प्रमुख–दे. वि. कळमकर. परीक्षा समिती प्रमुख–रा. रा. शिवणकर कार्यक्रम प्रमुख–सु. बा. मुल्लेवार.

विदर्भ साहित्य संघ सिंदेवाही शाखेच्या वतीने येथील समाज मंदिरात विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांचे हस्ते प्रा. श. गो. चरडे लिखित 'काव्यगंगा' या कविता संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार श्री. ना. सी. कातोरे होते. शहरी माणसाची रसिकता तृप्त करण्याचे अनेक मार्ग आहेत. खेडे विभागातील रसिकता जोपासण्याचे कार्य विदर्भ साहित्य संघानी करावे असे विचार प्रा. श्री. शेवाळकर यांनी कविता संग्रह प्रकाशन समारंभ प्रसंगी व्यक्त केले. सर्वप्रथम स्थानिक विदर्भ साहित्य संघ शाखेचे सचिव श्री. अशोक साळवे यांनी अहवाल वाचन केले तर श्री. दे. वि. कळमकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. देवराव बोरकर यांनी आभार मानले. याप्रसंगी सर्वश्री बाळासाहेब लिमये प्रा. मदनराव धनकर प्रा. सुरेश द्वादशीवार व निमंत्रित मंडळी उपस्थित होती.

विदर्भ साहित्य संघ सिंदेवाही शाखेचे कार्याध्यक्ष श्री. भुजंगराव मुकुंदराव वगडे गुरुजी यांची चिमूर निर्वाचन क्षेत्रातून महाराष्ट्र विधानसभेवर प्रचंड बहुमतानी निवड झाल्याबद्दल त्यांचा सिंदेवाही शाखेतर्फ सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सर्वश्री दे. वि. कळमकर, रा. रा. शिवणकर, एन. यु. कुंदावार, सुधाकरराव मुल्लेवार यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संचालन शाखा सचिव श्री. अशोक साळवे तर सहसचिव श्री. बाबुराव परसावार यांनी आभार प्रदर्शन केले.

गडचिरोली : वि. सा. संघ शाखा गडचिरोलीचे उद्घाटन प्रा. राम शेवाळकर यांचे हस्ते मंगळवार दि. २४ डिसेंबर १९८५ रोजी झाले.

नवीन वर्षाकरिता खालीलप्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली.

कार्याध्यक्ष : गो. ना. मुनघाटे, कार्योपाध्यक्ष : संभाजी होकम, सचिव : प्रा. अरविंद वंदे, सहसचिव : वासुदेव मुते, कोषाध्यक्ष प्रा. रा. कृ. ठाकरे, कार्यक्रम प्रमुख प्रमोद मुनघाटे, सदस्य : विजय धाईत, प्रा. किरमोरे, प्रा. मेश्राम, नी. ज. मांदाडे, ना. शि. पाटील.

देणग्या :

(१) श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या ग्रंथसंग्रहांत नागपूरचे पत्रकार व नाट्यसमीक्षक श्री. वसंत सदाशिव नानल यांनी 'नाट्यदर्पण'चे बांधीव अंक देणगी दाखल दिल्याने नाट्यविषयक संदर्भाची चांगली सोय झाली आहे. तसेच वि. सा. संघाचे जुन्या पिढीतील कार्यकर्ते कै. र. वि. कुळकर्णी यांच्या संग्रही असलेले युगवाणी, सह्याद्री इत्यादी नियतकालिकांचे महत्त्वाचे व दुर्मिळ अंक त्यांचे जामात श्री. श्याम सरवटे ह्यांनी देणगीदाखल दिले.

(२) स्व. अहिल्याबाई सीताराम चौधरी स्मृती व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठी या वर्षीच्या खर्चाकरिता रुपये १००१–०० एका अनामिकाकडून मिळाले.

(३) स्व. उमापद गुप्ता स्मृती प्रीत्यर्थ हिंदी रंगमंचाकरिता रुपये ६६००/– ची देणगी श्री. सुवीमल गुप्ता, कलकत्ता यांनी श्री. कनु मशरुवाला, अकोला यांचे मार्फत वि. सा. संघाला दिली.

नवीन मान्यता प्राप्त शाखा

कोठारी (जिल्हा–चंद्रपूर). शेगांव (जिल्हा–बुलढाणा)

नवीन आजीव सभासद

१. श्री. पंकज त्र्यंबक चांदे. २. श्री. शेखर कमलाकर वेंद्रे. ३. श्री. दिलीप मोरेश्वर पंढरपूरकर (सर्व नागपूर) ४. श्री. उपेन्द्र दामोधर कुळकर्णी (पुणें) ५. श्री. अशोक गोपाळ साठे (ठाणें)

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,

नोव्हेंबर–डिसेबर १९८५ पोच

हे बोल अंतरीचे / रामदास कुहिटे / अज्ञात प्रकाशन न्यू रेल्वे कॉलनी सिन्दी मेघे वर्धा / पृ. ८८ / रुपये १५/–

खुणेचे पान / सौ. मनकर्णिका जोग / निळकंठ प्रकाशन / १६४३ सदाशीव, पुणे–३०/ पृ. ७२ / रुपये १४/–

युद्ध / निलकांत चव्हाण / कविता प्रकाशन, चौक मंडई, वेळेगल्ली ३१५२, नाशिक / पृ. ४७ / रुपये १५/–

बांडगुळे / विश्वास वसेकर / नवल पब्लीकेशन्स, ३९, अत्रे नगर, सेलू–४३१५०३ / पृष्ठ ६४ / रुपये १५/–

गझलात रंग माझा / खावर / कै. विजय अंबाडे / पारजात पब्लीकेशन ब्लॉक नं. ३, ५७६, शिवाजीनगर, पुणे–४ / पृ. ३६ / रुपये १०/–

आफत / भास्कर कुळकर्णी / किर्ती प्रकाशन, उस्मानपुरा, औरंगाबाद / पृ. १०६ / रुपये २५/–

अपघात टाळा–मालती / भ. म. भादुले / शशिकांत प्रकाशन, पूर्व वर्धमाननगर, नागपूर / पृ. ५६–पृ. २५९ / रुपये १५/– रुपये ४०/–

वा. म. जोशी–साहित्यदर्शन / वा. ल. / गो. म. कुळकर्णी / साहित्य अकादमी प्रकाशन मुंबई–१४ / पृ. २९२ / रुपये ३०/–

तरिही / अनुराधा पाटील / कुशा प्रकाशन ११९, म. गांधीनगर औरंगाबाद–५ / पृ. १०१ / रुपये ३०/–

अत्तरसुगंध / कृ. द. दीक्षित / मौज प्रकाशनगृह, मुंबई–४ / पृ. ६८ / रुपये ३२/–

घरंदाज गायकी / वा. ह. देशपांडे / मौज प्रकाशन गृह मुंबई–४ / पृ. १९९ / रु. ४०/–

माझी छाया चित्रकला / देवीदास बागुल / अभिजीत साहित्य १२६३ / आनंदभुवन जंगली महाराज पथ, पुणे–५ / पृ. ९६ / रुपये ४०/–

कागद आणि कॅनव्हास / अमृता प्रीतम / क्रांती प्रकाशन, मनवृंदावन, ओंकारनगर, जळगांव / पृ. ७६ / रुपये ३०/–

एका चरित्राचे चरित्र / द. न. गोखले / मौज प्रकाशन गृह मुंबई–४ / पृ. १६४ / रुपये ५५/–

नाटचचिंतन / डॉ. अ. द. वेलणकर / सौ. सुधा वेलणकर ३२५, गांधीनगर, नागपूर नागपूर–१० / पृ. ९९ / रुपये १६/–

दहा बाय दहा / दिलीप पु. चित्रे / प्रास प्रकाशन ३९, नाथ माधव कांदिवली पूर्व, मुंबई–१०१ / पृ. ३९ / रुपये १२/–

वसे चीना / रघु दंडवते / प्रास प्रकाशन ३९, नाथ माधव कांदिवली पूर्व मुंबई–१०१ / पृ. २२० / रुपये ४२/–

(मलपृष्ठ २ वरून)

९. मतदारांना केंद्रीय कार्यालयातून सोमवार दिनांक १७-२-१९८६ रोजी मतपत्रिका पाठविण्यात येतील.

१०. सभासदांकडून मतपत्रिका केंद्रीय कार्यालयाकडे शुक्रवार दिनांक ७-३-१९८६ ला सायंकाळी ८ वाजेपर्यंत पोचणे आवश्यक आहे.

११. मतपत्रिका-मोजणी रविवार दिनांक ९-३-१९८६ ला सकाळी ९ वाजेपासून केंद्रीय कार्यालयात सुरू होईल.

१२. निवडणुकीचा निकाल रविवार दिनांक ९-३-१९८६ ला विदर्भ साहित्य संघ केंद्रीय कार्यालयात मतमोजणी संपल्यावर लगेचच घोषित करण्यात येईल.

१३. (अ) घटना कलम १२ (ड) प्रमाणे एकूण निवडणूक प्रक्रियेविषयी तक्रार नोंदविण्याची अंतिम तारीख व वेळ सोमवार दिनांक १७-३-१९८६ सायंकाळी ७ वाजेपर्यंत ही राहील.

(ब) लवादाकडून तत्संबंधी निकाल देण्याची अंतिम तारीख मंगळवार दिनांक २५-३-१९८६ सायंकाळी ७ वाजता ही राहील.

टीप : १. नामनिर्देशपत्र विदर्भ साहित्य संघाच्या केंद्रीय कार्यालयात रोख रु. ५/- (रुपये पाच फक्त) भरून दिनांक ७-१-१९८६ पासून सायंकाळी ६-३० ते ८-३० या कार्यालयीन वेळात प्राप्त होतील. नामनिर्देशन-पत्रिकेच्या शेवटी दिलेल्या टीपेतील सूचना बंधनकारक राहतील.

२. घटना कलम १२ (अ:) प्रमाणे अध्यक्षपदासाठी रु. १००/- (रुपये शंभर फक्त) व कार्यकारिणी-सदस्यपदासाठी रु./५०- (रुपये पन्नास फक्त) प्रत्येक उमेदवारास रोख स्वरूपात किंवा बँक ड्राफ्टच्या स्वरूपात अनामत रक्कम म्हणून कार्यालयात जमा करावी लागेल. बँक ड्राफ्ट विदर्भ साहित्य संघाच्या नावे काढलेला असावा.

३. निवडणुकीसंबंधीचा सर्व पत्रव्यवहार निर्वाचनाधिकारी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सिताबर्डी नागपूर, ४४००१२ ह्या पत्त्यावर करावा. अन्य पत्त्यावर केलेल्या पत्र-व्यवहाराची जबाबदारी स्वीकारण्यात येणार नाही.

सही/-
(रामकुमार श्रीवास्तव)
निर्वाचन अधिकारी
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

नागपूर, दि. ३१ डिसेंबर १९८

अनुक्रमणिका

YUGWANI: Regd. No NGP. 275
युगवाणी / दिवाळी १९८५

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर १०

अनुक्रमणिका